


# मेधा





# मेधा

**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**
**अन्नपूर्णा परिवार**



पहिली आवृत्ती : दि.१८.८.२०

सुवास्तु प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई बेंगलोर हायवेजवळ,
वारजे, पुणे ४११०५८.

**Email :** ammco-ordinatorpune@annapurnapariwar.org
ammco-ordinatormumbai@annapurnapariwar.org

**Website :** www.annapurnapariwar.org

किंडल आवृत्ती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
मो. ९३७२७१५४२१, ९९२२९६७०००

किंमत : ₹ ४५०/-

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| | 'मेधा' ची प्रस्तावना: माझी कॉम्रेड बायको | यशवंत(जयंत) सामंत | १ |
| १. | मेधा आमची डेमॉक्रेटिक बॉस | कॉ. सुरेश धोपेश्वरकर | २० |
| २. | आता मी मेधाचा फॅन झालो आहे | कॉ. प्रसन्ना उटगी | २९ |
| ३. | ''माझी बहिण मेधा'' | प्रा.आनंद मेणसे | ४३ |
| ४. | मेधाताईंच्या सहवासात | अंजली पाटील | ४८ |
| ५. | मेधाताई, कॉ दादा पुरव, बॅंकिंग युनियन, सहकार व मी | कॉ. बाळासाहेब पिसाळ | ५४ |
| ६. | आधारवड कष्टकरी महिलेचा | वृषाली मगदूम | ५८ |
| ७. | 'अन्नपूर्णा- मेधाताई' | डॉ.संजय कुमार भोसले | ६३ |
| ८. | आपलीच मेधा | डॉ.रोहिणी गवाणकर | ६७ |
| ९. | मेधाताई माझ्या धाकट्या पिढीतील नेतृत्व | डॉ.कुमार सप्तर्षी | ७० |
| १०. | चैतन्याचा अखंड स्त्रोत | अंजली कुलकर्णी | ७२ |
| ११. | मेधा रे, मेधा रे....... | शिवराज गोर्ले | ८३ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| १२. | डॉ. सौ मेधा पुरव सामंत ची यशोगाथा | शरद कामत | ९० |
| १३. | 'हिरक षटकोन'! | संध्या, प्रतिभा, वंदना, रूपा आणि वासंती | ९४ |
| १४. | मेधा एक मैत्रिण, सखी की गुरू? | शैला दिक्षित | ९९ |
| १५. | मेधा एक आदर्श व्यक्ती व मैत्रिण | सुजाता हटकर | १०३ |
| १६. | आमची बाल मैत्रिण | मधुवंती भागवत | १०९ |
| १७. | कठोर परिश्रम : मेधा | राजलक्ष्मी पाटणकर | ११० |
| १८. | मेधा, मी व बँक ऑफ इंडिया कर्वे रोड शाखा | कल्याणी फडतरे | १११ |
| १९. | मेधाशी ३० वर्षाचे मैत्र | भास्कर भावे | ११८ |
| २०. | ध्येयासक्त मेधा | मुकुंद सातपुते | १२३ |
| २१. | मैत्रिण-बहिण | राजीव शेवडे | १२५ |
| २२. | तुसी ग्रेट हो | राजेंद्र काळे | १२७ |
| २३. | आमची चाळीस वर्ष घट्ट मैत्री आहे | मीना शेवडे | १२८ |
| २४. | शिस्तबद्ध कार्यतत्पर मेधा | श्रीधर जठार | १२९ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| २५. | अष्टवधानी मैत्रिण | वर्षा जठार | १३१ |
| २६. | धडाकेबाज मैत्रिण | उषा आहेर | १३२ |
| २७. | आमच्या मेधाचा झोका उंच उंच जावू दे | लता पावशे | १३५ |
| २८. | आधारवड : कविता | अशोक पावशे | १३७ |
| २९. | मेधा :परखड तळमळ | प्रिती घरत | १३९ |
| ३०. | लाडुली मेधा | अनुपमा देसाई | १४१ |
| ३१. | लाडक्या बहिणीस पत्र | जयमाला आजगावकर | १४३ |
| ३२. | मेधा माझी दयाळू बहिण | नलिनी सामंत | १४५ |
| ३३. | मेधाने आमच्या अन्नपूर्णाचा परिवार केला | मधुकर पुरव | १५१ |
| ३४. | आमची हळवी मेधा | सुनिल व मेधा पठारे | १५३ |
| ३५. | वहिनी नाही मैत्रिण : कविता | अपर्णा परूळेकर व लिना नाईक | १५५ |
| ३६. | माझी बहिण मेधा | अभय दादा | १५६ |
| ३७. | प्रोफेशनल नातेवाईक मेधा | कुंजा कोचरेकर | १५८ |
| ३८. | जाऊ माझी प्रेमाची : कविता | सुषमा खानोलकर | १५९ |
| ३९. | आमचा दीपस्तंभ | शिरिषा पुरव | १६० |
| ४०. | आठवणीतील मामी | प्रविणा सबनीस | १६३ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ४१. | मेधाताईः कार्यकर्त्यांचा दीपस्तंभ | संतोष बी.पी | १६६ |
| ४२. | ध्येयवेडया किमयागार | डॉ.स्मिता शहापूरकर | १७२ |
| ४३. | ताई,पाठीवर हात ठेवून सतत लढ म्हणा | गीता फाटक | १७६ |
| ४४. | अन्नपूर्णाः एक बहरलेले झाड | सुकन्या कुलकर्णी | १७९ |
| ४५. | मानस पुत्राचे मनोगत | मारूती कुडचीकर व सुषमा कुडचीकर | १८५ |
| ४६. | मेधाताई : माझी आई | रूपा प्रविण पवार | १९२ |
| ४७. | मेधाताई : आमचं वरदान | शिल्पा गौरव शेलार | १९६ |
| ४८. | मेधाताई : माझा आधार | शारदा पाटील | २०१ |
| ४९. | मेधाताई माझे आदरस्थान | अविनाश येनपुरे | २०३ |
| ५०. | आपुलकीने चौकशी करणाऱ्या ताई | प्रमोद कदम | २०५ |
| ५१. | ताई : ज्ञानवृक्ष | उज्वला वाघोले | २०६ |
| ५२. | परिसस्पर्श | आरती शिंदे | २११ |
| ५३. | परिवार जोडायला ताईंकडून शिकले | आश्विनी भरम | २१४ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ५४. | गुरू माऊली | सविता भोर | २१५ |
| ५५. | मेधाताई : प्रोफेशनल व पर्सनल जीवनाचा समतोल | मंजिरी परांजपे | २१६ |
| ५६. | ताईंच्या ज्ञानाचा समाजाला फायदा व्हावा | मोहिनी निगडे | २१९ |
| ५७. | सोशल वर्कर ते डेप्युटी मॅनेजर : मेधाताईंच्या सावलीतील प्रवास | माया जाधव | २२१ |
| ५८. | ताईंनी घातलेल्या कार्यपद्धतीमुळे मिळतो कामात आनंद | शितल कदम | २२३ |
| ५९. | मेधाताईंच्या वटवृक्षाची मी एक फांदी | सुधीर गायकवाड | २२५ |
| ६०. | ताई, तुमची शिकवण भविष्याला सावरते | कविता शेळके | २२९ |
| ६१. | ‘‘आई’’ नंतरची ‘‘आई’’ म्हणजे ‘‘ताई’’ | गणेश जगदाळे | २३२ |
| ६२. | मेधाताई : माझे प्रेरणास्थान | शिल्पा लिहिणे | २३४ |
| ६३. | मेधाताई : माझ्या गुरू | रागिणी वाघमारे | २३६ |
| ६४. | माझ्यात सामावलेल्या ताई | वैशाली चवाथे | २३९ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ६५. | मी अन्नपूर्णातील पहिली स्टाफ | कल्पना भंडारे | २४२ |
| ६६. | माझी दुसरी आई | शुभांगी राऊत | २४३ |
| ६७. | ताईंनी घडवले मला टिम लीडर | प्राची गांधी | २४८ |
| ६८. | कर्तव्य पूर्तीची ६० वर्षे | सुरेखा पादीर | २५० |
| ६९. | सदैव सकारात्मक ताई | अनिता सोनवणे | २५५ |
| ७०. | दुर्बलांना सबल करणाऱ्या ताई | सिध्दी कुलकर्णी | २५७ |
| ७१. | मेधा मॅडम : आमच्या मार्गदर्शक | लीना अकीवटे | २५९ |
| ७२. | ताई, पाणी मागितलं तर समुद्र दिला | पुष्पा बाठे | २६१ |
| ७३. | ताई शिवाय अन्नपूर्णाचा विचारच करू शकत नाही | संगिता क्षिरसागर | २६३ |
| ७४. | ताईंमुळे डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आली | आश्विनी वंगारी | २६६ |
| ७५. | आमच्या माऊली मेधाताई | हसिना शेख | २६८ |
| ७६. | अन्नपूर्णा ने ओळख दिली | ज्योती शिंदे | २७० |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ७७. | माझी दुसरी आई, गुरू माऊली! | संगिता कांबळे | २७३ |
| ७८. | ताई मालक नाहीत, आम्ही कामगार नाही | रेखा म्हस्के | २७५ |
| ७९. | प्रिय ताई | वैजयंता वाळुंज | २७७ |
| ८०. | ताई म्हणजेच अन्नपूर्णा | सायरा पठाण | २७८ |
| ८१. | मेंबर म्हणून आले, ब्रँच मॅनेजर झाले | ज्योती पवार | २७९ |
| ८२. | अन्नपूर्णा आणि मेधाताई | पुष्पा तायडे | २८० |
| ८३. | ताईंनी आई होऊन सर्व शिकवलं | सुनिता कमले | २८१ |
| ८४. | अन्नपूर्णाने कर्ज मुक्त केले | सुहासिनी कुळ्ये | २८३ |
| ८५. | अन्नपूर्णा माझे सासर माहेर | सुनिता पाटील | २८४ |
| ८६. | आमच्यासाठी चॉकलेट आणतात आमच्या ताई | अनिता होनागुडी | २८५ |
| ८७. | ताईः आमच्या वाळवंटातील गोड झरा! | सुवर्णा वाघमारे | २८७ |
| ८८. | मेधाताई : आमचा ऊर्जा स्त्रोत | कल्पना सोनवणे | २९० |
| ८९. | मेधाताई : माझ्या आयडॉल | संजना जंगम | २९२ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ९०. | जगण्याला उमेद देणाऱ्या ताई | निलीमा दळवी | २९३ |
| ९१. | अन्नपूर्णा परिवाराचा आधारस्तंभ | लता महाजन | २९५ |
| ९२. | तुम जियो हजारो साल | स्मिता पेडगावकर | २९६ |
| ९३. | ताई, तुमच्यामुळे ताठ मानेने जगतो | ज्योत्स्ना सर्णेकर | २९७ |
| ९४. | 'मी'' नाही''आम्ही'' | ज्योती पाटील | २९८ |
| ९५. | ताई कुंभार, आम्ही मडकी | सुजाता गुंड | ३०० |
| ९६. | आम्हाला मान मिळवून देणाऱ्या ताई | एक स्टाफ | ३०१ |
| ९७. | मेधाताई म्हणजे जिद्द | कल्पना टेमघरे | ३०२ |
| ९८. | मूर्ती व कीर्ती दोन्ही महान | प्रियंका कानगुडे | ३०३ |
| ९९. | मेधाताईंनी जीवनाला दिशा दिली | मनिषा पवार | ३०४ |
| १००. | माझी ओळख मिळाली | खैरून्निसा शेख | ३०५ |
| १०१. | स्वतःच्या पायावर उभी राहिले | सुवर्णा चोरगे | ३०६ |
| १०२. | स्वतःचे घर, व्यवसाय झाला | आम्रपाली सोनवणे | ३०७ |
| १०३. | शून्यातून वर आणले | कविता थोरात | ३०८ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| १०४. | ताईंनी दिले सन्मानाचे जीवन | छाया महामुनी | ३०९ |
| १०५. | तुम्ही माय मी लेकरू | अनिता ढोले | ३११ |
| १०६. | दुःखात दिली साथ | निर्मला चंदरगी | ३१३ |
| १०७. | ताईंमुळे पायावर उभे राहिलो | भारती सिरसाल | ३१४ |
| १०८. | माझे घराचे स्वप्न पूर्ण झाले | मीना वाघ | ३१५ |
| १०९. | मेधाताई : जीवनाला उमेद देणाऱ्या | संध्या नागटिळक | ३१६ |
| ११०. | आमच्या मैत्रिण ताई | सुलभा ढवळे | ३१७ |
| १११. | अबला नाही सबला | संतोषी गाढवे | ३१८ |
| ११२. | आभाळा एवढया उंच ताई | सोनी सबावल | ३१९ |
| ११३. | गोरगरीबांच्या देव माणूस ताई | स्वाती रणदिवे | ३२० |
| ११४. | ताईं सोबत आम्ही आमची बँकच काढली | शेवंताबाई | ३२२ |
| ११५. | कोणी साथ देत नव्हतं, तेव्हा ताईचा हात मिळाला | सुशिलाबाई साळेकर | ३२४ |
| ११६. | मेधाताई नेहमी डोळयासमोर दिसतात | लिलाबाई ढोक | ३२५ |
| ११७. | ताई देतात चांगली शिकवण | स्वप्नाली | ३२६ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| ११८. | ताईंनी माझ्या चंच्या ऑस्ट्रेलियाला नेल्या | कविता जाधव | ३२७ |
| ११९. | आर्थिक व वैचारिक बदल अन्नपूर्णामुळे घडले | शिवानी कांबळे | ३२८ |
| १२०. | ताईंनी सामाजिक ज्ञान वाढवले | स्वाती वाघमारे | ३२९ |
| १२१. | स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी | जयश्री मोहिते | ३३० |
| १२२. | आज माझ्याकडे बचत आहे | कोमल गायकवाड | ३३१ |
| १२३. | ताईंची शिकवण: घेण्यात नाही,देण्यात मजा आहे | वर्षा गायकवाड | ३३२ |
| १२४. | समान संधी सर्वांना | रेश्मा तांबोळी | ३३३ |
| १२५. | ताईंनी आम्हाला शिखर दाखवले | आशा एम. रेड्डी | ३३४ |
| १२६. | ताई निर्णयात आमचा विचार घेतात | नंदा जाचक | ३३४ |
| १२७. | ताईंनी आनंद व हिंमत दिली | आशा डोळस | ३३५ |
| १२८. | ताईंनी माईक हातात दिला | संगिता फरांदे | ३३६ |
| १२९. | आधारपूर्णामुळे म्हातारपणी स्वातंत्र्य मिळेल | श्वेता कांबळे | ३३७ |

| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| १३०. | ताठ मानेने जगायला शिकलो | सुमिधा घोंडगे | ३३८ |
| १३१. | ताई तुमच्यामुळे कळले ''आम्ही कमी नाही'' | वंदना कांबळे | ३३९ |
| १३२. | अन्नपूर्णा सोडून दुसरे कुठले कर्ज नको | एक सभासद | ३४० |

# INDEX (English Section)


| Sr. No | Article Name | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 133. | My Mamma | Nachiket Samant | 341 |
| 134. | My Sister Medha | Viren Pathare | 345 |
| 135. | My Medha Atya | Sagar Utagi | 348 |
| 136. | My Little sister who has become a big Sister to many | Baludada | 352 |
| 137. | My elder sister Medhatai | Yatin Purao | 356 |
| 138. | My Neighbourhood Friend | Surekha Godbole | 357 |
| 139. | Medha Mami | Anish Parulekar | 358 |
| 140. | Medha Atya | Anshuman | 360 |
| 141. | My super model Mami | Prasad Parulekar | 362 |
| 142. | My Own Medha Aaji | Pratyusha Sabnis | 363 |
| 143. | My Cool Aaji | Aaleen Parulekar | 364 |
| 144. | My Medha Aaji :- A Role Model | Siddhant Samant | 367 |
| 145. | Medha,My Friend Vahini | Raju Khanolkar & Sadhana Samant | 368 |
| 146. | My Kaki - The Torchbearer | Priti Khanolkar Ranadive | 372 |
| 147. | Medha Mavshi | Kalyani Gadre | 374 |
| 148. | Medha Mavshi | Janaki Naralkar | 375 |
| 149. | Medha Kaki | Swapnil Gadre | 376 |
| 150. | BOI Star Our Own Com. Medha Purao Samant | Rammohan | 377 |
| 151. | Our Friend Medha form 1981– 2020 | Sujata Tandel | 381 |

| Sr. No | Article Name | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| **152.** | Medha Tai: A transparent Leader | Sujata Bhat | 385 |
| **153.** | Medha Mam : Empathetic Wife of my boss | Arpita Guha | 387 |
| **154.** | Medha Samant: A warm person | Uttara Kale | 388 |
| **155.** | Down to Earth Medha Mam | Veena Nagapurkar | 389 |
| **156.** | Medha Samant : A Banker Turned Micro Banker | Dr. S. Elangovan | 391 |
| **157.** | Medha : A Charismatic Leader | Brig. Raghunath V Jathar | 394 |
| **158.** | Medha : A Microfinance leader Who Chose a narrow path | K C Ranjani | 396 |
| **159.** | Medha Samant : A Dynamic Person With An Unwavering Commitment To The Poor | Ravi Kulkarni | 398 |
| **160.** | Medha Madam: Empowerment Personified | Dr. Archana Singh | 402 |
| **161.** | Medha Tai : A Pillar of Strength | Kanish Debnath | 404 |
| **162.** | Medha Samant: A Torchbearer | Jayvant Bhave | 406 |
| **163.** | An Institution called "Medhatai" | S.M. Ghatpande | 408 |
| **164.** | Medha Samant ; The Social Entrepreneur | Pramod Deshmukh | 413 |

| Sr. No | Article Name | Author Name | Page No. |
| --- | --- | --- | --- |
| **165.** | Crossing Paths With Medha | Alizee Graf | 415 |
| **166.** | Inspiring journey with you! Medha | Anne Claire & F.X Hay | 416 |
| | उपोद्घात : मी कशी घडले - वाढले | डॉ. मेधा पुरव सामंत | 420 |

## ‘मेधा’ ची प्रस्तावना: माझी कॉम्रेड बायको मेधा

**शी** इज अ जेम ऑफ अ पर्सन! त्या मानाने मी जेमतेम. आमच्या घरात ती विदुषी आणि मला विदुषकी चाळे करण्यात इंटरेस्ट जास्त! उंची सोडून सगळयाच गोष्टीत ती माझ्या पुढे. पण एक गोष्ट मात्र माझ्याकडे फार चांगली आहे, ती म्हणजे I have much better spouse than she has! अशा व्यक्तीसाठी तिच्या ६० व्या वाढदिवसासाठी काय करावे? असा प्रश्न मला पडला. त्यातून पुन्हा माझी कॉम्रेड बायको; तिला कपडे, साड्या, दागिने ह्याची आवड नाही. मी तिला नेहमीच चिडवत आलो, की ती ‘‘स्वस्त बायको आहे!’’

एका वर्षांपूर्वीच मी, नचिकेत, धोपे, चित्रा, अंजली, वृषालीताई, उज्वला आम्ही सगळयांनी ठरवले की सर्व सुहृदांना तिच्या विषयी लिहायला सांगायचे, आणि त्याचे एक पुस्तक बनवून तिला ते भेट द्यायचे!

चार शब्द लिहायला सांगितलेल्या व्यक्तींनी जवळ जवळ चारशे शब्द लिहिले. सगळे मिळून भरपूर पानांचे पुस्तक झालेले आहे. चार पिढयांनी हे पुस्तक लिहिलेले आहे. त्यात तिच्या काकापासून ते नातीपर्यंत, ९० वर्षाच्या तिच्या मावशीपासून ते १४ वर्षाच्या नातवंडांपर्यंत सगळयांनी मेधा, मेधाताई, मेधा आई, मेधा काकी, मेधा मामी, मेधा मावशी, मेधा आत्या बद्दल लिहिलेले आहे! आणि हया पुस्तकाची प्रस्तावना लिहीण्याचा भार माझ्यावर येऊन पडला आहे!

मी व मेधा आमचा दोघांचा सहवास गेल्या उण्यापुऱ्या ४३ वर्षाचा आहे. आम्ही प्रथम भेटलो तेव्हा मेधा बारावीत होती आणि मी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये विद्यार्थांचा संप घडवून आणल्यामुळे कॉलेजमधून काढून टाकलेला होतो, आणि

कम्युनिस्ट पक्षाचा पूर्णवेळ कार्यकर्ता होतो. ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचा मुंबईचा सेक्रेटरी म्हणून मी काम करत होतो.

त्यावेळी कॉम्रेड प्रकाश रेड्डी, मी जयंत सामंत, कॉम्रेड ध्रुव रेडकर व कॉम्रेड उदय चौधरी असे ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन चे विद्यार्थी नेते होतो. मेधाच्या बाबांचा म्हणजे आमचे आदरणीय नेते कॉम्रेड दादा, यांचा एक दिवशी मला फोन आला, ''अरे मेधाने त्या भोलाज् क्लासमध्ये एम.बी.बी.एस. एन्ट्रन्सच्या परिक्षेसाठी क्लास जॉईन केला होता, आता एम.बी.बी.एस. एन्ट्रन्सच्या परिक्षा घ्यायचे कॅन्सल झाले आहे. तर ते क्लासवाले पैसे रिफंड करत नाहीत, म्हणून मेधा तिकडे सर्व विद्यार्थ्यांना घेऊन त्यांच्याशी रिफंडसाठी भांडायचं असा प्रयत्न करत आहे. तर तुम्ही ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन मधून काही चळवळ करू शकता का? मेधाला काही मदत, मार्गदर्शन करू शकता का?''

दादांनी असं सांगितल्यावर उत्साहाने मी व कॉम्रेड प्रकाश रेड्डी व कॉम्रेड उदय चौधरी मेधाला भेटायला गेलो. भोलाज् क्लासच्या बाहेर आम्ही एका संध्याकाळी आंदोलन केलं, आणि त्या क्लासच्या मालकांना फी परत दयायला लावली. मेधाचा मित्र परिवार किती मोठा आहे याचं त्या दिवशी दर्शन घडलं. कारण तिने एका दिवसाच्या मुदतीत सर्व क्लासमधील विद्यार्थ्यांना क्लास मध्ये रिफंड आंदोलन करायला चार वाजता जमा केलं होतं. अशी आमची पहिली ओळख झाली. त्याच दिवशीच माझी व मेधाची मैत्री सुरू झाली. पुढे मेधाशी मैत्री झाल्यावर मी पुन्हा शिक्षण सुरू केलं. कलिना कॅम्पस, मुंबई विदयापीठातून फिजीक्समध्ये एम.एस.सी. केलं व बजाज इन्स्टीटयूटमध्ये एम.बी.ए. सुद्धा जॉईन केलं. अर्थात माझी कॉम्रेड बायको मला जर्नल पूर्ण करणे इत्यादी साठी मदतीला असायची, व तिचे स्टॅटीस्टीक्स,

अॅक्चुरियल सायन्स हे विषय (मला येत नसतानाही) मी तिला शिकवायचो.

अशी मेधाची आणि माझी मैत्री वाढतच गेली. आम्हाला एकमेकांशी गप्पा मारायला, वादविवाद करायला आवडायला लागलं. आमच्या दोघांच्या लग्नाचा निर्णय आम्ही घेतला, अर्थात त्यात स्पष्टपणे पुढाकार मेधाचाच होता. त्यावेळेस मेधाचं वय असेल सतरा अठरा, आणि मी पंचवीस सव्वीस वर्षाचा होतो. तेव्हापासून आजपर्यंत आम्ही एकत्र वाटचाल करत आहोत. लग्न होईपर्यंत बऱ्याचशा फी वाढीच्या किंवा विद्यार्थ्यांच्या इतर लहान मोठया आंदोलनामध्ये मेधा आणि मी एकत्र असायचो, आणि एकत्र असल्यामुळे जास्त आनंद वाटायचा.

आमचं लग्न हे रजिस्टर पद्धतीने करायचे, कोणत्याही विधीशिवाय असं आम्ही दोघांनी ठरवलं. परंतु मेधाचे आई वडिल कॉ. दादा आणि प्रेमाताई हे नेते होते. त्यामुळे त्यांच्या परिचयाच्या किमान हजार लोकांच्या उपस्थितीत शेवटी आमचं लग्न झालं.

प्रत्यक्ष लग्नामध्ये मेधाने मला चांगलाच धक्का दिला. लग्नाच्या वेळी (मुहूर्ताच्या वेळी म्हणूच शकत नाही) रजिस्ट्रार सह्या घेताना मेधा आणि मी आणि आमचे तीन जामीनदार उभे होतो. पण ऐन सह्या करायच्या वेळेला मेधा पेनच उचलेना. ती त्या कागदाकडे अशी बघत राहिली की, आता ही सही करण्याऐवजी रामदास स्वामीसारखी मंडपातून पळून जाते की काय, अशी परिस्थिती तिने निर्माण केली. मी घाबरून गेलो. कसंबसं तिला हसवून, सही घडवून आणली.

संध्याकाळी लग्नाच्या रिसेप्शन मध्ये अनेक मोठे मोठे नेते येवून गेले. त्यात कॉम्रेड एस.ए.डांगे होते. बँक युनियन चे मोठे नेते होते. श्री वाघुळ, बँक ऑफ इंडीयाचे चेअरमन पण

आले होते. अशी सगळी मंडळी येवून गेली. आम्ही दोघं जण शेवटी स्टेजवरून खाली उतरलो आणि रात्रीची शेवटची जेवणाची पंगत सुरू झाली.

मेधाने आता हमसून हुमसून रडायला सुरूवात केली! मेधाचं रडणं बघून तिचे नातेवाईक रडू लागले. ब्राम्हण सहायक संघात आमचं लग्न झालं, तिथे आसपासचे बिल्डिंग मधून वाकून बघणारे लोक, एवढंच काय तर माझे वडिल, जवळचे नातेवाईक सुद्धा रडू लागले. मेधाचं रडणं बघून माझा पाच वर्षाचा भाचा चेतन इतका ओशाळला, की तो हॉल मध्ये सर्वांना फिरून सांगत होता की ''मेधा ताईला (तो तिला मामी कधी म्हणायचा नाही) डोळयात कचरा गेलाय ना, म्हणून ती रडतीय.'' अशा प्रकारे मेधाने माझं धाबं दुसऱ्यांदा दणाणून सोडलं.

लग्नाच्या रात्री आम्ही ब्राम्हण सहायक संघातून टॅक्सीत बसून, वरळी सी फेस ला येईपर्यंत मेधा हमसून हुमसून रडत होती. मी तिला हसवायचा प्रयत्न करत होतो. शेवटी माझे वडिल बोलले, की ''मेधाला हे दागिने आणि शालूबिलू मुळे बहुतेक रडू येत आहे, तिला त्याची सवय नाहिये. तिला तिचं ते पॅन्टशर्ट घालायला दे, म्हणजे ती नॉर्मल होईल. हा लग्नात मी घातलेला झब्बा आहे, सिल्क चा, तो घरी गेल्या गेल्या मेधाला देतो.'' ते ऐकून मेधा एकदम खुदकन हसली.

त्यानंतर तिने मला रात्री हळूच सांगितलं की ''तिला तिच्या बाबांना सोडून यायचं नव्हतं.'' म्हणून ह्या बाईसाहेब एवढ्या रडत होत्या.

लग्नानंतर आमचं सहजीवन सुरू झालं, कॉंग्रेस हाऊस मधल्या माझ्या आईबाबांच्या दोन खोल्यांच्या घरात. तसा मी एकटाच मुलगा होतो. तीन मोठया बहिणी व आई बाबांचा दत्तक मुलगा अशी आम्ही ५ भावंडे. बहिणींची लग्नं झालेली

होती, पण त्याही अधून मधून येत असत. आम्ही सगळे जण गुण्या गोविंदाने त्या दोन खोल्यांमध्ये राहत असू. मेधाने तिथपासून जे सगळयांना आपलंसं केलंय, माझे सगळे बहिण भाऊ, आई वडील अशी सगळयांची मेधा माझ्यापेक्षा जास्त लाडकी कधी झाली, हे मलाच कळलं नाही. आजही माझी सगळी भाचवंडं मामाच्या गावाला जाऊया, म्हणत नाहीत, तर मामीच्या गावाला जाऊया असे म्हणतात, असो.

मेधाने लग्नानंतर तिची ग्रॅज्युएशनची परिक्षा दिली व नंतर लगेच ती बँक ऑफ इंडिया, ऑपेरा हाऊस ब्रँच मध्ये रूजू झाली. नोकरी व संसार असं तिचं रूटीन सुरू झालं. मी त्याकाळात आधी कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून नोकरी घेतली. पुढे मी कॉलेजची नोकरी सोडून मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीमध्ये एका छोट्या कंपनीत नोकरीला लागलो, अशा प्रकारे आमची दोघांची करियर  सुरू झाली. संसारही सुरू झाला.

मेधा बँक ऑफ इंडियात लागल्यावर मेधाचा पहिला पगार झाला. मेधाचा पहिला पगार जेमतेम सातशे रूपये होता. अर्थात माझा पहिला पगार तेव्हा अकराशे रूपये होता. मेधाने पहिल्या पगारातून, घरी येताना लहान थोरांना छोटया, मोठया गिफ्ट घेऊन घरी आली. माझे आई वडील, माझ्या बहिणी, त्यांची मुलं, तिचे आई, वडील, तिच्या बहिणी, तिचे सगळे कझिन्स, तिची शरू आत्या जी शिक्षीका होती व त्यांच्याकडे राहत होती, हया सगळयांसाठी तिने लहान मोठे गिफ्ट घेतले. माझ्यासाठी एक अत्यंत छोटीशी गिफ्ट ती घेवून आली. स्वतः साठी काहीही न घेता हात हालवत आनंदाने मॅडम घरी आल्या. आणि त्या रात्री तिने मला गप्पा मारताना सांगितलं, की ‘‘सगळयांना गिफ्ट दिलं, खूप छान वाटलं’’ त्यानंतर मला अंदाज आला की, पुढचा आमचा संसार कसा असणार आहे. ह्या मॅडम सगळयांना सगळं वाटून माझ्यासाठी छोटंस

काहीतरी घेवून, स्वतःला काहीच न घेता खुशीत असणार, याचा अंदाज मला तेव्हाच आला.

आमच्या लग्नानंतरच्या पहिल्या दोन वर्षातच मेधाच्या बाबांचे म्हणजे कॉम्रेड दादांचे दुखःद, अकाली निधन झाले. मेधाने त्यांच्या मृत्युनंतर, तिचे शिक्षणाचे प्लॅनस बदलले. तिला जर्मन शिकून भाषांमध्ये ट्रान्सलेशनचे काम करायचे होते, मेधाला कलेची अतिशय आवड होती. पण ते सगळे बाजूला ठेवून मेधाने ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज फेडरेशनचे काम करण्याचा निर्णय घेतला. मेधाने ऑपेरा हाऊस इथून मुंबई मेन ब्रँच म्हणजे फोर्ट इथं बदली घेतली, आणि तिची धावपळ सुरू झाली. घर, बँक, युनियन वगैरे  वगैरे.

कालांतराने अंधेरीला आम्ही राहू लागलो. ज्याला आत्ता लोखंडवाला कॉम्पलेक्स म्हणतात. त्यावेळी ती एक दलदल होती, तिथे पहिल्यांच तयार झालेल्या एका सोसायटी मध्ये आम्ही फ्लॅट घेतला. ती रिझर्व बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सोसायटी होती. माझे मेव्हणे रिझर्व बँकेत होते. त्यामुळे माझी बहीण, मेव्हणे आणि आम्ही, असे शेजारी शेजारीच राहायला गेलो. माझे आई वडील सुद्धा होते. आमच्या संसारात नचिकेतचे पदार्पण झाले. माझ्या बहिणीलाही तेव्हा मुलगा झाला अनिश.

आम्ही सगळे तिथे एक मोठे एकत्र कुटुंब असल्यासारखे नांदत होतो. माझ्या मोठया बहिणीचा मुलगा प्रसाद ही शिकण्यासाठी आमच्याकडेच असायचा. मेधा या सगळया एकत्र कुटुंबात अगदी सगळयांचे मनापासून करायची. माझ्या वडिलांच्या एका मोठया आजारपणात तिने त्यांची सेवा केली. या सगळयात ती आनंदाने मिसळून जायची.

तिची बँक चर्चगेटला होती. आमच्याकडे अक्षरशः तेव्हा बस सुद्धा येत नसायची. मेधा एक दोन किलोमीटर चालत जात असे व तिथून पुढे बस व ट्रेन असा प्रवास करीत असे. दीड तास प्रवास करून बँकेत जायची व दीड तास प्रवास करून बँकेतून परत यायची. घरातील सर्व कामं करायची. त्यावेळेस मी मेधाचे वेगळेच रूप बघितले आहे.

मेधा मध्ये प्रचंड चिकाटी आणि कष्ट करण्याची ताकद आहे. मी तेव्हा त्या काळात सतत प्रवासात असायचो, कारण मी माझ्या नोकऱ्या बदलत होतो, पुढे पुढे चाललो होतो. नचिकेतचे लहानपण, आजारपणं हे सगळं बऱ्यापैकी मेधाला करायला लागायचे आणि ते तिने विना तक्रार केलेलं आहे. आणि तरी आम्ही हसत खेळत आनंदाने राहू शकलेले आहोत.

या काळात मेधाच्या वडिलांच्या मृत्युमुळे प्रेमाताई एकटया पडल्या होत्या. त्यामुळे प्रेमाताईंना त्यांच्या अन्नपूर्णा महिला मंडळाच्या कामात मदत करण्यासाठी सुद्धा मेधा मधून मधून बँकेतून रजा घ्यायची, जायची. त्यांचे व्यवहार, हिशेब बघणं, बायकांची मिटींग घेणं आणि जी काय गरज असेल ती मदत करणे असं तिचं चालू असायचं.

माझ्या शक्तीनुसार मी त्यामध्ये सामील होत असे, आणि आम्हाला हे एकत्रित कार्य करतोय असं कधी वाटलं नाही. आम्ही मुळामध्ये दोघेही विद्यार्थी कार्यकर्ते म्हणूनच एकत्र आलो होतो. त्यामुळे आनंदाने आमच्या हया सगळया धडपडी चालू असत. यात आनंदी व हसवत ठेवण्याचा भाग माझ्याकडे असे, त्याबद्दल मला मेधाचा ओरडाही वेळोवेळी खायला लागत असे. प्रत्येक काम नीटनेटके, अत्यंत चिकाटीने आणि गांभीर्याने काम करण्याचा भाग मेधाकडे असायचा! अशाप्रकारे आमचे सहजीवन सुरू होतं.

पुढे मी पुण्याला येवून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा लोखंडवाला कॉम्प्लेक्स मधल्या आमच्या जागेला थोडा चांगला भाव यायला लागला होता. ती जागा विकून धंदयात काही पैसे घालावे आणि पुण्यामध्ये त्याच पैशात घर आणि व्यवसाय असं दोन्ही सुरू करता येईल, असा माझा एकंदर विचार होता.

त्या सुमारास बँकेच्या युनियनमध्ये मेधाचं बरंच नाव झालेलं होतं. बँकेमध्ये ती स्थिर स्थावर झाली होती. आमचा छान फ्लॅट सजवून, टू व्हिलर वगैरे घेऊन झाली होती. असं सगळं असताना दुसऱ्या एखादया बायकोने हे धाडस करायला मोडता घातला असता. पण मेधाने लगेच 'हो' म्हटलं. तिने काही प्रश्न विचारले, जसे की, ''तुझा धंदा चाललाच नाही, तर आपण काय करणार? जरी आपण तिघेच (मी, मेधा, नचिकेत) पुण्याला जाणार असलो तरी एक बेडरूम जास्तीची घेऊ. वेळ पडली तर पेईंग गेस्ट ठेवू.'' आम्ही दोघांनीही माझ्या आईवडिलांना, तिच्या आईला समजावून सांगितले की, आम्ही पुण्यात शिफ्ट होत असलो तरी नेहमी येत जात राहू. ''सर्वांची संमती'' घेवून आम्ही पुण्याला शिफ्ट झालो.

पुण्याला आल्यावर बँकेतून बदली करून घेईपर्यंत मेधाने सहा महिने पुणे-मुंबई असा ट्रेनने प्रवास करून बँकेचा जॉब, नचिकेतची शाळा, नवीन शाळेचे ॲडमिशन असं सगळं तिच्या धडपडीतून साध्य केलं. मी नवीन धंदा सुरू केल्यामुळे पुण्याबाहेर सतत असणे, प्रवास हे सुरूच होतं.

त्याच दरम्यान मी मेधाला टू व्हिलर शिकवली व घेऊनही दिली. मात्र मेधा टू व्हीलर वरून दोनदा पडली. पहिला ॲक्सिडेंट खूपच मोठा होता. मेधाच्या जबडयाला दोन फ्रॅक्चर झाले. बरेच दात तुटले. जबडा ६ आठवडे तारांनी शिवून ठेवावा लागला. तरीही मेधाची जिद्द अशी की, ती ॲक्सिडेंट नंतर लगेच ४ दिवसात बँकेत जाऊ लागली.

चोरांनी एकदा तिच्यावर हल्ला केला. हे सगळं ती माझ्या गैरहजेरीत निभावून न्यायची. तिचा जनसंपर्क नेहमीच अफाट असायचा. मदतीला नेहमीच माणसं ती उभी करायची. सगळं काही करून ती परत फ्रेश असायची, त्यामुळे परत आमचं सहजीवन आनंदात सुरू राहीलं.

साधारणपणे तीन ते चार वर्षात माझ्या नासान कंपनीला थोडेसे स्थैर्य यायला लागलं. थोडंसंच म्हणतो, कारण तसे आज नासानला बत्तीस वर्षे झाली. कुठलाही धंदा १००% स्थिर नसतोच. काळाच्या ओघात चढउतार चालू असतात. मी नासान सुरू केले १९८९ साली. तर मेधाने १९९२ साली माझ्याशी चर्चा सुरू केली की ''मी बँक सोडून तळागाळातील महिलांसोबत बँकींग सुरू करू का?''

तेव्हा सोव्हीएट रशियामध्ये बदलाचे वारे वाहू लागले होते. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हयाचे पडसाद भारतात ही उमटू लागले. सोव्हीएट रशियाचे मॉडेल कोलमडणे व भारतातील कल्याणकारी सरकार ही संकल्पना बदलून खाजगीकरणाकडे वाटचाल होऊ लागली होती. त्या बदलांचा स्वीकार कसा करावा हया बद्दल स्पष्टता नव्हती. त्यामुळे सगळेच डाव्या चळवळीतील कार्यकर्ते अस्वस्थ होते. मेधाही बऱ्यापैकी अस्वस्थ असायची, ती सतत माझ्याशी चर्चा करायची. तिच्या मनामध्ये बँक सोडून तळागळाच्या महिलांसोबत काम करण्याचे विचार ही घोळायला लागले होते. दुसऱ्या बाजूला तिला ''पूर्ण वेळ लिखाणाला वाहून घेवू की कार्यकर्ता होऊ?'' असे प्रश्न होते. अशा चर्चा आमच्या चालू असायच्या. त्यात आमची अडचण अशी होती, की मेधाचे बँकेत हॉऊसींग लोन होते. त्यामध्ये तिचा प्रॉव्हिडंट फंड सगळा खर्च होवून जाणार होता. तिच्याकडे काही पैसे राहणार नव्हते. व तिची सॅलरी येणार नव्हती.

मी आनंदाने 'हो' सांगितले. कारण मला माहित होते, की त्यामध्ये ती समाधानी असेल, आणि नक्कीच ज्यात झोकून देईल, त्यात काहीतरी घडवेल. आम्ही बऱ्याच आधीपासून असे ठरवले होते की, आमच्यापैकी एकाने समाजासाठी कार्य करायचे व एकाने कुटुंबासाठी कमवायचे. बऱ्याच चर्चा, विचारविनिमय ह्यानंतर ठरले की, मेधाने बँक सोडून अन्नपूर्णाचे काम म्हणजे प्रामुख्याने कर्ज गरीब महिलांपर्यंत पोचवण्याचे काम सुरू करायचे. गोपीनाथनगर मधील आमच्या घराच्या खाली, अगदी एक छोटीशी खोली, मी कधीतरी नासान साठी लागेल म्हणून घेतली होती. तिथे आम्ही नासानचे ऑफिस कधीच ठेवू शकलो नाही कारण ती अत्यंत छोटीशी खोली होती. त्या खोलीमध्ये दगड विटांचे सिंहासन मांडून मेधाबाईचे अन्नपूर्णा परिवाराचे काम सुरू झाले. त्यानंतर अनेक खाचखळगे आले, त्यातून संस्था उभी करत करत आज मेधा एवढया मोठया स्केलवर अन्नपूर्णा परिवार घेवून आली आहे. याबद्दल मला तिचा किती अभिमान वाटतो हे सांगण्याची गरज नाही!

अन्नपूर्णाचा पोर्टफोलिओ जेव्हा साडेतीन लाखांचा होता तेव्हाची एक आठवण इथे लिहावीशी वाटते, मेधाचे ऑफिस गोपीनाथ नगरच्या ८ बाय १० च्या खोलीतून लुनावत कॉम्प्लेक्स मध्ये आमच्या घराशेजारील गच्ची मध्ये दोन खोल्यांमध्ये शिफ्ट झालेले होते. तिच्याकडे कामाला २ ते ४ मुली येऊ लागल्या होत्या. मेधाने ह्या दरम्यान तिचे एम.एस.डब्ल्यू. चे शिक्षण पूर्ण केले होते. अन्नपूर्णाचे काम पुण्यातील झोपडपट्ट्यांमध्ये फिरून ती उभे करत होती. घर, संसार, नचिकेत असे सगळे सांभाळत होती, आणि रात्री जागून, अभ्यास करून ती एम.एस.डब्ल्यू. ला पहिली आली होती. पुढे तिने अशाच प्रकारे पी.एच.डी. सुद्धा केली.

मेधाला इंग्लंडमधील ससेक्स युनिव्हर्सिटी मध्ये महिला सक्षमीकरणाचा दोन महिन्याचा कोर्स करण्याची संधी चालून आली. मेधाने भरपूर चांगल्या सिस्टिम्स लिहून ठेवल्या. ज्या सिस्टीम्स तिच्या २ पार्ट टाईम स्टाफ ना शिकवून ती गेली, तिच्या गैरहजेरीत कर्ज वसुली व हिशोब हयासाठी. त्या सिस्टिम्स वाचून मी प्रभावित झालो.

मेधा इंग्लंडला गेली. तिला स्टायपेंड म्हणून दिवसाला वीस पौंड मिळायचे. आणि ह्या बाई आठवड्याला दोन पौंड खर्च करायच्या. एक मोठा ब्रेड, दोन किलो सफरचंद, बटर, जॅम असं सगळं रूमवर आणून ठेवायची. ब्रेक फास्ट युनिव्हर्सिटीत मिळायचा. लंच व डिनर ती २ पौंडमध्ये आठवड्याला भागवायची. वाचलेल्या पैशाचे तिने काय केलं असेल?

तिने इंग्लंड मधील छान छान जागांचे फोटो असलेले पोस्टकार्डस घेतले. तेव्हा म्हणजे १९९७ साली जवळपास पोस्टकार्डचे दिवस संपत आले होते. पोस्टकार्ड इंग्लंडमध्ये त्या मानाने महाग. मेधाने पोस्टकार्डस वर आमच्या नातेवाईक, मित्रपरिवाराला तिकडून पत्रं लिहिली. तिच्या भावाने वीरेनने तिला अमेरिकेत बोलवले. इंग्लंडमधील कोर्स संपल्यावर एक महिन्यांसाठी ती अमेरिकेला जाणार होती.

तिने लिहिलेल्या सगळया पत्रांना ‘‘आत्ता मी यू. एस. ए. ला असणार आहे. तुम्ही या पत्राला उत्तर देताना यू. एस. ए. मधील कोणत्या पत्त्यावर द्यायचे.’’ अशा सगळ्या सूचना लिहिलेल्या होत्या. एक महिना ती अमेरिकेत राहिली. तिचा भाऊ वीरेन तिला म्हणाला की, ‘‘आमच्या आयुष्यात जेवढी पत्रं आली नाहीत, तेवढी तुझ्या एक महिन्याच्या वास्तव्यात आली.’’ मेधा इंडियात परत आली. वाचलेल्या पैशांतही तिने सगळ्या नातेवाईकांना, मित्रांना वस्तू आणल्या. स्वतः साठी तिने काहीच आणले नाही.

इंग्लंड, अमेरिकेचा ३ महिन्याचा दौरा संपवून मेधा परत आली तेव्हा तिने पाहिले तर तिच्या गैरहजेरीत सभासदांनी हफ्ते थकवले होते. तिच्या अननुभवी स्टाफने सभासदांकडून वेळच्या वेळी हफ्ते आणले नव्हते. मेधा सकाळ संध्याकाळ पुण्यातील वस्त्यांमध्ये जाऊ लागली. सभासदांकडून हफ्ते वसूल करण्यात तिची बरीच दमछाक होत होती; चिडचिड ही व्हायची. तेव्हाचा तिचा पोर्टफोलिओ अंदाजे ३.५ लाखांचा होता. एकदा मी म्हणालो, ''हवं तर साडेतीन लाख रुपये मी देतो, तू आधीचे बँकेचे देणे देऊन टाक आणि तू परत नव्याने सुरू कर.'' ती बोलली, ''नाही, हा प्रॉब्लेम माझा आहे. मी सोडवीन.'' तिने सर्वच्या सर्व साडेतीन लाख रुपये वसूल केलेच! आता तिचा पोर्टफोलिओ दोनशे करोडच्या वर गेलेला आहे!

दुसरी आठवण म्हणजे, २००७/०८ मध्ये, इंडियन ओव्हरसीज बँकेने ठरवले कि, पुण्यात मायक्रो फायनान्स मध्ये काम करायचे. इंडियन ओव्हरसीज बँकेचे तेव्हाचे चेअरमन श्री. भट हे पूर्वी बँक ऑफ इंडियामध्ये होते. बँक ऑफ इंडियामधील व्ही. सी. जोशी हे रिटायर्ड जनरल मॅनेजर होते. व्ही. सी. जोशी हे कॉम्रेड दादांचे जवळचे मित्र व मेधाशी ही त्यांचे खूपच जिव्हाळयाचे संबंध होते. तर व्ही. सी. जोशींनी इंडियन ओव्हरसीज बँकेच्या चेअरमन ना मेधाची व अन्नपूर्णाची माहिती सांगितली. इंडियन ओव्हरसीज बँकेने अन्नपूर्णा सोबत एक जॉईंट व्हेंचर नॉन बँक फायनान्स कंपनी करायचे ठरवले. त्यात मेधाला ''Sweat Equity" म्हणून दोन कोटी रुपयांचे शेअर्स द्यायचे इंडियन ओव्हरसीज बँकेच्या बोर्डाने मंजूर केले. पण तिने नॉन बँक फायनान्स कंपनी केले नाही. तिने सांगितले, काय द्यायचे, ते अन्नपूर्णाला दया. आज नॉन बँक फायनान्स कंपनी काढली असती, आणि तिने ते २ करोड रुपये घेतले असते तर ती

नक्कीच १०० करोडची मालकीण झाली असती. पण माझ्या मताने तिचा तो निर्णय योग्यच होता. ती जास्त सुखी आहे, आणि १०० कोटींपेक्षा जास्त मानसन्मान तिला मिळाले आहेत.

आमच्या सहजीवनातल्या काही गंमती सांगाव्याशा वाटतात. एकदा मेधाने विचारले की, ''आपण फोर व्हिलर घेऊ या?'' मी तिला म्हणालो की, ''मी काही फोर व्हिलर अजिबात चालवणार नाही. मी ड्रायव्हर ठेवीन. तू चालवणार असशील तर घे'' आणि मेधाने 'हो' म्हटलं! तिने फोर व्हिलर घेतली, चालवली. मेधा अतिशय उत्कृष्ट ड्रायव्हर आहे. मी मात्र गाडी न चालवता तिच्या शेजारी बसून तिला सतत सल्ले देत असतो. गाडी चालवताना आमचे खूप वादविवाद होतात आणि तरी आमचा सुखाने प्रवास चालू असतो. मेधा म्हणते, ''तिला वाहन योग आहे'' आणि मी म्हणतो, ''मला वाहन सुख आहे.''

आमच्या दोघांच्या या ४३ वर्षाच्या सहजीवनात आम्ही ४३ हजार वेळा भांडलेले आहोत. आम्ही इतके भांडतो, तरी रोज आम्ही गप्पा मारतो. मेधा तिच्या दिवसभरात घडलेलं सर्व काही मला रोज सांगतेच! मला तिचा आग्रह असतो की, मी पण सगळं १०० टक्के सांगितलंच पाहिजे.

आमच्या अनेक मित्रमैत्रिणींना आणि नातेवाईकांना प्रश्न पडतो, ''तुम्ही एवढं रोज बोलता, तर तुम्ही वर्षातून दोन वेळा चारचार दिवस जे काही दोघेच ट्रिपला जाऊन राहता त्यावेळेस परत अजून काय बोलता?'' मी नेहमी गंमतीने बोलतो, ''बोलण्याचा भाग मेधाकडे असतो आणि हसवण्याचा भाग आणि ओरडा खाण्याचा भाग माझ्याकडे असतो.'' आमचं सहजीवन अशा प्रकारे चालू आहे.

मेधाचं तिच्या वडिलांवर अतिशय प्रेम होतं. त्यांच्याच पावलांवर पाऊल ठेवून 'बँकींग फॉर द पुअर' करणं हेच तिचं ध्येय होतं. ते आता बऱ्यापैकी मेधाने अचिव्ह केलेलं आहे. मेधाने पीएचडी पूर्ण झाल्यावर मला एकदा विचारले, ''जयंत मला माझ्या बाबांनी बँकेत जॉईन झाल्यावर त्यांचं नाव लावायचं नाही, असं सांगितलं होतं, त्यामुळे लग्नानंतर ताबडतोब त्यांनी मला मेधा सामंत नाव करायला लावलं. पण मला माझ्या बाबांचं नाव लावायचं आहे. मेधा पुरव सामंत. मी नाव लावू का?'' त्यावेळी मी गमतीने मेधाला म्हणालो की, ''तुला हवं असेल तर मी पण जयंत पुरव सामंत लावतो.'' अशाप्रकारे आमच्या सहजीवनातील काही गमती जमती.

आमच्या लग्नानंतर पहिलं एक दिड वर्ष आम्ही ग्रँट रोडला काँग्रेस हाऊस मधल्या छोट्याशा घरात राहत होतो. तिथूनच जवळ मेधाची ऑपेरा हाऊस ब्रँच होती. घरापासून दहा ते पंधरा मिनिटं मेधाला ऑफिसला जायला लागायची. ती चालत जायची व घरी चालत यायची.

एके दिवशी मी कामावरून घरी परत आलो, त्यावेळेस माझे वडिल हॉलमध्ये बसून काहीतरी ऐकत होते आणि मेधाबाई तावा तावाने त्यांना काहीतरी कथा सांगत होती, ''मग मी त्याला कॉलर पकडून दोन मुस्काटात दिल्या.'' हे तिच वाक्य मी ऐकतच राहिलो. माझे वडिल कौतुकाने तिचं ऐकत होते. त्यानंतर मी विचारले की, ''काय झालं?'' त्यावेळेस मेधाने परत तिची कथा मला नविन उत्साहाने, तावातावाने सांगितली. त्याचं सार असं होतं की, ऑपेरा हाऊसला बँकेत जात असताना एका मवाल्याने मेधाची छेड काढली. या बाईसाहेब तडक उलटया फिरून त्या मवाल्याच्या मागे पळत गेल्या. त्याच्यानंतर पुढची पाच दहा मिनिटे ऑपेरा हाऊसच्या भर चौकात मेधा त्या मवाल्याच्या मागे जोर जोरात पळत होती. अनेक लोकांना वाटले की, तो मवाली हिची पर्स घेवून

पळालेला आहे, म्हणून बरेच लोक ही तिच्यामागे पळत होते. शेवटी मेधाने त्या मवाल्याची कॉलर पकडून दोन-तीन मुस्काटात मारल्या. तेव्हा लोकांनी विचारले, ‘‘पर्स किधर है?’’ तेव्हा ही म्हणाली, ‘‘पर्स नही चुराई थी, उसने मुझे गलत जगह पर छुआ था.’’ त्यानंतर बऱ्याच लोकांनी पण त्याला थडा थड मारले.

ही वीरश्रीपूर्ण कथा आमच्या मॅडम सासरे बुवांना कौतुकाने सांगत होत्या. आणि सासरे देखील कौतुकाने ऐकत होते. माझे वडिल स्वातंत्र्य सैनिक, त्यामुळे त्यांना अन्यायाविरूद्ध कोण लढतं म्हटलं की अतोनात कौतुक वाटायचं. अशी ही माझी कॉम्रेड बायको!

मेधाने तिच्या तरूण वयात, मुंबईत असताना बसमध्ये, ट्रेनमध्ये किंवा रस्त्यात किमान तीन चार वेळा तरी मवाल्यांना पकडून चोप दिलाय किंवा भर चौकात त्यांच्यावर खूप आरडाओरडा करून त्यांना लाज वाटायला लावली आहे. गप्प बसून तिने कधीच अन्याय सहन केला नाही.

ग्रँट रोडहून आम्ही जेव्हा अंधेरीला लोखंडवाला कॉम्प्लेक्स मध्ये रहायला गेलो. तेव्हा तिथे आजूबाजूला काहीच नव्हतं.

पुढे तो एरिया खूपच श्रीमंत म्हणून प्रसिदध आला. पण आमच्या सुरूवातीच्या सहा वर्षाच्या तिथल्या वास्तव्यात छोटी छोटी दुकानं, हॉटेल्स, बिल्डींगस् व्हायला लागल्या होत्या. अशात तिकडे एक पॉश लाँड्री उघडली. त्या लाँड्रीमध्ये आम्ही आमचे कपडे इस्त्रीला दयायला लागलो.

त्यावेळेस आमची आर्थिक परिस्थिती अगदी नाजूक असायची. कारण फ्लॅट घेतलेला. बँकेच्या कर्जाचे हफ्ते भरत होतो. मेधा व मी दोघेजण नोकऱ्या, करियर सांभाळत होतो

आणि त्यात छोटा नचिकेत! असे सगळे धावपळीचे आणि कष्टाचे ते दिवस होते.

अशातच एकदा मेधाने बचत करून एकदम चार पाच नविन ड्रेस शिवले. तिने शिवलेले ते ड्रेस पहिल्यांदाच इस्त्रीला देण्याची वेळ आली. तिने ते ड्रेस त्या लाँड्रीमध्ये दिले. त्यानंतर चार पाच दिवस झाले, त्या लाँड्रीचा माणूस ते कपडे घेऊन आला नाही. मग मेधाने तिच्या धावपळीतच वेळ काढून लाँड्रीत जाऊन चौकशी केली, की काय झाले ते कपडे का नाही आले? लाँड्रीवाला म्हणाला कि ‘‘वो गलतीसे दुसरी जगह पर डिलीव्हरी किया है दो दिन में लाकर देता हूँ।’’ असे करत दोनाचे चार, चाराचे आठ दिवस झाले, जवळ जवळ पंधरा-वीस दिवस होऊन गेले तरी लाँड्रीतून ते कपडे आले नाहीत. त्यानंतर मेधाने परत एकदा जाऊन धमकी दिली की, ‘‘मी तुझ्या लाँड्री समोर येऊन आरडाओरडा करेन,’’ तरी त्याने ते हसण्यावारी घेतले.

एके दिवशी आमच्या मेधा बाईनी बँकेत सुट्टी टाकली, आणि सकाळी सकाळी लॉड्रीच्या समोर जाऊन ठाण मांडून उभ्या राहिल्या! तिथे येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला सांगायला लागल्या, ‘‘मी नविन कपडयांचा गठठ् दिला होता, हयाने तो हरवलाय की विकला याची मला माहित नाही. त्याच्याकडे कपडे देऊ नका.’’ मेधाने सांगायला सुरूवात केल्यावर पहिली पाच दहा गिऱ्हाइके कपडे न देता तिथून निघून गेली. हे बघितल्यावर त्या लाँड्रीवाल्याचे धाबे दणाणले. त्याने हाता पाया पडून मेधाला परत पाठवले आणि ‘‘मी बघतो, कपडे आणून देतो.’’ अशी विनंती केली. त्याच दिवशी संध्याकाळी त्याने तो गठ्ठा घरी आणून दिला. माझे वडिल त्यांच्या शूरवीर सुनेवर इतके खूष झाले, की माझ्या वडिलांनी तिला अजून दोन ड्रेस भेट म्हणून दिले.

अशी ही माझी कॉम्रेड बायको! हक्कांसाठी भांडणारी, पण जीवाला जीव देणारी. जिद्द, चिकाटी, प्रचंड कष्ट करण्याची क्षमता अंगी बाळगणारी! ध्येयवादी, शिस्तप्रिय!

आम्ही पुण्याला रहायला आल्या नंतर माझे आई बाबा ठाण्याला रहात होते, व मधून मधून पुण्याला येत असत. दोनेक वर्षात माझ्या बाबांचे निधन झाले. त्यानंतर माझी आई नेहमी पुण्यात येत असे. सर्व मुलामुलींकडे ती येऊन-जाऊन राही. तिला संगीत नाटके आवडत असत, त्यामुळे ती पुण्यात आली की मेधा तिला भरत नाटय मंदिर मध्ये रात्री नाटके पहायला घेऊन जात असे. मेधा दिवसभराची कामं आटपून रात्री ९ वाजता तिच्या टू व्हीलर वर पाठीमागे माझ्या आईला घेऊन जाई. मेधाला पण संगीताची आवड आहे, पण ती दमलेली असायची, त्यामुळे ती नाटकात झोपून जायची. माझी आई तिला विचारायची, ‘‘अगं तू नक्की परत टू व्हीलर चालवशील ना? नाही तर जाऊ परत.’’ मेधा म्हणायची, ‘‘तुम्ही बघा पूर्ण नाटक. मी व्यवस्थित जागी होऊन चालवते टू व्हिलर’’ अशा प्रकारे मेधाने सासूबाईंना सर्व संगीत नाटकं दाखवली.

माझ्या आईच्या शेवटच्या २ वर्षात तिला डिमेन्शिया झाला होता. तेव्हा ती फक्त मेधाचं ऐकत होती.

गेल्या काही महिन्यात, करोनाच्या काळातील तिची एक आठवण इथे सांगितलीच पाहिजे. माझा भाऊ चंदू, बँक ऑफ इंडियात ऑफिसर आहे. कफ परेडला काम करतो व डोंबिवलीत रहातो. जून अखेरीस माझ्या बहिणीचा फोन आला, ‘‘अरे, चंदू आजारी आहे. त्याला बरेच दिवस ताप येतोय. उद्या त्याला कोविडची टेस्ट करायला सांगितलीय. तो खूप घाबरलाय. तू आणि मेधा त्याच्याशी बोला.’’

रात्री ९.३० वाजता मी व मेधाने चंदूला फोन केला. त्याला नीट बोलताही येत नव्हते. त्याने त्याच्या बायकोला,

गीताला फोन दिला. गीताने सांगितले, ‘‘चंदूला नीट श्वासही घेता येत नाही, तो खूप घाबरला आहे.’’ मेधाने गीताला बराच धीर देऊन फोन ठेवला, व आम्ही एकमेकांकडे पाहिले.’’ चंदूचं वय ५९. चंदू-गीता घरात दोघेच. त्यांचा मुलगा-सून ऑस्ट्रेलियात. रात्रीच जर चंदूला श्वसनाचा त्रास वाढला, तर व्हेंटिलेटर लागेल, व ते मिळाले नाही तर चंदू जगणार नाही. ह्यापैकी एक ही शब्द न बोलता आम्ही दोघांनी हे नजरेनेच बोललो.

मेधा म्हणाली,‘‘जयंत, चंदूच्या ॲडमिशनसाठी वाशीतल्या हॉस्पिटलमध्ये प्रयत्न करू का?’’ मी ‘हो’ म्हणालो. त्यानंतर २ तास मेधा फोन कॉल्स करत होती. तिने २५ एक फोन कॉल्स केले असतील. शेवटी रात्री १.३० वाजता वाशीतल्या एका हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन मिळाली. ह्या दरम्यान मेधा मधून मधून गीताला फोन करून धीर देत होती. गीताच्या भावाला अजितला, ‘‘गाडी तयार ठेव. चंदूला आज नक्की वाशीला ॲडमिट करायचे आहे.’’ अशा सूचना देत होती.

मेधाला अशावेळी देहभान उरत नाही, हे माहीत होतेच, त्यामुळे मी तिला सपोर्ट देणे एवढेच काम करत होतो. त्यापुढचे १५ दिवस चंदू आय. सी. यू. मध्ये होता व एकंदरीत एक महिन्याने त्याला डिस्चार्ज मिळाला.

ह्या संपूर्ण महिन्याभरात मेधा दिवसरात्र चंदूची काळजी करत नव्हती तर काळजी घेत होती. हॉस्पिटलच्या डॉक्टरांना दिवसातून ३ ते ४ वेळा कॉल करणे. मध्यरात्रीपर्यंत जागून आय.सी.यू च्या डॉक्टरांच्या राउंडच्या वेळी व्हिडीओ कॉल करून चंदूशी बोलणे, त्याला बघणे. गीताला मानसिक आधार देणे. हे सर्व करताना मेधाची स्वतःची तब्येत इतकी बिघडली, की तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. अर्थात आमची सून व विहिण बाई दोघी डॉक्टर असल्यामुळे मेधाची ट्रिटमेंट त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये झाली.

शेवटी चंदू बरा झाला. तो वाचला ह्याचे श्रेय चंदू-गीताच काय, पण आमचे पूर्ण कुटुंब मेधालाच देते, पण मेधाला त्या श्रेयात फार रस नसतो. चंदू वाचला ह्यात मेधा खूष असते!

अशा ह्या माझ्या स्पेशल बायकोच्या, स्पेशल वाढदिवसानिमित्त तिच्या सर्व सग्या सोयऱ्यांच्या तिच्या बद्दलच्या भावना तिच्या पर्यंत पोहचवण्यासाठी केलेला हा खटाटोप तिच्या पसंतीला उतरावा एवढीच आशा!

**यशवंत (जयंत) भास्कर सामंत**

# १. मेधा आमची डेमॉक्रेटीक बॉस

बघता बघता आमची मेधा ६० वर्षाची झाली. दादा आणि प्रेमाताई पुरव यांची सुकन्या, विशू व माधवीची ताई. पुरव याच्या गोकुळांतील सर्वांवर प्रेम करणारी मेधा अशी विविध रूपे मी तिच्या गेल्या ६० वर्षातील आयुष्यात पहिली आहेत.

दादा व प्रेमाताईंचा आणि माझा परिचय मेधाच्या जन्मापूर्वी पासून. दादा आणि प्रेमाताई यांना आचार्य अत्रे, कॉ. डांगे, साथी एस. एम. जोशी यांचे सान्निध्य आणि मार्गदर्शन मिळाले. १९५० च्या उत्तरार्धातील संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील ही सर्वमान्य नेतृत्वाची त्रिमूर्ती. त्यांच्या वक्तृत्वाने, कर्तृत्वाने, नेतृत्वाने भारलेली पौगंडावस्थेतून नुकतेच बाहेर पडून तारूण्यात प्रवेश करणारी, सानेगुरूजी ज्यांना धडपडणारी मुले म्हणून कौतुक करीत, अशा वयात माझा दादा व प्रेमाताई यांच्याशी परिचय झाला.

तरी सुद्धा ‘‘मेधा तुझ्या बारशाच्या घुगऱ्या आणि बर्फी खाल्ली आहे.’’ असे मी आचार्य अत्रे यांच्या स्टाईलमध्ये अचाट आणि अफाट विधान करू शकत नाही.

कारण मेधाचा पाळणा झोके घेत असे अन्नपूर्णा सदन या डी. एल्. वैद्य रोडवरील बिल्डींगच्या तळमजल्यावरील छोट्याशा जुन्या ब्लॉकमध्ये! आजी, आजोबा, काका, आत्या, आई, वडीलांच्या संयुक्त कुटुंबात.

१९६५-६६ च्या दरम्यान दादा व प्रेमाताई यांनी राम मारूती रोडवरील ‘‘नवनीत’’ या नव्या इमारतीमध्ये तळमजल्यावरील हल्लीच्या परिभाषेत वन बी.एच.के. फ्लॅट घेतला.

१९६६-६७ चे दिवस आमच्या बँक कर्मचाऱ्यांच्या ऑ.आय.बी.ई.ए. च्या चळवळीत अत्यंत धामधुमीचे होते. साथी जॉर्ज फर्नांडीस आमच्या युनियन्स व गिरणी कामगारांची युनियन तोडण्याचा प्रयत्न करीत होते, या काळात अनेक वेळा मी आणि मेधाचे बाबा दादा पुरव एकत्र ऑफिसला जात असू. सकाळी ९.४५ ते १० या अत्यंत धावपळीच्या वेळात मी मेधाच्या घरात प्रवेश करीत असे, तिचे बाबा ऑफिसला जाण्याची तयारी करीत असत, आई प्रेमाताई मेधा व विशूच्या वेण्या बांधून त्यांना बालमोहन शाळेत पाठविण्याची तयारी करीत असे.

मेधाची दोन नंबरची बहिण विशाखा (विशू), खोडकर, थोडीशी टॉमबॉईश आणि अवखळ होती. प्रेमाताईंचा धपाटा चुकविण्यासाठी ती कधी कधी माझ्या मांडीवर येऊन बसावयाची! मेधा काहीशी अबोल, शांत, थोडीशी स्वतःच्याच कोशात रमलेली असल्यामुळे तिला क्वचितच धपाटे मिळत.

१९६८ साली मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत शिवसेना प्रजासमाजवादी पक्षाच्या आधाराने निवडून आली. शिवसेनेचे आक्रमक हल्ले कम्युनिस्ट पक्षावर नित्यनेमाने सुरू झाले. त्यावेळी मेधाचे बाबा दर शनिवारी रात्री दादर विभागातील निवडक कार्यकर्त्यांसाठी अभ्यास मंडळ त्यांच्या ''नवनीत'' मधील घरात घेत. झेकोस्लोवाकियाचा कम्युनिस्ट नेता ज्युलीअस् फ्युचिक जो हिटलरच्या तुरूंगात बंदी होता त्याचे ''NOTES FROM GALLOWS'' हे इंग्रजी पुस्तक वाचून त्याचे तात्काळ मराठी रूपांतर करून आम्हा तरूणांचा फॅसिझम विरोधी लढण्याचा निर्धार पक्का करून घेत असत. आता हे पुस्तक मराठीत ''फाशी जाता जाता'' म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

त्या वेळी मेधा ७ ते ८ वर्षाची असेल. अनेक वेळा ती तिच्या बाबांचे हे विवेचन ऐकत ऐकत बाबांच्या मांडीवरच

झोपत असे. कारण त्यांची बिछाने घालण्याची जागा आम्ही तिच्या काका लोकानी बळकावलेली असे. आमच्या या अभ्यास मंडळात शिकविण्यासाठी कॉ. भुस्कुटे येत, ते डोंबिवलीत रहात असत. रात्री ११.२० ला त्याची शेवटची कल्याण लोकल असे. त्यांच्या व्याख्यानाच्या वेळेस भाषण ऐकत ऐकत मेधा हमखास तिच्या बाबाच्या मांडीवर शांतपणे झोपत असे.

१९६८ ते १९७८ हे दशक फारच धामधुमीचे होते. १४ बँकाचे राष्ट्रीयीकरण, बांगलादेश युद्ध, आणीबाणी, जनता पक्षाची राजवट, इंदिरा गांधीचा पराभव इत्यादी. बऱ्याच महत्वाच्या घटना ह्या दशकात घडल्या.

याच धामधुमीच्या काळात मेधा स्कॉलरशिपची परीक्षा पास झाली आणि तिचा फोटो बालमोहन शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ इतर यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनी समवेत झळकला.

माझ्या आईला या फोटोचे इतके अप्रूप आणि कौतुक होते की, ती मला, माझ्या मिसेसला, माझ्या बहिणीला, माझ्या वडीलांना आणि १९८०-८१ साली बालमोहन शाळेत प्रवेश घेतलेल्या माझ्या मोठ्या मुलीस प्राचीस आवर्जून मेधाचा फोटो बघावयास सांगायची.

१९७१ साली बांगलादेश मुक्ति लढ्यास मदत म्हणून भारतीय महिला फेडरेशनच्या वतीने प्रेमाताईंनी सुशीला पटेल यांनी तयार केलेले ‘‘भारत एक खोज’’ हे पंडीत नेहरू यांनी लिहीलेल्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पुस्तकावर आधारित एक बाहुल्याचे प्रदर्शन शिवाजीपार्क येथे भरविले होते.

या प्रदर्शनास १०-११ वर्षाची मेधा आपल्या मित्र मैत्रिंणीना घेऊन यायची. माझ्या मिसेसची तिच्या शैला काकीशी तिची एकदम गट्टी जमली. ती ११ जुलै २०११

साली शैलाचे निधन होईपर्यंत. परंतु ही प्रेमळ मेधा माझ्या लग्नास किंवा संध्याकाळच्या स्वागत समारंभात तिच्या आई-बाबा समवेत हजर नव्हती. जरी तिचे आईबाबा आमच्या घरच्या गणपतीस दरवर्षी येत असत, तरी ती नेहमीच येत नसे. अशा मेधाच्या बालपणीच्या माझ्या खट्टया मिठ्ठ्या आठवणी आहेत.

आठवणीचा कॅलिडिओस्कोप आता फास्ट फॉरवर्ड करतो. कारण जगात-भारतात आणि मुख्य म्हणजे मेधाच्या आयुष्यातील घटनांना प्रचंड वेग आला होता.

मेधा बालमोहन मधून एस.एस.सी. पास होऊन आता रूईया कॉलेजवाली झाली होती. थोडेफार ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे काम करू लागली होती. मी थोडेफार म्हटले कारण याच काळात जयंत तिचा मित्र झाला. त्यामुळे रूईयाच्या कट्ट्यावर तेथील ''मणीज्'' च्या इडली-डोसा कॉफीसाठी ते एकमेकांना किती वेळा भेटले त्यातील ए.आय.एस.एफ. च्या कामासाठी किती व जवळच पाच गार्डनच्या परिसरात हिंडत जीवनसाथी होण्याचे कधी ठरवले. हे जयंत आणि मेधाचे गुपित आहे. जयंत सिक्रेट जपण्यात भयंकर माहिर आहे. आता हेच बघाना, या आठवणी लिहून घेण्याचा प्लॅन जयंतचा.

त्यामध्ये त्याने मला, उज्वला, चित्रा, अंजली पाटील यांना सामील करून घेतले आहे. पण प्रत्येक गोष्टीचे प्लॅनिंग करणारी मेधा हिच्या पासून जयंतचा हा प्लॅन सिक्रेट आहे. त्या करिता त्याने आमच्या सगळ्याचा ''दृष्टीपलीकडे'' हा व्हॉटस्अॅप ग्रुप पण मोबाईलवर केला आहे.

आता ''गच्ची'' हा सिनेमा दिग्दर्शित करणारा माझा लहान मित्र आणि मेधा व जयंत यांचा सुपुत्र नचिकेतने

त्याच्या लाडक्या बाबाचे हे सिक्रेट त्याच्या लाडक्या मम्मास सांगितले कसे नाही? हे मला न सुटलेले कोडे आहे.

मेधा पुरव १९८१ साली मेधा सामंत झाली. तिच्या लाडक्या बाबाचे आणि आमच्या नेत्याचे अकाली दुःखद निधन १९८२ मध्ये झाले. मेधा बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरी करू लागली. वडीलांच्या निधनानंतर बँक ऑफ इंडियातील युनियनमध्ये सक्रिय झाली. आईला मुंबईतील अन्नपूर्णाचे अकाऊंटस् व ताळेबंद करण्यामध्ये मदत करू लागली.

गिरगांव, लॅमिग्टन रोड, ऑपेरा हाऊस या एक किलोमीटरच्या त्रिकोणात सासर घर-बँक-भाजी-मच्छी मार्केटसाठी वावरणारी मेधा १९८३ मध्ये अंधेरी ते चर्चगेट प्रवास करू लागली. बँक ऑफ इंडिया बॉम्बे ऑफिस मधील मस्टर गाठण्याची धावपळ करू लागली. बॉम्बे ऑफिस मधील गट, उपगट, स्थानिय लोकाधिकार समिती, मराठी वाङ्मय मंडळ यातील ताणे बाणे, त्याचे युनियनमधील साद पडसाद तिला अनभवू लागली, स्वतःचा ठसा त्यावर उमटवू लागली.

१९८५ साली तिला स्वतःला जरी मुलगाच असला तरी ‘‘मुलगी झाली हो’’ हे नाटक महिला दिनानिमित्त सादर करू लागली. युनियनच्या वतीने विविध बँकातील युनियन कार्यकर्त्यांच्या तीन महिन्याच्या वर्कर्स एज्युकेशन क्लासला जाऊन आली. बँकेच्या युनियनमध्ये अधिक अधिक सक्रीय होऊ लागली. ए. आय. बी. ई. ए. चे नेते कॉ. छड्डा, कॉ. मेनन, कॉ. परांजपे, कॉ. चिटणीस, कॉ. केलावाला हे मेधाकडे भावी पुढारीण म्हणून बघू लागले.

एवढ्यात मेधा व जयंत यांनी मला सांगितले की त्यांनी पुण्यामध्ये सेटल होण्याचा निर्णय घेतला आहे, आमच्या सर्वांचा हिरमोड झाला.

मेधा पुण्याच्या बँक ऑफ इंडियामध्ये कर्वे रोड येथे कामावर १९८९ मध्ये रूजू झाली. गोपिनाथ नगर ते कर्वे रोड ही नवी वहिवाट सुरू झाली. पुण्यातील युनियन आणि मुंबईतील युनियनच्या वातावरणात तिला वेगवेगळेपणा जाणवला. युनियनच्या सभासदात आणि नेत्यांमध्ये सुद्धा.

बँकींग व्यवसायात संक्रमणाच्या कालखंडास सुरूवात झाली होती. आर्थिक दुर्बल गटांना कर्ज वितरणात अग्रक्रम देण्याच्या धोरणास १९९०-९१ साली आलेल्या नवउदार आर्थिक धोरणामध्ये सोडचिठ्ठी देण्यात आली, एवढ्यात पौड फाट्यावरच्या शेवंताबाई मेधाला भेटल्या.

नव्या आर्थिक धोरणाचा भाग म्हणजे स्वस्त दराने गरीब गरजूंना उपलब्ध असलेले कर्ज बँकांनी बंद करण्याचे ठरविले. परिणामी अगदी राष्ट्रीयकृत बँकाचे सुद्धा दुर्बल घटकांना असलेले कर्ज वाटप बंद झाले किवा धिम्या गतीने सुरू राहिले.

यांच काळात दुसऱ्या बाजुला सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. बर्लीनची भिंत कोसळली. युरोपचे एकीकरण झाले आणि जागतिक भांडवलशाहीचा वारू चौफेर उधळला. कष्टकरी जनता, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते उदास व निराश झाले. काही निष्क्रीय झाले, काही नव्या परिस्थितीचा रेटा नव्याने गरिबी विरुद्धच्या लढाईची रणनीती ठरविण्याचा, मानसिक, शारिरीक दमणूक करणारा मार्ग सोडून इतिहासात रममाण होण्यात, कर्मकांडे करण्यात मश्गुल राहिले.!

या नव्या वळणावर, खाच खळग्यांनी भरलेल्या रस्त्यावर चालण्यासाठी बँकेची नोकरी सोडून, पूर्ण वेळ अन्नपूर्णाचे काम करण्याचा निर्णय मेधाने घेतला.

मेधाने अन्नपूर्णाचे काम पुणे येथे करीत असतानाच एम.एस.डब्ल्यू. व मायक्रो फायनान्समध्ये पी.एच.डी. करण्याचा निर्णय घेतला. एकूण फायनान्स व त्यातही मायक्रो फायनान्स याची सैद्धांतिक बैठक आणि पुण्यातील अन्नपूर्णाची प्रयोगशाळा यांची तिने सांगड घातली.

मायक्रो फायनान्सवर लक्ष केंद्रीत करतानाच या गरीब वस्तीतील नागरिकांच्या विमा, पेन्शन, पाळणाघर, शिष्यवृत्त्या, इत्यादी गरजांसाठी नवे उपक्रम हाती घेतले. त्यात चांगल्यापैकी यश मिळविले. या काळात तिने लिहीलेल्या कवितांच्या संग्रह ‘‘सखी’’ २००० साली प्रसिदध झाला. ‘‘सखी’’ काव्यसंग्रहात प्रसिद्ध झालेल्या संस्कार कवितेतील पुढील ओळी

‘‘स्वातंत्रतेच्या जल्लोषात  
जथ्थ्ये निघाले होते  
देहांच्या कोनाड्यांत  
पेटते पलिते होते  
त्यामुळे  
अंधाराची भिती वाटली नाही  
वाट चुकण्याची धास्ती घेतली नाही!  
त्याच पुंजीवर  
केली वाटचाल कालवर  
पण आज?  
आज थोडं चुकल्यासारखं वाटतंय  
सुटतंय, सुटतंय म्हणताना  
गणित थोडं चुकल्यासारखं वाटतयं  
लाल ताऱ्याचं अढळ स्थान  
कालचं आज राहिलं नाही  
लाखो मन पेटवणारे  
पलिते आज जागते नाहीत!

आता अंधारातच जग पहाणं
शिकायला हवं
जुन्याच गणितातल्या नव्या सिद्धांतांना
सामोरं जायला हवं!
प्रश्नातच दडलेलं उत्तर
नव्या डोळ्यांनी हुडकायला हवं

या विचारांनी मेधाने नवी संकल्पनात्मक रचना तयार केली आणि पुणे मुंबई येथील अन्नपूर्णाचे काम पुनर्संघटीत करण्यास सुरवात केली. फक्त मायक्रोफायनान्स यावर लक्ष केंद्रीत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. संचालक मंडळाला व्यावसायिक पद्धतीने काम करता यावे, या दृष्टीने फायनान्स मधील जाणते लोक, चाटर्ड अकाऊंटस्, ज्या वित्तीय संस्थांकडून कर्जे घेतली त्यांचे प्रतिनिधी संचालक मंडळावर घेतले.

व्यावसायिकता आणि व्यापारी वृत्ती याच्यातील लक्ष्मणरेषा, त्याच्यातील ताणे बाणे हलक्या हाताने प्रश्नांचा गुंता होऊ न देता समर्थपणे हाताळले. व्यवस्थापकीय संचालक म्हणून संचालक मंडळास समजावून सांगितले. कर्मचारी-अधिकारी यांच्यातील ताणतणाव सभासद आणि कर्मचारी यांच्यामधील समजुती गैरसमजुती मेधाने अत्यंत पारदर्शकपणे हाताळल्या. नविन तंत्रज्ञानाचा वापर वित्तीय शिस्तीसाठी आणि नियंत्रणासाठी अत्यंत प्रभावीपणे केला.

गरिब कष्टकरी महिला सभासदांमधून १०० वस्ती प्रतिनिधी निवडून त्यांना प्रशिक्षीत केले. वस्ती प्रतिनिधींना दैनंदिन कामकाजापासून तर संचालक मंडळाच्या कामकाजापर्यंत समजावून घेणारी संरचना अत्यंत मेहनतीने तयार केली. या संरचनेतील जिवंतपणा, रसरशीतपणा टिकवून ठेवण्यासाठी नियमित सभा, प्रशिक्षणे, सहली हे प्रकार अत्यंत लिलया हाताळले.

यामध्ये पुणे मुंबईतील चकरा, बँकर्स, चॅरिटी कमिशनर यांच्याकडे खेपा घालणे, बिल्डर्सशी वाटाघाटी आणि वकीलाशी चर्चा करणे अशी विविध कामे मेधाने केली आहेत आणि हे सर्व सामाजिकतेचे भान ढळू न देता.

हीच मेधाच्या कामाची खासियत आहे.

पुणे, मुंबई या दोन्ही ठिकाणी मेधाने उज्वला, आरती, अनिता, मधुरा, लता, सुजाता, अश्विनी, सविता, कल्पना, प्राची, रागिणी यांची सक्षम, सतर्क, सर्व कामात पारंगत अशी कार्यक्षम टीम उभारली आहे.

तर अशी आहे आमची डेमॉक्रेटीक बॉस - मेधा.

**कॉ. सुरेश धोपेश्वरकर**

**ऑल इंडिया बँक एम्पलॉइज असोसिएशनचे नेते.**
**महाराष्ट्र स्टेट बँक एम्पलॉइज फेडरेशनचे नेते.**
**बँक ऑफ महाराष्ट्र एम्पलॉइज युनियन चे नेते.**
**माजी ''कर्मचारी संचालक'' बँक ऑफ महाराष्ट्र**
**अन्नपूर्णा परिवार, संचालक मंडळ.**

# २. आता मी मेधाचा फॅन झालो आहे!

**अ**न्नपूर्णा परिवाराची मेधाताई ही कॉ. दादा पुरव व प्रेमा आत्या ह्यांची मुलगी म्हणूनच मी बालपणापासून तिला ओळखत होतो. विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक चळवळीत ती भाग घेऊ लागली. आणि त्यातच तिने आपला खरा जीवनसाथीही मिळवला. कॉ. दादा पुरव व प्रेमा आत्या यांची सामाजिक बांधिलकीची परंपरा व धुरा समर्थपणे नुसतीच सांभाळली नाही तर तिला एक एक पायरी वर चढवत, आपल्या स्वकर्तृत्वाने, उंच शिखरावर नेले आहे.

कॉ. दादांचं काम सुद्धा अगदी तरूणपणीच सुरू झाले होते. दादर, परळ, लालबाग, वरळीकडील आणि तरूण मुलांना संघटीत करून त्यांनी 'लोकसेना' ही संघटना बांधली. त्यामध्ये त्यांना 'बंडा हर्डीकर' व 'श्रीकांत लाड' सारखे साथीदार लाभले होते. ब्रिटीश साम्राज्यशाही विरूद्ध स्वातंत्र्यलढा तीव्र व प्रखर करणे हा त्यांचा मूळ उद्देश होता.

पुढे ते गिरणी कामगार युनियनच्या चळवळीमध्ये ओढले गेले. १९४६ नंतर बँक कर्मचाऱ्यांच्या ट्रेड युनियन चळवळीचे समर्थपणे पुढारीपण केले. १९८२ मध्ये त्यांच्या अकाली व आकस्मिक मृत्यूपर्यंत म्हणजे अवघ्या ५४ व्या वर्षी कॉ. दादा अखिल भारतीय पातळीवरचे 'ए.आय.बी.ई.ए.' चे पुढारी झाले होते. त्यांचे कर्तृत्व व कार्यपद्धती मी जवळून पाहिली आहे. त्यामुळे त्यांची कामाची उकल, सर्वसामान्य मेंबर्सना जटील सामाजिक प्रश्न समजावून सांगण्याकरिता लागणारी अभ्यासूवृत्ती, सहनशीलता वगैरे गुण मला मेधामध्ये पुरेपूर बघायला मिळाले.

कठीण प्रसंगी लागणारी नीडरता व गुंतागुंतीच्या प्रसंगी आणि प्रतिकूल राजकीय, सामाजिक परिस्थितीतून आपल्या संघटनेचे व पर्यायाने सर्व सभासदांच्या हितसंबंधाचे रक्षण

करण्याचे कौशल्य कॉ. दादांमध्ये होते, 'नोटाबंदी' च्या काळातील मेधाने त्याच गुणांचे दर्शन घडवले. अन्नपूर्णा परिवाराला सावरले व सुखरूप बाहेर काढले. पद्‌मश्री पुरस्काराने सन्मानित केलेल्या मुंबई अन्नपूर्णाच्या प्रेमाताई ह्यासुद्धा अगदी लहान वयातच सामाजिक चळवळीत आल्या. 'गोवामुक्ती' संग्रामात काम करणारा त्यांचा मोठा भाऊ काशिनाथ तेंडुलकर व त्यांच्या मित्र मंडळींची जी भूमिगत चळवळ होती त्यात सहभागी होऊन भूमिगत चळवळीत क्रूर पोर्तुगीज पोलिसांचा ससेमिरा चुकवत व दहशतीच्या वातावरणांत 'खबऱ्या' म्हणून काम करणं सोपं नव्हतं.

तोच धाडसीपणा मला मेधाच्या कामातही प्रतीत झालेला अनेकदा दिसला. समोरचं ध्येय स्पष्ट असेल तर धाडसी स्वभाव कठीण परिस्थितीवर मात करण्यास उपयोगी पडतो. १९९१ नंतर केंद्रीय सरकारने अवलंबिलेल्या नवीन आर्थिक नीतीमुळे देशातील उद्योगधंदे व सामजिक परिस्थितीमध्ये खूपच फरक पडला. त्यामुळे प्रेमाताईने मुंबई अन्नपूर्णाचा 'खानावळ मॉडेल' चा उभारलेला डोलारा व त्याकरिता वाशी, शिरवळ, प्रभादेवी येथे केलेली गुंतवणूक ही खूपच अनुत्पादीत राहू लागली होती. शिवाय ही गुंतवणूक पदरच्या शिल्लकीतील नव्हे तर इतर वित्तीय संस्थाकडून कर्जाऊ म्हणून घेतलेली, त्यामुळे आत बट्ट्याचा व्यवहार चालला होता. हुशार आणि अभ्यासू वृत्तीच्या मेधाताईंच्या ही गोष्ट लक्षात यायला वेळ लागला नाही.

पुणे येथे स्वत:चे अन्नपूर्णा परिवाराचे काम स्वतंत्रपणे मेधाताईने सुरू केलेच होते. जवळ जवळ एक तप आपल्या मैत्रिणी-चित्राताई व अंजलीताई तसेच आपला जीवनसाथी जयंत (यशवंत) यांच्या मदतीने, सहकार्याने मोठ्या कष्टाने हे काम उभे केले होते. ह्या अनुभवाच्या गाठीवर तिने मुंबई

अन्नपूर्णा महिला मंडळाच्या कामात लक्ष घालायला सुरूवात केली.

मी, कॉ. धोपेश्वरकर, प्राध्यापक आनंद मेणसे ह्या तिच्या धाडसी कामाचे साक्षीदार आहोत. प्रेमाताई आणि मेधाताई ह्यांच्या ह्या अफाट कामाचे सामाजिक बांधिलकी मधील आम्ही एक घनिष्ठ दुवा म्हणून वावरलो. तब्बल दहा-बारा वर्षाच्या अविरत नियोजनबद्ध परिश्रमाने टप्याटप्याने मेधाताईने मुंबई अन्नपूर्णाचा डोलारा भक्कम पायावर उभा केलाच त्याचबरोबर पुण्यातील आपल्या अन्नपूर्णा परिवाराचे तिने एका सुंदर सशक्त 'अन्नपूर्णा परिवारात' रूपांतर केले.

हे काम वरकरणी अनेकांना सोपे वाटेल आणि वाटते सुद्धा. मायक्रो फायनान्स म्हणजे काय? छोटे छोटे कर्ज वाटायचे. आपल्या समाजात गरजवंत खूप आहेत, कर्ज देणारेच पाहिजेत. पण मेधाने अंगिकारलेला व स्वीकारलेला मायक्रो फायनान्सचा मार्ग हा कष्टकरी महिलांच्या सबलीकरणाच्या चळवळीचा एक भाग आहे. हे लक्षात घेतले तर मेधाच्या नेतृत्वाखाली अन्नपूर्णा परिवाराचा जो विस्तार गेल्या २६-२७ वर्षात झाला आहे. त्याचे ऐतिहासिक महत्त्व जाणवेल.

मुळांत 'बँक ऑफ इंडिया' मधील चांगल्या पगाराच्या शाश्वत नोकरीचा त्याग करून कष्टकरी महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण चळवळीत उडी घेणं हेच मेधाचे एक मोठे धाडस होतेच! पण कॉ. दादा पुरव आणि कॉ. प्रेमा पुरव ह्या आई वडिलांचा सामाजिक चळवळ व सामाजिक बांधिलकीचा वारसा आणि आपला विद्यार्थी दशेतच चळवळीत मिळालेला जीवन साथीदार जयंत सामंत याचा भक्कम पाठिंबा, साथ आणि मार्गदर्शन ह्याच्या जोरावर मेधाने हे धाडस यशस्वीरित्या स्वकष्टाने अन्नपूर्णा परिवाराच्या रूपाने फलद्रूप केले आहे.

कॉ. दादा पुरव आणि पूर्वाश्रमीच्या प्रेमा तेंडुलकर यांना मी माझ्या बालपणापासून ओळरवतो. मी १०-१२ वर्षांचा असेन. मी माझ्या आई वडिलांबरोबर मुंबईत क्रॉफर्ड मार्केट जवळील म्युनिसिपल डॉरमेटरीत राहात होतो. माझी पाच भावंडेही बरोबर होती. १९५७-५८ चा तो काळ होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीने रवूपच जोर धरला होता. माझे वडील, रामभाऊ उटगी दैनिक मराठ्याच्या संपादकीय मंडळात काम करायचे. आचार्य अत्रे यांचा 'दैनिक मराठा' म्हणजे एक मुलूरव मैदानी तोफच होती व संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे ते एक मुरवपत्रच होते. प्रेमाताई आणि दादा पुरव हे सुद्धा 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीत सक्रीय होतेच. आचार्य अत्रे हे प्रेमाताईचे 'पप्पा' आणि माझे वडील 'रारवी बंधु' म्हणून प्रेमाताई ह्या माझ्या प्रेमा आत्या!

प्रेमाआत्या त्यावेळी व्ही.टी. (बोरिबंदर-आजचे सीएसटी) जवळील बोराबाझार गेट वरील एका जुन्या बिल्डिंग मधील मोठ्या फ्लॅटवरती एकट्याच राहात. तेव्हा माझ्यावर एक जबाबदारी सोपवली गेली. रोज रात्री मी त्यांना सोबत म्हणून वरील फ्लॅटवर झोपायला जात असे व पहाटे उठून कर्नाक बंदर ब्रीज जवळील 'जनाबाई आणि माधवराव रोकडे' अ. प्रा. शाळा येथे शिकायला जात असे. जेमतेम एक वर्षभर हा कार्यक्रम चालू राहिला.

येथेच माझी बेळगावचे ज्येष्ठ पुढारी कॉ. कृष्णा मेणसे, लाल निशाण गटाचे ज्येष्ठ पुढारी कॉ. दत्ता देशमुरव आणि कॉ. दादा पुरव यांची भेट झाली.

पुढे १९५९ मध्ये कॉ. दादा पुरव- प्रेमा आत्याचा विवाह झाला. शिवाजी पार्क येथील त्या लग्न सोहळ्यास माझे आई-वडील आणि मी हजर होतो. पुढे आम्ही १९६० मध्ये चेंबूरला राहायला गेलो, परत १९६२ मध्ये टिटवाळा जवळील

शहाड गावात, तेथून १९६४ मध्ये दहिसर आणि मग सायन कोळीवाडा येथे.

शेवटी १९६६ मध्ये मुंबई सोडून आम्ही सगळे बेळगावला राहायला गेलो. कारण माझे वडील दैनिक 'विशाल महाराष्ट्र' मध्ये उपमुख्य संपादक म्हणून होते. बेळगाव येथे कृष्णा मेणसे असल्यामुळे आम्हाला खूपच हायसे वाटले. गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये शिकताना मी कॉ. कृष्णा मेणसे यांच्या शहीद भगतसिंह बुक स्टॉल आणि त्यांच्या मेणसे गल्लीतील घरी येत जात असे. त्यांच्या बरोबरच मी पॉवरलूम वर्क्स युनियनमध्ये ट्रेड युनियनचे सुरूवातीचे धडे गिरवले. आणि मार्कस्वाद व समाजवादी विचारांचे बाळकडू प्यालो.

आचार्य अत्रे यांच्या मृत्यूनंतर जशी 'मराठा' ची वाताहात झाली तसेच दैनिक 'विशाल महाराष्ट्र' ची लवकराच दिवाळखोरीकडे वाटचाल सुरू झाली. वडील व घराकडील दैना मला बघवेना. मीच मोठा मुलगा म्हणून १९६८ मध्ये मी मुंबईला आलो आणि सिंदीयाची सिस्टर कन्सरन इस्टर्न बंकर्स लि. मध्ये नोकरीला लागलो. मी सायन येथे एका गेस्ट हाऊसमध्ये राहात होतो. त्यामुळेच परत एकदा प्रेमा आत्या आणि दादा पुरव यांच्या संपर्कात आलो. कारण ट्रेड युनियन चळवळ, कामगार मैदान व शिवाजी पार्कवरील सभा.

१९६८ चा मे महिना. शाळांनाही सुट्टीमध्ये मेधा आपल्या बहिणींना घेऊन एस. टी. बसने कोकणात आपल्या मावशीकडे चालली होती. कॉ. दादा पुरवांबरोबर मी सुद्धा त्यांना बसमध्ये बसवायला बॉम्बे सेंट्रल एस. टी. बस स्टॅन्डवर गेलो होतो. सकाळची वेळ असूनही बस स्टॅन्डवर तोबा गर्दी. सीट रिझर्व केल्यामुळे मेधा, विशाखा यांना बसमध्ये बसवण्यास काही त्रास झाला नाही. पण बस काही सुटेना. कॉ. दादा, कंडक्टर व दोन प्रवासी ट्रॉफिक कंट्रोलरच्या

ऑफिसकडे गेले होते. थोड्या वेळाने ‘‘प्रसन्नदादा बस सुटायला उशीर का होतो आहे? बाबा कुठे गेले?’’ असे मेधाने विचारले. मेधाने ‘प्रसन्न दादा’ म्हणून मारलेली ती हाक कदाचित पहिलीच असावी. मेधा तेव्हा केवळ आठ वर्षाची असावी आणि मी सगळं घरदार सोडून एकटाच नोकरीच्या निमित्ताने मुंबईला आलो होतो. त्यामुळे ‘प्रसन्नदादा’ ह्या हाकेने मी थोडासा सुखावलो. इतक्यात कॉ. दादाही आले. ते पॅसेन्जर आणि कंडक्टर बसमध्ये चढले व बस सुटली. नंतर कॉ. दादांनी मला सांगितले की, एकाच सीटकरिता दोघांना रिझर्वेशनची तिकिट दिली होती. आणि कंडक्टर नंतर आलेल्या प्रवाशाला उतरवण्याचा प्रयत्न करीत होता. कॉ. दादांनी मध्यस्थी करून दुसऱ्या प्रवाशाला ही सीट देण्यास भाग पाडले होते.

समाजात वावरतांना आपल्या सभोवताली होणाऱ्या अन्यायाविषयी चीड येणे आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करणं हा कॉ. दादांचा स्वभाव हा मेधामध्येही पुरेपूर उतरला आहे.

कॉ. कृष्णा मेणसे कडून ट्रेड युनियन मध्ये काम करण्याचे प्राथमिक धडे व ‘समाजवाद’ म्हणजे काय ह्या विचारांची ओळख आणि त्याबरोबरच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्व घेऊनच मी मुंबईला आलो होतो. त्यामुळे कॉ. दादा पुरव व प्रेमा पुरव ह्यांना भेटण्याकरिता राम मारूती रोड, दादर येथील ‘नवनीत’ मधील त्यांच्या घरी जात असे. हे घर म्हणजे सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा भेटण्यासाठी, चर्चा-मिटींगज् करण्याचा अड्डाच होता. घर तसं छोटसंच. मिटींगज्, चर्चा म्हणजे थोडा गोंगाट आलाच. पण मी मेधाला आतल्या खोलीत एकचित्त होऊन अभ्यास करताना बघितले आहे.

पुढे कॉ. दादांच्याच सांगण्यावरून बँक ऑफ इंडियाची बेळगांव येथे नवीन शाखा होणार होती. त्याकरिता अर्ज केला. परंतु लेखी व तोंडी परिक्षा वास्को-द-गामा येथे झाली आणि बेळगांव ऐवजी मडगाव (गोवा) शाखेत पोस्टिंग ऑर्डर हाती मिळाली. त्यामुळे १९ मे १९६९ पासून मी गोवेकर झालो. प्रोबेशनवर असतानाच जुलै १९६९ मध्ये मी ए.आय.बी.ई.ए. च्या हाकेनुसार इतर बँक कर्मचाऱ्यांबरोबर संपावर गेलो आणि युनियनच्या कामातही लक्ष घालू लागलो. कॉ-ऑपरेटीव्ह बँक कर्मचाऱ्यांना संघटीत करून त्यांच्या युनियन्स रजिस्टर करून घेतल्या. त्यामुळे मी गोवा बँक कर्मचारी संघटनेचा सरचिटणीस झालो. त्यामुळे मुंबईला माझं जाणं येणं चालूच राहिले.

मेधा-जयंत यांचे लग्न झाले. मी त्यांच्या लग्नाला हजर होतो. मग मेधा जयंत अंधेरीला रहायला गेले. मेधा बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरीही करू लागली होती आणि युनियनच्या कामात रसही घेऊ लागली होती. माझ्या मुंबईच्या एका भेटीत मेधाने मला तिच्या घरी जेवायला बोलविले. मी संध्याकाळी सात-आठच्या सुमारास तिच्या घरी पोहोचलो. ती स्वयंपाक करीत होती. जयंत वॉशिंग मशिनमध्ये कपडे धुवायला घालत होता. जेवण तर तिने चविष्ट व सुरेख केलेच होते पण माझ्या आठवणीत राहिली ती गोष्ट म्हणजे जेवण झाल्यावर ओटा पुसून, ओटा पुसण्याचे कापड धुवून ते एका विशिष्ट पद्धतीने सिंकजवळ वाळत घातले. त्यानंतर जयंतने ते कापड काही कारणाने घेतले आणि दुसरीकडे ठेवले. मेधाने ठणकावून त्याला सांगितले, ''मी जिथे ते कापड घातले होते तिथेच तसेच वाळत घाल.''

अन्नपूर्णाच्या ऑफिसमध्ये गेल्यावर लिफ्टमध्ये लिफ्टच्या बाहेर, वॉशरूम मध्ये वॉशरूमच्या बाहेर गेस्टहाऊसमध्ये अशाच प्रकारच्या खास सूचनांचे तक्ते

लावलेले दिसतील. मी तिच्या या ‘काटेकोर’ वागण्याच्या स्वभावाची थट्टा करण्यासाठी हे सांगत नाही, तर आठवण झाली ती कॉ. दादांचे युनियन ऑफिस नीटनेटके ठेवण्यात, योग्यप्रकारे विषयावर फायलिंग करण्याकडे जो कटाक्ष होता त्याची. ह्या शिस्तीचे इतरांना पालन करावे लागे. काहींना ह्या गोष्टी जड जातात.

मला आणखी एका गोष्टीचं खूपच कौतुक वाटतं, मेधा आपल्या अंगभूत उपजत गुणांना जपण्याकरिता कुठून कसा वेळ काढते याचे. ती सुरेख कविता करते, चित्र काढते, लिहिते, बोलते आणि सदा हसतमुख राहाते.

तिने लिहिलेल्या कवितांचा ‘सखी’ हा काव्यसंग्रह २००० सालीच प्रसिद्ध झाला. कवी नारायण सुर्वे यांची त्याला खूपच छान प्रस्तावना आहे. अन्नपूर्णाच्या आपल्या कामाच्या अनुभवावर आधारलेलं, कष्टकरी महिलांच्या सबलीकरणावर आणि सक्षमीकरणावर आधारित तिने थोडेच पण अर्थपूर्ण साहित्य निर्माण केले आहे आणि ते अनेक मासिके व साप्ताहिकांतून प्रसिद्धही झाले आहे. अनेक सेमिनार आणि वर्कशॉपमधून भाषणे देणे तसेच प्रशिक्षण देण्याचे कामही तिने छान व समर्थपणे केले आहे. तिने दिलेले ‘टेड टॉक’ ही खूपच गाजले.

मेधा व आम्ही अगदी जवळ आलो त्याला आणखीही एक कारण आहे. कॉ. दादा अचानक मृत्यूला सामोरे जाण्यापूर्वी मुंबईच्या सायन हॉस्पिटलमध्ये कोमा अवस्थेत त्यांनी काढलेले बरेच दिवस आणि त्यांच्या निधनानंतर प्रेमाआत्या, मेधा, विशाखा आणि पप्पू (माधवी) यांचे गोव्याला आमच्या घरी वास्तव्य. त्या दिवसात हॉस्पिटल मध्ये आय.सी.यु च्या बाहेर लॉबीमध्ये प्रेमाआत्या बसून होत्या. दादांचे खूपसे सहकारी, ट्रेडयुनियनमधील पुढारी, मित्रमंडळी, आप्तेष्ट, नातेवाईक आणि सर्वसामान्य कार्यकर्ते कॉ. दादांच्या

प्रकृतीची विचारपूस करायला येत होते. मी सुदधा गोव्यातून तीन- चार वेळा जावून आलो. मेधाच्या मनात बाबा शुध्दीवर येत नाहीत ही काळजी होतीच पण बोलताना ती दुसऱ्यांना धीर देत होती. व कॉ. दादा लवकर बरे होतील या आशेवर त्यांना परत घरी पाठवत होती.

१८ ऑगस्ट १९८२ ला मुंबईत पोलिसांची बंडाळी होती. त्यातच कॉ. दादांच्या मृतदेहाला दादर स्मशानभूमीत अग्नी दिली गेला. दुसऱ्याच दिवशी कॉ. छड्डा, कॉ. चिटणीस, कॉ. परांजपे, कॉ. धोपेश्वरकर यांच्या सल्ल्यानुसार मी प्रेमाआत्या व तिघी मुलींना घेऊन गोव्याला आमच्या घरी मडगांवला आलो. माझी बायको जयश्रीने त्यांचं दुःख हलके करण्यास खूपच मेहनत घेतली. आपली शाळेतील नोकरी आणि सहा व दीड वर्षाची अशी दोन मुलं ह्यांना घेवून हे काम सोपं नव्हतंच. जवळजवळ १०/१५ दिवस त्या आमच्याकडे होत्या. गोव्यातील त्यांच्या कुठल्याच नातेवाईकांना याचा पत्ता सुध्दा नव्हता. हया गोव्यातील वास्तव्यात मेधाने स्वतः ला सावरलेच, पण आपल्या बहिणी व आईला सुध्दा त्यांची काळजी घेत सावरले. ह्याच वास्तव्यात माझा मोठा मुलगा सागर हा मेधाआत्याच्या फार जवळ आला.

प्रो. मोहम्मद युनूस यांना त्यांच्या बांगलादेशमधील ग्रामीण बँकेच्या मायक्रोफायनान्स मॉडेलला नोबेल पारितोषिक मिळाले. त्यानंतर आपल्या देशात सुद्धा एस.जी.सी. व लघुकर्ज वाटपावर भर देणाऱ्या अनेक वित्तिय संस्था निघाल्या. परंतु अनेकांनी त्या अतिशय संकुचित मर्यादितच राबवल्या, मायक्रो फायनान्स म्हणजे गरीबांना कर्ज वाटप व वसुली करणे ह्या मर्यादे पलिकडे ते गेले नाहीत.

मेधा अन्नपूर्णा परिवार ह्या संकुचित संकल्पनेच्या पलिकडे जाऊन गरीब कष्टकरी उद्यमी महिलांना वाढत्या क्रमाने छोटी मोठी कर्ज सातत्याने देत, त्यांचे व त्यांच्या

कुटुंबियांचे राहाणीमान उंचावून समृद्ध करण्यावर भर देत आहे. म्हणूनच तिने आखून दिलेली अगदी पहिल्या लघुकर्जापासूनची कर्ज वाटप ते कर्जाची वसुली करेपर्यंतचे आराखडे व पायऱ्या ह्यांनी एका 'मॅन्युअलचे' स्वरूप धारण केले. स्वत: अगदी पहिल्या ९ भाजीवाल्या महिलांना ११ जुलै १९९३ मध्ये दिलेल्या तिचे प्रत्येकी रू. १०००/- च्या कर्जापासून ते आजतागायत मॅन्युअल परफेक्शनचे काम चालूच आहे.

मेधा अन्नपूर्णात आणखी एका गोष्टीची डोळयात तेल घालून काळजी घेते. आपले सभासद यशस्वी उदयोजिका व्हाव्यात, व्यावसाय व उदयोगातील जोखीम घ्यायला धीट, सक्षम व सिध्द व्हाव्यात, पण अतिउत्साह व हव्यासापोटी कर्जबाजारी (Over borrowed) होऊ नयेत याची.

इतर मायक्रोफायनान्स कंपन्याना याचे भान असत नाही कारण नफा हे त्यांचे लक्ष्य असते. ''महिला सक्षमीकरण'' हे घोषवाक्य केवळ जेवताना लोणचे तोंडी लावायला घेतो तसे त्यांचे असते.

मला आवडतात ती मेधाने स्वत: लिहून तयार केलेली गाणी आणि प्रार्थना, प्रतिज्ञा ज्या निरनिराळ्या मिटींगच्या वेळी सर्वांनी सामूहिकरित्या तालबद्धपणे गायली जातात आणि मिटींग संपवताना 'आम्ही सगळयाजणी एक आहोत' ही प्रतिज्ञा केली जाते.

''हे मंदिर मानवतेचे
फूल वाहू या इथे श्रमाचे
दु:ख गरिबी दूर करणे
काम हे अमुचे
हे मंदिर मानवतेचे........
....... आणि
चल ग सखे मिटींगला.......
सुख दु:ख मनातलं सांगायला

मेधाने लिहिलेली ‘जसा तवा चुल्यावर’ ही स्वानुभवावर आधारलेली ‘स्त्री’ मासिकातून प्रसिद्धीस आलेली मालिका, ‘सकाळ’ मधून प्रकाशित झालेल्या अन्नपूर्णा सभासदांच्या यशोगाथा किंवा अन्नपूर्णाच्या दरमहा होणाऱ्या मिटींगकरता तिने सामाजिक विषयावर लिहिलेली पत्रे खूप वाचनीय आहेत. अन्नपूर्णा परिवाराच्या सभासदांच्या सुखदु:खाशी ती किती एकरूप झाली आहे त्याचे ते द्योतक आहे. इतर सर्वसामान्य लेखिकेप्रमाणे गरीब कष्टकरी महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, त्यांच्या सुखदु:खाच्या कथा सांगणे एवढेच करून मेधा थांबली नाही. ती स्वत: कृतिशील असल्यामुळे अन्नपूर्णाच्या माध्यमातून तिने नवनवीन योजना त्यांच्या सबलीकरण व सक्षमीकरणाकरीता राबवल्या.

मेधाने अगदी सुरुवातीला समुद्दिष्ट गट स्थापन करून गरीब कष्टकरी महिलांना कर्जे दिली आणि त्यांना खाजगी सावकार, यांच्या मगरमिठीतून मुक्त केले. मग त्यातूनच बचत करणे, वाढवणे, आजारपण किंवा मृत्युमुळे मग तो अपघाती असो वा नैसर्गिक, त्यातून ओढवणाऱ्या आघाताना तोंड देण्याकरिता विमा उतरवणे आणि त्याची ‘अन्नपूर्णा परिवार’ अंतर्गतच व्यवस्था करण्याचे कौशल्य दाखविले. बाजारात अनेक विमा कंपन्या आहेत. नफा कमविणे हेच त्यांचे उद्दिष्ट असते. म्हणून तिने तिचा फ्रेंच मित्र फ्रॅनकोज् झेव्हियर (एफ.एक्स.) ह्याच्या मदतीने खास स्कीम तयार करून घेतली. एफ.एक्स. हा एक उत्तम ॲकच्युरियल तज्ञ आहे तर मेधा ही संख्याशास्त्रात पारंगत आहे. त्यामुळे यशस्वीरित्या कर्जदाराच्या मृत्युचा विमा, स्वास्थविमा, कुटुंबाकरिता विमा अशा अनेक स्कीम्स् तयार करून त्या राबविल्या. एक वैशिष्ट म्हणजे विम्याचे दावे खुद्द सभासदच पास करतात व त्याचे पैसे सार्वजनिक रित्या मिटींगमध्ये कम्युनिटी प्रतिनिधीच्या हस्ते वाटले जातात. त्यामुळे तळागाळातील सभासदामध्ये आत्मविश्वास वाढीस लागून नवे

नेतृत्व व कार्यकर्ते तयार होण्यास मोठा वाव मिळत आहे. वृद्धापकाळाची गरज म्हणून आधारपूर्णा पेन्शन योजनाही आणली.

मेधा एक उन्तम कुटुंब किंवा व्यक्ती मार्गदर्शक आहे. गरिबी व दारिद्रय सामाजिक दुष्ट प्रवृत्ति याची तिला जाणीव आहे. त्यामुळे अन्नपूर्णा परिवारांत कुटुंब मार्गदर्शन (कौन्सिलिंग) ची व्यवस्था केली आहे. ह्या गरीब महिला आणि त्यांचे कुटुंबिय हळूहळू का होईना गरीबी, दारिद्रय, अंधश्रद्धा, प्रतिगामी रूढी, परंपरापासून मुक्त होतील.

तरूण कष्टकरी महिलांना आपल्या मुलांना पाठीशी बांधूनच कामाला जावे लागते किंवा वस्त्यामध्ये वाऱ्यावर सोडून कुटुंबाच्या रोजीरोटीसाठी जावे लागते. त्यामुळे अन्नपूर्णाच्या माध्यमातून मेधाने गरीब वस्त्यामध्ये पाळणाघरे सुरू केली. ज्यामुळे गरीब वस्त्यामधील मुलांना चांगलं सुरक्षित संस्कारक्षम बालपण मिळते आणि त्यांच्या आईला निर्धास्तपणे कामासाठी घराबाहेर पडता येते.

अन्नपूर्णेच्या सभासदांच्या स्वास्थ विमा बरोबर नियमाने आरोग्य तपासणी डॉक्टरांच्याकडून होतेच, परंतु आरोग्याची ऋतुमानाप्रमाणे काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन वस्ती पातळीवरच मेधाने सुरू केले आहे. शिवाय घरोघरी अन्नपूर्णाचे वार्षिक कॅलेंडर आहेच, ज्याच्या प्रत्येक महिन्याच्या मागच्या पानावर उपयुक्त माहिती, सल्ले, उपाय दिलेले आहेत. अन्नपूर्णाच्या सभासदांना उद्योगासाठी सल्ला, मार्गदर्शन, प्रशिक्षणाची व्यवस्था आहेच, शिवाय नोकऱ्या मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच मुलांच्या शिक्षणाकरिता कर्ज व अनुदानाची व्यवस्था केली आहे.

२०१९ पासून घर बांधणी प्रकल्पाची सुरूवात केली आहे. घरबांधणी प्रकल्प म्हणजे केवळ गृहकर्ज वाटणे नव्हे तर

त्याकरिता तज्ञलोकांची मदत व इतर सामाजिक संस्थाच्या आणि सरकारच्या सहाय्याने ही घरे सुबक, सुंदर, मजबूत आणि आर्थिकदृष्टया सभासदांना परवडणारी असावीत असा कटाक्ष आहे. तसे प्रयत्न अन्नपूर्णा परिवारातर्फे सुरू झाले आहेत. ह्या सर्व कामामध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा व प्रेरणास्थान आहे मेधाताई.

कॉ. दादा पुरव, कॉ. धोपेश्वरकर आणि माझ्यासारख्यांनी मध्यमवर्गातील कामगारांच्या उत्कर्षाकरिता आपल्या कुटुंबाची पर्वा न करता वेळ व शक्ती, आयुष्यच पणाला लावले. एका विशिष्ट सामाजिक, राजकीय व औद्योगिक कालखंडात आपल्या देशाच्या विकासाची ती मोठी गरज होती. आपल्या देशातील औद्योगिक मागासलेपणा दूर करण्याकरिता मोठी 'क्रयशक्ति' असलेला मध्यमवर्ग तयार होणे गरजेचे होते. कारण आपल्याच देशात नाही तर सर्व जगात 'बाजारावर आधारित अर्थव्यवस्था' आहे. परंतु बाजारावर आधारित अर्थव्यवस्था शाश्वत नसते तिला समाजवादी अर्थव्यवस्थेत रूपांतरीत व्हावेच लागेल.

म्हणूनच समाजवादाच्या दिशेने वाटचाल करताना गरिबी व दारिद्र्य निर्मूलनाकरता मेधाने घेतलेला वसा महत्त्वाचा व मोलाचा वाटतो. काही डाव्या चळवळीतल्या नेत्यांना 'अन्नपूर्णा' चे काम नेमस्त, मिळमिळीत, केवळ सुधारणावादी वाटते. त्यामुळे क्रांतीची धार बोथट तर होणार नाही ना अशी भिती त्यांना वाटते. अशा पोथीनिष्ठ धोपटमार्गाने जाणाऱ्या डाव्या चळवळीतील नेत्यांना मला सांगावेसे वाटते की, अन्नपूर्णाने राबविलेल्या गेल्या २७ वर्षातील एका परिपूर्ण कार्यक्रमामुळे हजारो गरीब कष्टकरी महिलांना हत्तींचं बळ आलं आहे. म्हणूनच २३ जानेवारी २०२० च्या वार्षिक मेळाव्यामध्ये मोदी-शहा जोडगोळीच्या नागरिकत्व सुधारणा कायदा व नागरीकत्व नोंदणी मोहिमे विरोधात ठराव पास करून हजारो स्त्रियांनी 'हम कागज नहीं

दिखायेंगे' ची घोषणा बुलंद केली. समाज परिवर्तनाच्या चळवळीत आम्हीही आहोत हेच दाखवून दिले.

मला १९९३ मध्ये मेधाने उचललेल्या धाडसी पावलाचे कौतुक वाटते. बँकेतील सुरक्षित लठ्ठ पगाराची नोकरी त्यागून 'अन्नपूर्णाची' जोपासना केली व त्याचे मोठ्या परिवारात रूपांतर केले. ती बँकेतील ट्रेड युनियनमध्ये काम करीत होती आणि मोठी पुढारी पण होऊ शकली असती, तशी तिच्यात क्षमता होतीच. परंतु तिने तो सोपा मार्ग पत्करला नाही. त्यामुळेच तिचे अन्नपूर्णा परिवारातील विधायक कार्य, अष्टपैलू व्यक्तिमत्व व कर्तृत्व जास्त खुलून दिसते. म्हणूनच मी तिचा फॅन झालो आहे.

तिने आईस उद्देशून लिहिलेल्या आपल्या कवितेतील पुढील ओळी सार्थ करून दाखविल्या आहेत.

आत्ताशी उमगू लागलंय
या वाढीच्या आलेखावरचा
मी फक्त एक बिंदू
तुझ्या पुढचा.......

सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांनी ''सखी'' च्या प्रस्तावनेत मेधाविषयी अतिशय मार्मिक नोंद केली आहे की, यातील कविता संख्येने कमी आहेत हे ठिकच आहे. नाहीतरी भाराभार लिहूनही खूप काही साधते असे नाही. त्यातील सच्चेपणा व प्रामाणिक स्वर टिपण्याची क्षमता असायला हवी, ती ह्या कवयित्रीच्या प्रतिभेत आहे हे ठळकपणे जाणवते.'

१३ एप्रिल २०२० ला मेधाचा ६० वा वाढदिवस !
तिला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !

**कॉ. प्रसन्न उटगी**

**अध्यक्ष ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस गोवा.**
**निवृत्त सचिव बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन.**
**संचालक मंडळ सदस्य अन्नपूर्णा परिवार.**

# ३. ‘‘माझी बहिण मेधा’’

**मी** आणि मेधा तसे समवयस्क! लहानपणापासून एकमेकांना पाहात आलेले. आमचे मेणसे आणि मेधाचे पुरव कुटुंबियांचे घनिष्ठ आणि जिव्हाळ्याचे नाते. माझे वडील आणि तिचे आईवडील कम्युनिस्ट चळवळीतले. तिची आई प्रेमाताई गोव्यातून बेळगावात आली होती. कारण गोवा मुक्ती संग्रामातील मंडळीना गोव्यात राहणे धोक्याचे होते. पोर्तुगीज त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. बेळगावात प्रेमाताईंना आमच्या घरात आश्रय मिळाला. तेथून त्या मुंबईस गेल्या. अशा ह्या प्रवासात अगदी घट्ट ज्यात खरीखुरी कॉम्रेडीयरी म्हणतात तशी ती आमच्या आई व वडलांमध्ये आहे.

मे महिन्याच्या, दिवाळीच्या सुट्टीत आमचे मुंबईत जाणे झाले तर त्यांच्याकडे राहणे होई! पुरव मंडळी आमच्याकडे बेळगावला येत असत.

नेतृत्व गुण मेधाकडे लहान वयातच होते, तिला अनेक मोठे नेते, घरीच बघायला मिळाले. अगदी कॉ. डांगे यांच्यासारख्या मोठ्या माणसाशी बालवयात संवाद साधता आला. इतरही अनेक नेत्यांची नावे घेता येणे शक्य आहे. त्यांचे दादर येथील नवनीत बिल्डींगमधील घर हे कार्यकर्त्यांचा नेत्यांचा राबता असलेले घर होते. या सगळ्या वातावरणात तिची जडण घडण झाली. लहान वयात राजकारण समजू लागले. त्यांच्या घरी असे राजकीय नेते येत तसेच साहित्यिक येत कॉ. शाहीर अमर शेख, कॉ. शाहीर अण्णा भाऊ साठे, प्र.श्री. नेरूरकर हे प्रख्यात साहित्यीक व विचारवंत हे तर तिचे मामाच, आत्याचे पती अशा प्रकारे साहित्यविषयक, कलाविषयक गोष्टी कानावर पडत गेल्या, पाहता आल्या.

मुंबईतील त्या काळामध्ये, म्हणजे ७० च्या दशकातले वातावरण तसे संघर्षाचे होते. कॉ. कृष्णा देसाईंचा खून झाला

होता. कम्युनिस्टांवर शिवसेनेकडून हल्ले होत होते. कम्युनिस्ट कार्यकर्तेही आपापल्या भागात दोन हात करीत होते. गिरणी कामगार चळवळ, बँक कामगार चळवळ, विद्यार्थी चळवळ जोरात होती. मेधा विद्यार्थी चळवळीत सहभागी झाली. जयंत सामंत, प्रकाश रेड्डी अशी मंडळी विद्यार्थी चळवळ चालत असत. मेधा या चळवळीत सक्रिय असतानाच तिचा परिचय कॉ. जयंत यांच्याशी झाला आणि पुढे हे दोघेजण जीवनाचे साथीदार झाले. एकमेकांना सांभाळून घेत त्यांची प्रगती सुरू आहे.

प्रेमाताईंनी १९७६ साली अन्नपूर्णा महिला मंडळाची स्थापना केली. कामगार वस्तीमध्ये राहणाऱ्या महिला घरगुती खानावळ चालवत. त्यांच्याकडे भांडवल नसे. यासाठी त्या पूर्णपणे सावकारावर अवलंबून असत. सावकारांकडून त्यांची लुबाडणूक होई. ही लुबाडणूक थांबविण्यासाठी त्यांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज देणे आवश्यक होते. ते काम प्रेमाताई कॉ. दादा पुरव यांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाखाली करत होत्या. प्रेमाताईंचा कामाचा उरक दांडगा, त्यांनी प्रचंड काम उभे केले.

दरम्यानच्या काळात मेधा जयंतशी विवाहबद्ध झाली. तिने बँकेत नोकरी मिळविली. आता ती बँक कर्मचारी संघटनेशी जोडली गेली. याच काळात पुरव कुटुंबावर मोठा आघात झाला. कॉ.दादा पुरव यांचे आकस्मिक निधन झाले. एका बिकट परिस्थितीला सामोरे जाणे आता भाग पडले. या काळात मेधा आणि जयंत ने अगदी जबाबदारीने प्रेमा ताईंना सावरले.

१९८९ मध्ये जयंतने आपला स्वतंत्र व्यवसाय पुण्यात सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मेधा जयंत पुण्यात स्थलांतरीत झाले. तोवर मेधा बँक कर्मचाऱ्यांची पुढारी म्हणून ओळखली जाऊ लागली होती. परंतु बँक कर्मचाऱ्यांपेक्षा

आपण ज्या भाजीवालीकडे भाजी घेतो तिचे प्रश्न तिला आता दिसू लागले. जयंतचा व्यवसाय आकार घेत होता. श्रमजीवी महिलांच्या प्रश्नांना भिडावे तर ते पूर्णवेळ भिडायचे. बँकेतली नोकरी सोडून, असा विचार करून तिने १९९३ साली बँकेतील नोकरी सोडण्याचा निर्णय घेऊन ती या क्षेत्रातील पूर्णवेळ कार्यकर्ती झाली. खरंतर जयंतचा व्यवसाय स्थिर व्हायचा होता. पण मेधाने नोकरी सोडण्याचं धाडस केलं, यातच तिचे वेगळेपण स्पष्ट दिसतं.

मेधानं सर्वात महत्त्वाची गोष्ट केली जी कम्युनिस्ट वातावरणातील माणसे सहसा करीत नाहीत. तिने आपले शिक्षण सुरू केले. आता जे काही करायचे ते 'परफेक्ट' असा विचार केला होता. समाज कार्य करण्याचे अगदी शास्त्रशुद्ध शिक्षण तिनं घेतलं. मला वाटते समाजकाम करण्याऱ्या प्रत्येकालाच असे शिक्षण घेणे आवश्यक आहे. असे शिक्षण न घेताही अनेकांनी मोठी काम केलेली आहेत. ही गोष्ट वेगळी! मेधाने पुढे असे ठरवले की आपण जर आर्थिक क्षेत्रात काम करणार असू तर मग आपणाला अर्थशास्त्र कळलं पाहिजे. यासाठी तिने या विषयातील डॉक्टरेट करण्याचा निर्णय घेतला. एका बाजुला अन्नपूर्णा महिला बचत गटांचे काम वाढत होते. आणि त्यावेळी अर्थ शास्त्रात हिचे संशोधन सुरू होते. हे केवळ मेधाच करू जाणे! तिने जिद्दीने एम.एस.डब्ल्यु. व पी.एच.डी. या पदव्या मिळविल्या व कर्तबगारी सिद्ध केली.

महिलांचे जेव्हा आपण संघटन करतो तेव्हा एक गोष्ट घडते. महिला आपली भांडणं, घरगुती समस्या घेऊन तुमच्याकडे येतात. त्यांच्याशी संवाद कसा साधायचा हे सुद्धा एक शास्त्र आहे ते तिने शिकून घेतले आणि म्हणून ती आज उत्तम प्रकारे समुपदेशन करू शकते. या कामात ती वाकबगार आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी या भाषा तिनं उत्तम आत्मसात केल्या आहेत. एखादी विदेशी विदुषी भेटायला आली तर

तिच्याशी तिच्या भाषेत आणि एखाद्या वस्तीमधील बाई भेटायला आली तर तिच्याशी तिच्या भाषेत मेधा संवाद साधू शकते. ती कधी कॉ. मेधा असते, तर कधी मेधाताई असते. असं निरनिराळ्या भूमिकेत वावरणं कठीण असतं. पण ते तिला जमून गेलंय.

कामाचा उरक हा मेधाचा आणखी एक गुण. भराभर कामं हातावेगळी करण्यातच ती माहिर आहे. तिच्या भाषेत टाईम बाऊंड प्रोग्रॅम, फोक्सड् एक्शन असे शब्द असतात. सलग ती किमान दहा तास काम करू शकते! तिचे काम म्हणजे सतत बोलत राहणे किंवा कॉम्प्युटरवर काम करणे, ही कामे ती अथकपणे करू शकते. एक दिवस झोपडपट्टीत बोलायचे आणि दुसऱ्या दिवशी विद्यापीठात बोलायचे हे काम तिलाच जमलं आहे.

मेधाचा प्रवास हा आणखी एक वेगळा विषय आहे. जेव्हा मुंबईत काम वाढवायचे ठरले तेव्हा आठवड्यातून किमान तीन फेऱ्या मुंबईच्या व्हायच्या. वेगळा ड्रायव्हर ठेवणे सुरूवातीपासून शक्य नव्हते, अशा काळात तिनं ड्रायव्हींग शिकून घेतलं आणि त्यात ती तरबेज झाली. आजही तिची गणना कुशल ड्रायव्हरमध्ये करता येईल इतकी ही निपुण आहे. ती जगभर फिरत असते. जगातल्या अनेक मान्यवर संस्थांमधून तिची व्याख्याने होतात. तिने जी विमा योजना तयार केली आहे तिच्यावर आता अभ्यासक संशोधन करत आहेत.

मेधाचे संघटन कौशल्य ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ज्यांना कोणाला तिच्या संघटन कौशल्याची झलक बघायची आहे. त्यानी अन्नपूर्णा महिला मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा बघावी. वार्षिक सभेस दहा हजारावर महिला येतात. शिस्तीत बसतात. निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात. जोरदार घोषणा देतात हे बघताना अंगावर रोमांच उभे राहतात.

पुण्यात आणि नवी मुंबईत अशा दोन सभा होतात. अशा सभा संघटीत करणे हे सोपे काम नाही.

मेधाची कलाविषयक जाणीव उत्तम आहे. साहित्य आणि चित्रकला यात तिला विशेष रस आहे. तिने जर केवळ चित्रकलेवर किंवा साहित्य निर्मितीवर लक्ष केंद्रीत केले असते तर ती त्या क्षेत्रातही अगदी उच्च स्तरावर पोहचली असती. एवढी क्षमता तिच्यात आहे. परंतु मेधाला प्रश्न पडला की, प्राथमिकता कशाला? श्रमजीवी महिलांना मदत करणे की चित्रकला आणि साहित्य? तिने श्रमजीवी जनतेच्या संघटनाला महत्त्व दिले. असे करावेच लागते. डाव्या चळवळीतील अनेकांनी असे केले आहे. हा एक वेगळ्या प्रकारचा त्यागच म्हणता येईल.

आपले दैनंदिन व्याप सांभाळत असतानाच एक गोष्ट मात्र मेधाने केली ती म्हणजे आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष होणार नाही याची खबरदारी तिने घेतली आहे. कला क्षेत्रात वावरणारा दिग्दर्शक चिरंजीव, त्याची डॉक्टर पत्नी, त्यांच्या दोन कन्या आणि आपला जीवनसाथी जयंत यांच्यातील सुसंवाद, बांधिलकी यांना धक्का लागू न देण्याची काळजी ती नेहमी घेते. सार्वजनिक क्षेत्रात जे काम करतात, त्यांच्यापासून घराकडे दुर्लक्ष होण्याचा धोका असतो. मेधाने तसे होणार नाही याची काळजी घेतली आहे.

मेधाने केलेल्या कामाची नोंद देश विदेशातील अनेक संस्थांनी घेऊन तिचा यथोचित सन्मान केला आहे. पुढेही तिला सन्मान मिळत राहतील. तिचे कार्य असेच वाढू दे. तिचा गौरव होत राहू दे ही मनापासून सदिच्छा!

**प्रा.आनंद मेणसे**

**बेळगाव**

# ४. मेधाताईंच्या सहवासात

**मे**धाताई...

आज जवळ जवळ २२, २३ वर्ष झाली आपण भेटलो त्याला. १९९७-९८ ला आपण पहिल्यांदा भेटलो, मुंबईमध्ये प्रेमाताईंचा ६१ व्या वाढदिवसासाठी. मी १९८७ ते ९२ पर्यंत लातूरमध्ये नोकरीसाठी होते, उत्तम होळीकर आणि ग्रुपसोबत नाटकं करत होते. त्यांचा बँकेचा ग्रुप काही सामाजिक विषयावर भाष्य करत असे, मी त्यांच्यासोबत होते. त्यावेळी मुंबईच्या प्रेमाताई, अन्नपूर्णा महिला मंडळ मला माहीत झाले.

तर १९९७ ला वाशी येथील अन्नपूर्णाच्या हॉस्टेलमध्ये आम्ही लातूरकर राहिलो होतो, एक शांत मुलगी त्यावेळी आम्हाला भेटली. उंच, साधी, चेहऱ्यावर किंचित हसू, आम्ही लातूरहून येडे आलो होतो, पण तिने सहज आमच्याशी बोलायला सुरुवात केली. प्रथमदर्शनी मला आवडली ती मुलगी, मेधा, प्रेमाताईंची मोठी मुलगी.

खुप ऐकले होते तुमच्याबद्दल. हुशार, बँकेतील नोकरी सोडून अन्नपूर्णाचे काम करणारी. उत्तमने मी पुण्यात बदली होऊन आल्यावर तुमचा नंबर दिला, यांच्या सोबत रहा, नुसती घर आणि नोकरी करू नकोस असा विचार मांडला. त्यानंतर कर्वेरोडला लुणावत कॉम्प्लेक्समध्ये माझे महिन्यातून एकदा येणे सुरू झाले.... आणि आज २०, २२ वर्ष आपण एकत्र आहोत ताई. अर्थात अन्नपूर्णा हा आपला समान धागा आहे .

अन्नपूर्णा नसती तर तुम्ही आणि मी इतक्या जीवाशिवाच्या भेटलो नसतो. आज आपण अन्नपूर्णा एम. डी. आणि संचालक हया नात्यापलिकडे त्या पलिकडे चांगले मैत्रही आहोत याचे जास्त अप्रूप वाटते मला! २००० ते २०२० लुणावत कॉम्प्लेक्स पासून आज सुवास्तूपर्यंतचा अन्नपूर्णा  चा

प्रवास..... वस्तीमध्ये हिंडण्यापासून ते आज तुमच्यासोबत दिल्ली, चेन्नई, बांगलादेश कुठे कुठे गेलो आपण तो प्रवास......

खुप स्थित्यंतरे झाली ह्यामध्ये, अन्नपूर्णा खूप वाढली, सुरूवातीच्या दोनच स्टाफ शुभांगी, कल्पना! आणि आज ४०० कर्मचारी, वाढलेले विश्वस्त मंडळ, अन्नपूर्णाचे इतर प्रोजेक्ट्स..... २५० कोटींचा आणि १.५ लाख सभासद असा मोठा पसारा! एक प्रोफेशनल परंतु सामाजिक चळवळ....... अन्नपूर्णा.

ह्या सर्व प्रवासात तुम्ही आमच्यासोबत एम.डी. म्हणून होतात, एक साधी अन्नपूर्णा म्हणून होतात, एक सखी, मैत्रिण म्हणून होतात, एक कुटुंबातील व्यक्ती म्हणूनही होतात, आहात.... ही तुमची प्रत्येक ठिकाणी वेगळे असण्याची कला मला अचंबित करते. २४ तास तुम्ही अन्नपूर्णा असता, पण क्षणात तुम्ही जयंतची मेधा असता, क्षणात नचूची ममा असता, ईहा, नव्या, मायरा ची आजी असता, प्रेमाताईंची काळजी करणारी मुलगी असता, कोणाची वहिनी, मामी, आत्या........ कॉलेजमधील मेधा, शाळेतील मेधा...

ह्या सर्व भूमिका सहज करत असता तुम्ही! कोठे ही ''हे मी करते'' असा आव नसतो, ह्या सर्व भूमिका म्हणजेच मेधा हे जसे काही समीकरण बनले आहे. आणि हो, ह्यामधून ही 'स्व' मधील मेधालाही वेळ देण्यासाठी तुमची धडपड असते. सखीमधील कवितामधून ती कधी कधी डोकावते. धावत पळत गाठलेल्या नाटकाला, सिनेमाला, गाण्याच्या कार्यक्रमाला, सवाईला ही मेधा जाणवते. हा वेळ तिला जास्त मिळत नाही ह्याच वाईट वाटतं. पण.............. !!!

निवांत बसून तुमच्याशी बोलताना मनात येत असते, इतकं शिकलेली, डॉक्टरेट मिळवलेली, तुमच्यावर, तुमच्या कामावर भारतात, परदेशात लोक अभ्यास करतात, थिसिस लिहितात, किती तरी पुरस्कार मिळवलेली, प्रचंड अभ्यासू,

कोणत्याही गोष्टीचा सखोल विचार करणारी, वर वर विचार न करता, त्याचे परिणाम कोणत्या गोष्टींवर कसे होतील असा तळापासून विचार करणारी ही व्यक्ती, लाखो महिलांचे भले कसे होईल, त्या स्वतःचे पायावर खंबीरपणे कश्या उभ्या रहातील, आपल्या कुटुंबाला आर्थिक सक्षम करण्यासाठी अन्नपूर्णा त्यांना काय मदत करू शकेल, कशा पद्धतीने त्यांना तोशिष पडणार नाही ह्याचा आणि ह्याचाच विचार सतत तुमच्या मनात असतो.

अन्नपूर्णा मधील वस्ती पातळीवर काम करणाऱ्या आपल्या कर्मचारी, त्यांचे सगळे सगळे तुम्हाला माहीत असते. आणि विशेष म्हणजे तुमच्या ते लक्षात ही रहाते. कधीही त्याचा काही रेफरन्स आला तर तुम्ही पटकन, त्या स्टाफ ची सगळी हिस्ट्री सांगता. तुमच्या ह्याच स्वभावामुळे आपला सगळा स्टाफ तुमच्यावर प्रेम करतो. त्यांना तुमच्या विषयी प्रचंड आदर आहे. त्याचमुळे कधीही भेटली की संगीता तुम्हाला मिठी मारते. एक प्रकारची सकारात्मक उर्जा मिळते त्यांना. तुम्ही कधीही सी. एम. डी. म्हणून अंतर ठेवत नाही. पण ह्याचा अर्थ असाही नाही, कामामध्ये निष्काळजीपणा चालेल. अश्यावेळी तुम्ही फक्त आपल्या सगळ्या अन्नपूर्णाचे सी. एम. डी. असता. काम चांगले करणाऱ्याला त्याचे कौतुक आणि न करणाऱ्याला आधी प्रशिक्षण आणि नंतर शिक्षाही मिळतेच. न सुधारणा करणाऱ्या व्यक्तीसमोर तुमचे वेगळेच स्वरूप येते मग. तिथे माफी नाही. आधी अन्नपूर्णा नंतर व्यक्ती!

मी, चित्रा आणि तुम्ही असे कामानिमित्त खूपदा बाहेर जातो. संपूर्ण प्रवासात अन्नपूर्णामधील पुढील काही वर्षात कसे निर्णय घ्यावे लागतील ह्यावर तुम्ही बोलत असता त्यावर चर्चा, आमची ही त्यावरील मते, असे बोलत असतो. मध्येच आपण घरगुती गोष्टी बोलतो, आमच्या घरचे सगळे तुम्हाला माहीत असते. कोणी आजारी, त्याची चौकशी, वेळ काढून भेटून

येणे, घरचे काही कार्यक्रम असतील तर कितीही कामं असतील तरी धावत पळत हजेरी लावून येणे, कसे जमवता तुम्ही........

तुमच्या शाळेमधील मैत्रिणीसोबत एन्जॉय करणे, त्यांना वेळ देणं, आम्ही सुध्दा त्यांच्या मैत्रिणी झालो आहोत आता. सर्वांशी तुम्ही आमची सगळ्यांची ओळख करून देता, तुमचे अन्नपूर्णा कुटुंबीय म्हणून.

खूप सामाजिक संस्था आणि तिथे काम करणारी मंडळी पाहून ऐकून माहीत आहेत ताई, पण अन्नपूर्णा आणि मेधाताई ह्यांना जॉईन होण्याचे प्रमुख कारण आपली वैचारिकता. समाजासाठी काम करण्याची निर्लेपवृत्ती आणि डाव्या विचार सरणीच्या, कोणत्याही राजकीय पक्षांच्या झेंड्याखाली काम न करण्याची वृत्ती. खूप काही वेळ देऊ शकत नाही आम्ही तुम्हाला, अन्नपूर्णाला, खारीचा छोटा वाटा उचलण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत. आणि त्याचा सार्थ अभिमानही वाटतो की आम्ही अन्नपूर्णा आहोत. आणि ह्या २०, २२ वर्षांनी आम्हाला एक वेगळी ओळख मिळाली ताई, अन्नपूर्णामधून. कोणीही वस्ती मधून भेटल्या की ‘‘तुम्ही अन्नपूर्णामधील अंजलीताई ना’’ असे विचारले की वेगळे काही तरी छान वाटते. शेवंताबाई तर कुठेही मस्त मिठी मारतात. पूर्वी मी वस्त्यांमध्ये प्रमोशन, वसुलीसाठी जायचे, आपल्या सभासद प्रेमाने चहा द्यायच्या, ‘‘आज ताई आल्या’’ म्हणून. ते प्रेम, आदर आम्हाला नक्कीच अन्नपूर्णामुळे मिळतो ताई.

कर्मचारी व आमचे नातेही खूप छान आहे. कामासाठी त्या मलाही थोडे घाबरतात, पण आमचे नातेही सुंदर आहे. उज्वला, आरती, अनिता, शुभांगी, पुष्पा ह्या सगळ्या जश्या घरच्याच आहेत. त्याही वेळ मिळेल तेव्हा घरगुतीही बोलतात, कामासंदर्भात बोलतात, कधी सल्ला विचारतात .... माझेही कुटुंब असे विस्तारले आहे अन्नपूर्णामुळे.

आपण म्हटले तर खूपदा एकत्र असतो, माझं काम संपले की मी तुमच्या मीटिंगमध्ये येऊन बसते, तुमचे काम चालू असतानाही, एखादी गोष्ट लगेच तुम्ही मला सांगता, समजावून देता, कोणत्या विषयावर चर्चा चालू आहे हे सांगता, मला त्यात सामावून घेता, त्यामुळे खूप गोष्टी समजतात. निघताना १० मिनिटे आपण आपली पर्सनल गोष्टीसाठी देतो. त्यामुळे सतत संपर्कात असतो, मला काही गोष्टी, विचार पटले नाही तर तुम्हाला मी डायरेक्ट सांगू शकते. हे असे का आहे हे तुम्ही अन्नपूर्णाच्या दृष्टीकोनातून सांगता. तिथे असे कधी होत नाही, तुम्ही सी. एम. डी. आहात, मी डायरेक्टर आहे. तुम्हाला घाबरून राहिले जात नाही, आदर आणि प्रेम असे आपले नाते आहे आणि म्हणूनच गेली वीस बावीस वर्ष मी अन्नपूर्णा परिवारामध्ये आहे आणि अत्यंत अभिमान आहे मला त्याचा.

आज 'साठी' आली तुमची, पण आजही अक्षरशः दिवसाचे चोवीस तास ही तुम्हाला कमी पडतील अश्या तुम्ही कार्यरत आहात. घरी पण सगळ्या गोष्टीत मेधा असतेच, तसेच अन्नपूर्णामध्ये मेधाताई. एक गोष्ट आवर्जून सांगायची म्हणजे इतर कंपनीप्रमाणे तुम्ही अन्नपूर्णाचे एकट्या मालक नाही आहात, इथे प्रत्येकजण अन्नपूर्णाची मालक आहे. आपल्याकडे प्रत्येक गोष्टीची माहिती सर्वांना असते. गोष्टी लपवून ठेवल्या जात नाहीत. प्रत्येकाची ठरवलेली जबाबदारी असते, ती पार कशी करायची ह्याचे सर्व प्रशिक्षण देण्यात आलेले असते. त्यात ती व्यक्ती पारंगत कशी होईल याकडे तुम्ही जास्त लक्ष देता. त्या व्यक्तीने इतर स्टाफला काम कसे सोपवावे, करवून घ्यावे, इकडे आणि स्टाफला सगळ्या सोई मिळाव्यात, ह्यावर तुमचे लक्ष असते. कर्मचारी कायद्याप्रमाणे त्यांना पगार आणि इतर सोई इथे मिळतात. आपली सर्व डिपार्टमेंट अत्यंत सोईसुविधांनी परिपूर्ण आहेत. वस्ती पातळीवरील स्टाफ कडे, त्यांच्या आरोग्याकडे, त्यांना मिळणाऱ्या सोईंकडे तुमचे सर्वात

जास्त लक्ष असते. अन्नपूर्णाचा पाया हे सभासद आणि पहिली पायरी फिल्ड स्टाफ आहेत असे तुम्ही नेहमी सांगता. वरील डोलारा हा यावर उभा आहे. त्यांना नेहमी सांभाळा, त्यांची काळजी घ्या असेच तुमचे सर्वांना सांगणे असते. त्यासाठी सर्वांची फिल्डला भेट असते.

ताई, तुमचे जीवन म्हणजे अन्नपूर्णाचे मॅन्युअल वाटतेय. वर वर पाहिले तर सगळं छान सुंदर वाटतेय. सहज मिळाल्यासारखं. पण इतक्या वर्षात तुमच्या सोबत आहोत आम्ही. आलेली संकटे, आर्थिक अडचणी, मुंबई ऑफिसला लागलेली आग, घरच्या अडचणी.... यादी दिली तर खूप मोठी होईल. इतकं सहज सोपं नाही तुमचं आयुष्य. जवळून गुलाब सुंदर दिसतो पण काटेरी कुंपण आहेच त्याला. पण कोणत्याही संकटात तुमचं धैर्य अफाट आहे. त्यावेळी तुमची शांतता भंग होत नाही. त्यातून तुम्ही कसा रस्ता काढता, बाहेर पडता हे अत्यंत महत्त्वाचे आहे! आणि फक्त स्वतः नाही तर तुमच्यासोबतच्या सर्वांना तुम्ही कणखर करायचा प्रयत्न करता, अशी खूप उदाहरणे माझ्या समोर घडली आहेत.

ताई, तुम्हाला लिखाणाला वेळ मिळावा, कारण त्यामुळे जगाला अन्नपूर्णा हे मॉडेल कायम लक्षात राहील. मी खूप छोटी आहे, तुमच्यावर मी काय लिहू, बोलू....
म्हणून मी ‘‘अन्नपूर्णा मॅन्युअल..... मेधाताई’’ ह्या बद्दल लिहायचा लहानसा प्रयत्न केला.

**अंजली दिवाण- पाटील**

**बी. एस.एन.एल.**
**संचालक, अन्नपूर्णा परिवार**

# ५. मेधाताई, कॉ. दादा पुरव, बॅकींग युनियन, सहकार व मी

**को**णत्याही व्यक्तीचे सामाजिक जीवनात काम करत असताना त्यांच्या कार्याचे मूल्यमापन हे त्यांनी स्वीकारलेल्या सामाजिक विचारावर आधारलेले असते. मुंबई शहरामध्ये जेव्हा कापड गिरणी हेच मुख्य कारखाने होते व त्या कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या मूलभूत मागण्यासाठी कॉ. एस. ए. डांगे यांच्या नेतृत्वाखाली लढे दिले गेले होते. त्यावेळी माझ्या सारख्या असंख्य तरूणांनी जे जवळून पाहिले होते. त्यावेळी कॉ. डांगे याना साथ देणारे जे कम्युनिस्ट पक्षाचे नेते होते त्यात कॉ. दादा पुरव व कॉ. प्रेमाताई पुरव हे आघाडीवर होते.

१९७५ मध्ये बँकेत माजी सैनिकांसाठी असलेल्या राखीव कोट्यातून नोकरी मिळाली. त्यानंतर मी काही दिवसातच बँक कर्मचाऱ्यांची ए.आय.बी.ई.ए. या संघटनेत काम करण्यासाठी सक्रीय झालो. त्यावेळी मी कॉ. दादा पुरव व कॉ. सुरेश धोपेश्वरकर यांच्या संपर्कात आलो.

मी स्वत: संयुक्त महाराष्ट्र चळवळ नुसती जवळून पाहिली नाही तर विद्यार्थी दशेतच चळवळीत सहभागी झालो. या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कॉ. एस. ए. डांगे, एस. एम. जोशी, क्रांती सिंह नाना पाटील अशा अनेक डाव्या नेत्यांची भाषणे ऐकून मी त्याच्या विचाराने प्रभावित झालो. आणि तोच विचार घेऊन मी आजपर्यंत सामाजिक जीवनात वावरत आहे. ह्याच विचाराने मी बँक कर्मचाऱ्याच्या संघटनेत संक्रमित झालो आणि कॉ. दादा पुरव यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली व त्यांचा आदर्श घेऊनच कर्मचारी संघटनेचे काम करीत राहिलो.

कॉ. दादा पुरव यांनी बँक कर्मचारी संघटनेची जबाबदारी पार पाडत असताना कॉ. प्रेमाताई पुरव यांना त्यांच्या अन्नपूर्णा महिला मंडळ या संस्थेला अर्थसाह्य करण्यासाठी बँकेतून दुर्बल घटकासाठी असलेल्या अर्थसाह्य धोरणा अंतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्याचे काम केले.

अन्नपूर्णा महिला मंडळ ही संस्था दादा व प्रेमाताई यांनी १९७६ मध्ये स्थापली होती. मुंबईच्या गिरणी कामगारांना जेवणाचे डबे घरगुती खानावळी चालवित असलेल्या गरीब महिला देत होत्या. अशा महिलांना मदत करण्यासाठी कॉ. प्रेमाताई पुरव व कॉ. दादा पुरव या दोघांनी अन्नपूर्णा महिला मंडळ स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून गरीब महिलांना रोजगार मिळवून देण्याचे काम केले.

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याचा उद्देश असा आहे, की हे जवळून पाहिले आणि हाच आदर्श घेऊन आम्ही चळवळीत काम करीत राहिलो. मी आणि माझ्या सारखे इतर या चळवळीत बाहेरून येऊन सहभागी झाले.

मेधा सामंत या तर अशा आदर्शवादी घरात जन्माला आल्या आणि आदर्शवादी चळवळीचे बाळकडू त्यांना मिळाले. कॉ. दादा पुरव आणि कॉ. प्रेमाताई पुरव यांनी सुरू केलेली महिला सक्षमीकरणाची चळवळ पुढे चालू ठेवण्याचे कार्य मेधा सामंत यांनी हाती घेतले. काळानुरूप बदल होत गेले तसे चळवळीचे स्वरूप सुद्धा बदलत गेले. कापड गिरण्या व कारखाने बंद पडले आणि नवीन तंत्रज्ञानाने क्रांती घडवून आणली आणि माहिती वर आधारीत उद्योग निर्माण सुरू झाले. महिला सक्षमीकरणासाठी मायक्रो फायनान्स सारखे साधन निर्माण करण्याचे काम मेधा सामंत यांनी सुरू केले. त्यासाठी त्यांनी स्वत: बँकेतील नोकरीचा राजीनामा देवून संपूर्ण वेळ या कामाला देण्यास सुरूवात केली. नुसते मायक्रो फायनान्सच्या माध्यमातून महिलांना कर्ज देवून आर्थिक उन्नतीकडे लक्ष न

देता त्या महिलांचा सामाजिक व सांस्कृतिक विकास कसा होईल याकडे सुद्धा त्यांनी आपले लक्ष दिले. अशा ह्या गरीब महिलांच्या मुलांसाठी पाळणाघरं त्यांच्या त्यांच्या वस्तीमध्ये चालवण्यासाठी मदत करून त्या पाळणाघरातील मुलावर चांगले संस्कार कसे होतील व पुढे ती मुले चांगले शिक्षण घेऊन या देशाचे आदर्श नागरीक कसे बनतील अशा प्रकारची चळवळ मेधा सामंतांनी चालू ठेवली आहे.

हा आपला भारत देश विविध धर्माचा, जातीचा, वंशाचा, भाषेचा आहे. परंतु वर्षानुवर्षाच्या परंपरेने व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने हा आपला देश विविधतेतून एकतेने घट्ट बांधलेला आहे. आणि तो कोणी तोडू शकणार नाही ही शिकवण मेधा सामंत सर्वांना देत असतात. हा एक त्यांच्या चळवळीचा भाग आहे. याचवेळी समाजातली, कुटुंबातील विषमता गेली पाहिजे याकडेसुद्धा चळवळीच्या माध्यमातून संदेश देण्याचे काम चालू ठेवले आहे आणि समाजातील अनेक गोष्टीविरूद्ध आवाज उठवण्यासाठी किंवा समाजातील बदल घडवण्यासाठी त्यांची तगमग आहे ती त्यांना कधीच स्वस्थ बसू देत नाही.

ही महिला सक्षमीकरणाची व सामाजिक बदलाची चळवळ चालू ठेवण्यासाठी व्यवस्थापन कौशल्याचा उपयोग करून आवश्यक असेल तिथे आपल्या अधिकाराचा वापर, परिस्थिती आणि त्यातील संबंधीत लोकांना हाताळणे आणि समोरची समस्या सोडविणे हे व्यवस्थापन मेधा सामंत यशस्वीपणे पार पाडत आहेत. म्हणून अन्नपूर्णा परिवार प्रगतीची वाटचाल करीत आहे.

हया चळवळीत मी गेल्या ७ ते ८ वर्षापासून सहभागी आहे. अन्नपूर्णा परिवारच्या संचालक मंडळाचा सदस्य म्हणून, सहकारी तत्वांवर चाललेल्या सक्षमीकरण चळवळीत सहभागी असल्याचा मला सार्थ अभिमान व आनंद वाटतो.

ही चळवळ अशीच पुढे चालू राहावी व मेधा सामंत यांना उदंड आयुष्य लाभो ही त्यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा !

**कॉ. बाळासाहेब पिसाळ**

**रिटायर्ड युनायटेड बँक,**

**संचालक, कुर्ला नागरी सह. बँक**

**संचालक, अन्नपूर्णा परिवार**

# ६. आधारवड कष्टकरी माहिलेचा

**मे**धा सामंत पुरव साऱ्यांच्या मेधाताई! करारी, कर्तृत्ववान, कार्यरत, सर्वसमावेशक अस्सं व्यक्तिमत्व. मी मेधा सामंत ना भेटले, तेव्हापासून त्यांच्या कामाचा वेल झपाट्याने गगनावरी चढताना पहात आले. सुरुवातीची वाटचाल, संघर्ष मला तसा अनभिज्ञच आहे.

जातपात, धर्मविरहित, निधर्मी, शोषणविरहित समानतेवर आधारित समाजरचना निर्माण झाली पाहिजे हा ध्यास घेवून मेधाताईंनी वाटचाल सुरू केली. 'नाही रे' अशा शेवटच्या घटकापर्यंत पोचून त्यांना सक्षम करण्याचा वसा घेतला. आर्थिक सक्षमता ही स्त्रीच्या विकासाची वाट आहे. ते विकासाचे दार एकदा उघडले की बाई मागेच वळून बघतच नाही. स्वबळावर स्वत:च्या पायावर उभं राहणं व स्वत:ला घडवणं हे वस्तीतील भगिनी जेव्हा करते तेव्हाच तिचं हे रूपडं अतिशय लोभस असतं! आत्मविश्वास, आत्मसन्मान, वाढीला लागलेला असतो.

मेधाताईंनी वस्तीतील अशा असंख्य भगिनींना घडविलं. उडण्याचं बळ दिलं. वाट सोपी नव्हती. लहानपणापासून घरात कष्टकरी समाजासाठी झटणारे त्यांच्या समस्याचे निराकरण करणारे आईवडील मेधाताई पहात होत्या. ह्या मिळालेल्या वाटेवरच सावकाराच्या कचाट्यांत अडकलेल्या भाजीवाल्या भगिनी भेटल्या. त्यांच्यातल्याच एक होवून त्यांचे प्रश्न सोडवत असताना मेधा ताईंनी चाकोरीची वाट सोडून दिली.

वस्तीतील महिला भाजीवाली, फळवाली, बांगडीवाली, म्हणून व्यवसाय करत होत्या. कोणी वस्तीतच कपडे शिवणे, कपडे विकणे, स्वयंपाक करणे असेही छोटे मोठे व्यवसाय करू लागल्या होत्या. या व्यवसायासाठी लागणारे भांडवल

अन्नपूर्णामधून त्यांना पुरवण्यासाठी हे भांडवल उभे करण्यासाठी मेधा ताई अहोरात्र झटत होत्या. बँकामधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटणे, प्रस्ताव देणे, बोलणी करणे, तारण म्हणून स्वत:चे घर ठेवणे. एकाचवेळी अतिशय वेगळ्या आघाड्यावर मेधाताई काम करत होत्या. या कामाचा वेग व आवाका थक्क करणारा होता. या कामासाठी चोवीस तासाचा दिवसही कमी पडत होता. कष्टकरी महिला वस्तीवस्तीतून संघटित होवू लागली. अन्नपूर्णाला येवून मिळू लागली. त्यांच्या गरजांना पुरे पडण्याचे आव्हान मेधाताईंनी स्वीकारले. समर्थपणे पार पाडले.

कष्टकरी महिलेचा आर्थिक विकास, एवढ्यावर मेधाताई थांबणे शक्यच नव्हते. कुटुंब कल्याण हा अजेंडा त्यांनी घेतला. मेधाताईंच्या मनात, डोक्यात सतत महिलेचा सर्वांगीण विकास हा भुंगा वळवळत असतो व तो त्यांना स्वस्थ बसू देत नाही. मला तर नेहमी मेधाताईंच्या डोक्यात विविध कल्पनांचा, योजनांचा, विकासाचा कम्प्युटर आहे. ज्यातून नवनवीन उन्मेषाचे धुमारे फुटत असतात असे वाटते. या धुमाऱ्यांच्या मागे मेधाताईंचा ध्यास आहे. स्वप्न आहे. जे त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

नेतृत्व कसे असावे याचे मेधाताई एक उत्तम उदाहरण आहे. अन्नपूर्णा परिवारात वेगवेगळी कौशल्य असलेली निष्णात, तज्ञ, काम करणाऱ्यांची फळी तयार झाली आहे. खूप वेगवेगळ्या पातळ्यावर ही कामे चालू आहेत. बघणाऱ्याला झाडाला आलेले उत्तम फळ दिसते. पण इवलेसे रोपटे लावून त्याची कशी निगराणी केली, त्यांच्यात जीव ओतून त्याला कसे वाढवले, ते वाढवताना काही वेळा त्याचे काटेही रूतले. काहींची सहज वाढ होते. काहींना वाढवताना खूप परिश्रम घ्यावे लागतात. हे सारे पडद्यामागचे कोणालाच माहित नसते व दिसत नसते. मेधाताईंना, याविषयी विचारले

की त्या म्हणतात, ''या सर्वजणी तयार झाल्या आहेत.'' त्या तयार झाल्याचे त्यांना समाधानही त्यांना आहे. नेतृत्व ही तशी खूप अवघड व आव्हानात्मक गोष्ट आहे. जी फार कमी लोकांना जमते. नेतृत्व करताना सर्वांना सामावूनही घ्यावे लागते. करारी, कठोरही व्हावे लागते. आपली कौशल्ये बाजूला ठेवून घडवणाऱ्या व्यक्तीच्या कमी अधिक क्षमतांनुसार त्या व्यक्तीला हाताळावे लागते. प्रत्येक व्यक्तीची कुवत ओळखूनच काम द्यावे लागते. एका बाजूला हेड ऑफीसची खंदी फळी मेधाताईंनी तयार केली. यात एकही कच्चा दुवा ठेवला नाही. तर दुसऱ्या बाजूला वस्तीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची फळी व तिसरीकडे वस्तीतील प्रतिनिधींना घडवले, शिकवले कामकाजात सामावून घेतले.

या साऱ्याचा उत्तम समन्वय मेधाताईंनी साधला आहे. स्वप्नं पाहणारी, प्रत्यक्षात उतरवणारी माणसं झपाटलेली असतात. हे झपाटलेपण मी जवळून, पाहतेय अनुभवतेय! कुटुंब कल्याण ही संकल्पना घेवून मेधाताई वाटचाल करतात. तेव्हा वस्तीत पाळणाघरे सुरू झाली. सभासद महिलांच्या मुलींना शैक्षणिक मदत मिळू लागली. आरोग्य मदतही मिळते. त्यासाठी चोवीस तास दोन डॉक्टर्स उपलब्ध आहेत. कष्टकरी महिलेला निवृत्ती वेतन मिळाले पाहिजे. असे चळवळीतील साऱ्याच कार्यकर्त्यांना वाटते. त्यासाठी सरकार दरबारी आंदोलने झाली. पण सरकारच्या मेहरबानीची (जी कधी होणार नाही हे ही सत्य आहे.) वाट न पाहता कष्टकरी महिलांसाठी आधारपूर्ण निवृत्ती वेतन योजना सुरू करण्याचे आव्हान मेधाताईच पूर्ण करू शकतात.

कष्टकरी महिलेला स्वत:चं घर असलं पाहिजे. या ध्यासाने मेधाताई गेली दोन वर्षे झपाटल्या आहेत. मग या दिशेने वाटचाल चालू केली आहे. कमी किंमतीत घर बांधून कोण देईल? घराला कर्ज कोण देईल? मग ते घर कसे असले

पाहिजे. मुलांना खेळायला अंगण हवे. झाडे लावायला जागा हवी. ज्येष्ठ महिलांना गप्पा मारायला कोपरा हवा. मेधाताईंनी माहिती गोळा करण्याचा धडाका लावला. हे असे धाडस मेधाताईच करू शकतात. कष्टकरी महिलेचे घराचे स्वप्न हे प्रत्यक्षात उतरविण्याचे अतिशय अवघड काम मेधाताईंकडून प्रत्यक्षात उतरणार आहे. मेधाताईंसाठी अवघड काहीच नसते. एकदा मनावर घेतले की विचार, प्रक्रिया सुरू होते. नेमके व नेटके नियोजन होते व बघता बघता अंमलबजावणीही होते.

कष्टकरी महिलेच्या विकासाच्या कामात गळ्यापर्यंत रूतलेल्या मेधाताईंना राहून गेलेल्या अनेक गोष्टीचीही हुरहूर लागून राहते. खूप वाचायचे असते. एवढे अनुभवाचे संचित लेखनातून मांडायचे असते. चळवळीतील मैत्रिणीशी जोडून घ्यायचे असते. संकल्प सारेच करतात. पण पूर्तता करणारे मेधाताई सारखे फारच थोडे लोक मी पाहिले आहेत. ६५ व्या वर्षी अन्नपूर्णाच्या दैनंदिन कामातून वेळ काढून या गोष्टीना वेळ द्यायचे त्यांनी ठरवले आहे. व ते त्या नक्की करतील. सामाजिक, देशपातळीवरील चळवळीत उडी घ्यायला तर मेधाताईंनी सुरूवातही केली आहे. ध्रुवीकरणाचे देशातील वातावरण, सी.ए.ए. व एन.आर.सी. बद्दलची सरकारची भूमिका, शाहीनबाग मधील महिलांचे आंदोलन व सरकारची उदासीनता यांनी अस्वस्थ झालेल्या मेधाताईंनी पुण्यात व वाशी, नवी मुंबई येथे रस्त्यावर उतरून या साऱ्याला विरोध केला व अनेक हात येवून मिळाले.

कामातील पारदर्शकता व प्रत्येक सभासद महिलेपर्यंत ती पारदर्शकता पोचवण्याचे काम मेधाताई करतात. वार्षिक सभेत ठराव पास करतात. महिलांची संमती घेणे हे अन्नपूर्णातील लोकशाही विचार प्रक्रियेचे व अंमलबजावणीचे सशक्त उदाहरण आहे. असं मला वाटतं.

अन्नपूर्णा सभासद महिलांचा स्वविकास तर झाला पण समाज विकासाच्या दिशेने त्यांची वाटचाल चालू आहे. भगिनीभाव जोपासताना स्वप्रेरणेने या महिला परिवर्तनाच्या दिशेने निघाल्या आहेत.

मेधाताईंना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अनेक पुरस्कार मिळाले पण अगणित कष्टकरी महिलांच्या डोळ्यातील चमक, मनातील आत्मनिर्भरता तिचं व तिच्या कुटुंबाचं घडणं जे मेधाताईंच्या तीन दशकाच्या अथक प्रयत्नातून साकार झालं आहे. यापेक्षा मोठा पुरस्कार असूच शकत नाही.

मेधाताईंना 'साठी' निमित्त खूप खूप शुभेच्छा व त्यांचे हे झंझावाती, सुसाट, झोकून देणारे काम असेच चालू राहो ही सदिच्छा!

**प्रा.वृषाली मगदूम**

**संचालक, अन्नपूर्णा परिवार व**
**स्त्री मुक्ती संघटना**

# ७. ‘अन्नपूर्णा- मेधाताई’

२००२ मधील गोष्ट असेल, त्यावेळी मी सातारा जिल्ह्यामध्ये सहकार विभागाचा जिल्हा प्रमुख म्हणून जिल्हा उपनिबंधक या पदावर काम करीत होतो. खरे तर सहकार चळवळीला महिला वर्गाशी संबंध फारच कमी असल्यामुळे अल्प बचत करणाऱ्या स्वयं सहाय्यता समूहांशी (सेल्फ हेल्प ग्रुप) सहकार खात्याचा फारसा संबंध नव्हता. परंतु मला स्वतःला बांग्लादेशातील ग्रामीण बँक आणि डॉ. मोहम्मद युनूस यांची महिला बचत गटाशी असलेली जवळीक याबद्दल थोडीफार माहिती होती.

त्याच सुमारास जावळी तालुक्यातील करहर भागातील महिला बचत गटांमध्ये सामाजिक कामकाज करणाऱ्या काही कार्यकर्त्यांचे वार्षिक साधारण सभेच्या निमित्ताने बोलावणे आले. अंदाजे तारीख ९ ऑगस्ट २००२ असावी. करहर मधील गोडाऊनमध्ये महिला मेळावा भरला होता आणि तिथली स्थानिक महिला पतसंस्थेची वार्षिक साधारण सभा चालू होती. सभेस्थानी मला पोहोचायला उशीर झाला. मी ज्यावेळी तेथे पोहोचलो, त्यावेळी पुण्यातील महिलेचे जोरदार भाषण चालू होते. खणखणीत आवाज आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व यामुळे पाहताक्षणी प्रभावित झालो. प्रमुख पाहुण्यांच्या खुर्चीमध्ये बसल्यानंतर महिलांचे आरोग्य, आर्थिक व सामाजिक प्रश्न आणि बचतीबाबत कळकळीने सांगितलेली माहिती यामुळे पुण्यातील विदुषीचे संपूर्ण भाषण मन लावून ऐकले.

त्याचवेळी मी भुदरगड पतसंस्थेची तपासणी केलेली होती, त्या तपासणीवेळी मला त्या पतसंस्थेची वार्षिक साधारण सभेमधील सभासदांची उपस्थितीची आठवण झाली. महाराष्ट्र राज्यभर पसारा असलेल्या पतसंस्थेच्या ३०००० सभासदांकडून वार्षिक साधारण सभेला हातावर मोजण्याएवढी उपस्थिती आणि

गावपातळीवर महिलांनी चालविलेल्या पतसंस्थेच्या सभासदांची १००% उपस्थिती यामुळे माझ्या भाषणात याचा उल्लेख केला. सभा संपल्यानंतर पुणेकर विदुषीला म्हणजे मेधाताई सामंत यांना थोडावेळ चहा पाण्याच्या वेळी चर्चा करण्याची विनंती केली. मेधाताई सुद्धा सभेनंतर महिला बचत गटांच्या चळवळीविषयी भरभरून बोलल्या. त्यांची तळमळ पाहून पुण्यामध्ये अन्नपूर्णा महिला सरकारी पतसंस्थेच्या कार्यालयामध्ये जाण्याचे ठरविले.

२००२ साली पुण्यातील अन्नपूर्णा महिला मंडळाच्या कार्यालयात जाण्यासाठी साताऱ्यावरून निघालो. त्यावेळी मोबाईल फोन नसल्यामुळे मेधाताईंना लॅन्डलाईनवर फोन लावला. त्यांनी फोनवर सांगितले की, ‘‘आपण कोथरूडमध्ये घरीच या.’’ लुणावत कॉम्प्लेक्स मधील मेधाताईंच्या घरी गेलो तर शेकड्याने चपला घराच्या बाहेर. मनात विचार आला, ‘महिला बचत गटांची मिटींग घरीच बोलविली की काय?’ घराच्या टेरेसवर गेलो तर ३००-४०० महिलांशी संवाद चाललेला. मेधाताईंनी मिटींग ऑब्झर्व्ह करण्याची सूचना केली. मी शांतपणे बचत गटाशी निगडीत प्रश्नोत्तरे ऐकत होतो आणि सातारा जिल्ह्यामध्ये महिला बचत गटांचा सहकार चळवळीशी संबंध कसा प्रस्थापित करता येईल याचा विचार करत होतो.

अन्नपूर्णा महिला मंडळाची स्थापना मुंबईमध्ये मेधाताईंच्या मातोश्री श्रीमती प्रेमाताई पुरव यांनी केलेली होती. त्यांच्या अथक प्रश्नातून मुंबई मुख्यतः वाशी, पुणे आणि शिरवळ येथे महिला विषयक कामकाज चालत असे. त्या कामकाजातून विधवा, परित्यक्ता महिलांना पायावर उभे करण्याचे सामाजिक काम प्रेमाताईंनी केले आणि त्यासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री देवून त्यांच्या कामाला मानवंदना दिली. तेच काम मेधाताई यांनी पुढे चालू ठेवले होते,

मात्र त्यांनी त्यांच्या कामातील सामाजिकतेबरोबर आर्थिक बाजू जास्त भक्कमपणे उभी केली.

२००४ साली माझी नेमणूक पुणे जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबंधक पदावर झाली. त्यानंतर माझा जास्त संबंध अन्नपूर्णा महिला सह पतसंस्थेशी आला. अन्नपूर्णा परिवारामधून तंत्रपूर्णा, स्वयंपूर्णा इत्यादी विविध योजनांची रूपरेषा कळू लागली. हेल्थ म्युच्युअल फंडाची संकल्पना मेधाताईंमुळे मला उमगली. साताऱ्यामध्ये महिलांनी महिलांसाठी चालवलेली हेल्थ म्युच्युअल सहकारी  संस्था मी अन्नपूर्णाच्या धर्तीवर उभी केली व बराच काळ ती महिलांनी चालवली. मेधाताईंनी एकदा चर्चा करत असताना झोपडपट्टीतील काम करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांच्या संगोपनासाठी ‘‘आम्ही वस्तीपातळीवर पाळणाघरे चालवतो’’ असे सांगितले. त्यावेळी त्यांना पाळणाघरांची स्वयंरोजगार सहकारी संस्था स्थापन करता येईल असे सुचविले. त्यानुसार लहान मुलांसाठी संस्कार आणि सुरक्षा पुरविणारी राज्यातील पहिलीच पाळणाघर स्वयंरोजगार सहकारी संस्था चालू झाली. त्याचा विस्तार आज वात्सल्यपूर्णा सह संस्थेच्या रुपात मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे.

२००७-०८ साली संचालक मंडळाच्या बैठकीत मेधाताईंनी अन्नपूर्णा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीचा विषय काढला. त्यावेळी मी अनुमोदन दिले. त्यावेळी आय. ओ. बी. ने मेधाताईंना अन्नपूर्णा एन. बी. एफ. सी. साठी रु. २ कोटी स्वीट इक्वीटी देऊ केली होती, परंतु मेधाताई त्याच्या संचालक  मंडळात असा ठराव पारित करु पहात होत्या, की एन. बी. एफ . सी नको, त्या ऐवजी  अन्नपूर्णा सहकार क्षेत्रातच ठेवू व स्वीट इक्वीटी ऐवजी अन्नपूर्णा महिला मंडळ मध्ये आय.ओ.बी. ने २ कोटी अनुदान द्यावे. अन्नपूर्णाचे सर्व कामकाज पतसंस्थेमार्फत करावे आणि

स्वभांडवल व ठेवी वाढवून महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे.

मला सांगायला अभिमान वाटतो की, आज अन्नपूर्णा क्रेडीट सोसायटीचे कामकाज एक लाखापेक्षा जास्त महिला सभासद आणि त्यापेक्षा जास्त ठेवीदार/ कर्जदार यांच्या माध्यमातून आता चालते. म्हणजेच मेधाताईंना लेखाच्या शीर्षकात दिलेली अन्नपूर्णेची संज्ञा माझ्या दृष्टीने परिपूर्ण आहे.

**डॉ.संजयकुमार भोसले**

**सहसंचालक (साखर) महाराष्ट्र राज्य, पुणे**

# ८. आपलीच मेधा

**म**ला मेधाचं बाळरूप आठवत नाही. आम्ही त्यावेळी गिरगावात रहात होतो. कधी-मधी दादरला आलो तर पुरवांच्या घरात डोकावत असू. ताई-दादा आम्हाला भेटो वा ना भेटो पण शाळेच्या गणवेषातली मेधा नक्कीच भेटे. ''ताई घरी नाहीत पण तुम्ही आत या ना'' मेधा म्हणे. प्रेमाताई 'नवनीत' मध्ये (शिवाजी पार्क पोलीस समोर) रहायला आली, आणि त्याच रेषेत पुढे आम्ही 'शिवप्रभा' मध्ये रहायला गेलो. नवनीतमध्ये तळमजल्यावर त्यांचं बिऱ्हाड सतत उघडं! ताई-दादांकडे कामाला येणारी माणसं आणि तीन देवीयांच्या समवयस्क मैत्रिणींचा सतत राबता. मेधालाच या गडबडीत बहिणींच्या मदतीने सर्वांची उठबस करावी लागे. मोठी असल्यामुळे बहिणींची जबाबदारी, सर्वांचा अभ्यास घेणे, यातच तिचा वेळ जाई.

मुली मोठ्या कधी होतात ते कळतच नाही. मेधा, विशाखा आणि पप्पू फ्रॉकमधून साधारणपणे स्कर्ट क्वचित पंजाबी ड्रेस, अशा त्या काळच्या समाज व्यवस्थेला धरून पोषाखाच्या पायऱ्या चढत होत्या. मधल्या काळात आमच्या पुतण्या- ज्या प्रेमाताईंच्या बहिणीच्या मुली होत्या. त्याही ताईकडे येऊन राहिल्या! आणि आमचं प्रेमाताईंकडे जाणं-येणं थोडं अधिक झालं.

पुरव कुटुंब दादरमध्ये 'नवनीत' मध्ये रहात असताना 'अन्नपूर्णा महिला मंडळ' चा जन्म झाला. त्याची मी साक्षीदार आहे. त्या वेळी तीनही मुली लहान होत्या. त्यामुळे ताई-दादांच्या कामाची कोणती मुलगी वारसदार ठरेल असा विचारही कधी मनात आला नाही. दादा व प्रेमाताई कट्टर कम्युनिस्ट ! त्यामुळे संस्थेचा वारसा आपल्या मुली चालवतील असा विचार त्यांच्या मनात कधी येत नसेलच कारण

“मी मेधाला तयार करते, विशूच्या मध्ये असे काम करण्याची स्फूर्ति निर्माण करण्याचा प्रयत्न करते” असं कधीही प्रेमाताई म्हणताना मी ऐकलं नाही. त्यांच्या पायाचं ऑपरेशन झालं तेव्हा मी म्हटलं, “प्रेमाताई कामासाठी दुसरी फळी निर्माण करता आहात ना?” तेव्हा त्या म्हणाल्या “मी कुणाच्या दुसऱ्या फळीत होते?” काम उभं रहाताना आपोआप दुसरी फळी निर्माण होईल, या दुसऱ्या फळीची नायिका मेधाच असेल आहे असं त्यांनी कधी सुचवलंही नाही.

मेधा प्रसंगा प्रसंगानं कार्यक्रमाला हजर असे. तिचं शिक्षण पूर्ण झाले होते. तिनं स्वतः च्या मनाने लग्न ठरविलं. दुसऱ्या घरात-वातावरणात आणि ताई- दादांच्या राजकीय विचारसरणी पेक्षा वेगळ्या असलेल्या कुटुंबात मेधा गेली. देव-धर्म न मानणाऱ्या कुटुंबातून रोज देवाची पूजा करणाऱ्या वेगळ्या विचारांच्या कुटुंबात गेली. असे फरक पचविणे हे किती कठीण असतं, हे स्वानुभवाने मला माहित आहे. नवा संसार, घर, बँकेतील नोकरी हे सर्व सांभाळत असतानाच तिचं स्त्रियांच्या आर्थिक प्रश्नांकडे लक्ष गेलं. मेधाने पुणे येथे स्वतंत्रपणे १९९० च्या दशकात काम सुरु केलं

तो प्रश्न नुसत्या क्षेत्रकार्यातून समजणार नाही म्हणून पती जयंत बरोबर चर्चा करून तिनं एम. एस. डब्ल्यू. केलं-ते ही सर्वोत्तम गुण मिळवूनच! त्याच वेळी रस्त्यावर बसून भाजी विकणाऱ्या स्त्रियांशी बोलून, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन, त्यांच्यासाठी बचतगटाची कल्पना राबविली. “अन्नपूर्णा महिला मंडळ” ज्या काळात जन्माला आले त्या वेळेची परिस्थिती आता पूर्ण बदलली होती. अन्नपूर्णेचा मूळ ढाचा न बदलता मायक्रोफायनान्सचा अभ्यास करून तिनं मूळच्या अन्नपूर्णेला चार चाँद लावले. दादा-प्रेमाताईंचे आशिर्वाद पाठीशी होतेच. परंतु जयंतने मेधाचा भावनिक, नैतिक व प्रेमाचा हात घट्ट धरला होता. आलेल्या अडचणींनाही

त्याची पाठीवरची थाप आणि 'चालयचंच' 'गो अहेड' या दोन शब्दांनी ती फुलत होती. प्रत्येक कर्तृत्ववान स्त्रीच्या मागे तिचा पुरूष असावा लागतो, याचा धडाच जयंतने पुरूषांना ही दिला.

प्रेमाताईंनी लावलेला अन्नपूर्णाचा वेलू मेधाने आपला अभ्यास, जिद्द आणि मानवी स्पर्श (ह्युमन टच) या द्वारे गगनापर्यंत पोहचविला. पुढील काळात जागतिकीकरणामुळे देशाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती झपाट्याने बदलली. त्या नव्या परिस्थितीत 'अन्नपूर्णा' मध्ये बदल करणे अपरिहार्य होते. मेधानं विचारपूर्वक ही परिस्थिती हाताळली. आपलं कुटुंब आणि सख्या अन्नपूर्णा यांची साथ सोबत घेत घेत नव्या विचारांची अन्नपूर्णा मेधा आज मजबूत करत आहे, याबद्दल मेधाचं कौतुक करावं तेवढं थोडंच!

अशा या आपल्याच मेधाला आरोग्यपूर्ण जीवन लाभो! अन्नपूर्णाही सर्व अंगांनी बहरत जावो,अशा सर्व शुभेच्छा.

**रोहिणी मावशी**
**डॉ. रोहिणी गवाणकर**
**निवृत्त : एस. एन. डी. टी., मुंबई**

## ९. मेधाताई: माझ्या धाकट्या पिढीतील नेतृत्व!

**मे**धा सामंत यांच्या कार्याकडे कोणीही आकर्षित होईल असे त्यांचे व्यापक कार्य आहे. माझ्या पत्नीशी त्यांचा प्रथम संबंध आला. त्यावेळेला त्या बँकेत अधिकारी होत्या. आणि आमचे खाते बँक ऑफ इंडियात होते घराजवळच.

१९९२ नंतर मेधाने बँकेतली नोकरी सोडली. मग तिच्या नवऱ्यासोबत ही आमची क्रांती मैत्री झाली, घरी येणे जाणे सुरू झाले. तिचा नवराही कम्युनिस्ट आहे. आणि फार थोड्या मुली किंवा महिला या भाग्यवान असतात, की ज्यांना आपल्या जीवनसाथीचा पाठिंबा असतो. ''तुला जे करायचे ते कर मी पाठीशी आहे''- ही पतीची भूमिका असल्यामुळेच ते काम करू शकतात. म्हणजे कुठल्याही अन्य स्त्रीला मेधाचा हेवा वाटेल, कारण कित्येक स्त्रिया कर्तृत्ववान असून त्यांचे कर्तृत्वच फुलत नाही.

मेधाने वडिलांकडून कम्युनिझम घेतला, आईकडून तिचे अपार कष्ट आणि तिचं संघटन कौशल्य! कारण मुंबई मधल्या कामगारांसाठी दोन-अडीच लाख कामगारांसाठी जेवण पोहोचवायचं अशी जी संघटना तिथे त्यांनी केली ते अगदी एकमेवाद्वितीय कार्य होते.

मेधाला घराची बॅकग्राऊंड आणि शिवाय तिची स्वत:ची बुद्धी आणि चर्चा करायला जीवनसाथी (शेअर करायला) हे सगळे मिळाल्यामुळे तिने हे अन्नपूर्णा परिवाराची अवाढव्य यंत्रणा - बचत गट, कर्ज देणे हे कार्य उभे केलेले आहे. अन्नपूर्णा महिला मंडळ कार्यात भुकेल्यांना स्वस्तात अन्न देणं होतं म्हणून अन्नपूर्णा नाव आलं! तिच्या संस्थेच्या वर्धापन दिनाला अनेक वेळा हजर राहिलो. त्या कार्याची मला पूर्ण माहिती आहे. ज्या पद्धतीने मेधाने ती घडी बसवलेली आहे ते पुढे असेच आपोआप चालेल.

मेधाचे जे खंबीर आणि शिस्तबद्ध व्यक्तिमत्व हे पुण्यामध्ये वर आलेले आहे, त्याची दखल सर्वांना पुण्यात घ्यावीच लागते. मध्ये काहींनी प्रयत्न करून बघितला की, ‘‘यांची विचारसरणी डावी आहे तर आपण यांच्यावर हल्ला करून बघू.’’ पण त्यांनाच माघार घ्यावी लागली. ती केवळ मेधाच्या प्रामाणिकपणामुळे. आपल्या समाजामध्ये विधायक कामाला सहसा अनुकूलता नसते, म्हणजे बहुतेक यशस्वी माणसांचे कौतुक न करण्याची प्रवृत्ती असते, त्यांना चक्रव्यूहातच अडकून टाकतात. मेधा या चक्रव्यूहात अडकली नाही, उलट आपल्यावर आघात होईल, तर संरक्षणात काय काय केले पाहिजे ते तिला माहित आहे.

मला असे एक मेधा सामंत नावाचे धाकट्या पिढीतले नेतृत्व आहे याचा खूप आनंद आहे.

**डॉ.कुमार सप्तर्षी**
**संस्थापक युक्रांद**
**अध्यक्ष, गांधीभवन**

# १०. चैतन्याचा अखंड स्रोत

**डॉ.** मेधा सामंत-पुरव सहकाराच्या क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाचे नाव. सहकाराशी मायक्रो फायनान्स हा विषय जोडून जबरदस्त काम उभं करणारी महाराष्ट्रातील पहिली स्त्री!

स्वतंत्र सामाजिक कार्यात कार्यमग्न असणाऱ्या डॉ. मेधा सामंत-पुरव म्हणजे पुरव कुटुंबातील तिसरी पिढी. त्यांचे दोन्ही बाजूचे आजी आजोबाही सामाजिक जीवनात रस घेणारे होते. त्यांच्या वडिलांचे वडील श्री. शांताराम लक्ष्मण पुरव हाय कोर्टात नोकरीला होते. ते आवडीने ज्ञातीतील लोकांसाठी काम करत. शांताराम भाऊ पुरव, भिकोबादादा पाठारे अशा अनेक मंडळीनी एकत्र येऊन क्षात्रैक्य समाजासाठी वनमाळी हॉल ही दादर विभागातील एक सांस्कृतिक संस्था उभारली आहे, जी आजही कार्यरत आहे. शांताराम भाऊ हे दादर सहकारी कन्झ्युमर सोसायटीच्या संस्थापकांपैकी एक होते. ते ह्या सहकारी संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. त्यांचा व्यासंग मोठा होता. त्यांच्याजवळ पुस्तकांचाही मोठा संग्रह होता.

घरात शिक्षणाचं वातावरण इतकं होतं, की त्या काळात मेधाताईंची एक आत्या गॅझेटेड ऑफिसर होती. एक शिक्षीका होती. सर्व काका, आत्या सुशिक्षीत होते. पण आठ भावंडांमध्ये आजोबांचा सामाजिक कामाचा वारसा फक्त मेधाताईंच्या वडिलांनीच उचलला. मेधाताईंचे वडील दादा पुरव स्वातंत्र्य चळवळीपासून राजकीय-सामाजिक चळवळीत होते. कॉ. दादा पुरव हे दादरची प्रसिध्द विदयार्थी संघटना लोकसेना मधून घडत गेलेले, लोकप्रिय युवा नेते होते. ‘चले जाव’ आंदोलनात प्रभात फेऱ्या काढण्यात पुढाकार घेणारे! पुढे ते साम्यवादी चळवळीत आले. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे हे त्यांचे गुरुच. गिरणी कामगार युनियन, बँक कर्मचाऱ्यांची

देशव्यापी संघटना All India Bank Emp. Association यातील त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. दुर्देवानं वयाच्या ५४ व्या वर्षी काम अगदी भरात असताना त्यांचं निधन झालं.

मेधाची आई प्रेमाताई पुरव त्या मानाने कमी शिकलेल्या. पण अतिशय धाडसी आणि निर्भय. गोव्यातील खोडये ह्या लहानशा गावातल्या, सधन कुटुंबातल्या. त्यांच्या आई म्हणजे मेधाताईंची आजी पंचक्रोशीतील साऱ्या बायकांची बाळंतपणे करत असत. काळाच्या मानाने त्या आधुनिक होत्या. नर्सिंग शिकलेल्या होत्या. मेधाताईंचे काशिनाथ मामा व त्यांच्या मागून आई यांनी गोवा मुक्ती संग्रामात उडी घेतली.

प्रेमाताईंना तेराव्या वर्षीच गोवा सोडून यावे लागले बेळगावला आल्या. गोवा मुक्ती लढ्यात त्यांना भूमीगत व्हावे लागले होते. १९५८-५९ साली त्या मुंबईत आल्या. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया पार्टीच्या ऑफिसवरच राहत होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत दादा पुरवही होते आणि प्रेमाताईही. तिथेच त्यांची ओळख झाली आणि १९५९ मध्ये त्यांचा विवाह झाला. मेधाताई यांचा जन्म १९६० चा. मेधाताई लहानपणापासून वाढल्या, त्या पार्टीच्या वातावरणातच. आचार्य अत्रे, कॉम्रेड डांगे, नाना पाटील, एस एम जोशी, कॉ. प्रभातकार, कॉ. परवाना यांचं सतत घरी येणं जाणं असायचं. यशवंतराव चव्हाण तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, ते देखील त्यांच्या घरी आलेले होते. मेधाताई सांगतात, ''पत्री सरकारची कहाणी'' मी नाना पाटीलांच्या मांडीवर बसून ऐकली आहे. मार्क्स-लेनिन चर्चा वडलांच्या मांडीवर झोपून ऐकली आहे. वडील घरात रात्री तरुण मुलांसाठी मार्क्सवादावर चर्चागट चालवायचे. आई आसपासच्या शाळकरी मुलांसाठी साने गुरुजी कथामाला चालवायची. त्यासाठी पस्तीस चाळीस मुलं आमच्या घरात जमायची. मग काय, या मुलांची लीडरशिप आपोआपच मेधाताईंकडे आली. सभाधीटपणा तर त्यांच्यात होताच. वयाच्या सतराव्या वर्षी

मेधाताई ए.आय.एस.एफ. (ऑल इंडिया स्टुडन्टस फेडरेशन) विद्यार्थी चळवळीशी आपसूक जोडल्या गेल्या. मार्क्स जयंती, लेनिन जयंतीच्या वेळी वक्तृत्व स्पर्धा, भाषणे यात त्या आनंदाने भाग घेत.

ए.आय.एस.एफ मध्ये मेधाताईंना त्यांचा जीवनसाथी जयंत सामंत भेटला. तोही पार्टीचा कार्ड होल्डर होता. त्यांचे वडील स्वातंत्र्यसैनिक नंतर काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यावेळी तो कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचा मुंबई सेक्रेटरी होता. चळवळीतच या दोघांचं लग्न जमलं, लग्न झालं तेव्हा मेधाताई फक्त २१ वर्षांच्या होत्या.

आई वडिलांच्या कामाविषयी मेधाताईंना नितांत आदर होता, पण तरीदेखील त्यांचा पिंड चळवळीचा नव्हता. ‘‘आई-वडिलांच्या समाजातील प्रतिमेमुळे माझ्यात आयडेंटिटी क्रायसिस निर्माण झाला होता, आणि मला वाटतं आई वडील कर्तृत्वानं मोठे असतील, प्रसिद्ध असतील तर असा आयडेंटिटी क्रायसिस मुलांना येतोच’’त्या म्हणतात. त्यामुळे लहानपणी मेधाताईंनी सामाजिक कामात यायचं नाही असं ठरवलं होतं. त्यापेक्षा त्यांना त्या वेळेला जर्मन भाषेत रस होता. त्यावेळेला त्या जर्मन शिकत होत्या. त्यामुळे जर्मन भाषांतरं करावी, चित्रं काढावीत, लिखाण करावं असं त्यांना वाटत होतं. दुसरीकडे त्यांनी रुईया कॉलेजमधून संपूर्ण संख्याशास्त्र घेऊन पदवी घेतली होती. वडीलांच्या अकाली मृत्युनंतर मात्र त्यांनी स्वतःच्या करियरचा निर्णय बदलला व त्या बँक कर्मचारी संघटनेत सक्रीय झाल्या.

सामंतांच्या घरात सासरे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. कुटुंब समंजस होते, त्यामुळे मेधाताईंना सासरी तसा त्रास झाला नाही. दोघांची वेव्हलेंग्थ जुळलेलीच राहिली.

दरम्यान मेधाताईंनी मैत्रिणींबरोबर बँकेची बी.एस.आर.बी.ची एन्ट्रन्स परीक्षा दिली होती, पण घरात सांगितलं नव्हतं. कारण विशेषतः वडिलांना त्यांनी अजून शिकावं असं वाटत होतं. बँकेत फायनल इंटरव्ह्यू झाल्यावर त्यांनी बाबांना सांगितले. बाबांनी ''बँकेत नोकरी करणार असलीस तर पुरव नाव लावायचे नाही'' असे सांगितले. तब्बल १२ वर्ष मेधाताईंनी बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी केली, आधी मुंबईत, नंतर पुण्यात. बॅंकेत मेधाताईंनी युनियनच्या कामात रस घेतला. महिला प्रतिनिधी म्हणून त्या युनियनच्या निवडणुकांमध्ये नेहमी निवडून यायच्या. त्या सांगतात, ''मुंबईत तेव्हा निवडणूक व्हायची. मी व उषाताई भिवंडकर प्रतिस्पर्धी असायचो. अगदी कमी मतांनी मी निवडून यायचे. सुरुवातीला तिथे लोकांनी मला स्वीकारलं नाही. दादांची मुलगी म्हणून निवडून आली. दादा नुकतेच गेले होते म्हणून भावनिक मतदान झालं.'' असं म्हणून काही जणांनी हिणवलं. परंतु नंतरच्या युनियनच्या निवडणुकांमध्ये मी केवळ माझ्या कामामुळे निवडून आले हे मान्य झाले.

पती जयंत यांच्या पुण्यात व्यवसाय करण्याच्या निर्णयामुळे मेधाताईंनी पुण्यात बदली घेतली. इथेही युनियन चे काम वगैरे सुरू झालेच. इथेही भरपूर कौतुक आणि टोमणे एकाच वेळेला मिळाले.

पण पुण्यात आल्यापासून त्यांना खूप अस्वस्थ वाटत होतं. मेधाताईंची आई प्रेमाताई पुरव यांनी १९७५ साली 'अन्नपूर्णा महिला मंडळाची' मुंबईत सुरुवात केली होती. त्यापूर्वी त्या महिला फेडरेशनचं काम करत होत्या. सुप्रसिद्ध महागाई प्रतिकार संयुक्त महिला आघाडीच्या लाटणे मोर्चामध्ये मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, मंजु गांधी, तारा रेड्डी यांच्या बरोबरीने प्रेमाताई आघाडीवर होत्या. महागाई विरुद्ध आंदोलन, गिरणी कामगारांचे लढे, यात त्या अग्रेसर होत्या.

सत्तरीच्या दशकात गिरण्यांमध्ये उत्पन्न घटत चाललेलं होतं. त्याचा परिणाम म्हणून गिरणी मालकांनी बायकांना कामावरून काढून टाकायला सुरुवात केली. बेकार झालेल्या या बायका मग खानावळी चालवू लागल्या. या बायकांसाठी प्रेमाताई पार्टीत भांडायच्या की 'महिलांना आपण मोर्च्याला, मिटींगला बोलावतो पण त्यांचे प्रश्न आपण सोडवत नाही.' तेव्हा दादांनी तिला 'भांडत बसण्यापेक्षा तू त्यांचे प्रश्न वेगळ्या पद्धतीने सोडव' असा सल्ला दिला. त्यातून मग 'अन्नपूर्णा' ची संकल्पना जन्माला आली. या खानावळवाल्या बायकांचे प्रश्न काय आहेत, आर्थिक प्रश्न सगळीकडेच कसा महत्त्वाचा आहे, त्यांच्यासाठी काय करायला हवं यावर बरीच चर्चा होऊन 'अन्नपूर्णा महिला मंडळ' १९७५ साली उदयाला आली.

या सुमारास देशपातळीवर बऱ्याच घटना घडल्या होत्या. १९६९ मध्ये बँका राष्ट्रीयकृत झाल्या. AIBEA युनियननं राष्ट्रीयीकरणाची मागणी जोरात लावून धरली होती, त्याचवेळी दुर्बल घटकांना कर्ज देणे ही योजना पुढे आली. १९७५ मध्ये आणीबाणीत वीस कलमी कार्यक्रम आला. त्यात एक कलम दुर्बल घटकांना कर्जवाटप हे होतं. तेच वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केलं होतं.

या सगळ्या गोष्टी जमून येऊन १९७५ साली 'अन्नपूर्णा महिला मंडळ' ची स्थापना झाली. हा एक ट्रस्ट होता आणि त्यात त्यांनी बँक लिंकेज प्रोग्रॅम सुरु केला होता. हा प्रोग्रॅम म्हणजे महिलांच्या छोट्या छोट्या गटांना बँकेने कर्ज द्यायचं. त्यासाठी 'अन्नपूर्णा महिला मंडळाने गटांना बँकेपर्यंत आणण्याचं मोठं काम केलं. बँक ऑफ बरोडानं पहिल्या १४ जणांच्या गटाला कर्ज दिलं. मेधाताई सांगतात, ''गटाला कर्ज देणे, गट हीच शक्ती, गटच जामीनदार ही आजच्या बचतगटाची जी संकल्पना आहे,'' ती दादांनी प्रथम मांडली आणि ती प्रत्यक्षात आणणारे हात माझ्या आईचे होते.

१९८१ साली 'अन्नपूर्णा महिला मंडळ' चं पहिलं ऑफिस मुंबईत सुरु झालं. पहिल्यांदाच परदेशातून मदत आली. त्यावरूनही टीका झाली, पण बाबा आईच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आईने मग 'अन्नपूर्णा महिला मंडळ' वरच लक्ष केंद्रित केलं. त्यात मेधाताई बुक कीपिंग, हिशोब लिहिणे, स्टाफ ना शिकवणं अशी मदत शाळा-कॉलेजमध्ये शिकतानाच करत होत्या.

१९८२ ते १९९० दरम्यान त्यांच्या मुलाचा नचिकेतचा जन्म, नवऱ्याच्या नव्या बिझनेसमध्ये त्याच्या पाठीशी उभे राहणं, बँकेतील नोकरी, युनियनचे काम असा सगळा संघर्षाचा काळ सुरू होता.

मेधाताई सांगत होत्या, '१९८९ साली आम्ही पुण्यात आलो, पण मला मुंबईची युनियन, महिला चळवळीची सवय होती, त्यामुळे पुण्यात पोकळी जाणवायला लागली. बॅक कर्मचारी चळवळीत काम करण्याचा देखील पुनर्विचार मनात येऊ लागला होता. कारण माझ्या मते बँक कर्मचारी चळवळ आता पुरेशी सेटल झालेली होती, आणि आपण अधिक काहीतरी करायला हवं असं मला वाटू लागलं होतं. दादा नेहमी म्हणायचे की ''संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी काम केलं पाहिजे.'' ते डोक्यात होतं. त्यामुळे पुढे काय करायचं हा प्रश्न मला अस्वस्थ करीत होता.'' मेधाताई सांगत होत्या. ''त्यातून आता आर्थिक जबाबदाऱ्याही कमी झालेल्या होत्या, नवऱ्याचा व्यवसाय स्थिर होऊ लागला होता.'' अशावेळेस मेधाताई यांच्या मनात वेगळेच विचारचक्र सुरू झाले होते. बँकेची नोकरी सोडण्याचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले.

बऱ्याच जणांनी त्यांना वेड्यात काढलं. काहीजण म्हणाले 'व्ही.आर.एस. येतेय, काही वर्ष थांब म्हणजे निदान पैसे तरी मिळतील'. पण मेधा ताईंच्या मनातलं अस्वस्थ चक्र

त्यांना स्वस्थ बसू देत नव्हतं. त्यांनी विचार केला, ``हा वेडेपणा तर खराच. पण तो आत्ताच करणं शक्य आहे. नंतर चाळिशीत स्वतंत्र काम सुरु करणं अवघड जाईल.'' ताईंना त्यावेळी नोकरी सोडताना फारच कमी पैसे मिळाले. घर कर्ज 'नील' झालं एवढेच काय ते, पण हातात एकही पैसा आला नाही. ``आर्थिक नुकसान झालं, पण मी तो वेडेपणा ठरवून केला होता. त्यामुळे त्याचं वाईट कधीच वाटलं नाही. बारा वर्ष नोकरी झाल्यानंतर ३ ऑगस्ट १९९३ रोजी नोकरीचा राजीनामा दिला.'' मेधाताई सांगता सांगता जणू त्या काळातच पोहोचल्या.

``आपण बचत गट म्हणतो पण तो शब्द खूपच तोकडा आहे खरं तर तो स्वयंसहायता गट असतो. नोकरी सोडण्याचा अगोदर मी बरीच चाचपणी करत होते. कुठे कोण काय काम करतंय, बचतगट हे कुठे पुणे शहर किंवा आसपास आहेत का, काय करता येईल याचा विचार करत होते. पुण्यात तेव्हा महिला मंडळ, अपंग, वृद्ध, बालकं, अनाथ स्त्रिया अशांसाठी काम होतं, पण बचत गट नव्हते. असंघटित क्षेत्रात फारसं काम नव्हतं. मी बँकेतून घरी परत येताना पौड रोड लगत भाजी विकायला बसणाऱ्या बायकांशी गप्पा मारत असे. त्यावरून बँकेतल्या मैत्रिणी चेष्टेने म्हणत, 'तू त्या भाजीवाल्या बायकांशी काय गप्पा मारत असतेस?' पण मी त्यांची परिस्थिती समजून घेत असे. रोज संध्याकाळी त्यांच्याकडे एक मलबारी अण्णा हप्ते घ्यायला येत असे. तो भरपूर व्याजानं त्यांना पैसे देत असे. एकदा मी त्या बायकांना विचारलं, 'मी पैसे दिले तर घ्याल का?' तेव्हा सुरुवातीला त्या 'नाही' म्हणाल्या. नीट चौकशी केली तेव्हा कळलं की त्याने बायकांना एक हजार रुपये कर्जाऊ दिले की रोज २५ रुपये याप्रमाणे परतफेड करताना ५० दिवसांत तीनशे रुपये व्याजापोटी जातात. हे चक्र

सतत सुरू असे. मेधाताई म्हणाल्या, ''हे पाहिल्यावर मी हादरले.''

तिथून एक किलोमीटरवर बँक होती. बँकांमध्ये त्यावेळी दुर्बल घटकांसाठी अल्प दराच्या कर्ज योजना होत्या. पण या वेळेपर्यंत बँकाची मानसिकता बदललेली होती. जागतिकीकरणाची चाहूल बँकांच्या धोरणांत दिसू लागली होती, त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील घटकांना स्वस्त कर्ज योजनेचा आम्हांला काहीच उपयोग झाला नाही. मग मी या बायकांशी सतत बोलून त्यांचा एक गट तयार केला, आणि स्वतःच सुरुवातीला नऊ जणींना कर्ज दिले. या नऊ जणींमध्ये शेवंताबाई खुडे, लीलाबाई ढोक, जाहिदाबी जलालुद्दीन, रजनी पाटील, आशा चव्हाण, सुशीला साळेकर इत्यादींचा समावेश होता. 'विशेष म्हणजे या स्त्रिया आजही मेधाताई बरोबर कृतीशील आहेत.'

मेधाताईंनी अत्यंत जाणीवपूर्वक सहकाराचा पर्याय निवडला. त्यांनी नंतर पुण्यात अन्नपूर्णा परिवार अंतर्गत पाच वेगवेगळया संस्था स्थापन केल्या. त्यात स्वतंत्रपणे मायक्रो फायनान्स आणि मायक्रो इन्शुरन्स, पाळणाघरं, शैक्षणिक शिष्यवृत्ती, पेन्शन अशा अनेक गोष्टी सुरु झाल्या. आता 'अन्नपूर्णा' हाऊसींग लोन मध्ये उतरणार आहे. महिलांच्या हाऊसींग को-ऑपरेटिव्ह संस्था वस्तीपातळीवर त्या उभ्या करण्याचा विचार करत आहेत.

''सहकाराशी मायक्रो फायनान्स'' ही संकल्पना जोडणारी आमची पहिली संस्था आहे, मेधाताई सांगत होत्या, 'आम्ही सुरुवातीला मोठी कर्जे देत नाही. तारण किंवा जमीन नसलेल्या गरीब महिलांनाच इथे छोटे कर्ज मिळते. सुरुवात २५-३० हजार रुपयांच्या छोट्या कर्जाने करतो. त्यासाठी महिलांनी पाच जणींचा गट तयार करायचा असतो. पुढे परतफेड बघून मोठी कर्जेही देतो.'

‘अन्नपूर्णा’ चा मुख्य हेतू तळागाळातल्या महिलांना व्यवसाय वाढीसाठी अर्थसहाय्य, मुलांचे शिक्षण, आरोग्य विमा इत्यादी मार्गानी त्यांचे सबलीकरण करणे हा आहे. महिलांनी ५ जणींचा गट केला की प्रत्येकीला रू. २५०००/- पासून १० लाखांपर्यंत मोठी कर्ज दिली जातात. अर्थात सव्वा लाखांपेक्षा जास्त कर्ज ही रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार मायक्रो फायनान्स म्हणून नाही, तर छोटे व्यवसाय म्हणून (एस एम ई) म्हणून दिली जातात. त्यासाठी त्यांनी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी हे माध्यम निवडले आहे. तसेच अन्नपूर्णा चे मुख्य काम पुणे मुंबईतून असले तरी फ्रांचायजी पार्टनरच्या माध्यमातून त्या बीड, इचलकरंजी अशा ग्रामीण भागातही पोहोचलेल्या आहेत. ना नफा ना तोटा या तत्त्वावर सुरू असलेले हे काम तिथे चालते. विशेष म्हणजे त्यांच्या कर्जाची थकित बाकी शून्य आहे.

महिलांच्या सचोटीवर त्यांनी हा टप्पा गाठला आहे हे विशेष. चित्राताई खिंवसरा, अंजली पाटील या विश्वस्त म्हणून काम करत आहेत. मेधाताई याचे श्रेय सहकारी तत्त्वांना आणि ती राबवणाऱ्या १९९३ पासूनच्या सहकाऱ्यांना देतात. चित्राताई खिंवसरा, अंजली पाटील या विश्वस्त म्हणून काम करत आहेत, शैला दिक्षित बँकेतील मैत्रिण सुरुवातीला अकाऊंट लिहून देत असत. उज्वला वाघोले, आरती शिंदे, मधुरा दिवाण, मंजिरी परांजपे, सुजाता भट, अश्विनी भरम, सविता भोर अशा असंख्य जणींच्या साथीने हा व्याप सांभाळला जातोय, मेधाताई सांगतात.

केवळ बायकांचे बचत गट स्थापन करून मेधाताई थांबलेल्या नाहीत, त्यांनी पुरुषांचे सुद्धा बचत गट बांधलेले आहेत. लोहार काम, सुतारकाम, रिक्षा चालवणारे, पत्रा गोळा करणारे - अशा पुरुषांच्या गटांनाही त्या कर्ज देतात. पुरुषांच्या बचत गटाची निर्मितीही महिलांच्या गरजेतूनच निर्माण झाली

आहे. असं त्या म्हणतात. त्यासाठी अन्नपूर्णा परिवार अंतर्गत अनेक सहा संस्था त्यांनी स्थापन केल्या आहेत... आतापर्यंत अन्नपूर्णाने काही कोटीचं कर्जवाटप केलं आहे. आणि त्याची १००% परतफेडही साध्य केली आहे... अन्नपूर्णा ची वस्ती पातळीवर अनेक ठिकाणी केंद्रं आहेत. अन्नपूर्णा परिवार मध्ये एकूण ४०० च्या वर स्टाफ आहे. गेली अठरा वर्ष आरोग्य विमा सुरु आहे. 'आरोग्य सुरक्षा निधी', 'जीवन सुरक्षा निधी', 'कुटुंब सुरक्षा निधी' या योजना सुरु आहेत. दरवर्षी जवळपास तीन कोटींची मदत यातून आजारपण आणि मृत्यू या प्रसंगी सभासदांना दिली जाते.

मेधाताईंच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा एक पैलू म्हणजे त्यांना लिखाणातही रस आहे. त्यांचा कवितासंग्रह 'सखी' लोकवाङमयगृह या मातब्बर प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला होता. त्याशिवाय त्यांनी कथालेखनही केलं आहे. ''संवाद करण्याच्या आवडीतून ह्या सगळ्या गोष्टी करीत असते ''असं त्या म्हणतात.

हे एवढं मोठं काम उभं करताना मेधाताईंना आई वडिलांचा वारसा तर मिळालाच, परंतु त्यांनी त्यात स्वतःच्या कल्पकतेची आणि प्रखर सामाजिक जाणिवेची जोड देऊन तो अधिक विकसित केला. या कामात त्यांना त्यांचे पती आणि मुलगा व सून यांचा खूप मोठा पाठींबा आहे. आहे. मेधाताईंच्या सासूबाई व त्यांच्या कुटुंबातील सगळ्यांना मेधाताईंविषयी कौतुक आहे. मेधाताईंनी या सगळ्या गोष्टी घरातल्या जबाबदाऱ्या पार पाडतच केल्या आणि आनंदानं केल्या. ''मला मी काही त्याग वगैरे केला असं वाटतच नाही, इतका आनंद या कामाने मला दिला. आय रियली एन्जॉय'' मेधाताई म्हणतात, ''समाजकार्य करायचं म्हणजे संसारावर निखारे वगैरे ठेवावे लागतात अशी एक कल्पना असते. पण आनंदी जीवन जगता जगता मला समाजासाठी काही करता

येतं हे माझ्या उदाहरणावरून नव्या मुला मुलीसमोर आलं तर मला बरं वाटेल. माझ्या सहवासात येणाऱ्यांना असं वाटलं पाहिजे की सामाजिक काम हे वाटतं तेवढं अवघड नाही. ते आनंदानं करणं शक्य आहे.''

मेधाताई ज्या तळमळीने हे बोलत असतात, ते खरोखर नव्या पिढीने तेवढ्याच मनःपूर्वक आत्मसात केलं पाहिजे. आज साठाव्या वर्षीही त्या इतक्या कार्यरत आहेत, त्यांना माझा सलाम!! पुढेही त्यांचे कार्य अशाच जोमाने सुरु रहावं यासाठी

त्यांना खूप शुभेच्छा ...

**अंजली कुलकर्णी**
**कवयित्री-लेखिका**

# ११. मेधा रे, मेधा रे...

'मेधा रे, मेधा रे'............. असं एक सुंदर गाणं आहे. पण (फुटकळ विनोदात तरबेज असल्यामुळे) मेधा भेटली की मी 'मेधा रे, मेधा रे,' असं हटकून म्हणत असे. त्यावर मेधाही 'ओ रे, ओ रे' असा प्रतिसाद देत असे.

हे मी भूतकाळात लिहिलंय, कारण गेल्या कित्येक वर्षांत आमची गाठभेट नाही. अर्थात तुम्ही भेटायचे थांबलात म्हणून काळ थांबत नसतो व उलटतच असतात. माझी सत्तरी (जवळ)आली. मेधाची साठी झाली. माझ्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या स्मरणिकेत मेधाने 'माझे स्नेही- गोर्ले' हा लेख लिहिला होता. आता मी तिच्यावर लिहितो आहे. आमच्या स्नेहबंधातलं विशेष काय आठवत आणि मेधा संदर्भात मला 'विशेष' काय वाटतं, ते व्यक्त करण्यासाठीची ही संधी.

मी काही काळ किर्लोस्कर व स्त्री मासिकांचा संपादक होतो. वीस एक वर्षांपूर्वी स्त्री मासिकातर्फे आम्ही नवोदित कवयित्रींसाठी काव्यस्पर्धा ठेवली होती, त्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होता. डॉक्टर अश्विनी घोंगडेंच्या हस्ते. मला आठवतं, 'पहिल्या पारितोषिकाच्या विजेत्या आहेत- मेधा सामंत' असे मी जाहीर केल्यानंतर समोरच्या श्रोत्यांमधून मेधा उठली आणि बक्षीस घेण्यासाठी आली. त्यावेळी प्रथम प्रकर्षाने जाणवली होती ती तिची उंची. आज इतक्या वर्षांनंतरही जाणवते ती 'अन्नपूर्णा' च्या माध्यमातून.. तिच्या कार्याने गाठलेली उंची.

पारितोषिक वितरण झाल्यानंतर मेधा भेटली आणि अगदी भरभरून बोलली. तिचा उत्साह, दिलखुलास स्वभाव आणि तिचं ॲक्टिव्हिटी ओरिएंटेशन. हे सारं पहिल्या भेटीतच जाणवलं. त्यानंतर ती 'स्त्री' च्या कार्यालयातही आली.

मी संपादक असलो तरी 'स्त्री' हा अंक स्त्रियांचा असावा, त्याचं स्वरूप, त्याचा आशय..... हे सारं स्त्रियांनीच ठरवावं, ही माझी भूमिका होती. त्या दृष्टीनं मी हेमा लेले, आसावरी काकडे अशा प्रथितयश कवयित्रींबरोबरच नवोदित लेखिका व कवयित्रींचा ग्रुप केला होता. दरमहा मी त्यांची बैठक घेत असे. बैठकीत, पुढील अंकासाठीचे विषय, कोण कुठला विषय हाताळू शकेल, विषयांत वैविध्य कसं आणता येईल, यांवर चर्चा होत असे. त्यावेळी मेधानं 'गोर्ले, तुम्ही मनुष्य संग्राहक आहातच, पण त्यातही जास्त करून 'महिला संग्राहक' आहात,' असं सूचित केलं होतं! अर्थात माझी ही 'सहभागी संपादना' ची कल्पना मेधाला खूपच आवडली होती. ती स्वतः 'चळवळी लेखिका' असल्याने प्रत्येक बैठकीला आवर्जून येत असे. मौज अशी इतर साऱ्या जणींना (आणि मलाही) भरपूर वेळ असायचा. शिवाय स्त्रियांकडे कुठलाही विषय नसतानाही कितीही वेळ बोलत राहण्याचं कौशल्य असल्यामुळे गप्पा रंगत असत. मेधा मात्र, 'फक्त गप्पांसाठी आपण नंतर भेटू यात, मी आता वेळ काढून आले आहे. आपण 'विषया' वर बोलूया का?' असं म्हणत चर्चा 'ट्रॅक' वर आणत असे. ज्यांना काही भरीव कार्य करायचं असतं, एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढायचं असतं, त्यांनाच वेळेची किंमत असते आणि कुठल्या गोष्टीसाठी किती वेळ द्यायचा, याचंही भान असतं. मेधाकडे ते होतंच.. तेव्हाही, आताही.

त्यावेळी मेधाने ने गरीब, भाजीवाल्या महिलांना 'मायक्रो फायनान्स' देण्याचे काम सुरू केलं होतं. त्या कष्टकरी महिलांचा जीवन-संघर्ष पाहून ती अस्वस्थ होत असे. त्या स्त्रियांच्या संघर्षाचं दर्शन घडविणारी लेखमाला लिहावी, असे मी सुचवलं होतं. तिने त्यावर लिहिलेली 'जसा तवा चुल्ह्यावर' ही लेखमाला 'स्त्री' च्या वाचकांना खूपच भावली, भिडली होती. थेट झोपडपट्टीतल्या स्त्रियांचं जीवन, इतक्या वास्तव स्वरूपात प्रथमच समोर आलं होतं. मुख्य म्हणजे ती

लेखमाला, तटस्थ पत्रकारितेच्या भूमिकेतून लिहिलेली नव्हती. त्या स्त्रियांसाठी कळकळीनं कार्य करणाऱ्या संवेदनशील, चळवळया लेखिकेनं लिहिलेली होती. साहजिकच ती अस्सल, जीवंत, वेगळीच होती.

'किस्त्रीम दिवाळी अंकासाठी खास म्हणून मेधाने घेतलेली शबाना आजमी ची मुलाखतही छान जमली' होती. अंकाला त्यामुळे एक वेगळंच परिमाण लाभलं होतं.

अर्थात मी 'स्त्री' च संपादकत्व सोडलं, तरी आम्ही अधूनमधून भेटत राहिलो. मेधा म्हणते त्याप्रमाणे कष्टकरी स्त्रियांचं संघर्षमय जीवन, त्यांना सक्षम करण्यासाठी चाललेली तिची धडपड यामधून कधीतरी हलक्याफुलक्या गप्पांसाठीची माझी भेट तिला 'रिफ्रेश' करणारी 'पिकनिक' वाटत असे.

एकदा तिनं मी व माझी सहाय्यक जयश्री रावळेकर, आम्हा दोघांना 'अन्नपूर्णा' च्या ऑफिस वर यायचं निमंत्रण दिलं होतं. त्यावेळी तिच्या घराच्या शेजारी ते ऑफिस होतं. तिने आम्हाला सामिष भोजनाचं आमिषही दाखवलं होतं. आम्ही दोघांनी तिच्या हातच्या चमचमीत भोजनाचा आस्वाद घेतला होता. त्यानंतर आमच्यासोबत, सोफ्यावरच मांडी घालून बसत, मोठ्या बाऊल मध्ये भरपूर आईस्क्रिम चाखणारी (खरंतर चापणारी!) मेधा आठवते............ आणि ते आटोपल्यावर पुढच्याच क्षणी ऑफिसच्या कार्याबद्दल भरभरून बोलणारी मेधाही आठवते.

आणखी एक आठवण! मी तेव्हा 'प्रतिसाद कम्युनिकेशनच्या' स्वतंत्र ऑफिसमध्ये बसत असे. तिलाही मी ऑफिसवर बोलावलं तेव्हा, 'दुपारी एकलाच येते, म्हणजे तुमच्यासाठी (सामिष) भोजनाचा डबाही आणीन,' असं तिनं म्हटलं होतं. एक सांगायला हवं, मी एकटाच राहात असल्याने, असं प्रेमाने खाऊ घालणाऱ्या मैत्रिणींचं मला सहाजिकच अप्रूप

असायचं. (आजही आहेच!) त्यात त्यांना जो आनंद मिळतो, तो मी अनेक मैत्रिणींना भरभरून देत आलो आहे. मेधाच्या प्रचंड कार्यबाहुल्यामुळे हा आनंद मी तिला पुढे फारसा देऊ शकलो नाही, याची चुटपुट आहेच.

खरंतर मेधाचा माझा स्नेह जुळणं ही एक अपूर्वाईच म्हणावी लागेल. तिनं स्वतःच म्हटल्याप्रमाणे आम्ही दोन भिन्न जगातले रहिवाशी! दोघांतलं एकच साम्य म्हणजे मी कॉर्पोरेट विश्वातली नोकरी सोडून पूर्णवेळ लेखक म्हणून जगण्याचा निर्णय घेतला होता. मेधानं बँकेतली सुखवस्तू नोकरी सोडून कष्टकरी महिलांसाठी कार्य करण्याचा निर्णय घेतला होता. आतला आवाज ऐकून, आपल्याला मनापासून वाटतं ते करता यावं म्हणून चांगल्या नोकरीला रामराम, एवढंच साम्य.. पण फरक केवढा!

मी 'देशकार्या' साठी वाहून घेतलेल्या एका संस्थेचा कार्यकर्ता होतो. वेळोवेळी आपत्ती ग्रस्तांसाठी, अगदी झोकून देऊन मीही काम केलं आहे. मात्र त्या संस्थेतल्या वैचारिक रेजिमेंटेशनशी व पर्यायानं तिथल्या समाजकार्याशी फारकत घेऊन मी 'स्व' कडे, स्वानंदाकडे व स्वच्छंदाकडे वळलो. मेधानं तळागाळातल्या कष्टकरी स्त्रियांच्या उत्कर्षासाठी स्वतःला वाहून घेतलं. मी विनोदी नाटक चित्रपटांतून लोकांचं रंजन करण्यात रमलो. माझी हजार प्रयोग झालेली नाटकं असोत की रौप्यमहोत्सव, सुवर्ण महोत्सव करणारे चित्रपट असोत, मेधानं पाहिलेले नाहीत. (चूक आमची आहे. निव्वळ मनोरंजनासाठी मेधासारख्या चळवळया स्त्रीनं तब्बल तीन तास कसे काढायचे- याचा आम्ही विचार करायला नको?) यातला गमतीचा भाग सोडा, मेधाकडे वेळेचा तुटवडा असला तरी गुणग्राहकता, उमदेपणा मुबलक आहे. माझी 'मजेत जगावं कसं? सारखी प्रेरक पुस्तके आणि 'नग आणि नमुने' सारखी विनोदी पुस्तके तिनं स्वतः आवर्जून वाचली

आहेत, आणि अनेकांना भेटही दिली आहेत. मराठीतल्या पहिला 'मॅनेजमेंट गुरु' आणि 'बेस्टसेलर' लेखक म्हणून माझं तिला निश्चित कौतुक आहे. पण त्याच वेळी, ''गोर्ले'' तुम्हाला स्वतः चं कौतुक ऐकायला आवडतं, हे मला माहिती आहे पण आता ते पुरेसं झालंय. तेव्हा जरा मुख्य विषयावर बोलू या का?'' असा सडेतोडपणाही आहेच.

तशा आमच्या वैचारिक धारणाही भिन्न आहेत. मी स्वातंत्र्यधर्मी, ती समाजकर्मी, शिवाय आम्ही दोघेही आपले मुद्दे ठामपणे मांडणारे! पण आमच्या स्नेहाच्या आड वैचारिक मतभेद येणार नाहीत, याची दोघांनीही दक्षता घेतली. मी स्वतः 'लेट अस अ‍ॅग्री टु डिफर' हे धोरण ठेवतो. मेधाही, 'या विषयावर आपला वाद होऊ शकतो, हा विषय टाळू या,' असं भान राखते.

मी तबियतनं लिहिणारा, ती धडाधड काम करत राहणारी. तिच्या माझ्या जगण्याचा वेग अगदी वेगळा आहे. ती सतत घाईत असते. भरभर बोलत असते. त्यावरून मी तिला म्हटलं होतं, ''तुझ्याशी बोलताना तू ट्रेनमध्ये बसली आहेस, ट्रेन सुरू झालीय आणि मी प्लॅटफॉर्मवर पळत-पळत तुझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करतोय असं वाटतं!'' काही वेळा तर वाटतं, माझ्यासारख्या गप्पिष्ट माणसानं, तिचा वेळ न घेणे, हेसुद्धा एक छोटंसं 'समाजकार्य' च ठरेल.

मेधाला मी किती मानतो याची तिला बहुधा कल्पना नसेल. (मला स्वतः लाही ती आता लिहिता लिहिताच आली!) मी तिला 'मानतो' याची अनेक कारणं आहेत.

सामाजिक कार्य करणारे अनेक असतात, 'ओरिजनल थिंकर्स' मात्र मोजकेच असतात. समाजाच्या गरजा अचूक ओळखून, काही नव्या संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या मंडळींचं मला खूपच कौतुक वाटतं. उदाहरणार्थ

डॉ. अनिता अवचट यांचं 'मुक्तांगण', अनुताई वाघ यांचं 'ग्राम मंगल.' मायक्रो फायनान्स ही तशी नवी संकल्पना नव्हे, पण फक्त कष्टकरी महिलेला आर्थिक बळ पुरवून 'सबलीकरण' होत नाही, तर तिच्या कुटुंबातील इतर घटकांनाही सामावून घेतलं तरच कुटुंब सक्षम होऊ शकतं, या विचारानं अर्थउद्यमपूर्णा, तंत्रपूर्णा, स्वास्थ्यपूर्णा असे विविध प्रकल्प सुरू करून जे बहुउद्देशीय मॉडेल साकारलं आहे, त्याबद्दल मी मेधाला 'मानतो.'

घरा शेजारच्या जागेत सुरू केलेली चळवळ आता सहा मजली वास्तूत पोचली आहे. मला कल्पना आहे, तिच्या कार्यासंदर्भात अनेकांनी 'इवलेसे रोप लावियेले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावेरी' असं म्हटलं असेल, पण त्याची पुनरुक्ती अपरिहार्य आहे. तिच्या कार्य विस्ताराचं नेमकं शब्दांकन अन्यथा अशक्य आहे. म्हणूनही मी तिला 'मानतो'.

आपल्या नावाअगोदर 'डॉ.' लावावं अशी अनेकांची आस असते, पण 'पी. एच. डी.' हे खायचं काम नव्हे. घरचा अन् चळवळीचा एवढा व्याप असतानाही मेधानं पी. एच. डी. केली. तिला 'मानावं' च लागेल.

'चळवळीच्या व्यापात कविता हरवू देऊ नकोस,' असं तिला म्हटल्याचं आठवतं. तिनं कविता जपली. तिचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला, यासाठीही 'मानतो'च मी तिला.

सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती मी पाहिल्या आहेत, त्यांच्यासोबत राहिलो, वावरलो आहे. काही जणांमध्ये 'समाजाचं भलं काय ते आम्हाला कळतं' किंवा 'आम्ही बघा किती मोलाचं काम करतो आहोत' असा अहंकार आढळतो. याशिवाय 'आम्ही एवढं समाजासाठी केलं, पण कोणी आमची दखल घेतली नाही' अशी खंत बाळगणारे ही मला भेटले आहेत. मेधाकडे 'सूक्ष्म अहंकार' ही कधी जाणवला नाही, ना

तिला प्रसिद्धीचं, रेकॉग्निशन चं काही अप्रूप आहे. 'मानावं' तर लागतंच तिला.

माझ्यावरील लेखाच्या शेवटी मेधानं लिहिलं होतं- 'मी व माझी मैत्रीण दोन तास गोर्लेंशी गप्पा मारून, आमची वयं आणखी लहान करूनच निघालो, षष्ट्यब्दी पूर्ण करताना गोर्लेंना ह्याच शुभेच्छा की 'आणखी लहान व्हा.'

मी जरा बदल करू इच्छितो. माझ्या लेखी तिचं कार्य नक्कीच खूप मोठं आहे, महान आहे. म्हणूनच मी शेवटी म्हणेन 'मेधा, तू लहानच हो, पण तुझ्या कार्यानं मात्र आणखीन महान होत रहा!'

**शिवराज गोर्ले**
**लेखक**

# १२. डॉ. सौ. मेधा पुरव- सामंतची यशोगाथा

**मे**धा पुरवशी माझी ओळख झाली ती १९७९-८० (साला दरम्यान.) त्यावेळी ती रुईया कॉलेजमध्ये स्टॅटिस्टीक्स या विषयांत पदवीचं शिक्षण घेत होती. त्याचं असं झालं की मी त्यावेळी कै. रत्नाकर मतकरींच्या लोककथा ७८ या नाटकाची प्रकाश योजना व नेपथ्याची जबाबदारी सांभाळत होतो. या नाटकाच्या कलाकारांमध्ये काही मुलं व मुली काम करत असत. यामध्ये विशाखा पुरव नावाची एक मुलगी होती. 'लोककथा' चे आठवड्याला ३-४ प्रयोग तरी व्हायचेच-बहुधा दादरच्या छबिलदासच्या प्रायोगिक रंगमंचावर. कधीकधी मुंबई बाहेर ही दौरे होत असत.

विशाखा स्वभावाने जरा मोकळी ढाकळी होती व मनाने निर्मळ होती. त्यामुळे आमची मैत्री लवकर झाली. असाच एकदा, 'लोककथा' चा दिल्ली दौरा होता. त्या दौऱ्यात विशाखा बरोबरच तिची मोठी बहीण मेधाही सामील झाली होती. मेधा विशाखा इतकी बडबडी नव्हती. शांत स्वभावाची होती. पण, सगळ्यांच्यात मिळून मिसळून राहण्याचा तिचा स्वभाव होता. कोणत्याही विषयावर गप्पा मारताना, चर्चा करताना तिचा त्या विषयाबद्दल असलेला अभ्यास जाणवत असे. ती व्यासंगी होती. विविध विषयावर तिची मतं ठाम असत. त्यामुळे, आमची तिघांची छान गट्टी जमली.

दिल्ली दौऱ्यात आम्हाला एक दिवस रिकामा होता. त्या दिवशी कुठे प्रयोग नव्हता. तेव्हा, सगळ्यांनी आग्रह धरला की आपण आग्र्याला जावून ताजमहाल बघून येवू व जमलंच तर फतेहपुर सिक्री ला पण जाऊन येऊ. मग, आम्ही काही जणांनी मिळून एक गाडी केली व ताजमहाल पाहायला गेलो. ताजमहाल आमच्यापैकी कुणीच पहिला नसल्याने सगळ्यांच्या मनात ताजमहाल पहाण्याची प्रचंड उत्सुकता होती.

ताजमहालच्या बाहेर उतरलो आणि सगळे भारल्यासारखे ताजकडे नुसते पाहताच राहिले. आम्ही सर्वजणं मग संध्याकाळपर्यंत नुसतं 'ताजदर्शन' च करत होतो. आपल्याला पुढे फतेहपुर सिक्री ला सुद्धा जायचे हे विसरूनच गेलो. त्यावेळेस, मेधा अगदी मन लावून ताजचं निरीक्षण करत होती. मेधाकडे असलेली कलासक्ती व काव्यमय दृष्टी त्यावेळेस मला जाणवली. या दौऱ्याच्या निमित्ताने आमची म्हणजे मी, विशाखा व मेधा यांची मैत्री वाढली.

त्या वेळेस मी बँक ऑफ इंडियाच्या बॅलार्ड इस्टेट शाखेत नोकरीला होतो. तर, रहायला कर्जतला. बँकेला शनिवारी अर्धा दिवस असायचा. त्यामुळे, मग दुपारी बँकेतून निघाल्यावर मी दादरला पुरवांच्या घरी जायचो. पुरवांकडे कामानिमित्त येणाऱ्यांची खूप ऊठबस असायची. दादांकडे बँकेच्या युनियनच्या कामानिमित्त अनेक जण येत असत. युनियनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तक्रारी घेऊन येणारे बँक कर्मचारी. तर, दुसरीकडे सौ. प्रेमाताईंकडे त्या करीत असलेल्या समाजकार्यातले कार्यकर्ते. दादा व सौ. प्रेमाताई या इतक्या माणसांची ऊठबस हसतमुखाने कसे करू शकायचे याचं मला नेहमी आश्चर्य वाटायचं. या गर्दीतच कुठे तरी एका कोपऱ्यांत आमचीही गप्पांची मैफल जमायची.

त्या दरम्यानच मेधा बँक ऑफ इंडियात नोकरीला लागली. नंतर, मेधाचं लग्न झाल्यावर ती गिरगावात रहायला गेली. मीसुद्धा माझ्या नाटकाच्या कामात अधिकाधिक गुंतत गेलो व नंतर बँकेत प्रमोशन घेतल्यावर माझी बदली गोव्याला झाली. पाच वर्षानंतर परत मुंबईला आलो तो पर्यंत सगळे आपापल्या कामात व्यग्र झाले होते. वाढलेल्या जबाबदाऱ्या मुळे मला सुद्धा बँकेत उशिरा उशिरा पर्यंत काम करायला लागायचे. यामुळे आमच्या भेटीगाठी कमी झाल्या. त्याच दरम्यान मेधा व विशाखा पुण्याला शिफ्ट झाल्या.

मेधाने बँकेत काम करता करता आपलं कार्यक्षेत्र निश्चित केलं होतं. त्या कार्यासाठी बँकेसारखी सुरक्षित आणि चांगल्या पगाराची नोकरी सोडून तिने स्वतःला या कामात झोकून दिलं ते आजतागायत. ते काम तिने पुण्याला चालू केलं. पण, तरीही मी फोनवरून त्यांच्या संपर्कात होतो. मध्यंतरीच्या काळात हा संपर्क तुटला. पण तरीही, ती करत असलेलं कार्य व त्यात ती मिळवत असलेलं यश, मान-सन्मान हे सारं वृत्तपत्रातून कळत होतं.

हा समाजकार्याचा वसा तिला घरातूनच मिळालाय आणि तो तिने समर्पित भावनेने जपलाय, हे विशेष. आज मेधा अन्नपूर्णा परिवाराच्या ६ अंगीकृत संस्थांची संस्थापिका, अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका आहे. या सर्व संस्था एकत्रितपणे गरिबांना, दिनदुबळ्यांना शक्ति प्रदान करण्याचं, त्यांना उर्जितावस्था प्राप्त करून देण्याचं काम एखादं व्रत घेतल्यासारखं करतायत; त्यांना सावकारी पाशातून मुक्त करत असतानाच, त्यांच्या फक्त आर्थिक गरजा पुरवणे एवढाच उद्देश न ठेवता, त्यांचं जीवन अधिकाधिक सुखकर करण्यासाठी त्यांच्या इतरही अडचणी दूर करण्याचा, गरजा पुरवण्याचा प्रयत्न या संस्थांच्या माध्यमातून केला जातोय. हे करत असतानाच स्त्री सबलीकरणाचं उद्दिष्टही साध्य करण्याचा प्रयत्न केला जातोय, हे विशेष. आज या संस्थामध्ये काम करणाऱ्या ४०० कर्मचाऱ्यांपैकी ९५% महिला आहेत तर लाखों महिला या संस्थांच्या सभासद आहेत व या संस्था पुरवत असलेल्या सेवांचा त्या लाभ घेत आहेत.

या महावृक्षाची सुरुवात मेधाने केली तेव्हा बँका या महिलांना कर्ज द्यायला तयार होईनात. कारण या कर्जाच्या परतफेडी विषयी त्यांना खात्री वाटत नव्हती. अखेर, मेधाने स्वतःच्या पैशांनी पहिल्या सभासदांना कर्ज दिली आणि ही योजना यशस्वी करून दाखवली. एवढेच नाही तर, आजच्या

करोनाच्या संकटकाळांत सुद्धा मेधा आणि तिचे सहकारी योजनाबद्ध रीतीने संस्थेच्या सभासदांचे प्रश्न समजून घेऊन व त्यांच्या हितांचा विचार करून सुयोग्य उपाययोजना करत आहेत.

मेधाने अलीकडेच वयाची साठ वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्ताने, अन्नपूर्णा परिवारातर्फे काही सोहळा करण्याचा तिच्या सहकाऱ्यांचा मानस आहे. या यशामध्ये मेधाला असलेले जयंतचे- तिच्या नवऱ्याचे - पाठबळ विसरता येणार नाही. त्यामुळे त्याचेही कौतुक या निमित्ताने व्हायलाच हवे.

सुमारे चाळीस एक वर्षापूर्वी मला योगायोगाने भेटलेल्या अठरा-वीस वर्षाच्या एका तरुणीनं आता आपल्या आयुष्यातील ध्येय साध्य केलेलं पाहायला मिळतंय. यांचा खूप आनंद होतोय. एक प्रकारे या स्थित्यंतराचा मी ही दूरचा असलो तरी एक साक्षीदार असल्याने हा आनंद अधिक आहे. म्हणूनच, माझ्यातर्फे मेधाला ही पुष्पभेट आणि शुभेच्छा!

**शरद कामत**

**रिटायर्ड मॅनेजर, बँक ऑफ इंडिया**

# १३. ‘हिरक षटकोन’!

**मे**धाच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त आम्ही तिच्या शाळा-कॉलेजमधल्या मैत्रिणी जरा भूतकाळात डोकावलो आणि पुन्हा एकदा, आमच्या षटकोनाची अगणित डिझाईन्स, आमच्या सर्वांच्याच मनात छानपैकी फेर धरायला लागली....एखादा कॅलिडोस्कोप बघावा तशी! कॅलिडोस्कोप अलगद फिरवला की त्यातला षटकोन, नवीन नवीन रंगीबेरंगी डिझाईन्स दाखवतो... अगदी तसंच झालं ... आम्ही भूतकाळाची पानं पालटत गेलो आणि आमच्या मैत्रीचे नवनविन कंगोरे आणि त्या सगळ्यातली वैशिष्ट्यपूर्ण ‘मेधा’, सारं काही आमच्यासमोर पुन्हा एकदा नव्याने उभं राहिलं.

आमचा षटकोन...रुईया कॉलेजमधला आम्हां सहा मैत्रिणींचा ग्रुप! संध्या, प्रतिभा, वंदना, वासंती, रूपा आणि मेधा! यापैकी संध्या आणि प्रतिभा आर. एम. भट शाळेतून आल्या होत्या, तर बाकीच्या सगळ्या बालमोहन विद्यामंदिरच्या! पण कॉलेजमध्ये मात्र या सहा कोनांची घट्ट वीण बांधली गेली. ‘मेधा’चं या प्रत्येकीशी मैत्रीचं एक वेगळंच वैशिष्ट्यपूर्ण नातं होतं आणि अगदी आजही आहे.

वंदनाला ‘मेधा’ आठवते ती १२ वी नंतर सायन्स सोडून आर्टसला जायचा निर्णय घेणारी ‘मेधा’! मेधा तेव्हा विद्यार्थी संघटनेचं काम करत होती आणि सायन्समध्येच पुढे शिक्षण घेतलं तर त्या कामाला पुरेसा वेळ मिळणार नाही म्हणून वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी अत्यंत समजदारीने, स्वत:च्या शिक्षणाचाच रोख वेळीच बदलणारी ‘मेधा’! पण याच समजूतदार मेधाचं काहीसं ‘खट्याळ’ रूपही वंदनाला आवर्जून आठवतंय. ‘बोअर’ करणाऱ्या एखाद्या प्रोफेसरच्या तासाला त्यांच्या खोड्या काढायच्या किंवा वर्गामध्ये हळूच काही न काही छोटा मोठा मजेशीर प्रसंग निर्माण करायचा,

अश्या अनेक गंमतींमध्ये, इतर मैत्रिणींबरोबर, मेधा आणि वंदना यांचाही सहभाग असायचा. त्यामुळेच असेल कदाचित, आमच्या बारावीनंतर, रुईयाच्या प्रोफेसर मंडळींनी सुटकेचा निश्वास टाकला; कारण वंदना सायन्सलाच राहिली आणि 'मेधा' आर्टसला गेली.

संध्या आणि प्रतिभा या खरं तर वेगळ्या शाळेतून आलेल्या! पण संध्या आणि प्रतिभाची तर मेधाशी एवढी घट्ट मैत्री झाली की, जणू अगदी बालपणीच्याच सख्या! संध्याला आजही आठवते, संध्याच्या आईच्या आजारपणात, संध्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिलेली 'मेधा'! तेव्हा ज्या प्रकारे 'मेधा' ने संध्याला साथ दिली, ती 'मेधा'च्या, गरज असलेल्याच्या मागे खंबीरपणे उभी रहाण्याच्या दुर्मिळ गुणाचं उत्तम उदाहरण होतं. संध्याच्या मनात त्यावेळी 'मेधा' ने निर्माण केलेली आपलेपणाची उब! तीच 'उब', अजूनही जेव्हा जेव्हा 'मेधा' भेटते, तेव्हा तेव्हा आवर्जून जाणवते, असं संध्या नेहमी म्हणते.

प्रतिभाला आठवतो तो, समजूतदार, खंबीर, खटयाळ मेधाच्या मनाचा एक 'हळवा' कोपरा! मेधा प्रतिभाला, ''मैं तुम्हीसे पूँछती हूँ, मुझे तुमसे प्यार क्यूं है'' किंवा ''तुम जो हुए मेरे हमसफर, रास्ते बदल गये'' ही आणि अशीच सुरेल, भावपूर्ण गाणी, नेहमी अगदी आवर्जून म्हणायला लावायची आणि प्रतिभा गाणी म्हणायला लागली कि 'मेधा' अगदी तल्लीनतेने त्यात हरवून जायची. आजही मेधाचा तो हळवा कोपरा प्रतिभाला खुणावत असतो आणि परत गाणी म्हणण्याची तयारी करायला सुचवत असतो. एव्हढंच नव्हे तर मेधा अनेक कवितांचं उत्तम रसग्रहण करायची आणि स्वत:ही उत्तम कविता करायची. आजही आपल्या भाषा प्रभुत्वाचा छान उपयोग करत, मेधा कविता लिहिते.

वासंती तर स्वतःच्या सुखी आयुष्याचं श्रेयच 'मेधा'ला देते. सायन्सला असलात तरी हरकत नाही, चला बँकेत भरती चालू होते आहे, तेव्हा आपण अर्ज करूया, असं नुसतं म्हणून 'मेधा' थांबली नाही तर तिने वंदना, संध्या, वासंती आणि स्वतःचा, असे चार फॉर्म आणून स्वतःच भरले आणि मग या चौघीही जणी बँकेच्या नोकरीत रुजू झाल्या. 'मेधा' ने महिला सक्षमीकरणाचा वसा घेत बँकेची नोकरी, निवृत्तीच्या कितीतरी आधीच सोडली. बाकीच्या तिघीनी मात्र बँकेची सेवा पूर्ण केली. म्हणजे तसं बघायला गेलं तर, वंदना, संध्या आणि वासंती यांना बँकेच्या नोकऱ्या मिळवून देऊन, मेधाने त्यांचंही एका परीने सक्षमीकरण केलं, त्यांचा आत्मविश्वास वाढवला, त्यांना अगदी विसाव्या वर्षीच स्वतःच्या पायावर उभं केलं होतं. मेधाच्या आग्रहाखातर अर्ज केलेल्या, या सुरक्षित नोकरीमुळेच, उत्तम जोडीदार, स्वतःचं घर, गाडी या साऱ्या गोष्टी आयुष्यात सुख देत गेल्या, हे आठवताना वासंतीला आणि आम्हा सगळ्यांना आजही 'मेधा'चा मोठाच आधार वाटतो.

रूपा खरंतर मेधाची शाळेपासूनची मैत्रिण! आजही तिला आठवतात, ते मेधाच्या अंगणात होणारे, सर्व मित्र मैत्रिणींचे पकडापकडी किंवा लपंडाव यांसारखे खेळ! तेव्हा सुद्धा, कोणी राज्य घ्यायचं, कोणता खेळ खेळायचा आणि खेळ वेळीच कसा संपवायचा, अश्या सगळ्या निर्णयांचा पुढाकार 'मेधा' चाच असायचा. तिचं हे 'नेते' पण सर्वच मित्रमैत्रिणींना खूप सुखदायक वाटायचं. किंबहुना कधी पुढचा दिवस उजाडतोय आणि मेधाकडे खेळायला जायला मिळतंय याची सारेजण वाट पहायचे. आजही तिच्या बरोबर काम करणाऱ्या तमाम अन्नपूर्णा परिवाराचाही हाच अनुभव असेल.

'मेधा'ची आणखी एक खासियत म्हणजे अतिशय उत्साहाने तमाम मित्र किंवा नातेवाईक मंडळींना छान छान

पदार्थ स्वत: करून खाऊ घालण्याची! अगदी कॉलेजमध्ये असल्यापासून ते आजतागायत तो तिचा उत्साह जराही आटला नाही, याचंही आम्हा सगळ्याजणींना खूप कौतुक वाटतं.

तसं 'मेधा' च्या प्रत्येक गोष्टीचंच आम्हांला विलक्षण कौतुक आणि अभिमान वाटतो. लहानपणीची खट्याळ, पण अत्यंत ध्येयासक्त असलेली मेधा आज कर्तबगारीच्या एका उत्तुंग शिखरावर आहे. पण आजही तिचे पाय जमिनीवर आणि हात सर्व आजूबाजूच्या हातामध्ये गुंफलेले आहेत. कुठल्याही प्रकारच्या कौतुकाची, मानसन्मानांची अपेक्षा न करता, स्वत:च्या सद्सद्विवेक बुद्धीला पटेल आणि रुचेल, तेच अतिशय प्रामाणिकपणे, शिस्तीने आणि नेटाने सतत पुढे नेणारी 'मेधा' बघतांना, आम्हां सगळ्याजणींना अतिशय सुखद समाधान मिळतं...आणि 'मेधा' सारख्या तरल आणि मनस्वी व्यक्तिमत्त्वाला, अतिशय आदराने आणि प्रेमाने जपणारा आमचा मित्र 'जयंत'! त्याचंही खूप कौतुक वाटतं!

तर आता आम्हां सहा जणींच्या षटकोनाचा, 'हिरक षटकोन' झालाय! या वर्षी आम्हा सगळ्यांचीच साठी! पण आज आणखी एक गोष्ट लक्षात आली; अखंड उर्जा आणि उत्साहाचा स्रोत असणारी, कॉलेजमध्ये विद्यार्थी संघटनेचं आणि मग महिला सबलीकरणाचं काम पूर्ण लक्ष देऊन करता यावं म्हणून स्वत:च्या आखीवरेखीव आयुष्याची दिशा बदलणारी, मैत्रिणींच्या आणि आजूबाजूच्या सर्वच माणसांच्या अडीअडचणींना धावून जाणारी, नोकरीच्या पहिल्या दिवशी स्वत:बरोबर मैत्रिणींचाही डबा घेऊन जाणारी आणि प्रत्येकाला अगदी आवर्जून खाऊ घालणारी, समाजातल्या कुठल्याही आर्थिक स्तरावरच्या महिलेला प्रेमाने जवळ घेऊन तिची जणू सखीच होणारी 'मेधा' आणि आता

नातींबरोबर त्यांची मैत्रिण होऊन त्यांच्या खेळातही तितक्याच मजेत रमणारी 'मेधा'......

'मेधा' च्या व्यक्तिमत्त्वाचे हे षट्पैलू, जणू 'मेधा' स्वत:च एक समभूज 'हिरक षटकोन' आहे! मेधा... तुला तुझ्या हिरक वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!!

**तुझ्याच**
**संध्या, प्रतिभा, वंदना, रूपा आणि वासंती!**

# १४. मेधा एक मैत्रिण, सखी की गुरु?

**मे**धाताई, एक उत्तुंग व्यक्तिमत्व! कष्ट करून मिळविलेले.

माझी तिची ओळख १९८३/८४ मधली. आम्ही दोघी बँक ऑफ इंडिया, बाँम्बे ऑफिस मध्ये फिक्स डिपॉझिट डिपार्टमेंट मध्ये एकत्र काम करत होतो तेव्हाची!

‘‘मुलगी झाली हो’’ हे पथनाट्य आपल्या बँकेत बसवणार आहोत, तुझा आवाज छान आहे, तर त्यात काम करशील का?’’ विचारणारी मेधा. माझ्या सारख्या अनेक जणींना एकत्र करून ते पथनाट्य आम्ही बसवून पाच सहा बँक कॉलनीज मध्ये सादर केले व बँकेच्या दुर्बल घटकांसाठी कर्जयोजनेची माहिती दिली. त्यावेळेस मुंबईतील अन्नपूर्णा महिला मंडळाच्या ऑफिसमध्ये प्रॅक्टीससाठी भेटत असू. माझ्या तरुण मनात अन्नपूर्णाच्या कामाची नोंद झाली.

१९८५ साली मी लग्न होऊन पुण्यात आले, आणि बॉम्बे ऑफिसचा संबंध संपला व मेधाशी ही संपर्क राहीला नाही. मेधा १९८९ ला पुण्यात आली. त्यावेळी आमची भेट झाली ती एका अपघातात! हो एकदा मी ऑफिस मधून घरी जाताना कर्वे पुतळयाजवळ एक बाई रस्त्यात पडली होती व तिचे सामान सर्वत्र विखुरले होते. मी मदत करायला गेले तर ती मेधा होती! सर्व लोकांना पांगवून मी तिला तिच्या सामाना सकट घरी सोडले. तेव्हा मेधा दुचाकी नुकती चालवायला शिकली होती.

त्या नंतर आम्ही परत भेटलो, तेव्हा तिने सांगितलं की , ‘‘मी अन्नपूर्णा चे काम पुण्यात सुरु केले आहे तुला मदत करायला जमत असेल तर बघ.’’ मी सुरुवातीला शनिवार रविवारी येऊन काम करावे असे ठरले. तेव्हा पासून मला आठवड्यातून एकदा मेधा नियमित पणे भेटू लागली. तिचा

कामाचा आवाका बघून मी थक्क झाले व स्वत: ला जमेल ती मदत करण्याचा संकल्प केला.

विविध आघाड्यांवर काम करताना तिची १९९४ ते २००३ कालखंडातील रूपं डोळ्यांसमोरून सरकत जातात ती अशी.....

१) अन्नपूर्णा चे पुण्यातील काम बाल्य अवस्थेत असतांना बांग्लादेश मध्ये जाऊन ग्रामीण बँक बघून त्यातील मायक्रो फायनान्स च्या कार्य पद्धती चा अभ्यास करणारी -- मेधा

२) स्वतः महिला व सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यासाठी २ महिने इंग्लडला गेली तेव्हा घरच्यांची आबाळ नको म्हणून स्वयंपाक करणाऱ्या मुलीला आठवड्याचा मेनू ठरवून त्या प्रमाणे पदार्थांच्या कृतींची पुस्तिका (रेसिपी बुक) बनवणारी -- मेधा

३) नचिकेतसाठी चिकन बिर्याणी बनवून मुंबई ला घेऊन जाणारी -- मेधा

४) मिस्टरांच्या (जयंतदादा) ५० व्या वाढदिवशी सकाळ, दुपार, संध्याकाळ वेगवेगळी ग्रीटिंग देणारी --मेधा

५) घराच्या बाहेरच्या भिंतीला काच लावून त्यावर स्वतः वारली पेन्टिंग करणारी --मेधा

६) घराच्या गच्चीत फूल व फळ बाग फुलवणारी --मेधा

७) मशीन वर शिवण शिवणारी --मेधा

८) विविध लेख लिहिणारी, तसेच कविता करणारी व त्यांचा काव्यसंग्रह ‘सखी’ प्रकाशित करताना काव्यसंमेलन घडवून आणणारी -- मेधा

९) तळागाळातील लोकांमध्ये त्यांचीच होऊन जाणारी व कॉर्पोरेट जगात तेवढ्याच सहजतेने वावरणारी --मेधा

१०) सुरुवातीचा स्टाफ व मेंबर्स ना सर्व प्रकारची मदत करणारी--मेधा

११) शिवसेनेच्या नगरसेवकाने अन्नपूर्णा च्या  कामासाठी सत्कार करण्यास बोलावल्यावर ठाम पणे नाही म्हणणारी -- मेधा

१२) 'मी नथुराम गोडसे बोलतोय' नाटकास जाण्याकरता सुट्टी मागणाऱ्या संगीताला सुट्टी नाकारणारी --मेधा

१३) कुठलीही शंका वा प्रश्न विचारला की चिठ्ठी वा पत्र लिहून त्याबद्दल सविस्तर समज देणारी --मेधा

१४) स्वतः च्या पर्सनॅलिटी मध्ये सुधारणा कश्या कराव्यात या करता मला देशमुख सरांच्या ट्रेनिंग ला घेऊन जाणारी व त्या करता विविध पुस्तकं (Who moved my cheese / Seven habits of effective people) वाचायला लावणारी -- मेधा

१५) संगीताची आवड असलेल्या माझ्या सारख्या, मैत्रिणीं बरोबर वेळ असेल तेव्हा सवाई गंधर्व सारख्या कार्यक्रमाला येणारी --मेधा

१६) ''तू बहिणाबाई ची गाणी छान म्हणतेस, त्या गाण्यांनी आपण मीटिंग ची सुरवात करू'' म्हणणारी -- मेधा

१७) 'हे मंदिर मानवतेचे' (प्रार्थना) तसेच 'चल ग सये मिटिंग' ला साखरी पदे स्वतः रचणारी व त्याला योग्य चाल सुचवून ''हे पद तू बसव व स्टाफ आणि मेंबर्स कडून तयार करून घे'' असे सांगणारी--मेधा

१८)अन्नपूर्णा मधील कुठलेही काम करण्याची इच्छा दर्शवल्यावर कुठलीही आडकाठी न करता मार्गदर्शन करणारी --मेधा

१९)समाजकार्यातील माहित नसलेल्या मला त्या समुद्रात छानशी डुबकी मारून अलगद किनाऱ्यावर आणून सोडणारी --मेधा

२०) तसाच राजकारणातील 'रा' समजत नसलेल्या मला त्या बगिच्च्यांतून फिरवून आणून एक ही काटा रुतू ना देता फुला सारखे बगीचा बाहेर अलगद सोडणारी --मेधा

२१) 'आता माझी मदत पुरे झाली, स्वतः चा विचार करून कृती कर' सांगणारी -- मेधा

अशी अनेक बाजूने मी मेधा जवळून पहिली व अनुभवली आहे प्रत्येक पॉईंट वर सविस्तर लिहिले तर २०/२५ गोष्टी नक्की तयार होतील असा हा आमचा एक तपाचा सहप्रवास संपला !

आत्ता तुम्हीच सांगा कोण आहे ही -- मैत्रिण, सखी, गाईड, फिलॉसॉफर, की गुरु?

बहिणाबाई म्हणते ''सदा जगाच्या कारणे चंदना परी घासला, अरे स्वतः मधी त्याले देव दिसला दिसला'' तर माझ्या सारख्या असंख्य अन्नपूर्णांना मार्गस्थ करणाऱ्या मेधाताईंना साठाव्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**शैला दिक्षीत**

**निवृत्त कर्मचारी, बँक ऑफ इंडिया**

**निवृत्त अन्नपूर्णा पदाधिकारी**

# १५. मेधा एक आदर्श व्यक्ती व मैत्रिण

‘‘मेधाताईंच्या ६० व्या वाढदिवशी सरप्राईझ द्यायचंय, काही आठवणी असतील तर लिहून देऊ शकाल का?’’ असा अन्नपूर्णाच्या ऑफिसमधून फोन आल्यावर मी जरा दचकलेच! मेधा व ६० वर्ष पूर्ण? आपण तिच्याहून दोन वर्षांनी लहान म्हणजे आपणही साठीला आलो तर! खरं म्हणजे मेधाचं व्यक्तिमत्व, तिची उर्जा, उत्साह व काम करण्याचं नियोजन, अवाका, हे एखाद्या तरूणीला ही लाजवेल असं आहे!

मेधाची व माझी ओळख १९८५ साली बँक ऑफ इंडिया मुंबई मुख्य शाखेत झाली होती. बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियनच्या एका निदर्शनात आम्ही सर्व स्टाफने लंच ब्रेकमध्ये बँके बाहेर यावे म्हणून आम्ही सर्वांना सांगायला गेलो होतो. मेधाला पाहिल्यावर प्रथमदर्शनीच मेधाचं स्मिता पाटीलशी साधर्म्य असल्याची मनोमन कबुली दिली!

त्यानंतर मी लग्न होऊन पुण्यात आले. काही वर्षांनी मेधा भेटली ती ही बदली पुण्यात होऊन आली होती. मेधा कर्वे रोड शाखेत तर मी वानवडी शाखेत कार्यरत होते. देवरे साहेब झोनल मॅनेजर असताना बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिसने पहिल्यांदाच एक मार्केटिंग टीम बनवली. प्रत्येक शाखेतील एक एक प्रतिनिधी घेऊन टीम तयार केली. पुण्यातील सर्व शाखांना जाऊन आजूबाजूच्या घरोघरी जाऊन बँकेच्या सर्व स्कीमची माहिती द्यायची. एक प्रश्नावली आम्ही भरून घ्यायचो. त्यावेळी दोन वर्ष मी व मेधाने एकत्र मार्केटिंगचे काम केले व एकमेकींच्या जवळ आलो. मी कोंढवा साळुंके विहारला तर मेधा कोथरुड गोपीनाथ सोसायटीत राहायला होती. पण भौगोलिकदृष्ट्या पुण्याच्या दोन टोकांना राहूनही आमची मैत्री आजही दृढ आहे. गोपीनाथ सोसायटीतून लुणावत कॉम्पलेक्स व आता हिमालीतील बंगला,

अशी मेधाच्या पुण्यातील सर्व निवासात मी जात, येत व संपर्कात आहे .

मार्केटिंग टीममध्ये काम करताना वानवडी ते स्पायसर कॉलेज, पाषाण सर्व पुणे आम्ही चाळून काढत होतो. अनुभव चांगले व वाईट, दोन्ही आले. बऱ्याच ठिकाणी आमचं स्वागत व्हायचं. बऱ्याच ठिकाणी शाखेतील (दुसऱ्या बँकेच्याही) कर्मचाऱ्यांच्या वाईट वागणुकीचा राग आमच्यावर काढला जायचा. सर्वसामान्य ग्राहकांच्या मनातील सार्वजनिक बँकांबद्दलची प्रतिमा पुसणे, बदलणे असं आव्हानात्मक काम आम्ही मार्केटिंग टीम म्हणून करत होतो. बऱ्याच ठिकाणी दार उघडलं जायचं नाही व उघडलंच तर ''आम्हाला काही नकोय! बँकेवर ही वेळ आली का?'' वगैरे ऐकून घ्यावं लागलंय. स्पायसर कॉलेज शाखेच्या एरियात फिरत असताना एक मजेशीर अनुभव आला होता. माझी उंची ५-६'' तर मेधा ५-८''. आम्हाला हातात मार्केटिंगच्या बँगा (सुट केस) दिल्या होत्या. बराच वेळ बेल दाबल्यावर दार उघडलं गेलं नाही व जेव्हा उघडल तेव्हा एक पुरूष टॉवेलने अंग झाकत ''माझी बायको घरात नाही, तुम्ही थोड्या वेळाने या'' म्हणून गयावया करु लागला. आम्हाला खूप हसू आलं होतं.

''जगी सर्व सुखी बँकेतील कर्मचारी'' हे पुणेरी टोमणे देखील ऐकायला मिळायचे. कधीकधी तीन चार ठिकाणी नकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्यावर मला पुढच्या घरी जाऊ नये असं वाटायचं, पण मेधा नेहमी सकारात्मक घ्यायची, ''अग ते आपल्याला नाही म्हणत नाहीत, ते बँकेला नाही म्हणताहेत.'' अशी तिची प्रतिक्रिया असायची. परत आम्ही नव्या जोमाने कामाला लागायचो.

एक आगळा वेगळा अनुभव व फेरीवाल्या विक्रेत्यांना काय अनुभव येत असेल हयाचा अनुभव घेतला. साधारण दोन वर्षे आम्ही मार्केटिंग टीममध्ये काम केलं. आम्ही मार्केटिंगला

असताना सर्वजण मेधाला खूपच मानायचे. तिचे ऐकायचे, मेधाची रहाणी ही मुंबईहून आल्यामुळे छान होती. फार क्वचित हेवा सुद्धा वाटायचा.

तिची बुद्धिमत्ता, कामाचा अवाका, बौद्धीक ताकदीशी तुलना केली की, मेधाला मिळणारा मान योग्य वाटतो. मेधाच्या घरी मायक्रोव्हेवमध्ये गरम केलेला नुडल्सचा उपमा अनेकदा खाल्लाय, मार्केटिंग मधून वेळ काढून घरी येऊन, खिचडीचा कुकर गॅसवर ठेवणारी मेधा ही आठवणीत आहे. तशी उंची ५-८ पण आहार अतिशय कमी. दोन फुलक्यावर भागायचं. गुडघेदुखीचा त्रास आहे पण कधी काम करताना जाणवला नाही. नियमित योगा करायची.

मेधा ही सर्वगुण संपन्न. घरात तिने पेंट केलेले पेंटींग ठेवलेले. कोल्ड सिरॅमिक्स चे अनेक नमुने आम्ही एकत्र केलेत. घर उत्कृष्ट लावलेलं, स्वच्छता खूपच! ''सखी'' म्हणूनच मेधाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेला! उत्कृष्ट वक्ती, अतिशय ताकदीचं व्यक्तिमत्व! वागणं, बोलणं संयमाने. कोणाला दुखावणार नाही, पण योग्य ते करून घेणारी. एक शिस्तबद्ध व्यक्तिमत्व! माझा फोन गेल्यावर ''मी आता नचिकेतचा अभ्यास घेतेय, नंतर बोलू ''असं स्पष्ट सांगायची.

त्यानंतर मेधाने लवकरच बँक सोडली व पूर्णपणे अन्नपूर्णाच्या कामाला वाहून घेतले. मेधा भाजीवाल्यांना लोन देते, सही गिरवायला शिकवते, सही आली तरच लोन मिळतं, असं बरंच ऐकलं होतं. गोपीनाथ सोसायटीतील तिच्या कामाच्या काही मिटींग अटेंड केल्या. मी मेधाताईंची मैत्रिण म्हणून कर्ज घ्यायला आलेल्या बायका माझ्या पाया पडल्या होत्या. ''आता पाया पडताय, पण नंतर हफ्त्यासाठी मला हाता पाया पडायला लावू नका'' असे मेधाचे तेव्हा स्पष्ट सांगणे मी ऐकले आहे.

जर एखादी व्यक्ती आपल्या ध्येयावर लक्ष ठेवून काम करत असेल तर काय करु शकते याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मेधा! अन्नपूर्णाचं रोपटं प्रेमाताईंनी लावलं, पण त्याचा वटवृक्ष करून त्याची अनेक कलमे आपल्या बुद्धीच्या ताकदीने मेधाने केली. बँक सोडल्यावर मेधाने मास्टर्स इन सोशल वर्क व डॉक्टरेटर ह्या पदव्या मिळवल्या व त्याचा पुरेपूर उपयोग आपल्या कामासाठी केला.

मेधाचा १९९९-२००० मध्ये फोन आला होता. ''अन्नपूर्णा महिला मंडळ'' ला २५ वर्षे होतायत, मी एक नाटक लिहीलंय. तू माझ्या आईचा रोल करशील का?'' ऐकल्यावर वाटलं नाटकातील आई, पण जेंव्हा मिटींगला गेलो तेंव्हा कळलं, २५ वर्षापूर्वी प्रेमाताई साधारण माझ्या एवढ्या-सारख्या होत्या, ''त्यांचा रोल कर.'' असे मेधाने सांगितले. धोपे काका पण तिथे होते. ते पटकन म्हणाले, ''अभिनय करणं सोपं आहे, पण काम करणं प्रत्यक्षात अवघड आहे.'' मी हे आव्हान पेललं. प्रत्येक वेळी प्रयोग सादर झाल्यावर ''छान काम केलंस'' असा अभिप्राय मिळाला!

''अन्नपूर्णाची वाटचाल'' हे नाटक आम्ही पुण्यातील वर्धापनदिनी पोलीस ग्राऊंड व मुंबईत वाशी व बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये केलं. प्रयोग अतिशय चांगले झाले. ''हया प्रेमाताई कुठून आल्या''असं ही विचारण्यात आलं. नाटकात कचरा गोळा करणाऱ्या बायका, वडे तळणाऱ्या बायका, ज्यांना लिहिता वाचता येत नव्हतं, त्यांना सभासदांची भूमिका करायला लावली होती. तोंडी वाक्यं पाठ करून घेतली होती. हादग्यातील गाणी, पोवाडे मेधाने लिहिले होते. सुप्रसिद्ध, लेखिका कार्यकर्ती ज्योती म्हापसेकर (मेधाची चळवळीतील मैत्रिण) व तिची सहकारी अलका पावनगडकर हयांनी गाणी बसवून दिली होती. बँक ऑफ इंडियातील नाट्यप्रेमी, अनिल मिराशी व नितीन श्रोत्री हयांना पण नाटकात घेतलं होतं.

आत्ताची सुप्रसिद्ध अभिनेत्री शुभांगी फावडे लाटकर हिने सूत्रसंचालन व आमचा मेकअप पण केला होता. हे सर्व मेधाने जुळवून आणले होते.

त्या नाटकानंतर थोडे दिवस मी मेधाच्या कार्यक्रमाला गेले की, ''ताई आल्या'' म्हणून कुजबुज व्हायची. मुख्य ज्यांचा रोल मी केला होता, त्या प्रेमाताईंनी पण मिठीत घेऊन माझं काम चांगलं झाल्याचं सांगितलं.

त्यानंतर वाशीतील अन्नपूर्णाच्या वास्तूत मेधा गणपतीमध्ये मला व माझ्या धाकल्या लेकीला, सिम्रनला घेऊन गेली होती. तिचे वडील कॉ. दादा पुरव. त्यांच्या नावाने युवकांच्या स्पर्धा सुरू करण्यासाठीचा तिचा प्रयत्न होता. सिम्रनने ग्रॅज्युएशन नंतर एम. एस. डब्ल्यू. केलं त्यावेळी तिच्या कर्वे इन्स्टीट्युटला ॲडमिशन व नंतर फिल्ड वर्क प्लेसमेंटच्या वेळी मेधामावशी आलीच मदतीला.

नचिकेतच्या लग्नात संगीत मध्ये नृत्य करावयाचे होते. त्यासाठी माझी मोठी कन्या श्रावणी हिला मेधाने मुद्दाम बोलावून घेतले, ''अगं, आम्हाला नाच येत नाही. तू येऊन शिकव.'' मग श्रावणीने जयंत व मेधा दोघांनाही घरी जाऊन काही स्टेप्स शिकवल्या होत्या.

मेधाच्या अन्नपूर्णा वर्धापनाच्या अनेक कार्यक्रमांना वेळात वेळ काढून मी उपस्थित असते. तिच्या गोपीनाथ सोसायटीच्या मिटींग नंतर, लुनावत कॉम्प्लेक्स टेरेसवरच्या मिटींग, पोलिस ग्राउंड वरील वर्धापन दिन, नंतर ॲग्रीकल्चर कॉलेज मैदानावर, आता डि.पी. रोडवरील पंडित फॉर्म वरील वर्धापन दिन! दिवसें दिवस संख्या वाढतेय, जागा कमी पडतेय. अशीच तिची घोडदौड चालू राहो व एखादा कार्यक्रम बालेवाडीत करण्याची वेळ येवो!

मेधाला तिच्या कामात मदत करण्याची मला खूप इच्छा आहे, पण बहुतेक तो योग बँकेतून निवृत्त झाल्यावरच येईल, असं वाटतंय! तिच्या कामात खारीचा वाटा उचलण्याचं काम

मी अन्नपूर्णा परिवाराच्या वार्षिक मेळाव्यात सूत्रसंचालन करुन केलंय.

प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे एक पुरुष असतो. मेधाच्या मागे जयंत खंबीरपणे उभा आहे. दोघेही हुषार व दोघांमध्ये नेतृत्व गुण पुरेपूर भरलेले! मला नेहमी प्रश्न पडतो की, ‘‘वाद झाला तर माघार कोण घेत असेल?’’ नचिकेत, सुनबाई चैत्रा व दोघी नाती नव्या व मायरा असा मेधाचा संसार ही फुलताना मी बघितलं आहे. मेधाचं वारजेतील अन्नपूर्णाचं ऑफीस हल्लीच पाहिलं, थक्क झाले! सहा मजली बिल्डिंग, खाली रिसेप्शन काउंटर! सर्व काम सुसूत्रपणे चाललंय. प्रत्येकाला कामाचं योग्य वाटप व सर्वजण मनापासून काम करतात. जास्तीत जास्त महिला व त्यांच्याकडून व्यवस्थित काम करुन घेणे हे मेधाच करु जाणे. मेधाने अन्नपूर्णाचं सॉफ्टवेअर तयार केलंय. मनोमन कबुली दिली की, मेधाने बँकेतील नोकरी सोडली आणि अतिशय चांगलं विधायक काम केलंय. मेधाने गेल्या २८ वर्षात अनेकांना दारिद्रय रेषेवर काढलंय, त्यांचे संसार फुलवलेत.

जर एखादी व्यक्ती ध्येय केंद्रीत असेल व आपल्या कामातील प्राधान्य जाणत असेल तर यश कसे प्राप्त होते. हे सर्व मेधाकडे बघून पटते. मेधाला अनेक पुरस्कार मिळालेत. ती जे कार्य करतेय, त्यात तिला भरभरून यश मिळो. ती जेव्हा आम्हाला भेटते, मला व माझ्या मुलींना तिच्याकडून नक्कीच चांगली उर्जा मिळते. तिच्या पुढील वाटचालीसाठी अनेक अनेक शुभेच्छा व अशी मैत्रिण आम्हाला जन्मोजन्मी मिळो ही परमेश्वराकडे प्रार्थना. तिचा आयुष्याचा झोका इतका उंच जावा की क्षितिज पार करावे.

**सौ. सुजाता सुरेंद्र हटकर**
**मॅनेजर, बँक ऑफ इंडिया**

# १६. आमची बालमैत्रिण

**प्रिय मेधा,**

सर्वप्रथम तुला वाढदिवसानिमित्त अनेकानेक शुभेच्छा!

वुमन एम्पॉवरमेंट लीडर म्हणून तुझं जे नाव तू मिळवलंयस, ते ऐकताना, तुझ्या पुरस्कारांची यादी वाचताना तुझा खूप अभिमान वाटतो!

तुझ्या कामात तुला असेच यश मिळत राहो, येणारी सर्व वर्ष आनंददायी, उत्तम आरोग्याची जावोत!!

**मधुवन्ती भागवत**

**बालमैत्रिण**

# १७. कठोर परिश्रम: मेधा

**आ**ज आपल्या सर्वांना मेधा तिच्या उत्तुंग कामामुळे परिचित आहे. परंतु या पदापर्यंत पोचण्यासाठी तिने अतिशय परिश्रम घेतले आहेत.

मेधा लग्नानंतर अंधेरीला राहात असे आणि तिच्या कामाचं ठिकाण होतं चर्चगेट. त्यामुळे रोज सकाळी लवकर घरातल्या जबाबदाऱ्या पार पडून घाई गडबडीत लोकल ट्रेन पकडणं हा दिनक्रम. बहुतांशी बायका गप्पा, एखादी डुलकी यामध्ये आपला गर्दीचा प्रवास करत असतात. (हल्ली सर्व मंडळी हातातल्या मोबाईलला चिकटलेली असतात) असो.

तर मेधा रोज ऑफिसला निघताना आदल्या दिवशीचा ‘‘टाईम्स ऑफ इंडिया’’ घेऊनच घराबाहेर निघत असे. अंधेरी ते चर्चगेट या वेळेत ती आदल्या दिवशीचा पेपर वाचत असे. नुसता वाचत असे का? तर नाही.. तिच्या बरोबर पेन, छोटी डायरी असे. अडलेले शब्द, एखादा न कळणारा मुद्दा असं सगळं ती नोंदवून ठेवी आणि मग ते शब्दकोशातून शोधून समजून घेई. या सगळ्या सवयी पुढे तिला तिच्या पी. एच. डी. च्या कामात, तिच्या कार्यक्षेत्रात काम करताना नक्कीच उपयोगी पडल्या असतील.

मोठी माणसं उगाचच मोठी होत नाहीत. उत्तम सवयी, आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी घेतलेले कष्ट यामुळेच ती कर्तृत्वाने मोठी होतात. तुम्हाला काय वाटतं?

मेधा, तुला वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा!

**राजलक्ष्मी पाटणकर**

**बालमैत्रिण**

# १८. मेधा, मी व बँक ऑफ इंडिया कर्वे रोड शाखा

**स**गळ्या मैत्रिणी जेवणाच्या टेबलावर जमलो. आज मी ठरवलंच होतं, हा विषय काढायचाच. निम्मं जेवण झालं, सगळ्यांची क्षुधा शांत झाली, तसं मी डायरेक्टच बोलायला सुरूवात केली. माझा अनुभव सांगितला, तसं एकेकीनं तोंड उघडलं.

''मलाही हाच अनुभव आला'' लता म्हणाली ''ए खरंच गं, मी एक-दोनदा दुर्लक्ष केलं, पण मग मलाही कसंतरीच वाटू लागलं'' स्वाती म्हणाली.

''मी तर किती दिवस बेचैन आहे. मला पण सेम अनुभव आला''-''इति सारिका! आता मात्र मेधा वैतागली. ''कल्याणी, आज तू तोंड उघडलंस म्हणून कळलं, नाहीतर सर्वजणी निमूट ऐकून घेत होत्या ना? घडलंय ते खूप भीषण वगैरे नाही, पण म्हणून ऐकून घ्यावं असं तर मुळीच नाही''.

हा आमचा बँक ऑफ इंडिया, कर्वे रोड शाखा, डबा ग्रुप! ही घटना १९९१-९२ ची! तेव्हा कॉम्प्युटर्स नव्हते. त्यामुळे मॅन्युअली सर्व कामे होत. लेजरला पोस्टींग करायचे, दुपारी लंच नंतर सप्लीमेंटरी लिहायची. मग ४ वा. ती कॉल करायची. कॉलींग ऑफिसर समोर जाऊन बसायचं, नि तो म्हणाला की कॉल करायचे. त्यावेळी आम्ही मुली २५-३० च्या वयोगटातल्या. घरी जायची ओढ...... मुलं अगदी लहान..... मग हया कॉलींग नंतर घरी पळायचं. त्यामुळे एखादी चूक व्हायची. अर्थात् कस्टमर च्या अकाऊंट वर परिणाम व्हायचा नाही, पण इंटरेस्ट बॅलन्सींग वर मात्र व्हायचा.

आमच्या त्यावेळच्या सेव्हींग अकाऊंटसच्या सप्लीमेंटरीचे कॉलिंग करणारे ऑफिसर महाशय बऱ्यापैकी

सिनिअर होते. पण जरा जास्तच ‘‘स्मार्ट’’ होते. कॉलींग करताना आमची काही चूक झाली. की ते आमच्या डोक्यावर टप्पल मारायचे. जणू तो त्यांचा हक्कच होता. पहिल्यांदा जरा विचित्र वाटलं, म्हटलं जाऊ दे चुकून झालं असेल. पण पुढे २-३ वेळा हेच घडल्यावर मात्र मला चैन पडेना. जी गोष्ट माझ्याबाबतीत घडली, ती इतर बायकांच्या बाबतीत घडू नये, त्यांना सावध करावं म्हणून मी सर्वांदेखत हा विषय काढला.

आता सगळ्या जणींना सेम अनुभव आलाय म्हटल्यावर मेधा म्हणाली, ‘‘हे असंच तुम्ही ऐकून घेतलंत, तर त्या ऑफिसरला वाटेल, कसंही वागा, काहीही केलेलं चालेल! पहा, आता मी सांगते तसं करू या का?’’

आणि दुसऱ्या दिवशी मेधाने त्या ऑफिसरला सांगितलं की ‘‘आज लंच नंतर १० मिनिटे ठेवा. आम्हाला बोलायचंय.’’ लंच घेताना आम्ही सर्वजणी गप्प-गप्प! मेधा म्हणाली ‘‘तुम्ही का गप्प आहात? चूक तुम्ही केलीय का? मस्त आनंदाने जेवा.’’

लंच झालं नि आम्ही सर्वजणी मेधाचा पदर धरून माना खाली घालून घाबरत गेलो. तो ऑफिसर टाळत होता, पण मेधाने हाक मारून त्याला थांबवलं.

‘बोला सामंत मॅडम’

‘हो, बोलायचंच आहे. हया सर्व बायकांची तुमच्या विरूद्ध कॅम्प्लेंट आहे’

‘का? मी काय केलंय?’

‘‘तुम्ही कामात चुका झाल्या की टप्पल मारता. यापुढे तुम्हाला ही सवय मोडावी लागेल. कोणतीही लेडी स्टाफ ही गोष्ट सहन करणार नाही आणि असं पुन्हा चुकून जरी घडलं, तरी त्याचे परिणाम काय होतील हे मी सांगायची गरज नाही.’’

काही क्षण स्तब्धता..... शांतता.....

'काही बोलायचंय का तुम्हाला'

'न.... न.... नाही मॅडम. सॉरी''

'हया सर्वजणींना सॉरी म्हणा. मला एकटीला नाही..

'ह.... हो सर्वांना सॉरी''

आणि सर्वजणी आपापल्या जागेवर बसल्या. सुटकेचा निःश्वास टाकत! मेधा मात्र जणू काही घडलंच नाही अशी पुढची कामं करत होती. त्या दिवसानंतर असा प्रसंग तर घडला नाहीच पण इतर पुरूष कर्मचारी देखील आमच्याशी जरा जपून बोलू वागू लागले.

आमच्या शाखेत पुरूष व स्त्रियांसाठी एकच कॉमन वॉशरूम होती. फार विचित्र वाटायचं, मेधाला ते खटकायचं, ती म्हणायची ''मुंबईच्या शाखांमध्ये सेपरेट वॉशरूम्स्, रेस्टरूम्स असतात''. मग मॅनेजरच्या मागे लागून तिने वरच्या मजल्यावर स्त्रियांसाठी वेगळी वॉशरूम तयार करून घेतली. त्यासाठी ती सतत पाठपुरावा (फॉलोअप) करे. झोनल ऑफिसशी बोले. पार हेड ऑफिस पर्यंत बोलून बायकांच्या अवघड स्थितीची कल्पना देत असे. आम्ही तिच्या हया धडाडीमुळे फार प्रभावित झालो.

मेधा स्त्री मुक्तीच्या नावाखाली फायदे घेणाऱ्यातली आहे का? मुळीच नाही! मेधा स्त्रियांसाठी मोर्चे काढणारी आहे का? मुळीच नाही! मेधा पुरूषांना कमी लेखणारी आहे का? मुळीच नाही! किंबहुना ती स्त्री व पुरूष दोघांचाही मान रहावा असा आग्रह धरणारीच आहे. तसं नसतं तर माझी तिच्याशी मैत्री झालीच नसती.

मी कर्वे रोड शाखेत बदली होऊन आले, त्याआधी काही महिने मेधा मुंबई हून आलेली होती. पहिल्या २ दिवसांतच तिची-माझी मैत्री झाली. कदाचित 'मोकळा स्वभाव' हा दोघींमधला समान धागा असावा. मेधा ही दादा पुरवांची मुलगी

आहे. हे मला खूप उशीरा कळालं. ना तिने कधी त्याचा उच्चार केला, ना कधी वापर केला! पुढे कधीतरी आम्ही जेवताना विषय काढला, तेव्हा ती म्हणाली, ''आम्ही भावंडं लहानपणापासून घरी सतत ये-जा करणारी माणसं पाहिली. आपले वडील कामगारांसाठी काहीतरी करतात, लोक त्यांचा सल्ला घ्यायला येतात हे पाहिलं, चर्चा ऐकल्या, हया चर्चा घडताना आई म्हणजे प्रेमाताई स्वयंपाक करत-करत भाग घेत, ऐकत.''

कामगारांना आज मिळणाऱ्या सवलतींमध्ये विशेषतः बँक कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सवलतींमध्ये कॉ. दादा पुरवांचा सिंहाचा वाटा आहे आणि अशा दादांची कन्या मेधा आमची मैत्रिण.

प्रेमाताईंनी पुढे १९७० मध्ये ''अन्नपूर्णा महिला मंडळ'' ची स्थापन केली. मुंबईतल्या खाणावळवाल्या बायकांसाठी त्यांनी खूप कार्य केले. बरोबर २० वर्षांनी म्हणजे १९९०-९१ मध्येच आईच्या कार्यात झोकून द्यायचे मेधाने पक्के केले. शिवाय बँका गरीब महिलांना कर्ज देत नाहीत, हयाचा मेधाला राग येत असे. मोठमोठी थकित धेंडं सोडून बँका छोटया कर्जदारांच्या मागे लागतात ही बाब तिला खटकायची. भाजी विकणाऱ्या बाईपुढे वसुलीला, तेही २००-४०० रू. च्या तगादा लावणारे पाहिले की तिला सात्विक संताप येई. ''हया बायकांवर संसार चालतो, मुले शिकतात, दोन वेळचं अन्न पोटात जातं, नाहीतर दारू पिणारे नवरे काय मदत करणार?'' असा सवाल ती करे, स्त्रीमधे असलेली, अगदी उपजतच तग धरून राहण्याची शक्ती, उर्जा याचं मेधाने कायम समर्थन केलं. पण म्हणून तिने सरसकट सर्व पुरूषवर्गाला बदनाम नाही केलं.

मायक्रोफायनान्स क्षेत्रात उतरायचं मेधाने ठरवलं आणि एक दिवस डिक्लेअर केलं. ''मी नोकरी सोडणार''

झालं..... आम्ही सर्वजणी गंभीर..... पण तिचंही पटत होतं.... आपण जे काम करत नाही, ते आपली मैत्रीण करत्येय याचा अभिमान होता. शेवटच्या दिवशी निरोपाच्या भाषणात मेधा म्हणालीच -

''आपण योग्य तेच वागतोय ही खात्री असेल तर समोर पुरूष अगर स्त्री कुणीही असो निर्भीडपणे बोला, अगदी ठामपणे. प्रत्येक जण बोलू शकते, यावर आधी विश्वास ठेवा. केव्हाही अन्नपूर्णात मेधा काय करते बघायला या नक्की''

मेधा मनात ठसली. तिच्या बोलण्याने वागण्याने ठसली. बँकेत कामाचा तिने कधीच बाऊ केला नाही.

दादा पुरवांची मुलगी म्हणून कुठली सवलत घेतली नाही, आवाज चढवून बोलली नाही. (हां, आता मुळातच मेधाचा आवाज खणखणीत आहे, हे वेगळं!)

मेधाने आम्हाला नंतर घरी बोलावलं होतं. नासान मेडिकलचं जयंतचं काम आणि थोडंफार अन्नपूर्णाचं काम बघायला. त्यावेळी तिचं काम कोथरूडला चालत असे. हे सर्व दाखवत असताना मध्ये-मध्ये जे भेटतील त्यांची ओळख करून दिली. अगदी नवरा जयंत, मुलगा नचिकेत, बहिणी, मेव्हणे यांच्यापासून ते घरात काम करणाऱ्या ताईपर्यंत. त्यात गाडीचा ड्रायव्हर सुद्धा आला बरं का! ही ओळख करून देण्याची पद्धत मी प्रथमच पहात होते. आपल्या पैकी कितीजण असं करतात? स्वतःशीच विचार करण्याची गोष्ट आहे.

मेधाचा लोकसंग्रह अफाट! आई-बाबांच्या वर्तुळातले अनेक आणि स्वतः जाईल तिथे तिने अनेक ओळखी करून घेतल्या. स्मरणशक्तीही अचाट! तुम्ही कधी, कुठे भेटलात, हे ती अचूक सांगते. लीडरशीपच्या क्वालीटी तिच्यात पुरेपूर आहेत.

मेधाचा नचिकेतवर फार जीव आणि तो एकटा पडू नये म्हणून तिने परशुराम नावाचा अनाथ मुलगा दत्तक घेतला. त्याचं शिक्षण केलं. मेधाच्या दोघी बहिणी त्यांच्या संसारात रमल्या. मेधाला हे सहज शक्य होतं परंतु ती एका विशिष्ट ध्येयाने झपाटली होती. बँक सोडल्यावर तिने एम. एस. डब्ल्यू. केलं. वाचन भरपूर, त्यामुळे माहिती भरपूर, समाजात वावर भरपूर, मुंबईचा स्मार्टनेस पुरेपूर. सर्वच कामाला आलं.

''मायक्रो फायनान्स ही कन्सेप्ट लोकप्रिय झाली. त्यासाठी आय.आय.एम. मधून मेधाला बोलावणी आली. त्याच्या वेगळेपणाचा अभ्यास सुरू झाला. कालांतराने डिपॉझिटच्या योजना राबविल्या गेल्या. बँकापेक्षा थोडा जास्त रेट दिल्याने लोकांनी पैसे गुंतवले. तेही काम एकदम शिस्तीचे! पद्धतशीर! बँकेसारखीच डिपॉझिट फॉर्म भरा, पॅन द्या आणि जास्त व्याजदराचा फायदा घ्या. तिथे काम करणारे दादा, ताई अतिशय छान स्कीम समजावून सांगतात. दादा तुमच्याकडे डिपॉझीटची पावती आणून देतो. त्यात आम्ही सहभागी झालो.

सर्वच गोष्टींना एक शिस्त आहे. ज्यांच्या साठी तिने कष्ट घेतले, ज्यांना तिने दिलासा दिला, ते हजारो हात तिच्या मदतीला आले. कुठेही सत्कार असो, स्टेजवर मेधा एकटी कधीच येत नाही. बरोबर २ ताई, आक्का असतातच.

कुठल्या कार्यक्रमाला भेटली की मेधा आमच्या घरच्या प्रत्येकाची आठवण काढणार, विचारपूस करणार. शेवटी म्हणणार, ''या की, ग एकदा बघा तरी आम्ही कधी पाळणाघरं चालवलो, बालवाडी चालवतो. परदेशी विद्यार्थी प्रोजेक्ट करायला. इंटर्नशिप करायला इथे येतात. जरा वेळा काढा.''

आम्ही आपलं 'हो, हो' म्हणतो. पण याचा मेधाने कधी राग मनात ठेवला नाही आणि म्हणूनच आमची मैत्री टिकली. उलटपक्षी कुठे कार्यक्रम असेल, मेधा प्रमुख अतिथी म्हणून

आली असेल आणि प्रेक्षकांत आम्ही कोणी दिसलो, तर हीच आमची ओळख तिथे सांगते. मग परत आम्हीच लाजतो.

मेधा, आई-बाबांचा वारसा खऱ्या अर्थाने चालवतेस. सन्मानपत्रं तर मिळत राहतील. पण सर्व अन्नपूर्णांसाठी तू जे काही करत्येस, ते अचाट आणि अफाट आहे. यापुढील वाटचाली साठी तुला खूप खूप शुभेच्छा!

**कल्याणी फडतरे**

**बँक ऑफ इंडिया, पुणे**

# १९. मेधा-३० वर्षाचे मैत्र

**मे**धा साठ वर्षाची होणार, हे खरंतर तिला लागू न होणारं विधान आहे; पण तरीसुद्धा काळाच्या गणतीप्रमाणे हे असू शकेल. मेधाच्या कामाच्या झपाट्याला खरंतर काळाची मर्यादा अपुरीच आहे. आपण अंगीकारलेल्या कार्याप्रती तिची असणारी निष्ठा, त्यासाठी दिवसाचे चोवीस तासही कार्यमग्न राहण्याची तिची तयारी, तिच्या साऱ्या कुटुंबाची असणारी साथ, सोबत असणारी सहकाऱ्यांची आणि सुहृदांची सुंदर मांदियाळी, ह्या सर्वाला लाभलेली कणखर तसेच दूरदृष्टीने गगनाला गवसणी घालणारी मेधाच्या नेतृत्वाची कमाल म्हणजेच आज तिने उभे केलेले हे अन्नपूर्णा परिवार रूपी प्रचंड मोठे साम्राज्य होय!

चार महिन्यापूर्वी काही कामानिमित्त मेधाला भेटायला गेलो, आणि तिने स्वकर्तृत्वावर आज निर्माण केलेली ही भव्य संस्था पाहून माझाच ऊर अभिमानाने भरून आला. मेधासारख्या एका कर्तृत्ववान महिलेचा मी मित्र असणे हे मी माझे भाग्य समजतो. बँक ऑफ इंडियाच्या नोकरीत आणि युनिअनच्या कामातून निर्माण झालेली मैत्री ती आजही तशीच मानते, यातच तिचा साधेपणा आणि आजही जमिनीवर राहून आकाशात भरारी मारण्याचे कर्तृत्व मनाला भावून जाते.

आम्हाला आजही आठवते ती नव्वदच्या दशकात मुंबईहून पुण्यात बदली घेऊन आलेली आमचे अतिशय महान नेते कॉ. दादा पुरव तसेच थोर सामाजिक कार्यकर्त्या, अन्नपूर्णा संस्थेच्या संस्थापक, गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक श्रीमती प्रेमाताई पुरव ह्यांची मुलगी आणि युनियन मधील आमची सहकारी मेधा पुरव सामंत.

छोटीशी टी. व्ही. एस. कंपनीची मोपेड घेऊन पुण्यात सर्वत्र संचार करणारी, आई-वडीलांकडून समाजसेवेचे

बाळकडू लाभलेली, सदैव हसतमुख असणारी, स्वतःच्या मतांवर ठाम असणारी आणि तरीही सर्वांशी आपलेपणाने वागणारी मेधा सामंत.

मेधाने त्याकाळात बँकेच्या मार्केटिंग टीममध्ये उत्कृष्ट कामगिरी केली, युनिअनच्या कामात तिने तेवढीच आस्था बाळगली.

ह्याच काळात तिने स्वतःवर आलेला एक प्रसंग ज्या पद्धतीने सांभाळून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमोर एक वेगळाच आदर्श उभा केला, त्यावरून आमच्या पुणे युनिटला मेधाच्या रूपाने एक कर्तृत्ववान नेतृत्व मिळेल असा सगळ्यांचा झालेला कयास मात्र तिने थोड्याच कालावधीत खोटा ठरवला, कारण तिचा खरा पिंड होता तो समाजसेवेचा, समाजातील तळागळातील कष्टकरी महिला आणि त्यांची कुटुंबे ह्याच्या उद्धाराचा! लवकरच त्या दिशेने कूच करत तिने बँकेच्या नोकरीचा राजीनामा देत अन्नपूर्णा संस्थेचा पुण्यातील कारभार सुरू केला.

छोट्या जागेत अन्नपूर्णाचे काम सुरू करून शिवाय तिने मास्टर इन सोशल वर्क करायचे ठरवले. समाजसेवेचा गुण तिच्या डी. एन. ए. मध्येच असल्याने हयातही तिने प्राविण्य मिळवले. हयाच काळात मेधा एक उत्तम सामाजिक भान आणि जाण असणारी कवियत्री असल्याचे कळले, ते तिच्या काव्य संग्रहावरून.

अन्नपूर्णा संस्थेचा विस्तार दिवसेंदिवस वाढत होता. मोठ्या जागेत स्थलांतर आणि कष्टकरी महिलांच्या कल्याणासाठीच्या विविध योजनांसह आणखी काही नवीन क्षेत्रात तिने प्रवेश केला. काचपत्रा गोळा करणाऱ्यांसाठी, घरकाम करणाऱ्या महिलांसाठी, छोटे व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी तिने सुरू केलेले कार्य बहरत आलेले होते.

मेधा पुरव सामंत आता डॉ. मेधा पुरव सामंत बनली होती. परदेशांमध्ये जाऊन तिथे प्रशिक्षण आणि अनुभव आपल्या गाठीशी बांधत तिने स्वतःच्या अन्नपूर्णा परिवारच्या कार्याला नवीन आयाम दिला.

ह्या तिच्या कार्यात तिचे पती आणि सारे कुटुंबीय हयांनी तिला मोलाची साथ दिली. कर्तृत्ववान मेधाच्या पाठी सारे कुटुंबीय, सहकारी एकदिलाने उभे राहिले कारण त्यांना तिच्या कार्याच्या व्याप्तीची पूर्ण जाणीव होती.

मायक्रो फायनान्स क्षेत्रात उतरून तिने कष्टकरी महिलांना आर्थिक ताकद द्यायला सुरूवात केली. मग त्यांचे बचतगटांसारखे छोटे ग्रुप करून सामूहिक जबाबदारीच्या तत्वावर आर्थिक सहाय्य आणि बचत असे दुहेरी काम करताना त्यांचेसाठी अर्थपुरवठा करणारी पतसंस्था निर्माण केली. त्यातून पुढे गरजेपोटी पाळणाघरे, विविध भागात त्यांची छोटी मोठी मंडळे, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबासाठी आरोग्य विमा, आरोग्य सेवा अशी मोठी साखळीच निर्माण झाली. पुणे शहरात कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जागोजागी अनेक गट निर्माण केले. हजारोंच्या संख्येत महिलांना ह्यातून आधार मिळाला. कॉ. दादा पुरव हयांच्या नावाने एक ट्रस्ट निर्माण करून त्याद्वारेही अनेक उपक्रम सुरू केले.

कष्टकरी महिलांच्या अनुभवांवर आधारित तिने लिहिलेल्या कथांचा कथासंग्रह अगदी पूर्ण वास्तववादी झाला तर त्यात कुठलेच नवल नाही! कारण मेधाचे अनुभवांनी आणि आपल्या कार्याने संपृक्त झालेले व्यक्तिमत्व! हया हजारो महिलांची मेधाताई, अगदी मध्यरात्री सुद्धा झोपडपट्टीतील पिडीत महिलेच्या सहाय्यासाठी निर्भय पणे जाऊन अन्याय करणाऱ्या व्यक्तीला मग अगदी त्या महिलांच्या दारूड्या नवऱ्यालाही धडा शिकवायला मागेपुढे पाहत नाही. हया साऱ्याचा प्रत्यय अन्नपूर्णा संस्थेच्या वार्षिक सभेत हजारोंच्या

संख्येने येणाऱ्या आणि त्यांच्या मेधाताईंच्या एका हाताच्या इशाऱ्यावर पूर्ण शांतता पाळणाऱ्या महिलांच्या प्रचंड मोठ्या मेळाव्याला येतो. आज मोठाल्या बँका बुडीत कर्जांनी त्रस्त असताना अन्नपूर्णा पतसंस्था मात्र शून्य बुडीत कर्ज अभिमानाने दाखवते, कारण कष्टकरी महिलांचा विश्वास आणि सामूहिक जबाबदारीची त्यांची जाणीव किंवा बंधन हे होय.

यशस्वी व्यक्तीला मिळणारे सारे देशातील तसेच परदेशातील संस्थांचे असंख्य पुरस्कार आज मेधाच्या नावावर जमा आहेत, हे सारे तिच्या ऑफिसमध्ये दिमाखात ओळीने उभे आहेत पण खरा पुरस्कार म्हणजे हजारो गरजू कष्टकरी महिलांनी तिला दिलेला ''मेधाताई'' हा सन्मान होय.

काळाची गरज म्हणून आज तिची ही संस्था स्वतःच्या जागेत पंधरा हजार स्क्वेअर फुटाच्या सहामजली इमारतीच्या रूपात अद्यावत यंत्रणांसह एखाद्या कॉर्पोरेट ऑफिसच्या स्वरूपात दिमाखात उभी आहे. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र विभाग असून सुमारे चारशे महिला कर्मचाऱ्यांसह हा सारा कारभार तिच्या कुशल नेतृत्वाखाली उत्तमरित्या सुरू असतो. हयाला पौराणिक कथांमध्ये येणाऱ्या स्त्री राज्याची उपमा मला सुचते अर्थात ही कल्पना तिला भावेल, आवडेल की नाही ते मला माहित नाही, पण जेव्हा मी त्या ऑफिसला भेट दिली तेव्हा मला ही साम्राज्याची कल्पना सुचली.

दिवसाचे चोवीस तास कार्यमग्न असणाऱ्या मेधाला स्वतःच्या कुटुंबात रमायलाही आवडते आणि ती तेवढा वेळ त्यांना देते. हे सारे ती कसे जमवते हे तिचे तिच जाणो.

साठ वर्षाच्या आयुष्यात हा सतत चढत जाणारा मेधाच्या कार्याचा आलेख असाच वाढत राहू दे, शंभर वर्ष आयुष्य लाभून तिचे कार्य बहरत जावो. हयात समाजाचा

स्वार्थच आहे, कारण हजारो कष्टकरी महिलांच्या जीवनात नंदनवन निर्माण करणारी मेधा शंभर वर्षाच्या आयुष्यात नक्कीच लाखो महिलांचा उद्धार करेल अशी खात्री आहेच. इच्छा असूनही आमच्या मर्यादित कार्याच्या नादात आम्ही तिला फक्त नैतिक पाठींबा आणि प्रसंगी कौतुक एवढेच करत असतो. मेधा मात्र आमच्या संघटनेच्या दर वर्षी सात ऑगस्ट रोजी होणाऱ्या रक्तदान शिबिरास आवर्जून उपस्थित राहून प्रसंगी रक्तदान करून आपल्या एकेकाळच्या कार्याला शुभेच्छा देते. आम्हाला आमच्या हया कर्तृत्वाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेल्या मैत्रिणीचा, सहकारीचा सार्थ अभिमान आहे.

अशा हया मेधाला त्रिवार मानाचा मुजरा आणि सातत्याने कार्यरत राहण्यासाठी आरोग्यपूर्ण दीर्घायुष्यासाठी सदिच्छा!

**भास्कर भावे**

**(माजी खजिनदार बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन पुणे)**
**(उप सरचिटणीस स्टेट कमिटी ए.आय.बी.आर.एफ. महाराष्ट्र युनिट)**
**(पदाधिकारी बँक ऑफ इंडिया रिटायरिज असो. महाराष्ट्र- गोवा युनिट)**

# २०. ध्येय सक्त मेधा

**मा**झी आणि मेधाची ओळख बँक ऑफ इंडियातील एक सहकारी म्हणूनच होती. आमचे एक वरिष्ठ नेते कै. दादा पुरव, यांची ती कन्या एवढेच मला माहिती होते. परंतु सन १९९२-९३ मध्ये आम्ही बँकेच्या मार्केटिंग टिममध्ये काम केल्यामुळे माझी व मेधाची प्रत्यक्ष ओळख झाली.

त्यानंतर एक दिवस मला मेधाने बँक सोडण्याचा विचार बोलून दाखविल्यावर थोडेसे वाईट वाटले. पण त्याच बरोबर एक विश्वास होता की, काही निश्चित योजना मनात असल्याशिवाय मेधा बँकेची नोकरी सोडणार नाही.

अर्थात तसेच झाले... बँक सोडल्यावर मेधाने तळागाळातील लोकांसाठी काही काम करण्याच्या हेतूने भाजी विक्रेता, आणि छोटी कामे करणाऱ्या महिलांना लहान स्वरूपात अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास सुरूवात केली. आम्हांस एवढेच कळत होते की मेधा कुठल्यातरी सामाजिक कार्यात गुंतली आहे व त्याच बरोबर एम. एस. डब्ल्यु. सुद्धा करीत आहे. दरम्यानच्या काळात माझी ऑगस्ट १९९६ मध्ये प्रमोशनवर पुण्याबाहेर बदली झाल्याने आमच्यातील संपर्क थोडासा कमी झाला. अर्थात आमच्या अन्य सहकाऱ्यांकडून अधूनमधून मेधाच्या प्रगतीबद्दल बातम्या मिळत होत्याच.

आज अशी स्थिती आहे की, मेधा आणि अन्नपूर्णा परिवार ही दोन नावे वेगळी होऊच शकत नाही. हेच मेधाच्या २८ वर्षाच्या मेहनतीचे फळ आहे. आज अन्नपूर्णा परिवारची व्याप्ती फक्त त्यातील हजारो सदस्यांपुरतीच मर्यादित नाही, तर त्या सर्व कुटुंबांनाही एक भक्कम आधार अन्नपूर्णा परिवाराने दिला आहे. मेधा व तिचे सहकारी यांनी घेतलेल्या परिश्रमांचे फळ म्हणजे आजचा विशाल अन्नपूर्णा परिवार आहे. त्याचबरोबर मेधाचे ठरविलेले ध्येय व ते

साध्य करण्याची आस, त्यापर्यंत पोहोचण्याचा सुनिश्चित मार्ग! सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या ध्येयापर्यंत पोहोचेपर्यंत ज्या काही समस्या येतील त्यावर अत्यंत खंबीरपणे मात करण्याची वृत्ती, हे आपण अन्नपूर्णाच्या वारजे येथील कार्यालयास भेट दिल्यावर जाणवते. अन्नपूर्णाची दरवर्षी होणारी वार्षिक सभा हा एक परिवाराचा मोठा सोहळाच असतो. त्याचे देखणे आयोजन व शिस्तबद्ध संचलन यावर मेधाच्या कर्तृत्वाची छाप निश्चितच जाणवते.

सामान्यतः असे म्हटले जाते की, प्रत्येक यशस्वी पुरूषाच्या मागे एका स्त्रीचा सहभाग असतो, पण एखाद्या स्त्रीने मनात आणले तर ती कुठे जाऊ शकतो हे मेधाने दाखवून दिले आहे. आजपर्यंत तिला असंख्य पुरस्कार मिळालेले आहेत. तरी सुद्धा तिच्या वागण्यातील साधेपणा कोठेही कमी झालेला नाही अथवा तिच्यात काही बदल झालेला दिसून येत नाही. आज मेधा साठ वर्षांचा टप्पा पार करीत असली तरी कार्यात असलेला तिचा उत्साह कणभरही कमी झालेला नाही. ज्या सचोटीने व निष्ठेने मेधाने हे कार्य आपल्या खांद्यावर पेलले आहे ते या पुढेही तिच्या हातून निरंतर घडत राहो हिच तिच्या साठीच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा....

**मुकुंद सातपुते**

**निवृत्त चीफ मॅनेजर, बँक ऑफ इंडिया**

# २१. मैत्रिण-बहिण

**मा**झ्या आठवणीप्रमाणे मेधाशी माझी ओळख १९७७ साली, जयंतची मैत्रिण या रुपात झाली. पुढे हळूहळू ही ओळख वाढत जाऊन, मेधा माझीसुद्धा मैत्रिण आणि शिवाय बहीण झाली. चार पाच वर्षात जयंत आणि मेधा विवाहबद्ध झाले. आमच्या गाठीभेटी वाढतच राहिल्या. ते अंधेरीला रहायला गेल्यावर तर आम्ही, अधूनमधून शनिवार- रविवार रहायलाच जाऊ लागलो. साधारण असा समज आहे की मित्रांमधील संबंधात, त्यांच्या बायकांमुळे अंतर पडते पण मेधामुळे आमचे संबंध जास्त दृढ झाले. पुढे जयंत-मेधा पुण्याला रहायला गेले. त्यामुळे आमच्या भेटी कमी झाल्या पण भेटींमधील तीव्रता वाढली.

पुण्यात त्यांचे घर (तेंव्हा) वस्तीपासून दूर, गोपीनाथ नगरमध्ये होते. अंधार पडल्यानंतर जाण्याचा रस्ता निर्मनुष्य व्हायचा. एकदा मेधा छोट्या (आता कल्पना करवते का?) नचिकेतला घेऊन दुचाकीवरून घरी जात असताना काही लोकांनी तिला या रस्त्यावर लुटण्याच्या हेतूने अडवले. मेधाने धैर्याने, प्रसंगावधान राखून आरडाओरडा करून, प्रतिकार करून कशीबशी सुटका करून घेतली. याप्रसंगी तिने दाखवलेले धैर्य आणि प्रसंगावधान कौतुकास्पद होते म्हणून खास उल्लेख केला.

अर्थात, दोन भांडी जवळजवळ आली की, ती एकमेकांवर आपटणे हे अपरिहार्य आहे! तसाच आम्हीसुद्धा एकमेकांवर आपटून कधीकधी आवाज केला असेल. पण ती कंपने, रिकाम्या भांड्यांसारखी टिकली नाहीत, तर भरलेल्या भांड्यांच्या कंपनांसारखी चटकन नष्ट झाली.

मेधाचा ‘प्रपंच’ आता खूपच वाढला आहे. ती संपूर्णपणे ‘अन्नपूर्णामय’ झाली आहे. पण आमच्यासाठी, तिला वेळ नाही असे कधीच होत नाही. तिला अनेक पुरस्कार मिळाले, मान मिळाला पण आमच्यासाठी मेधा अजून ‘ती’च आहे!
पुढील प्रवासासाठी तिला लाखलाख शुभेच्छा!

**राजीव शेवडे**

# २२. तुसी ग्रेट हो!

**ज**यंतला तसं तर मी १९७० पासूनच ओळखतो. कॉलेजच्या त्या सोनेरी दिवसांपासूनची आमची मैत्री! असं जुनं मित्रत्व तसं टिकणारंच असत. कॉलेजचं शिक्षण संपल्यावर आम्ही, वेगळे झालो म्हणजे जयंतने एम. एस. सी. करायचे ठरवले. मी नोकरी करायला लागलो व राजीव शेवडे आपल्या वडीलांच्या बीझनेसमध्ये गेला.

तरीही आम्ही वेळोवेळी भेटत असू. १९७७ मध्ये पहिल्यांदाच जयंत मेधाला घेऊन मी काम करत असलेल्या कोको-कोलाच्या वरळी फॅक्टरीत आला. ती आमची पहिली भेट. त्यानंतर नोकरीच्या निमित्ताने १९७८ मध्ये मला शारजाला जावे लागले. माझी मेधाची पुन्हा भेट १९८१ तिच्या जयंत बरोबरच्या लग्नात झाली. ज्यांच्यासाठी मी खास दुबईवरून आलो होतो.

माझ्या लग्नाचे ही श्रेय मी मेधालाच देतो. कारण आमच्या माथेरानच्या ट्रिपमध्ये तिने माझे फुल ब्रेनवॉशिंग केले. जेणेकरून मी १९८४ मध्ये लग्न केले. १९८७ मध्ये आमच्या मुलाचा जन्म झाल्यावर शारजाला राम राम ठोकून आम्ही कायम स्वरूपी मुंबईला परतलो. या सर्वांचे क्रेडिट मेधालाच जाते. ती असे काही पटवून सांगते की बस!

मेधाच्या चळवळीचे एक्नॉलेजमेंट भारतात वेगवेगळे अॅवार्ड देऊन तर झालेच आहे, पण बाहेरच्या जगानेही हयाची नोंद घेऊन तिला तिचे अनुभव शेअर करण्यास आमंत्रित केले आहे. एवढ्या व्यापातही मेधा आपल्या नातेवाईक आणि मित्र परिवाराच्या ही सतत संपर्कात असते. मेधा ''तुसी ग्रेट हो'' तिच्या ६० व्या वाढदिवसाच्या आमच्या खूप खूप शुभेच्छा!

**राजेंद्र काळे**
**कौटुंबिक मित्र**

# २३. आमची ४० वर्षा पासून घट्ट मैत्री आहे

**खरं** तर ह्यातच सर्व आले.

तिला ड्रॉइंग, पेंटिंग, गाणे, वाचन, बागकाम, नविन गोष्टी बघणे ह्या सगळ्याच गोष्टींची मनापासून आवड आहे. पण सध्या अन्नपूर्णाचाच परिवार एवढा वाढला आहे की ह्या गोष्टी करायला फारसा वेळ देता येत नाही. तरीही जमेल तेंव्हा ह्या गोष्टी करायला आवडतात. त्यामुळे अशा संधी ती सोडत नाही. पूर्वी स्त्री मासिकांमध्ये लेखन केले, अनेक लोकांच्या मुलाखती घेतल्या. 'सखी' काव्य संग्रह आणि पुस्तके प्रकाशित केली. अनेक कला अवगत असून त्या जोपासण्याचा प्रयत्न चालू असतो.

तिला माणसांची आवड असल्यामुळे व लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशी संवाद साधण्याची कला अवगत असल्यामुळे सर्व वयाच्या लोकांशी तिची मैत्री आहे.

अन्नपूर्णाच्या व्यापात पूर्ण पणे गुंतलेली असूनही सर्वांच्या आवडी लक्षात ठेऊन स्वत:च्या हाताने करून त्यांना खाऊ घालते व आवडीच्या वस्तू देते.

नातींना गोष्टी सांगणे, त्यांच्याशी खेळणे, ह्या गोष्टी करण्यात तिला आनंद मिळतो. आमचा सगळा ग्रुप वर्षातून २/३ वेळा २-३ दिवसांची ट्रिप काढून एकत्र जमतो व मजा करतो.

एकमेकांच्या कडे जाणे, कारणाशिवाय पण चालूच असते.

स्वतः बद्दल प्रचंड आत्मविश्वास, माणसांच्या चांगुलपणा वर विश्वास ह्यामुळे तिचा मित्र परिवार वाढतच आहे. दिवसेंदिवस तो असाच वाढत राहो.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**मीना शेवडे**

**मैत्रिण**

# २४. शिस्तबद्ध कार्यतत्पर मेधा

**मे**धाची आणि माझी ओळख होऊन जवळ जवळ २५ वर्षे झाली. माझ्या मावसभावाचा मित्र जयंत त्यामुळे आमची ओळख, त्यावेळी ते लोखंडवाला (अंधेरी) ला राहत होते. त्यानंतर जयंत-मेधा १९९० ला पुण्याला शिफ्ट झाले. पुढे पुण्याला आल्यानंतर आमची व मेधा-जयंतची जास्त मैत्री झाली. त्यावेळी मेधा बँकेत नोकरी करत होती. परंतु तिचे मन तिथे रमत नव्हते. समाजसेवेचे बाळकडू तिला घरातूनच मिळाले असल्याने पद्मश्री प्रेमाताई पुरव यांच्यानंतर कोण हा प्रश्नच आला नाही. अन्नपूर्णा ही एक अत्यंत चांगलं काम करणारी संस्था आहे. प्रेमाताईंनी ती अत्यंत चांगल्याप्रकारे चालवली. परंतु वयामुळे प्रेमाताईंना बंधने होतीच, मेधाने निर्णय घेतला की बँकेतील सुखाची नोकरी सोडून आपण अन्नपूर्णाचा गाडा पुढे न्यायचा.

पहिल्यापासून तिला समाजसेवेची आवड होतीच. अन्नपूर्णा ठराविक कारणासाठी मर्यादित न ठेवता तिने त्यात मायक्रो फायनन्सिंगची भर घातली. रोज मेधा जेव्हा भाजी आणायला जायची तेव्हा ती भाजीवाल्या बायकांशी त्यांच्या फायनान्सियल प्रॉब्लेम विषयी बोलायची. त्यातून मायक्रो फायनान्सिंगची कल्पना पुढे आली व बघता बघता अन्नपूर्णा संस्थेचा मायक्रो फायनान्सचा व्याप एवढा वाढला की अन्नपूर्णाचा एक मोठा वृक्ष झाला. अन्नपूर्णाला ह्या आत्ताच्या उंचीवर नेण्यात मेधाचा खूप मोठा वाटा आहे. किंबहुना मेधामुळेच अन्नपूर्णा ही संस्था एवढी मोठी होऊ शकली. मेधाने बँकेतील नोकरी सोडल्यापासून तिचा खरा प्रवास सुरू झाला. आम्ही तो पहिल्यापासून पाहिला आहे. त्यामुळेच आम्हाला तिचे खरंच मनापासून कौतुक वाटते. स्वतःच्या हिंमतीवर, कल्पकतेने व शिस्तीने तिने सर्व कार्य उभे केले, वाढवले,

व्यवस्थित चालू ठेवले आहे. अगदी घरातील छोट्या ऑफिसपासून तर सहामजली सुवास्तूपर्यंत.

मेधाला शिस्त प्रचंड प्रिय आहे. त्यामुळेच ती सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडू शकली. घरातील प्रत्येक गोष्टी जिथल्या तिथे असण्याची तिला सवय आहे. ती नेहमी म्हणायची, ‘‘घरातले दिवे बंद करून जरी मला सोडले तरी कुठली वस्तू कुठे ठेवली आहे ती मी पटकन काढून देईन.’’ इतका व्यवस्थितपणा! हाच व्यवस्थितपणा तिला अन्नपूर्णा संस्थेच्या प्रगतीत उपयोगी पडला. पुढे जयंत-मेधा दोघांचेही व्याप खूप वाढत गेले त्यामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी कमी झाल्या, परंतु गणपतीत दोन दिवस आणि ३१ डिसेंबरला दोन दिवस आम्ही नक्कीच एकत्र असतो. प्रत्यक्ष जरी भेट कमी झाली, तरी आमची मैत्री तशीच टिकून आहे.

मेधाला अन्नपूर्णाच्या पुढील प्रवासास माझ्या खूप खूप शुभेच्छा. ती उत्तरोत्तर अशीच प्रगती करत राहील हीच इच्छा. हे काम करण्यासाठी तिला दिर्घायुष्य लाभो ही प्रार्थना! ती करत असलेल्या कामाला माझा मनापासून सलाम.

**श्रीधर जठार**

**कौटुंबिक मित्र**

# २५. अष्टावधानी मैत्रिण

**मे**धा...... तशी मेधाला मी शाळेपासून ओळखते. ती मला एक वर्ष ज्युनिअर. तिचा आते भाऊ माझ्या वर्गात असल्यामुळे ती आमच्या वर्गात यायची. एवढीच माझी आणि तिची ओळख. शाळा सुटल्यानंतर किती वर्षे काहीच कॉन्टॅक्ट नव्हता. लग्नानंतर मी पुण्यात आले. शाळा सोबतींशी काहीच संपर्क नव्हता.

मेधा-जयंत साधारण १९८९-९० च्या सुमारास पुण्यात शिफ्ट झाले. आमच्या कॉमन मित्रामुळे त्यांच्याशी ओळख झाली आणि मग भेटी-गाठी सुरू झाल्या, त्या आजपर्यंत सुरू आहेत. या सर्व वर्षांमधून मेधाचा संपूर्ण प्रवास-बँकेची नोकरी ते आजचे अन्नपूर्णा या प्रवासाचा चढता आलेख आम्ही पाहिला आहे, पाहत आहोत.

वयाची साठी आली तरी त्याच पंचविशी-तिशीतल्या उत्साहाने आपले काम करणारी..... स्वतःच्या बिझी शेड्युल मधून सर्व नाती जपणारी.... अष्टावधानी अशी मेधा! अशा या मेधाला तिच्या प्रत्येक गोष्टीसाठी माझ्या खूप खूप शुभेच्छा! आणि अशीच उंच उंच भरारी घेत राहा!

'जीवेत् शरदः शतम्!

**वर्षा जठार**

**कौटुंबिक मैत्रिण**

# २६. धडाकेबाज मैत्रिण

**मे**धा, अगं तू चक्क ''साठी''त पदार्पण करते आहेस, म्हटल्यावर मला तर शंभरीत गेल्यासारखंच वाटायला लागलं.

आम्ही ''मुंबैकर'', मुंबईचा रास्त अभिमान असणारे! इतर मंडळी कांही म्हणू देत, ''इतकी वर्ष पुण्यात राहूनही मुंबै-मुंबै करता,'' पण खरंच मुंबईला नांव ठेवायला मन धजावत नाही..... तर आम्ही पुण्यात यायचं ठरवल्यावर आमचे मित्र सामंत आणि जठारांनी आमच्या येण्याचे स्वागतच केलं. सामंतही मुंबईत राहून पुण्यात आलेले. मेधाने तर मुंबईपासून बँक ऑफ इंडियाची कास धरलेली. आजवर असलेले आमचे बँक ऑफ इंडिया मधील खाते मेधानेच उघडून दिलेले. अगदी लॉकरसकट.

कर्वे रोडवरील तिची शाखा आम्हाला घरापासून जवळच होती. तेव्हा मेधा गोपीनाथ नगर ते कर्वे रोड हा प्रवास सनी या स्कूटर वरून करत असे, घरी जाताना बरेचदा नचिकेतला शाळेतून घेवून जात असे. तेव्हा गोपीनाथ नगरला जाण्याचा रस्ता तसा सुनसान असायचा, एका बाजूला कमिन्सची भिंत दुसऱ्या बाजूला टेकडीवजा जंगल, मध्ये गोपीनाथ नगरचा रस्ता. दिवसा-ढवळ्यासुद्धा त्या रस्त्यावरून जायची भिती वाटायची. एकदा नचिकेतला घेऊन संध्याकाळी घरी जाताना समोरून ३-४ जण येताना दिसले, मेधाच्या एकंदर परिस्थिती लक्षात येताच तिने नचिकेतला उलट्या दिशेने जाण्यास सांगितले. जिथे काही मंडळी संध्याकाळचा ''वॉक'' घेत होते. त्यांना ही परिस्थिती नचिकेतने सांगितल्यावर ती मंडळीही धावतच निघाली, या सर्वांचा अंदाज त्या ३-४ जणांना आला आणि त्यानी टेकडीच्या दिशेने पलायन केले.

तर अशी ही आमची मैत्रिण! तेव्हाही धडाडीची होती आणि आजही आहे.

बँकेतून घरी जात असताना भाजी घेऊन जाण्याचा तिचा शिरस्ता रोजच्या भाजीवाल्या ओळखीच्या झाल्यामुळे त्या आपली गाऱ्हाणी बरेचदा मेधाला सांगत, अगदी अडते कसे त्रास देतात, ते नवरे पिवून धिंगाणा करतात इथपर्यंत! पोटाची खळगी भरायला भाजी-फळे विक्रीचा व्यवसाय तर करावाच लागत असे. पैशाची चणचण तर जन्माला पुजलेली! यातूनच त्या सर्वांची मेधाशी ओळख झाली. या सर्वांची चिटफंड, भिशी, पतपेढी यावरच जास्त विश्वास होता. बँकेत खाते कसे उघडायचे, बँकेचा व्यवहार कसा करायचा हे समजावून देण्याचे श्रेय पूर्णपणे मेधालाच! यातूनच 'मायक्रो फायनान्स' उदयाला आले .

''अन्नपूर्णा'' या संस्थेची सुरवात मेधाच्या आई प्रेमाताई पुरव यांनी केली असली तरी, त्याचा वटवृक्ष मात्र मेधाच्या मेहनतीनेच फोफावला यासाठी तिने बँकेला रामराम ठोकला, आणि पूर्णपणे अन्नपूर्णासाठी स्वतःला वाहून घेतले, आज पुणे, नव्या मुंबईसह अनेक ठिकाणी अन्नपूर्णाचे कार्य अविरत चालू आहे. यासाठी मेधाला तिचे यजमान जयंत सामंत यांचेही पूर्ण सहकार्य लाभले आहे.

उत्कर्षाची शिडी चढताना ती डळमळीत कशी करता येईल याची 'वाट' बघणारे अनेक असतात, मेधाच्या बाबतीतही असे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, पण अर्थातच जिद्दीचे दुसरे नांव ''मेधा सामंत!''

अन्नपूर्णाचा विस्तार होत असतानाच तिने बँकेला राम राम ठोकला पण आजवर तिचे बँकेशी नाते जुळलेलेच आहे. अशी अनेक नाती मेधाने जोपासली आहेत. मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, नवे-जुने शेजारी, व्यवसायानिमित्त

झालेल्या अनेक ओळखी, असे अनेक सूर तिला गवसले आहेत, या खेरीज तिने संगीतातले सूरही आपलेसे केले आहेत, सवडीनुसार ती संगीत मैफिल असेल तर तिथे आवर्जून हजेरी लावते.

जयंतच्या बरोबरीने तिला धोपेश्वरकर काका, चित्रा, अंजली, उज्वला आणि इतर सहकारी यांचीही मोलाची साथ मिळाली आहे. हे ही नसे थोडके! पुणे आणि मुंबई येथे होणाऱ्या ''ए. जी. एम.'' सोहळ्याच्या वेळी जो प्रचंड 'महासागर' जमतो, त्यावेळी मेधाच्या कार्याचा आवाका किती आहे याची पुरेपूर प्रचिती येते. अशा वेळी माझ्या सारखीचे डोळे भरून येतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो.

माझा लेख संपविताना सुचलेल्या चारोळ्या

''मैत्रिच्या विणीतून जुळूनी येती नाती
त्या नात्याने बांधल्या गेल्या रेशीम गाठी
अशाच रेशमाचा धागा धरूनी
शुभेच्छा तुज देते मनापासुनी.....''

**उषा आहेर**
**मैत्रिण**

# २७. आमच्या मेधाचा झोका उंच उंच जावू दे.

**मे**धाचा साठावा वाढदिवस करायचा आहे. आठवणीतील फोटो पाठव असा जयंतदादाचा फोन आला. क्षणभर मला खरं वाटलं नाही. मेघा इतक्या लवकर कशी साठची झाली? मग माझ्या लक्षात आलं, मी सहासष्टची झाल्यावर मेधा साठची होणारच!

आणि मन पन्नास वर्ष मागे गेले. सर्व जुन्या आठवणी जाग्या झाल्या. तिचं माझं नातं, नात्याच्या पलिकडचं, जिव्हाळ्याचं, मैत्रीचं. ती मला मोठी बहिण मानते. लहानपणी मेधा, विशू, पप्पूचं आमच्या घरी खूप कौतुक असे. गोव्याला जाताना प्रेमाताई व दादा आणि या तिघी यांचा आमच्याकडे मुक्काम असायचा. माझी आई ताईची तर मेधा खूप लाडकी. मी मुंबईला पहिल्यांदा गेले तेव्हा मेधा शाळेत होती. ती मला चौपाटीवर फिरायला घेऊन जायची, शाळा दाखवायची, उत्साहाने गाणी म्हणून दाखवायची. तो बालपणीचा रम्य काळ झरकन नजरेसमोर आला. आम्ही एकमेकींना बरीच पत्रे लिहायचो. सर्व आठवलं की गंमत वाटते.

शाळेत असतानाची लाजरी, भावुक, छान छान गाणी म्हणणारी मेधा, स्त्री मुक्तीच्या लढ्यातील 'मुलगी झाली हो' कार्यक्रमात 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत खड्या आवाजात गाणारी व आता अन्नपूर्णा परिवाराच्या मेळाव्यात जोरदार भाषण करणारी मेधा हा तिचा प्रवास आम्हाला कौतुकाचा व अभिमानाचा असाच आहे.

नोकरी, संसार, नातीगोती सर्व सांभाळत तिने एम. एस. डब्ल्यु, पी. एच. डी केले. नोकरी सोडून अन्नपूर्णा परिवाराची उभारणी केली. प्रेमाताई, दादांचे संस्कार व

जयंतदादाची साथ, प्रोत्साहन स्वत:चे परिश्रम यामुळे ती पुढेच जात राहीली.

आमचे मेणसे कुटुंब आणि पुरव कुटुंब ह्यांचे अतूट, जिव्हाळयाचे नाते आहे. आमच्या कुटुंबातील सुखदु:खात मेधा नेहमी सहभागी असते. आमच्या परिवारातील बऱ्याच जणांचे संसार तिने उभे केलेत, सावरलेत. आता तर ती अन्नपूर्णा परिवारातील सर्वांची 'आधारवड' झालेली आहे.

तिच्या कार्याची दखल अनेक संस्थांनी घेतली. तिला बरेच पुरस्कार मिळाले. बऱ्याच उच्चपदावर ती पोहचलेली आहे. तिचा हा सारा प्रवास खूपच कौतुकाचा आहे.

हा कर्तृत्वाचा झोका असाच उंच उंच जावू दे.
पावशे कुटुंबियांकडून मेधाला खूप खूप शुभेच्छा.!

**लता पावशे**
**बहिण**
**बेन्नाळी, बेळगाव**

## २८. आधारवड

निस्वार्थी निगर्वी व साम्यवादी विचार
असलेल्या दांपत्याच्या पोटी जन्मलेली
अन् तेच आचार व विचार
आचरणांत आणणारी

कॉलेज जीवनांतच स्वत:च्या खांद्यावर
झेंडा घेऊन चळवळ करणारी
आणि त्या चळवळीतच
आपला जीवनसाथी शोधणारी -

मेघगर्जनेसम आवाज असणारी
आणि ओठातून धो धो बरसणाऱ्या
सरी साखरेच शब्दांचा वर्षाव करणारी
पण त्या शब्दांचा सुगंध मोहक वाटेल
असे वागणारी -

अनेक भाषांवर प्रभुत्व असलेली
मुद्दे पटवून देण्याचे कसब असणारी
कामाचा पसारा आभाळा एवढा असतानाही
शरीर व मनही थकू न देणारी -

ऐनवेळी पितृछत्र हरपले असताना
मातेच्या कर्तृत्वाचा समान धागा पकडून
सर्वस्व हरवलेल्यांना छत्र देणारी -

श्रमिक, दीन, रंजल्या गांजलेल्यांची
अतीव कणव असलेली
व त्यांचे दु:ख आपले मानून त्यांना
उभारी देण्यासाठी सदैव तत्पर असणारी -

जबाबदारीचा डोंगर पेलताना
न थकणारी, न डगमगणारी
पुरवांची अपूर्वा, सामंतांच्या आसमंतात तळपणारी -

शिक्षीत निर्बुध्दांच्या बुद्धीला चालना देणारी
रक्ताची नाती जपतानाच
पर रक्ताच्या नात्यांची वीण
घट्ट वीणणारी -

ध्येय उराशी बाळगून बेडरपणे
झोपडपट्टीत रात्री बेरात्री घिरट्या घालणारी
आणि घारीच्या नजरेशी साम्य असणारी -

समाजातील ढोंगीपणाशी दोन हात करताना
तेच दोन हात न्याय न मिळालेल्या
कष्टकऱ्यांना उचलून घेत
त्यांच्या जीवनात दीपस्तंभ बनून
अंधारातून उजेडाकडे नेणारी -

अनेक मान सन्मान मिळून देखील
निगर्वी राहून आपल्या ध्येयाकडे
मार्गक्रमण करणारी -
निरनिराळे प्रयोग यशस्वी करत
आदर्शवत प्रयोग राबवणारी
जीवनातील वेगवेगळे नातेसंबंध जोपासत
सर्वांची आधारवड बनलेली
सर्वांनाच हवीहवीशी वाटणारी
साठ वर्षांची तरुणी कोण?
तर ती - मेधा

**अशोक पावशे**
**बेन्नाळी, बेळगाव**

# २९. मेधा: परखड तळमळ

**मे**धा, तुला षष्ठयब्दीपूर्तीच्या मन:पूर्वक शुभेच्छा. त्याचबरोबर उत्तम आरोग्याचे लेणे लाभावे ही सदिच्छा!

मेधा, तुझ्याबद्दल लिहावे असे खूप काही तुझ्या भरीव व डोळस समाजकार्यामुळे, तुझ्या सहकाऱ्यांना वाटत असेल. मी मात्र तुझ्या संपर्कात आल्यापासूनच तुझ्या परखड विचारांनी प्रभावित होते. मला फार जवळची मैत्रिण खूप वर्षांनी भेटल्यासारखेच वाटले. खरंतर आपली ओळख माझ्या लग्नानंतरची. माझा सहचर भावाच्या नात्याने तू व तुझ्या दोन बहिणींशी बांधलेला! मलाही त्याचे कौतुक होते. अधूनमधून आपल्या भेटीगाठी होत. पण खरी ओळख झाली ती ताई (प्रेमाताई पुरव) बरोबर मी अन्नपूर्णा महिला मंडळमध्ये काम करायला लागले तेव्हाच. तू त्या काळात बँकेत जॉब करीत होतीस.

नंतर ‘अन्नपूर्णाच्या’ कामाला तू पुण्यातून सुरुवात केली. त्याआधी अधूनमधून दादरला महिन्या-दोन महिन्यातून तू आमच्या मिटींग घेण्याकरीता येत होतीस. त्यावेळी सर्वांना समजून घेऊन निर्णय घेण्याने खूपच मार्ग सुकर झालेले आहेत.

तळागाळातल्या महिलांबरोबर काम करताना आपुलकी, प्रेम हवे. पण वेळ पडल्यास कठोरपणे काही निर्णय घेणे आवश्यक असते हे तुझ्यामुळेच आमच्या लक्षात आले. चोखपणे व प्रामाणिकपणे व्यवहार हाताळतांना जे समाधान मिळाले, ते तुझ्या मार्गदर्शनामुळेच, तुझ्या पाठिंब्यामुळेच, तुझ्यातील नेतृत्वगुण फार वाखाणण्यासारखे आहेत. अन्नपूर्णा परिवार एवढा मोठा करण्यासाठी व अन्नपूर्णा महिला मंडळाचे काम सावरुन नीटनटके करण्यासाठी मेहनत व कष्ट तू अपार केले आहेस. हे मी, बघितले आहे. त्यामुळेच

अन्नपूर्णा परिवार भक्कम पायावर उभा राहिला. आखीव रेखीव धोरणामुळेच तू हे साध्य करु शकलीस, हे मी जाणते. संस्थेत तू सर्वांनाच जी शिस्त लावलीस व कामाबद्दल आपुलकी निर्माण केलीस, त्यामुळे संपूर्ण अन्नपूर्णा परिवार यशाकडे वाटचाल करीत आहे. त्याच बरोबर वैयक्तिक आपुलकी तू जपली आहेस. त्यामुळे पुण्याहूनही तू प्रदीपदादाला शेवटच्या आजारापर्यंत भेटायला येत होतीस. आमच्या कुटुंबाशी आजही तू जिव्हाळ्याचे संबंध ठेवले आहेस.

मेधा तुझ्या ह्या वाटचालीला माझ्याकडून शुभेच्छा व तुला ही दिर्घायुष्य मिळावे ही सदिच्छा!

**प्रिती प्रदीप घरत**
**वहिनी, मुंबई**

# ३०. लाडुली मेधा

'**नातं**' सुखवणारं, हसवणारं, आनंदित करणारं, 'नातं' जन्माने मिळणारं, सहवासानं फुलवणारं, मैत्रित्वानं बहरणारं असच एक माझ्या आयुष्यातील 'नातं'! हृदयातून उमलून आलेलं! लहानपणाच्या लडिवाळ किनारीने लपेटलेलं! अजूनही विनासहवास व्यक्तिमत्वात भिनलेलं माझं आणि मेधाचं नातं!

सुरूवात अजाणत्या वयात झालेली, आयुष्यात अधिकार गाजवू शकेल असं गोंडसबाळ-मेधा. तिच्या अवती भवती माझं वावरणं! अन्नपूर्णा निवास हया आमच्या दोघींच्या समान निवास स्थानामुळे जवळ आलेल्या आम्ही दोघी. इतरांच्या दृष्टीने बहिणी कधी झालो कळलंच नाही. शाळेत जणू मेधा म्हणजे माझीच जबाबदारी! तिला वर्गात नेऊन सोडणे, मधल्या सुट्टीत तिने डबा खाल्ला आहे की नाही बघणे आणि तिचे ते लाघवी अवलंबित्व.

काही वर्षे इतरांनी हरकत घ्यावी, असं आमचं अद्वैत! जणू वहिनीच्या दोन मुली बरोबर सिनेमाला जाणे इ. मी ते ताईपण पुरेपूर उपभोगले. मेधाच्या दृष्टीने मी म्हणजे हुशार, सुंदर इ. कुणी मला नावे ठेवलेली तिला आवडत नसे व मी पण सुखावत असे.

अशी माझी छोटुकली, बघता बघता कधी मोठी झाली कळलंच नाही, छोट्याश्या रोपट्याचा महावृक्ष कधी झाला जाणवलंच नाही. ही छोटी इतक्या धडाडीने आई वडीलांच्या पावलावर पाऊल ठेऊन त्यापेक्षा उंच भरारी मारेल असं कधी मला वाटलंच नाही. स्वतःचं शांत, सुरक्षित आयुष्य मागे टाकून नवी नवी आव्हाने स्वीकारून ही छोटी खूप खूप उंचावर गेली, स्वतःच्या आसपासची, पूर्वायुष्याची नाती जपत तिने आपलं विश्व निर्माण केलं! पण तिच्या स्वभावानुसार ही

तर तिची सुरुवात आहे. अजून तिच्यासमोर अथांग क्षितीज तिची वाट पाहत आहे.

मेधा, तुझ्या आत्तापर्यंतच्या वाटचालीला लाख लाख सलाम! तुझ्या पाठीशी दादा-वहिनीचा आशीर्वाद, त्यांचे कार्य हयाचा खूप मोठा वारसा आहे. त्या काळात त्यांचे कार्य पाहून आम्ही अचंबित होत होतो. त्यांना अभिमान वाटेल असेच कार्य तुझ्याकडून घडत आहे. तुझ्या पुढील वाटचालीला तुझ्या अनुताईचे उदंड आशिर्वाद.

**अनुपमा देसाई**<br>
**बालमैत्रिण - बहिण**<br>
**रिटायर्ड प्राध्यापिका**<br>
**एस.एन.डी.टी.कॉलेज**

# ३१. लाडक्या बहिणीस पत्र!

**प्रिय मेधा,**

सर्वप्रथम तुला ६० व्या वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा!

हल्ली व्हॉट्स अप च्या जमान्यात पत्र लिहिणं होत नाही. पण ह्या खास वाढदिवसानिमित्त पत्रच लिहावंसं वाटलं. पूर्वी आपली पत्रा पत्री होत होती. पत्राची वाट बघणं, पत्र वाचणं एक वेगळाच आनंद होता!

तुम्ही मे महिन्याच्या सुट्टीत वराडला यायचात. तेव्हा तिथे वीज नव्हती. तू, विशू मुंबईत जन्मलेल्या, वाढलेल्या, पण विना तक्रार रहात होतात. अनेक आठवणी नजरेसमोर तरळल्या. त्यातील एक आठवण सांगते. विश्वासच्या मित्राने एक सुंदर, गोंडस ससा एके संध्याकाळी आणला. पांढरा शुभ्र, लाल डोळयांचा ससा! आपणा सर्वांना खूप आवडला.

रात्री नलू, मी, दिपीका, तू, विशू सर्व गाढ झोपेत होतो. अचानक कुणीतरी खोलीत शिरल्यामुळे पळापळ झाली. काळोखात काही कळेना. सर्वच आपण खूप घाबरलो होतो. नंतर समजलं तो ससा पिंजऱ्यांतून सुटून सर्वांच्या कुशीत शिरण्याचा प्रयत्न करत होता. तू मात्र माझ्या कुशीत शिरली होतीस. सकाळी आपण ते आठवून खूप हसलो.

ती साधी-भोळी, निरागस मेधा आज अन्नपूर्णाचा एवढा मोठा कारभार समर्थपणे सांभाळते आहे. वाढत गेलेली अन्नपूर्णा तू मला वारजे व वाशी दोन्ही ऑफीसेस फिरवून दाखवली आहेस. ते बघत असताना मन अभिमानाने भरुन आलं होतं.

तुला अनेक मान सन्मान मिळाले.अनेक पदके मिळाले. खूप ठिकाणी तुझा सत्कार झाला. खूप मोठी यादी आहे. तुझ्या यशाचे खरंच खूप कौतुक वाटते.

एव्हढी नावारूपाला येऊन सुद्धा तू तशीच साधी भोळी आहेस. वेळोवेळी तू सन्मानाचे फोटो, भाषणाचे व्हिडिओ पाठवून मला जो आनंद देतेस, तो खूप मोठा आहे. मी सर्वांना अभिमानाने तुझ्या बद्दल सांगत असते.

असेच मान-सन्मान मिळवत राहा. मावशी-दादा आणि दोन्ही कडच्या आजी आजोबां कडून तुला जो समाज-सेवेचा वारसा मिळाला आहे. तो असाच जप. ते तुझ्या रक्तातच आहे म्हणा!

माझ्या या लाडक्या बहिणीला, पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा! खूप आशिर्वाद.

**तुझी,**
**सौ.जयमाला आजगावकर**
**मावस बहिण**

# ३२. मेधा- माझी दयाळू बहिण

**मी** नलीनी भरत सामंत. माझा जन्म गोव्याच्या निसर्गरम्य अशा छोट्या खेडे गावात झाला. आई-वडिलांची परिस्थिती नाजूक होती. त्यामध्ये मी धरून आम्ही पाच भावंडे होतो. माझे जीवन अगदी बालपणापासून कष्टमय होते. त्यात थोडेफार समजण्यास सुरूवात झाली तोच बापाचे छत्र डोक्यावरून हरवले. आधीच नाजूक परिस्थिती, तर आभाळच कोसळले, आता तर दुःखाला पारावार उरला नाही.

कोणी कोणाकडे पाहावे, किती रडावे, हेच समजत नव्हते! आईच्या तर कष्टाला आता सीमाच राहिली नव्हती. ती फार मोठ्या संकटातून जात होती, आम्ही चिमुकले तिच्यासाठी काहीच करू शकत नव्हतो. एखाद्याचे बाप जाणे हे किती मोठे दुःख आहे, हे मी त्या बालवयातच अनुभवले. आम्ही पाचही भावंडे वयाने खूप लहान होतो. पुन्हा प्रश्न होता तो शिक्षणाचा, त्यात मामाने माझ्या शिक्षणाची जबाबदारी घेतली.

पाचवी पर्यंत शिक्षण मामाच्या गावी झाले. आणि मग मला परत माझ्या मूळगावी यावे लागले. आता पुढील शिक्षणाचा मोठा प्रश्न पुढे उभा राहिला. मला तर शिक्षणाची आवड निर्माण झाली होती. काहीही सुचत नव्हते, पुढे शिकणार? कसे, कोण शिकवणार अनेक प्रश्न........

पण एके दिवशी माझ्या आत्याचा निरोप आला. आत्याने चक्क मला शिक्षणासाठी मुंबईला बोलावले होते. माझा आनंद गगनात मावेना. मुंबई सारख्या शहरात जायचे? माझ्याकडे साधे कपडे घालण्यास नव्हते. मग चप्पल तर फार लांबचा विषय होता. माझी आत्या मुंबई सारख्या शहरामध्ये, दादर मध्ये राहत होती. तिच्या रूपामध्ये प्रत्यक्षात देवच भेटणार होता. आता मी खूप शिकणार, मी आता मोठी होऊन

काहीतरी करणार अशी आशा उराशी बाळगून आत्याच्या घरात प्रवेश केला.

आत्याच्या परिवारामध्ये आत्या (प्रेमाताई पुरव), बाबा (दादा पुरव) आणि त्यांच्या तीन मुली मेधा, विशाखा, पप्पू (माधवी) अशा सुंदर परिवारामध्ये मी येऊन समर्पित झाले. आत्या गजबजलेल्या मध्य-मुंबई दादर येथे राहत होती. सुरुवातीला मी मुंबईच्या ह्या वातावरणात अगदी घाबरुन गेले होते. सगळं काही नवीन होतं.

मात्र दादा फारच प्रेमळ स्वभावाचे होते. माझे बालपण मेधा, विशाखा ह्यांच्या सोबत जाऊ लागले. माझी संपूर्ण जबाबदारी आत्या आणि दादांनी घेतली होती. आपल्या तीन मुलींप्रमाणे मलाही वागविण्यात आले. दादा हे बँक ऑफ इंडियाचे युनियन लीडर होते, दादांच्या तोडीस- तोड म्हणून आत्या- प्रेमाताई पुरव ह्या सुद्धा सामाजिक क्षेत्रात काम करत होत्या. त्यामुळे सामाजिक तसेच काही पुढारी लोकांचे येणे-जाणे सुरू असे. अशा सामाजिक वातावरणामध्ये मेधाचे बालपण जात होते.

मी पाहिलेली मेधा लहानपणापासून फार हुशार होती. तिला वाचनाची प्रचंड आवड होती. तसेच तिचे शिक्षण मुंबई मध्ये नावाजलेल्या बालमोहन शाळेमध्ये पूर्ण झाले. पुढील शिक्षणाची आवड असल्यामुळे तिने स्टॅटीस्टीक्स मध्ये डिग्री पूर्ण केली. घरातील सामाजिक वातावरणाचे बाळकडू पिऊन, सतत पुस्तक वाचण्यात दंग असलेल्या मेधा ला पाहून मला फार तिच्याबद्दल कौतुक व कुतूहल वाटायचे की, ही आपल्या जीवनात फार बदल घडवेल. मेधाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगायचे म्हटले तर, ती फार प्रेमळ आहे. माझ्यावर ती खूप प्रेम करायची! अतिशय जिद्दी, प्रचंड वाचनाची आवड असलेली, आपल्याच विश्वात राहून भोवतालच्या परिस्थितीचा

अभ्यास करणारी,  तेजस्वी रूप घेऊन आलेली मेधा आपल्या जीवनात तेजोमय कार्य घडवेल, असे मला तेव्हाच वाटत होते.

माझे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर दादांनी माझ्या लग्नाची फार मोठी जबाबदारी घेतली. त्यांच्याकडे येणाऱ्या, बँकेत नोकरी करणाऱ्या भरत सामंत यांच्यासोबत माझे लग्न लावून दिले. सोन्याहून पिवळे केले! हे माझ्यासाठी अविस्मरणीय आहे.

त्यानंतर मेधा मोठी झाली. माझे मावस दिर जयंत सामंत यांच्या सोबत मेधाची मैत्री झाली. विदयार्थी चळवळीत ते दोघेही एकत्र आले. पुढे दोस्ती प्रेमात बदलून गेली. अतिशय देखणा व तेजस्वी असा युवक तिने शोधून काढला. आई-वडिलांच्या सहमतीने विवाह झाला. मेधा माझी आतेबहिण होतीच, मावस जाऊ सुद्धा झाली.

माझे पती भरत सामंत हे डाव्या चळवळीत होते. व त्यांचा मावसभाऊ जयंत सामंतही त्याच चळवळीत होता.

लग्नानंतर दोघांनीही आपल्या पुढील भविष्याची सुरुवात आधी काँग्रेस हाऊस, ग्रँटरोड व पुढे अंधेरी, लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथून केली. बँक ऑफ इंडियाची नोकरी सांभाळून, आपल्या संसाराचा गाडा संभाळत, अंधेरी ते चर्चगेट ट्रेन चा दीड+दीड तासांचा प्रवास करून मेधा संसारातल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत होती. असा सुखी संसाराचा आनंद घेत असताना दादांचा मृत्यू झाला. मेधाने व जयंतने आई व बहिणींना सावरले.

लवकरच मेधाने सुंदर अशा पुत्र रत्नाला जन्म दिला. सांसारिक जबाबदारी मध्ये आणखी जबाबदारी वाढली होती.

काही वर्षांनी पतीच्या व्यवसायानिमित्ताने मेधाला कायमस्वरूपी पुण्याला स्थलांतर करावे लागले. पुणे शहर तसे

मेधा साठी फार नविन होते. धावपळीच्या वातावरणातून पुणे शहरामध्ये स्थायिक होत जरा दूर निसर्गमय अशा कोथरूड मध्ये घर घेऊन आपल्या संसाराला सुरुवात केली. त्यानंतर लवकरच तिने बँक ऑफ इंडियाची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. ही मात्र फार अवघड गोष्ट होती.

एकीकडे नचिकेतचे बालपण, शिक्षण तर दुसरीकडे नविन कार्यास आरंभ केला. पुण्यामध्ये अनेक कष्टकरी महिलांशी संवाद साधून बँकेच्या नोकरीचा अनुभव गाठीशी बांधून, महिला सक्षमीकरणाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्णय १९९३ साली मेधाने घेतला. नऊ भाजी वाल्यांना घेऊन पहिले कर्ज वाटप करून श्रीगणेशा केला. भांडवल म्हणून पहिले पतीचे सहकार्य घेतले.

सावकारी कचाट्यातून अनेक महिलांना बाहेर काढताना मेधाला एखादा किल्ला सर केल्याचे समाधान मिळत होते. परिस्थितीशी झुंज देणाऱ्या महिलांना पुढे नेण्यासाठी ती रात्र-दिवस विचार करत होती. तिने अगदी सुरुवातीपासून आपल्या घराच्या जिन्याखाली छोट्याशा खोलीमध्ये अन्नपूर्णा चा श्रीगणेशा केला. दगडाची टेबल-खुर्ची बनवून आपल्या कार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. तिथून नंतर लुनावत कॉम्प्लेक्स मध्ये घर व घरातील ऑफिस हलवले.

अनेक अडचणीतून पुढे जात असताना ऑफिस मध्ये येणाऱ्या गरीब महिलांना पासून सोसायटी मधील लोकांना त्रास होऊ लागला. मेधाचे जे ध्येय होते, ती त्यांच्या साठी कटकट होती.

सोसायटीतील लोकांना समजावून सांगून त्यांच्या मानसिकते मध्ये बदल घडवणं अशक्य होते, म्हणून कर्वेनगर येथे डोंगर-वस्तीवर पहिली जागा घेतली. चार बाजूंनी

पत्र्याच्या भिंती पत्र्याचे छप्पर अशा जागी मेधाने अन्नपूर्णाचे कार्यालय थाटले.

हे सर्व कामकाजाचा बोजा पेलवत असतानाच मुंबई मध्ये प्रेमा ताईंनी (आई) विस्तारलेल्या दादर, वाशी, शिरवळ येथील महिला उदयोग तोटयात चालत होता. तसं आता प्रेमाताई यांचे वाढते वय, या जबाबदाऱ्या त्यांच्यासाठी अवघड होऊन बसल्या होत्या. पुन्हा मेधाने त्या कामकाजात लक्ष घातले. तिने पुन्हा एक मोठे आव्हान स्वीकारले, २००४ ते २००६ हा तो काळ होता.

मी इकडे माझ्या संसारात मग्न होते, मला त्या काळात काही आर्थिक अडचणीना तोंड द्यावे लागत होते. मला मेधाची अगदी मनोमन आठवण झाली. तिला जाऊन भेटावे, तिच्याशी बोलावे असे वाटू लागले. मी मनाशी निर्धार केला. दादर येथे ऑफिसवर जाऊन, मी माझे मन तिच्याशी गप्पा मारून मोकळे केले. मेधाने अगदी माझी सर्व अडचण मनापासून ऐकून घेतली. पहिले काम कँटीन मध्ये मला दिले. ती देवाला मानत नाही, पण माझ्यासाठी ती देवा पेक्षा वेगळी नाही. तिच्याकडे खूप थोर विचारांची जपणूक आहे. मेधाने मला दिलेल्या नोकरी मुळेच माझ्या संसाराची गाडी मी सावरू शकले.

मेधा, मी माझ्या संसाराची विस्कटलेली घडी पुन्हा नव्याने बसवली. आज माझ्या संसारातल्या प्रत्येक वस्तूवर तुझे नाव आहे. तू तुझ्या कार्यात एवढी गुंतून गेली असताना माझ्या संसाराचे जहाज तूच मनापासून वाचवले. तू मला कधीच परकं समजलं नाही. तू तुझ्या वेगवान आयुष्यामध्ये माझी नेहमीच आठवण ठेवत आलीस.

तू मला त्या कँटिंग पर्यंत मर्यादित न ठेवता मायक्रो फायनान्स मध्ये काम करण्याची संधी दिली. खरंच ह्यातील कुठलंच काम मला माहीत नव्हतं. तुझ्या भरवशावर

त्याही कामाचा मी मनापासून स्वीकार केला. जवळजवळ १५ वर्ष अन्नपूर्णा परिवारात काम केलं. मेधा तू दिलेल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या. फार मोठे समाधान मिळाले आणि तुझ्या एवढया मोठया कार्यात माझा खारीचा सहभाग सुद्धा घडला.

आपल्या संपूर्ण कुटुंबामध्ये तू अशी वेगवान विचारांची, जिद्दी, कष्टाळू, प्रेरणादायी, आत्मविश्वास निर्माण करणारी आणि प्रेमळ अशी एक धडाडीची कार्यकर्ती निघालीस.

हे लिहित असताना तुझ्याबद्दल मन मोकळे करत असताना डोळ्यातून अश्रू येत आहे. पण हे दुःख नाही, हेच तुझ्याबद्दल चे प्रेम आहे. तू आजपर्यंतच्या केलेल्या कार्याला मनापासून मानाचा मुजरा. तुझ्या वाढदिवसानिमित्त मला बोलण्याची संधी दिली, मी तुझ्या साठी कितीही लिहिले तरी शब्द अपुरे पडतील. माझ्यासाठी फक्त नाही, तर अशा अनेकांच्या पाठीशी तू उभी खंबीरपणे उभी आहे.

मेधा तू अशीच पुढे जात राहा. तुझ्यावर प्रेम करणारी माणसे तू मोजू शकणार नाहीस. तुझ्या बँक खात्यामध्ये माझे आणि माझ्यासारखे अनेकांचे प्रेम डिपॉझिट होईल, कारण तुझ्या ह्या महान कार्याला मर्यादा नाही, तुझ्या ह्या उंच भरारी ला माझ्याकडून आणि माझ्या परिवाराकडून खूप खूप शुभेच्छा!

**नलिनी भरत सामंत**

**मामेबहिण,जाऊ व**

**रिटायर्ड अन्नपूर्णा स्टाफ**

# ३३. मेधाने आमच्या अन्नपूर्णाचा 'परिवार' केला

**मी** अकोल्याला रहात असल्यामुळे मेधाचं बालपण तेवढं जवळून पहाता आले नाही.

मी १९६८ मध्ये मुंबईस आलो तेव्हा मेधा ८-९ वर्षाची असेल आणि ती बालमोहन शाळेत शिकत होती. शाळा घराजवळ असल्यामुळे ती चालत शाळेत जात असे. तेव्हा ती जरा बुजरी होती. उन्हाळ्याच्या सुट्टीत ती प्रभादेवीला आमच्याकडे रहायला येत असे, तेव्हा सोसायटीतल्या मुला-मुलींबरोबर रात्री सोसायटीच्या गार्डनमध्ये गाणी गोष्टीचा फड बसत असे, त्यात ती दिपाली आणि परेश बरोबर उत्साहाने भाग घेत असे. समोरच्या गल्लीमध्ये कधी कधी सिनेमा दाखवत असत, तो पहाण्यासाठी दिपाली, परेश आणि ती किचनच्या प्लॅटफॉर्मवर बसून जागून  तो सिनेमा पण पहात असत.

आमच्याकडे दिवाळीचा एक दिवस आम्ही सर्व बहीण भाऊ आणि त्यांचे कुटुंबिय एकत्र येत असतो. त्यावेळी घरातील सर्व मुलांच्या हातात सूत्रं असत, व तेव्हा सर्वात मोठी म्हणून मेधाच्या लीडरशीपची चुणूक दिसत असे. प्रा. श्री नेरूरकरांबरोबर तात्विक वाद प्रतिवादामध्ये ती हिरीरीने भाग घेत असे. आई आणि बाबा दोघांच्याही नातेवाईकांकडे ती आवर्जून जात असे.

एस.एस.सी. झाल्यावर तिने राम नारायण रूईया कॉलेजला आर्टससाठी प्रवेश घेतला. तिने अभ्यास करून, स्टॅटिस्टीक्स मध्ये बी.ए. ची डीग्री घेतली. शिकत असताना तिची जयंतबरोबर मैत्री झाली आणि त्यांचा पुढे विवाह झाला.

ग्रॅज्युएट झाल्याबरोबर तिने परिक्षा देऊन बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी स्वीकारली. त्या काळात ती युनियनच्या कारभारात भाग घेत असे. तिचं लग्न लवकरच म्हणजे

२१ व्या वर्षी झाले. लग्नानंतर ती गृहिणीचा ही रोल मनापासून करत होती.

आई आणि बाबा दोघेही कार्यकर्ते असल्यामुळे यांच्या घरी सारख्या येणाऱ्या जाणाऱ्यांचा राबता असे. त्यामुळे सामाजिक कार्याचे धडे तिला घरातूनच मिळत होते.

मेधाच्या आयुष्याला खरी कलाटणी पुण्याला आल्यावर मिळाली. तिथे तिला तिच्या कार्याची दिशा आणि मार्ग सापडला. मेधा मुंबईत वाढल्यामुळे तिला दुचाकीचा सराव नव्हता. पण पुण्यामध्ये त्याशिवाय तरणोपाय नव्हते पण तेव्हा मोपेड पासून सुरूवात करून ती पुण्यामध्ये सराईत पणे स्कूटर चालवू लागली. तिने अंगीकारलेल्या कामासाठी तिने कर्वे इन्स्टिटच्युटमध्ये शिक्षण घेऊन डॉक्टरेट ही मिळवली. आज ज्या मायक्रो फायनान्समध्ये जे प्रविण्य मिळवले त्याचा पाया तिने घातला.

अन्नपूर्णा हया नावाला आमच्या आयुष्यांत अनन्य महत्व आहे. आम्ही दादरला ज्या घरात रहायचो ते अन्नपूर्णा निवास. माझ्या आईचं नांव अन्नपूर्णा. प्रेमाताईंनी महिलांच्या सबलीकरणाची चळवळ चालू केली, त्याचं नाव ‘‘अन्नपूर्णा महिला मंडळ’’ आणि मेधाने त्याचा अन्नपूर्णा परिवार केला.

**मधुकर शांताराम पुरव**
**काका**

# ३४. आमची हळवी मेधा

**ज**यंतदादाचा फोन आला व तो सांगत होता की, ‘‘अरे १३ एप्रिल मेधाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत तर तू तिच्या बद्दल लिही.’’

‘‘मेधा आणि ६० वर्ष?’’ मला एकदम आश्चर्य वाटले. मग मी एकदम भूतकाळात गेलो आणि मला मेधा आणि जयंतदादाच्या लग्नाचा दिवस आठवतो. त्यादिवशी आम्ही सर्व खूष होतो. कारण आम्ही मोठे झाल्यानंतरचे माझ्या आजोळचे पुरव फॅमिली मधले ते पहिले लग्न होते. लग्न समारंभानंतर जेव्हा मेधा जयंतदादाच्या घरी जायला निघाली तेंव्हा ती सारखी रडत होती. मला अजूनही आठवते, त्या वेळी मेधा गाडीत बसून रडत होती. आम्ही सर्व भावंडं तिच्या गाडीच्या बाहेर उभे होतो आणि आत मेधा रडत होती. तेव्हा ती आम्हाला बोलली की,‘‘दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर तिला जयंतदादाच्या घरून दादा मामाकडे घेऊन या.’’

सगळ्यात मजा तर पुढे आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी ७.०० वाजता आम्ही सर्व भावंडं मामाकडे गेलो व दाराची बेल वाजवली, तेव्हा दादा मामा ने दरवाजा उघडला व आम्हाला बघितल्यावर विचारले, ‘‘एवढ्या सकाळी?’’ आम्ही सर्व भावंडं बोललो. ‘‘अरे मेधा काल रडत होती व तिने आम्हाला सांगितले की, तिला न्यायला सकाळी लवकर या’’ हया बोलण्यावर मामा जोरात हसला व म्हणाला, ‘‘या बसा’’ मग आम्ही ११-११.३० वाजता जयंतदादाच्या घरी गेलो. त्यावेळी मेधा छान नटून थटून हसत बसली होती.

मेधा बँक ऑफ इंडियामध्ये नोकरीला लागली. बँकेतील स्त्रियांचे प्रश्न ती यशस्वी पणे हाताळत होती. जयंत दादा मुंबईची नोकरी सोडून पुण्याला गेला. मेधा पण मुंबई बँक ऑफ इंडियातून पुणे बँक ऑफ इंडियाला गेली. काही

वर्षांनी मेधाने बँक ऑफ इंडियामधील नोकरी सोडून अन्नपूर्णा परिवाराची स्थापना केली. मामीने स्थापन केलेल्या अन्नपूर्णा महिला मंडळाचे काम समर्थपणे पेलले. तिने समाज सेवेमध्ये मास्टर्स व नंतर पी. एच. डी. ही पदवी देखील मिळवली. आज पुण्यात अन्नपूर्णा परिवाराची स्वतंत्र इमारत आहे. मेधाचे वेळोवेळी जगभरातील विविध नेत्यांबरोबर कामानिमित्त भेटल्यानंतरचे फोटो, तिला मिळालेले असंख्य पुरस्कार हे सर्व तिच्या अफाट कार्याची साक्ष देतात. ६० व्या वर्षात पदार्पण करून देखील अजूनही तिची ह्या क्षेत्रातील घोडदौड तेवढ्याच तडफेने चालू आहे.

सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने आदराचे स्थान मिळवलेल्या मेधाने नातेवाईक व मित्रमंडळी त्याच्यासाठी आवर्जून वेळ काढून त्यांच्या मनातही प्रेमाचे स्थान निर्माण केले आहे.

खर सांगायचे तर वरकरणी दिसणाऱ्या कणखर मेधातली हळवी मेधा तिने जीवापाड जपली आहे. अशा ह्या मेधास आम्हा सर्वांतर्फे वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!

**सुनील, मेधा पाठारे**

**आतेभाऊ ,वहिनी**

# ३५. वहिनी नाही मैत्रिण

आज आमुच्या मेधाची पूर्ण झाली साठी
आणि उलगडल्या मनातील आठवणीच्या गाठी

आली सामंतांच्या घरात बनुनी ती सून
पण सुनेची झाली लेक केंव्हा, हे नाही आले कळून

प्रेमळ वागणुकीने आणि जिव्हाळ्याने
ती झाली लाडकी मामी भाच्यांची
आणि झाली आमुची मैत्रिण वहिनीहून

संसार व नातीगोती सांभाळून सावरला
अन्नपूर्णाचा डोलारा भक्कम
मी काय करू तिच्या कार्याचे वर्णन
जे जाणून आहात तुम्ही सर्व सूज्ञ
हं एकच सांगते
पुन्हा आपण सर्व भेटू दहा वर्षांनी
असेच साजरी करू या
आमुच्या मेधाचा सत्तरीचा उत्सव

**अपर्णा परुळेकर आणि**

**लीना नाईक**

**नणंद व नणंदेची मैत्रिण**

# ३६. माझी बहिण मेधा

**ट्रिंक** ट्रिंक फोन वाजतो, आवाज येतो, 'मी मेधा बोलतीये'! एक आपुलकीचा आवाज की आपण अटेन्ड करतोच. ''नंतर बोलतो'' म्हणू शकत नाही.

मी मेधासारखा साहित्यिक नाही पण वाटतं

| | | |
|---|---|---|
| **M** | **-** | **Morality** |
| **E** | **-** | **Etiquettes** |
| **D** | **-** | **Devoted** |
| **H** | **-** | **Honest** |
| **A** | **-** | **Affectionate** |

एक मोठा भाऊ म्हणून मी तिच्या जीवनातले सगळे चढउतार जवळून पाहिलेत. ना यशाची धुंद, ना अपयशाचे रडगाणे! मेधाचा नवरा जयंत व माझी बायको झरीणा उर्फ अपर्णा हे सख्खे भाऊ बहिण. मी आणि मेधा दूरचे भाऊ बहिण. पण आमचे नाते पक्के आहे.

अगदी चिमुकल्यांपासून ते वयोवृद्ध माणसांची विचारपूस करणारी व प्रत्येकाला मदत करणारी माणसं आजकाल दुर्मिळ होत चाललीय. सौ. मेधा त्याला अपवाद आहे. लहान मुलांना नेपोलियनची गोष्ट सांगून ॲम्बीशस करणारी व मुलांत समरस होणारी मेधाच असते. संकटसमयी सर्वतोपरी मदत करणारी, प्रसंगी स्वतःची अडचण बाजूला ठेवणारी मेधाच असते.

कुटुंब म्हटले की, वाद-विवाद होतातच पण नाती कशी टिकवावी ते तिच्याकडूनच शिकावे. प्रामाणिकपणे सांगायचे

म्हणजे माझ्या अडचणींत माझ्या पत्नीबरोबरच मेधाने पण मला खूप सपोर्ट केला.

माझी एक महत्त्वकांक्षा होती की, जुने घर रिडेव्हलप करून टॉवर करायचा. मेधाने मला खूप सपोर्ट केलाय. माझ्या आयुष्यातील एक जवळची व्यक्ती मेधाच आहे. माझे मन मी नेहमीच तिच्याकडे मोकळे करतो.

पण एक गडबड ती करते. तिच्या घरी जेवणास गेलं तर प्रत्येक माणसासाठी त्याच्या आवडीचे पदार्थ करते व ते बघूनच पोट भरते.

आपण सर्व सामाजिक संस्थांवर निष्कारण कमेंटस करतो व दोष काढतो. पण बँक ऑफ इंडियातली नोकरी सोडून 'अन्नपूर्णा' संस्था हिने विस्तारली. अर्थात या हिच्या कार्यात तिचे पती श्री. जयंत सामंत व चिरंजीव नचिकेत सामंत यांचे पण योगदान आहे.

मेधा देव मानत नाही. पण आरत्या तिला पाठ आहेत. मी देवावर श्रद्धा ठेवतो. म्हणून प्रार्थना करतो की, तिला उदंड आयुष्य दे व देशातला सर्वोच्च बहुमान तिला मिळू दे. लाँग लीव्ह मेधा !

**अभय परुळेकर**
**भाऊ**

# ३७. प्रोफेशनल नातेवाईक मेधा

**डॉ.** सौ. मेधा सामंत यांना २०२० चा साहित्य संमेलनात रमाबाई आंबेडकर पुरस्कार प्रदान बातमी, जिव्हाळ्याची व कौतुकाची.

तसे सौ. मेधाला बरेच पुरस्कार मिळालेत. मी तिला गेली अनेक वर्षे जवळून पाहतोच. प्रथम ती श्रीमती प्रेमा पुरव यांची कन्या म्हणून ओळखली जायची. पुढे तिने स्वतःचे स्थान निर्माण केले.

फार कमी व्यक्ती पुरस्कारासाठी काम करत नाहीत, मेधा त्यातलीच एक! संपूर्ण जीवन तिने अन्नपूर्णाला वाहिले आहे.

नातेवाईकांच्या अडचणीच्या वेळी खंबीरपणे उभी राहून तरी परत त्यांचा स्वाभिमान जपणारी म्हणजेच मेधा. माझा इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय आहे. मी एक जवळचा नातेवाईक आहे. परंतु अन्नपूर्णाची इलेक्ट्रीकल कामे करताना तिच्या दृष्टीने मी पण फक्त कॉन्ट्रॅक्टर असतो. सगळे नियम पाळण्यात ती पर्टीक्युलर आहे.

या २०२० ला १३ एप्रिलला ती ६० वर्ष पूर्ण करत आहे. तिला माझ्या शुभेच्छा व दीर्घायुष्याचा आशिर्वाद.

**कुंजा कोचरेकर**
**नातेवाईक**

## ३८. जाऊ माझी प्रेमाची

वर्ष तर हे २०+ २०
म्हणजे ४० च
तू कशी काय मग ६० ची ग?
कुणीतरी सांगा हो तिला
ती मोजलेली वर्षे ठेव बाजूला ग!

प्रथम नजरेत भरलीस तू
'बत्तीस वर्षापूर्वी'
अजून ही त्या नजरेत तू
तशीच ग!

सुखात आनंदात आठवावी छबी तुझी
एका तुझ्या हास्याकडे नजर माझी नेहमी
जगाच्या नकाशातील ती भरारी तुझी
ऊर भरून माझा टाकी!

छोट्या छोट्या आमच्या आनंदात तू
आणि मोठ्या मोठ्या नकाशात ही तू
निर्मळ धो धो वाहणारं ते तुझं हसू
नको थांबवूस कधी, नाहीतर मी
तुझ्यावर रुसू!

मुक्त हसू ओठांवरी, स्निग्ध नजर सर्वांवरी
कधी इतकी निकटची झालीस कसं सांगू
तुला मी!

**सुषमा खानोलकर**
**मावस जाऊ**

# ३९. आमचा दीपस्तंभ

**का**ही व्यक्तींचा कधीही न पुसला जाणारा ठसा आपल्या जीवनावर उमटून जातो. अशांपैकी एक म्हणजे आमची मेधाताई. तिच्या सहवासात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे हेच मत असेल.

कार्यतत्पर, वक्तशीर, विनम्र आणि हजर जबाबी व्यक्तीमत्व. कोणत्याही अडचणींनी न डगमगता मार्ग काढण्याचा तिचा स्वभाव. हाती घेतलेले काम धडाडीने आणि उत्कृष्टरित्या पार पाडण्याची तिची सवय. या सर्व गुणांमुळेच बालपणीची एक संवेदनशील मुलगी ते आजची एक उत्कृष्ट सामाजिक उद्योजिका हा तिचा जीवनप्रवास खंबीरपणे पार पाडत आहे.

अन्नपूर्णा परिवाराचा वटवृक्ष सांभाळत असताना एक उत्तम गृहिणी, सुविद्य पत्नी, प्रेमळ आई आणि महत्त्वाचे म्हणजे एक आधुनिक आणि उत्साही आजी या सर्व भूमिका समर्थपणे निभावत आहे. आमच्या परिवाराच्या कुठल्याही सुखदु:खाच्या प्रसंगी  मेधा ताई पुण्याहून मुंबईला प्रयत्नपूर्वक उपस्थित राहते. सासर आणि माहेरच्या प्रत्येक व्यक्तीबद्दल अत्यंत आस्था आहे. लहानमोठ्यांचे कौतुक आणि शाबासकी तिच्याकडून नेहमीच असते. वडीलधाऱ्यांची नुसती चौकशीच नाही तर त्यांना जमेल तसा वेळही देते. मुंबईला असणाऱ्या काका-काकींना चार दिवसांसाठी पुण्यालाही घेऊन जाते. तिची माणसांना जोडून ठेवण्याची तळमळ सतत जाणवते. नाते कुठलेही असो, व्यक्तीमधले संबंध हे जिव्हाळा, प्रेम आणि आपुलकीच्या पायावर उभे असतात. हे मेधाताई नेहमीच आपल्या कृतीमधून दाखवित असते.

जीवनात कोणतीही गोष्ट ती मन:पूर्वक करत असते. एखाद्या कामासाठी लागणारी पूर्वतयारी ते काम उत्तमरित्या

पूर्ण करण्यासाठी लागणारी मेहनत आणि धडाडी तिच्या जवळ लहानपणापासूनच आहे. तिने कर्तव्यदक्ष बँक अधिकारी म्हणून बारा वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर अन्नपूर्णा परिवाराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचे धाडस केले. वाचनप्रिय, आणि अभ्यासूवृत्ती यामुळेच तिने चाळीशीनंतरही पी.एच.डी. पूर्ण केली.

अन्नपूर्णा परिवारांचे मेधाताईने उभारलेले आणि विस्तारलेले कार्य हे तिच्या अथांग संवेदनशीलतेचे योग्य उदाहरण आहे. कष्टकरी महिलांच्या बद्दल सहानुभूतीच नाही तर त्यांना अशाप्रकारे मदत उपलब्ध करून देत आहे की या महिलांना स्वतंत्रपणे आणि चांगले आयुष्य जगता यावे. हे करत असताना वेळोवेळी त्यांच्या अडचणी ओळखून, मेधाताईने अन्नपूर्णाच्या प्रकल्पांद्वारे बालसंगोपन ते अगदी पेन्शन योजनांपर्यंत अशा वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मेधाताईंची इतरांच्या अडचणी समजून घेण्याची क्षमता प्रत्ययाला येते.

एवढेच नाही तर मेधा ताईने प्रशिक्षित केलेला चारशेहून अधिक कर्मचारी वर्ग आज अत्यंत चोखपणे अन्नपूर्णाचा कार्यभार सांभाळत आहे. इतक्या स्त्रिया आणि तरूण मुलींमध्ये महिला सक्षमीकरणा बद्दलची तळमळ मेधाताईने रूजवली आहे. यावरून तिची स्वत:बरोबर इतरांनाही संधी देण्याची, त्यांना पुढे घेऊन जाण्याची मानसिकता दिसून येते.

मेधाताईचा सगळ्यात महत्त्वाचा गुण म्हणजे लहानांपासून ते थोरामोठ्यांना सामावून घेण्याची तिची वृत्ती. यांचेच एक उदाहरण म्हणजे आज अन्नपूर्णाच्या विश्वस्त मंडळावर अनेक ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्ती कार्यरत आहेत आणि बहुमोल मार्गदर्शन करत आहेत. व्यक्तीच नाही तर तिची कुठल्याही परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमताही उल्लेखनीय आहे.

दादाकाका आणि प्रेमाकाकी कडून एकता, बंधुता आणि समानता हे संस्कार मेधाताईच्या मनावर लहानपणापासूनच झाले आहेत. ते तिने सदोदित आचरणात आणले आहेत. हे सगळे करत असताना जयंत दादांसारख्या सुजाण पतिकडून मिळणारे प्रोत्साहन, कलात्मक आणि विचारशील पुत्र नचिकेत आणि सून डॉ. चैत्रा यांची साथ मेधाताईला सतत लाभत आहे. सत्याला सत्य म्हणण्याचा निर्भीडपणा, विचार मांडण्याचे शब्दसामर्थ्य, सभाधीटपणा आणि हजरजबाबीपणा या चारही गोष्टींचा सुंदर मिलाप मेधाताईकडे आहे.

मेधाताईंच्या गुणकौशल्यांमुळे आणि तिच्या उत्त्तुंग कार्यामुळे अन्नपूर्णा परिवारच नाही तर पुरव आणि सामंत या दोन्ही परिवारांची ती एक दीपस्तंभ आहे. प्रत्येक वर्षी नवे क्षितीज शोधणारे तिचे व्यक्तिमत्व हे आमच्या सर्व पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

अशा या अफाट उत्साही व्यक्तिमत्वाला षष्ट्यब्दीपूर्तीच्या हार्दिक शुभेच्छा!!!

**शिरीषा पुरव**

**वहिनी**

# ४०. आठवणीतील मामी

**वि**चार केला.......''लिहून आठवणी व्यक्त करता येतील का?''

लगेच उत्तर आले,''नाही!!''

कठीण असतेना,,,,,

सगळ्या आठवणी लिहून काढायच्या म्हटलं तर ,,,,, अशक्य नाही,

पण .... सुरुवात कुठून करू?

पटकन आठवलं, माझ्या लहानपणीचा एक किस्सा !!!! मी ७- ८ वर्षाची!

खरं तर हा किस्सा खूप महत्त्वाचा आहे.....

''केस कापायला घेऊन जातो'' सांगून मामा मला ग्रँट रोड वरून दादर ला घेऊन गेला, ते थेट मामी कडे. जणू त्याला निमित्तच हवं होतं, मामीला भेटण्यासाठी. केस कापून घरी आले,''आईने विचारले ''किती छान कापले केस, कुठे घेऊन गेला होता गं मामा?'' मी अगदी तत्परतेने, न वेळ दवडता ''मामीकडे''...

घरात स्मशान शांतता.....

मामाऽऽऽऽ, कदाचित बुचकळ्यात .....

बाकी घरातले प्रश्नचिन्ह घेऊन एकमेकांकडे बघत.......

मी मात्र पहिल्यांदा खाल्लेल्या 'Jelly' ह्या नवीन पदार्थाबद्दल कौतुक सांगण्याच्या प्रयत्नात, पण कोणी ऐकेल तर खरं..... झालं, मामाला हवी असलेली संधी मिळाली, आणि मामीच्या अस्तित्वाची बातमी सर्वांना कळली. आणि मामा मामीच्या लग्नाआधीच मी मामीच्या घरी जाऊन राहू लागले. लहान पणी

मला गोष्टी ऐकायला खूप आवडायचं, मामी ही एकमेव, जी न कंटाळा करता मला एका मागून एक गोष्ट सांगायची. गोष्टी ऐकून मी दमायची नाही, पण मामी बहुतेक पेंगायची, त्यावेळी गोष्टीमध्ये ''Statistics चे Formula'' कधी आणि कुठून यायचे हे मला कळायचं नाही.
गोष्ट सांगता सांगता मामी झोपायची, आणि एखाद्या राजकुमारा ऐवजी राक्षस रुपी Statistics चे Formula ची एन्ट्री व्हायची.

आजही तो दिवस आठवतो, मामा मामीच्या लग्नानंतर झालेला मामीचा पहिला पगार! मामीने आम्हा तिन्ही भावंडांसाठी जादूचे खेळ गिफ्ट म्हणून आणले.

मामी, माझ्याकडे अजूनही त्यातले Pink coins आहेत.

आता ही मनचक्षूना खूप स्पष्ट दिसतंय, काँग्रेस हाऊसच्या आजोळच्या गॅलरीमधील लाकडी बाकावर प्रसाद, मी आणि चेतन बसलोय आणि मामी तिच्या बॅग मधून गिफ्ट काढून आम्हाला देत आहे. रंग बदलणाऱ्या पिसांची जादू प्रसादसाठी, पत्त्यांची जादू चेतनसाठी आणि माझ्यासाठी Pink coins.

मामी 'Wren and Martin' घेऊन आम्हाला 'Article, Vowels,' वगैरे शिकवताना ही दिसतीये.

मामी म्हणजे 'One complete package!'

- घरी वेगवेगळे रुचकर पदार्थ बनवणारी
- ब्लाऊज वरती नक्षीकाम, भरत काम करणारी
- चायनिज रेसिपी सगळ्यांना करता यावी म्हणून मराठीत translate करून आम्हाला सगळयांना झेरॉक्स देणारी

- जुन्या Gent's trousers रूपांतर स्कर्टमध्ये करणारी
- घरात असलेल्या तांदळाच्या पिंपाला एखादी साडी नेसवून कॉर्नरपीस बनवणारी
- किंवा गेरू लावून वारली पेंटिंगची सुरेख वॉलपीस बनवणारी

अशा खूप काही कलांनी निपुण असणाऱ्या मामीला मी तिच्या तरुण वयातच सासू आणि आजी केलं.

हिला 'Multi Task Woman' म्हटलं तर तेही तिची व्यक्तिरेखा सांगण्यास कमीच पडेल.

शब्दात व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना शब्दच अपुरे पडायला लागले! असा हा स्मरणात असणाऱ्या मामीची फक्त झलक तुमच्या पुढे ठेवण्याचा एक प्रयत्न.

**प्रविणा सबनिस**

**भाची**

# ४१. मेधाताई : कार्यकर्त्यांचा दीपस्तंभ!

**डॉ**. मेधाताईच्या साठाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा. या निमित्ताने लिहिताना गेल्या वीस वर्षांतील काळ सरकन आठवून जातो.

मी बँकेत ए.आय.बी.ई.ए. या कर्मचारी संघटनेचा एक सक्रिय कार्यकर्ता असल्यापासूनच मेधाताईंना ओळखतो. १९८८-९० मध्ये ताईंना आम्ही ए.आय.बी.ई.ए. च्या राष्ट्रीय पुढारी म्हणून पहात होतो.

पुढे त्यांनी बँकेतील नोकरी सोडून देऊन १९९३-९४ मध्ये अन्नपूर्णा चे काम पुण्यात सुरू केले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय महिला कोषच्या नोडल अधिकारी म्हणून काम पाहिले, तेव्हा आमची भेट पुन्हा झाली. महाराष्ट्रात बचत गटात काम करणाऱ्या संस्था व संघटनासाठी शिरवळ येथे एक आठवड्यांचे प्रशिक्षण मेधाताईंनी आयोजित केले होते. त्यासाठी महाराष्ट्रातील तीस एक संस्था व संघटनाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मी व विनया ''बी. जी. व्ही. एस.'' चे कार्यकर्ते म्हणून सहभागी होतो. त्यावेळी बीड येथे आम्ही नुकतेच बचत गट स्थापन करायला सुरूवात केलेली होती.

प्रशिक्षण शिबीरात आम्ही बरेच काही शिकलो. त्यानंतर २००४-०५ मध्ये मेधाताईंना बीडला निमंत्रित केले. त्यांनी गटांना व गावांना भेटी दिल्यानंतर सांगितले की, खूपच प्राथमिक स्वरूपात काम सुरू आहे. खूप सुधारणेची गरज आहे.

नंतर आम्ही उस्मानाबाद येथे मेधाताई, लोपाताई याच्यासह उस्मानाबाद, लातूर व बीड मधील कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे पॅक्स अंतर्गत एक सक्षमीकरण व क्षमता बांधणीचा प्रकल्प लिहीला. या स्वरूपाचे काम आम्ही चळवळीतील लोक

प्रथमच करीत होतो. यावेळी आम्हाला प्रचीती आली ती मेधाताईंच्या अभ्यास, आकलन व मराठवाड्यात काम करण्याच्या तळमळीची. मेधाताई नेहमी म्हणत,''अन्नपूर्णाच्या कामाची मराठवाड्यात खूप गरज आहे.''

या प्रकल्प लिखाणानंतर सुमारे वर्षभर काही झाले नाही.पण सप्टेंबर २००६ मध्ये लातूर व बीड मध्ये Poorest Area Civil Society प्रकल्पाला सुरवात झाली. १५-१५ गावातून ४५-४५ बचत गट बनविणे व महिला उद्योजकता, कौशल्य विकास व सक्षमीकरण असे स्वरूप या प्रकल्पाचे होते. अन्नपूर्णा नोडल एजन्सी मार्फत आम्ही समता प्रतिष्ठाण ह्या ट्रस्टखाली बीड मध्ये व लातूरमध्ये कामास सुरूवात केली. या अठरा महिन्यांच्या कालावधीत मेधाताईशी एक घनिष्ठ जिव्हाळा निर्माण झाला. त्याला कारणं पण तशीच आहेत.

हे काम सुरू केल्यानंतर बीड मधील डाव्या चळवळीतील व बी. जी. व्ही. एस. मधील सहकारी मित्रांनी आमच्या या कामाला खूपच विरोध केला. विदेशी अनुदान घेऊ नये हे या विरोधाचे मुख्य कारण होते.

मेधाताईंचा खंबीरपणा व पाठीवर थाप मारून प्रोत्साहित करण्याची भूमिका खूप काही शिकवून गेली. चळवळीतील काही कार्यकर्त्यांच्या बेगडी विरोधाला न जुमानता आम्ही काम करू शकलो, त्या मागचा खरा भक्कम पाठिंबा मेधाताईच होत्या. आमच्या कामावर होत असलेल्या चुकीच्या आरोपांचे विविध पातळीवर मेधाताई योग्य त्या त्या ठिकाणी केलेले खंडन यातूनच समता प्रतिष्ठाण उभी राहू शकली हे आम्ही नम्रपणे मान्य करतो.

या दीड वर्षात दर तिमाही आढावा बैठकीत मेधाताई बीड व लातूरला आवर्जून उपस्थित राहात. कामाचे मूल्यमापन करीत. योग्य त्या सूचना देत. पहिल्या बैठकीत आम्ही कामाचे

प्रेझेंटेशन केल्यानंतर एक कार्यकर्ता जेवणाच्या सुट्टीत म्हणाला, ‘खूप छान प्रेझेंटेशन होतं,’ त्यावर मेधाताई लगेच म्हणाल्या, ‘‘त्याचं काम चांगलं आहे, म्हणून प्रेझेंटेशन चांगले झाले.’’

चांगल्या कामाचं कौतुक व ते अजून चांगले कसे होईल याचा ध्यास मेधाताईंचा नेहमी असायचा. यासाठी प्रत्येक स्तरावर वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा व शिस्त आम्ही मेधाताई मुळेच शिकू शकलो हे प्रांजळपणे, कबूल करतो.

चळवळीतील कार्यकर्ते म्हणजे एक सर्वव्यापी दोष आढळून येतो, तो म्हणजे हिशोब न ठेवणे, व्हाऊचर व सपोर्टिंग बिल नसणे. कारण आपल्याला एक अहंगंड असतो,‘‘आपण प्रामाणिक आहोत मग काय करायचं या नसत्या खरडेघाशा....’’

पण मेधाताई चे मार्गदर्शन व या प्रकल्पातून समता प्रतिष्ठाण ने नेमकी ही शिस्त आत्मसात केली व आजही जपलेली आहे. याचं संपूर्ण श्रेय मेधाताईना जाते.

फक्त नियोजन व आढावा असे स्वरूप न ठेवता मेधाताई गावांना व गटांना भेटी देत ... गावांची, गटांची व प्रमुख महिला सभासदांची नावे मेधाताईना लक्षात राहतात याचं खरंच नवल वाटत असे.

पॅक्स प्रकल्प संपल्यानंतर आम्ही समता बचत गट महासंघा व्दारे सूक्ष्म वित्त चे काम सुरूच ठेवले. पण यासाठी कर्जाची मोठी गरज होती. बिना रजिस्टर्ड महासंघाला कोण कर्ज देणार? बँक मदत मिळणे शक्य नव्हते.... अशा वेळी अन्नपूर्णा ने स्वत: फ्रेंचायसी योजना सुरू करून समताला कर्ज देण्याला सुरूवात केली. समताला पुढील सहा महिन्यात सहकारी संस्था म्हणून नोंदणी करावयास सांगितले. त्यासाठी मेधाताईंनी स्वतः मा. संजय भोसले सरांना सांगून बीडच्या जिल्हा निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे शिफारस केली.....

सूक्ष्म वित्त चे काम इतक्या सूक्ष्मतम पातळी वर जाऊन मेधाताई करीत, त्यामुळे आम्हाला सतत उर्जा व उत्साह मिळत राही.

समताने २००७ ते २०१३ या कालावधीत अन्नपूर्णा मार्फत ११ कोटीचे कर्ज घेतले व ते पूर्ण परतही केले आहे. यातून समताने बचतगटांचे जाळे उभे केले आहे.

‘‘कोणतीही संस्था स्वयंनिर्भर असावी’’असे मेधाताई नेहमी सांगत ... अन्नपूर्णा सोबतच, बँकेतूनही कर्ज घ्यावे अशी सूचना त्यांनी केली ... नुसती सूचना करून त्या थांबल्या नाहीत तर ८ मार्च २०१२ च्या कार्यक्रमात महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष, मा. फिलीप डी सिल्वा सरांना त्यांनी समताला कर्ज देण्याबाबत शिफारस केली. त्यातूनच पुढे ५० लाखाचे कॅश क्रेडिट कर्ज महाराष्ट्र ग्रामीण बँकेने समता पतसंस्थेला दिले.

नव नविन प्रयोग व उपक्रमांना ताई सतत प्रोत्साहन देत, त्यातूनच त्यांनी आमचे आरोग्य सहयोग निधीचे पथनाट्य अन्नपूर्णा च्या पुण्यातील वार्षिक सभेत करायला लावले.

स्वतः व स्वतःची संस्था मोठी करण्यासाठी सतत धडपडणारी माणसे- कार्यकर्ते बरेच आहेत. पण आपला अनुभव इतरांना उपयोगी पडावा व त्यातून विविध संस्था व संघटना उभ्या राहाव्यात यासाठी सतत सक्रीय प्रयत्न व धडपड मेधाताई करतात, हा एक ताईचा अलौकिक वेगळेपणा आहे.

ताईचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या बिन कामाच्या तात्विक गप्पात वेळ घालवत नाहीत. पण प्रत्येक कार्यकर्त्यांची त्या आत्मीयतेने चौकशी करतात.

अन्नपूर्णा परिवारचा आजचा एव्हढा मोठा वटवृक्ष उभा रहाताना मेधाताई यांनी वेळोवेळी घेतलेली मेहनत व परिश्रम यांचे महत्त्व खूप मोठे आहे.

कोणताही नियम करणे व त्याची वेळेवर अंमलबजावणी करणे यातून त्यांचे प्रशासन कौशल्य लक्षात येते.

ताई कधीही अर्ध्या तासाच्या वर भाषण करत नाहीत. मला नेहमीच नवल वाटायचं की आठ आठ तास खराब रस्त्यावरून प्रवास करून, न थकता अर्ध्या तासाचं भाषण.... पण ते अर्थपूर्ण असायचे ...नेहमीच दिशादर्शक आणि प्रेरणादायी.

या दरम्यान ताईंशी माझ्या व संगीता तसेच इतर प्रमुख कार्यकर्ते यांच्या अखंड गप्पागोष्टी व्हायच्या... सर्व विषयांवर... विलक्षण आनंददायी अनुभव असायचा तो....

## स्मृतिसुमने

**

शुभाताईंनी आंतरजातीय विवाह केला. ही गोष्ट ताईंना सांगितली तेव्हा ताईंनी अभिनंदन करत एक महत्वपूर्ण सल्ला दिला. ''नवरा एक पॅकेज असतो हे लक्षात घे. बऱ्या- वाईट दोन्हीसह त्याचा स्वीकार करायचा. कामावर व आपल्या उद्देशावर सदैव प्राधान्य दे.''

**

समता कार्यालयाच्या उदघाटनाला कॉ. धोपेश्वरकर बीडला येऊ नयेत व NGO टाईप कामाला प्रोत्साहन देऊ नये असा प्रयत्न काही बीडचे कार्यकर्ते करीत होते. कॉ. पानसरेंना यात लक्ष द्यावे लागले व कॉ. धोपेश्वरकर बीडला आले व

कार्यक्रम उत्साहाने झाला. यात मेधा ताईंची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळेच समता पतसंस्था उभी राहिली.

**

१९७५ पासूनच सूक्ष्म वित्त कर्जास मुंबईत पद्मश्री प्रेमाताई पुरव यांनी सुरवात केली. असाच प्रयोग बांग्लादेश व गुजरातेतही याचं वेळी सुरू होता. सूक्ष्म वित्तास मिळालेल्या यशातून अनेक धंदेवाईक संस्था ह्या क्षेत्रात आल्या. व १९९५-९६ पर्यंत ''मायक्रोफायनान्स'' हा एक व्यवसाय जगभर बनला होता.

त्यावेळी अन्नपूर्णा चे सहकारी तत्वावरील मॉडेल डॉ. मेधाताईंनी जाणीवपूर्वक उभे केले. त्यामुळे यातील महिला सक्षमीकरण चळवळीचा आत्मा कायम राहिलेला आहे. अन्नपूर्णाचा मुंबई-पुण्यासोबतच फ्रेंचायसी मार्फत बीड, इचलकरंजी, कोल्हापूर, उस्मानाबाद, लातूर या भागात सतत विस्तार होत आहे.

मेधाताईंच्या साठाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने या सर्व आठवणींना एक उजाळा मिळाला. ताई, आपल्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा आणि आपण असेच दीपस्तंभासारखे आम्हाला सक्रीय मार्गदर्शन करीत राहावे हीच सदिच्छा.

**संतोष बी. पी.**
**समता प्रतिष्ठान, बीड**

# ४२. ध्येयवेड्या किमयागार

**बु**द्धिमान आणि मेहनती असलेल्या मेधाताईंना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांचे कर्तृत्व अजून मोठी झेप घेवो यासाठीही शुभेच्छा!!

मेधाताईंना मी पहिल्यांदा अन्नपूर्णा महिला मंडळाच्या नवी मुंबईच्या ऑफिसमध्ये पाहिलं. अन्नपूर्णा महिला मंडळाचा दादर आणि नवी मुंबईतील कोपरखैरणे या ठिकाणी खाद्यपदार्थ बनवून विकण्याचा प्रचंड मोठा व्यवसाय होता. कॉम्रेड पद्मश्री प्रेमाताई पुरव यांचं नाव त्यावेळी सगळीकडे गाजत होतं. कष्टकरी, छोटे व्यवसाय करणाऱ्या, मेस चालवणाऱ्या महिलांचा मोठा आधार असलेल्या अन्नपूर्णाच्या सभासद लाखांमध्ये होत्या. त्यांचे काम बघायला आणि तसे काम उस्मानाबाद, लातूर या ठिकाणी सुरु कसे करता येईल, हे पाहायला आम्ही काही कार्यकर्त्यांनी मुंबईला जायला सुरुवात केली. प्रेमाताई भरभरून माहिती देत असत, सगळा पसारा फिरून दाखवत असत, समजावून सांगत असत. गोवा मुक्ती लढ्यातील त्यांचा थरारक अनुभव, अन्नपूर्णाची स्थापना कॉम्रेड दादा पुरव यांच्या सोबत कशी झाली, पुढे त्याचा विस्तार कसा झाला याचे रोमांचक अनुभव प्रेमाताईं कडून ऐकताना आम्ही भारावून जात असू.

त्यात काहीशा अबोल असलेल्या मेधाताईंची ओळख तेव्हा विशेष झाली नाही. एक मात्र जाणवायचे की त्यांच्या विचारांत स्पष्टता आणि नेमकेपणा होता. त्या पुण्यात बँकेत नोकरी करत करत अन्नपूर्णा पतसंस्थेचे काम खूप मेहनतीने करत होत्या हे जाणवायचे. बँकेत नोकरी करणाऱ्या आणि बँक कर्मचारी संघटनेचे काम हिरीरीने करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांच्या त्यांच्यासोबत मार्क्सवादी तत्वज्ञानावरती

आधारित जगाच्या आकलनाच्या चर्चा चालत, तेंव्हा मी फक्त श्रोत्याचे काम करू शकत असे. माझा त्यात काही अभ्यास नव्हता. मेधाताईंचे आत्मविश्वासपूर्ण बोलणे मला आवडत असे. त्याने मी प्रभावित झाले.

नंतरची बरीच वर्ष मुंबईला माझे येणेजाणे चालू होते. पण मेधाताई पुण्यात राहत असल्याने माझी त्यांची फारशी भेट होत नसे. त्यावेळी अन्नपूर्णा चे काम मेधाताईंनी पुण्यात सुरु केले होते. मुंबईमधल्या अन्नपूर्णाच्या प्रचंड पसाऱ्यापुढे पुण्याचे काम छोटे वाटत होते.

अन्नपूर्णा महिला मंडळाच्या शिरवळ येथील प्रकल्पाच्या उद्घाटनाच्या वेळी मेधाताईंच्या नियोजन, आखणी आणि शिस्त यांची झलक पाहायला मिळाली. नीटनेटके आणि प्रभावी कार्यक्रम कसे आखावेत, आणि पार पडावेत याची उदाहरणं मेधाताईंमुळे पाहायला मिळाली.

२००० च्या सुमारास कॉम्रेड प्रेमाताई पुरव यांचे एव्हढे मोठे काम योग्य व्यक्तीच्या हातात जायला हवे असे सगळ्यांना वाटत होते. त्यावेळी मेधाताईंच्या हातात धुरा आली. सर्वाना ते योग्यच वाटले. उस्मानाबाद आणि लातूर येथील आम्हा कार्यकर्त्यांनाही समाधान वाटले. खरे तर त्यावेळेपर्यंत मेधाताईंनी आपली नोकरी सोडून पुण्यात अन्नपूर्णा परिवार उभारणीत पूर्णपणे वाहून घेतले होते. २००३ पासून त्यांच्या पुणे, नवी मुंबई, दादर येथील चकरा अथकपणे सुरु झाल्या. जवळपास दररोज मुंबईतील काम करावे लागायचे. पुण्याचे कामसुद्धा वेगाने वाढत होतं. तारेवरची कसरत चालू होती मेधाताईंची.

एव्हढ्या धावपळीत १९९४-९६ मध्ये MSW आणि नंतर, २००० साली micro finance मध्ये पी.एच.डी केलं. मी तर आश्चर्यचकितच झाले या मोहिमेने. म्हणजे कामाच्या

ओझ्याखाली दबून न जाता, आपल्या आवडीचे शिक्षण पार पाडणे हे आश्चर्यकारक नाही तर काय? त्यांच्यामधल्या या अफाट उर्जेने मी आनंदीही झाले आणि त्यांची काळजीही वाटायची. मेधाताईंची अधून मधून भेट व्हायची तेंव्हा त्या विचारांत आणि कामात गर्क असायच्या. विश्रांती, मनोरंजन त्यांच्या वाट्याला येत नसावं बहुतेक तेव्हा. एक मात्र त्यांनी अट्टाहासाने जपलं ते म्हणजे, नियमित व्यायाम आणि स्वत:चा फिटनेस!! ‘‘मला आजारी पडायला मुभाच नाही’’ असं मेधाताई म्हणायच्या.

बघता बघता, मुंबई अन्नपूर्णाची नीट व्यवस्था लावून, पुण्याचे त्यांचे काम प्रचंड कधी झाले, ते कळलेच नाही. आधीच्या मुंबईतील डेरेदार वृक्षांचे, नंतर पुणे, नवी मुंबई येथील डेरेदार वटवृक्षांत रुपांतर करण्याची आश्चर्यकारक किमया मेधाताईंनी करून दाखवली आहे.

मी त्यांच्या मुंबईतल्या अन्नपूर्णाच्या वार्षिक सभेला दोन एक वर्षांपूर्वी हजर होते. त्यावेळी, मी तो देखणा माहोल अनुभवला आहे. तीस चाळीस हजार महिला अत्यंत शिस्तीत, सांगितलेल्या ठिकाणी, पूर्णवेळ बसून होत्या. अन्नपूर्णाची शिस्तबद्ध टीम नेमून दिलेले काम करत होती. प्रत्येकीला तिने कोणते काम, कसे करायचे आणि केव्हा करायचे आहे याची चांगलीच जाण होती. सर्व सभासदांना बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक होती. सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणाऱ्या महिलांना त्याचा उपयोग कर्ज घेताना होतो हे विशेष!!

त्या सर्व सभासद सगळी भाषणं लक्षपूर्वक ऐकत होत्या. ठराव मंजूर करत होत्या. एकएक मिनिटाच्या हिशोबाने सभा चालत होती. लक्षात घ्या, की तीस चाळीस हजार महिलांना दोन तास अशारितीने खिळवून ठेवणं ही साधी गोष्ट नाही. त्यामागे मेधाताईंची प्रचंड, अथक मेहनत आहे. सभेनंतर तर सगळ्या बायकांनी मेधाताईंना घेराव घातला. मेधाताई चक्क

व्यासपीठावरच बायकांच्या गराड्यात खाली मांडी घालून बसल्या. ‘‘मला आता थोडा वेळ तरी यांची गाऱ्हाणी ऐकून घ्यावी लागतात’’ अशी लाडीक तक्रार त्या हसत हसत करत होत्या. ते दृश्य खूप प्रेमळ होते.

आपल्या सोबत विश्वासू, समंजस माणसं निवडणं हे खूप जिकिरीचे काम असते. मेधाताईंना हे जमलं आहे. पतसंस्थेसोबतच पाळणाघर चालवणे, कौशल्य विकासासाठी कोर्सेस चालू करणे, समस्या निवारण केंद्र चालवणे, अशा बहुअंगी कामासाठी उत्तम टीम लागते. अन्नपूर्णाकडे ती आहे आणि त्याच्या शीर्षस्थानी मेधाताई पुरव-सामंत आहेत ही महत्वाची बाब आहे.

नवी मुंबईमध्ये अन्नपूर्णाची स्वत:ची बिल्डींग पूर्वी होतीच. आतातर, पुण्यातही एक मोठी, ऐटबाज इमारत अन्नपूर्णाकडे आहे हा चळवळीमधल्या सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. ध्येय  घेऊन काम उभं करणं थोडं सोपं असतं, पण वर्षानुवर्ष ते टिकवणं आणि वेगवेगळ्या अंगाने वाढवणं, कालानुरूप त्यात आधुनिकता आणणं हे ध्येयवेड्या माणसाचच काम आहे. मेधाताई अशाच लोभस ध्येयवेड्या आहेत. त्या तशाच राहोत ही सदिच्छा!!

**डॉ.स्मिता शहापूरकर,**
**लोकप्रतिष्ठान, उस्मानाबाद.**

# ४३. ताई,पाठीवर हात ठेवून सतत लढ म्हणा!

**मे**धाताईंच्या ६० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्याबद्दल लिहिण्याचा योग आला. मी १९९५ सालापासून सामाजिक क्षेत्रात काम करत असताना मेधा ताईंच्या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा दरारा ऐकून होते. त्यांच्याबद्दल आदर ही होता.

२०१२ पासून दिशा ला, आमच्या ग्रामीण भागातील संस्थेला कार्य वाढवण्यासाठी कोणाचे मार्गदर्शन घ्यायचे, तर आमच्या संस्थेच्या अध्यक्षांनी मला पुण्यातील २ संस्था प्रतिनिधींकडे पाठवून, ''तू निवड कर, कोणत्या संस्थेचे मार्गदर्शन निवडायचे,'' तेव्हा मी दोन्ही संस्थाना भेटून ''अन्नपूर्णा'' संस्थेच्या मा. डॉ. मेधा पुरव सामंत यांचे बोट धरायचे ठरवले.

मी खरंतर एवढा निर्णय घेण्याइतकी मोठी अनुभवी व विचाराने परिपक्व नव्हते. पण ताई मला फार आश्वस्त करणाऱ्या वाटल्या. खरंच आज २०२० साली तो निर्णय यशस्वी ठरला, तो ताईच्या सततच्या मार्गदर्शनाने, ''पाठीवरती हात ठेवून लढ'' म्हटल्याने.

मी गेले बरेच वर्ष पुणे व पुणे जिल्ह्यातील अनेक संस्थांबरोबर काम केले आहे. खूप आदरणीय व्यक्तीमत्वे, बुद्धीमान संस्था प्रतिनिधी असतात, समाजामध्ये आवडीने, प्रामाणिकपणे मनापासून तीव्र इच्छा असणारे कार्यकर्ते असतात. पण त्यांना ताई सारख्या व्यक्तींचे मार्गदर्शन मिळाले तरच हातून खूप मोठे काम होते.

अन्नपूर्णा संस्थेचे फ्रँचायजी मॉडेल आहे, ते इतर व्यावसायिक संस्थेसारखे नाही. गरीब, ग्रामीण व गरजू महिलांसाठी ज्या सामाजिक संस्था अर्थ व्यवहार करतात.

त्यांनी योग्य अर्थसंस्था नोंदणी करणे, आर्थिक व्यवहाराचे नियम ठरवणे, या आर्थिक व्यवहाराचा हिशेब ठेवण्यासाठी योग्य संगणकप्रणाली निवडणे, लेखा परिक्षण करणे, टीमचे या सर्व पायऱ्यावर ताई व त्यांच्या टीमचे आम्हाला वारंवार, मार्गदर्शन व पाठपुरावा हा अगदी विना मोबदला असतं, आणि हेच अमूल्य आहे. तसेच सरकारी नियम, समाजामध्ये काम करत असताना येणाऱ्या अडचणीवर अनुभव कथन व ज्या अतिशय उत्कृष्ट व नावाजलेल्या विविध प्रणाली या अन्नपूर्णात वापरल्या जातात. त्याही आम्हाला विनामूल्य दिल्या जातात. २०१३ पासून आम्ही त्यांना जोडलेले आहोत. पूर्वी दरमहा ताईंसह मिटींग होत असे व आता गेले वर्षभर त्रैमासिक मीटींग होतात.

पण आजतागायत एकही मिटींग मी सोडली नाही. ताईंना एक-एक आकडा पाठ असतो आर्थिक उलाढालीचा. मला त्यांचे प्रत्येक मिटींगमधले मार्गदर्शन उपयोगी पडते.

माझ्या बाबतीत सांगायचं झालं तर गणित नको, म्हणून कला शाखेत पदवीधर झाले व नंतर समाजकार्य! १४ वर्ष वेगवेगळे सामाजिक प्रकल्प राबवले, पण तेथे कायम डोनेशनची कमतरता. दिशा ट्रस्ट ने ताईंच्या मार्गदर्शनाने ०४ एप्रिल २०१४ रोजी दिशा पतसंस्था नोंदणी केली व ताईंच्या सततच्या मार्गदर्शनाने ३२ लाखावरुन संस्था ६ वर्षात ३ कोटीवर गेली. आता मला ते गणित ही जमायला लागले. काय व किती शिकले- कर्ज वसुली, कायद्याचे भान, आकड्यांची कसरत, मनुष्यबळ व्यवस्थापन, व्यवसाय वृद्धी व रिस्क घेणे सुद्धा. हे सगळे नियमांबरोबर पडताळणी सह!

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे समाजातील गरीब, गरजू महिलांसाठी काम करतो त्यामुळे आर्थिक बरोबर सामाजिक ज्ञान देणं व कर्ज पूर्ण फेडण्यास शिकवणं.

मला ताईंचा सहवास मिळाला म्हणून मी काम पूर्ण करेन असा आत्मविश्वास आला आहे, संकटाला तोंड द्यायची तयारी आहे. कुठे, कधी, कसं पुढे जायचं हे माहिती आहे. मी धार्मिक नसले तरी पूर्ण नास्तिक नसल्याने दरमहा त्यांच्या ऑफिसमध्ये प्रवेश करताना सुवास्तूत प्रवेश केल्याची, सकारात्मक ऊर्जा, उत्साह घेऊन जाते व काम करते! अशा माझ्या सारख्या कार्यकर्त्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले, त्या आदरणीय डॉ. मेधाताईंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

ताई म्हणजे कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळी- ''पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.''

**गीता फाटक**
**संघटक, दिशा पतसंस्था**
**मावळ**

# ४४. अन्नपूर्णा परिवार : एक बहरलेलं झाड

**मे**धाताई

माझी मेधाताईंशी पहिली भेट झाली ती नॅसकॉम च्या एका कॉन्फरन्समध्ये. आम्ही दोघीही एकाच पॅनलवर स्पीकर्स होतो. तो पर्यंत मला अन्नपूर्णा परिवाराविषयी काहीच माहिती नव्हती!

मेधाताईंनी सुंदर शब्दांत थोडक्यात पण थेट मनाचा ठाव घेईल अशा तऱ्हेने अन्नपूर्णा परिवाराची माहिती दिली, एक दोन मिनिटेच आम्ही त्यानंतर बोललो पण तेव्हा माझ्या मनातून अन्नपूर्णा हा विषय काही जाईना, कारण मेधाताईंच्या प्रत्येक शब्दातला सच्चेपणा आणि त्यांच्या संस्थेच्या कामाची सखोल व्याप्ती!

त्याच सुमारास मी इंग्लंडच्या केम्ब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये अभ्यास करत होते आणि थिसीस साठी योग्य विषय शोधत होते. बऱ्यापैकी वाचन झाल्यावर माझ्या मनाने कौल दिला की आपण गरीब स्त्रियांच्या सक्षमीकरणावरच संशोधन करायचे आणि तेही अन्नपूर्णा परिवाराच्या माध्यमातून!

एक दिवस मी मेधाताईंना फोन केला आणि विचारल्यावर त्यांनी लगेचच ''हो जरूर'' हे उत्तर दिले. मी करत असलेली नोकरी सोडून माझ्या संशोधनासाठी पूर्ण वेळ काम करायचे ठरवले. माझ्या आयुष्यातला नविन आणि अतिशय समृद्ध प्रवास सुरू झाला.

मेधाताईविषयी लिहिताना मी अन्नपूर्णा परिवारातील इतर लोकांचा विचार न करता लिहूच शकत नाही, कारण मी ज्या मेधाताई अनुभवल्या त्या त्यांच्या नजरेतून! माझ्यासाठी मेधाताई हे एक वेगळी व्यक्ती नाही तर सर्व स्त्रियांना (आणि पुरूषांना) आत्मसन्मान कसा कमवायचा, जपायचा

आणि जोपासायचा ह्याचे भान आणणारी एक विचारधारा! जेव्हा जेव्हा अन्नपूर्णाचा विचार करते तेव्हा मला स्पर्शून जाते ते माणुसकीचे स्फुल्लिंग आणि त्यातून घडलेली सुंदर कुटुंबं!

खरं म्हणजे मेधाताईंनी त्यांच्याच सारख्या असंख्य मेधाताई तयार केल्या आहेत.

सुकन्या आपल्या संस्थेविषयी संशोधन करते आणि म्हणजे आपण तिला अतिशय शिस्तबद्ध रीतीने मदत करायची हे मला किंवा मेधाताईंनाही तिथल्या कुणालाही सांगावे लागले नाही. पुण्यातल्या सर्व झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन अन्नपूर्णा मधल्या ब्रांच ऑफिस मध्ये काम करणाऱ्या आणि कर्ज घेत असलेल्या स्त्रियांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याकडून माहिती गोळा करणे! माझ्या संशोधनासाठी मी जात असे, माझ्या प्रत्येक दिवसाचे वेळापत्रक महिनाभर आधी तयार केले होते उज्वलाताई आणि आरतीताईंनी!

अन्नपूर्णा परिवाराला मिळालेल्या अमाप यशात ९० टक्के वाटा आहे तो मेधाताईं मधल्या अत्यंत सिस्टिमॅटिक, शिस्तबद्ध; ध्येयाने भारलेल्या सेनापतीचा! आणि त्यांनी तो स्वतः पुरता मर्यादित ठेवलेला नाही तर पहिल्या दिवसापासूनच बरोबर काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीत जाणीवपूर्वक उतरवला आहे.

सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांविषयी साधारणपणे समज असतो की तिथे शिस्त पाळणे, प्लानिंग करणे, कॉम्प्युटर्स वापरणे, प्रत्येक गोष्टीसाठी विचारपूर्वक प्रोसेस असणे जवळजवळ अशक्यच! पण अन्नपूर्णा संस्थेत मात्र मेधाताईंनी एखाद्या कॉर्पोरेट कंपनी इतके कामाचे सिस्टिमॅटिक वातावरण जाणीवपूर्वक तयार केलेलं आहे. आणि विशेष म्हणजे तिथल्या सर्वांना ते सहज जमेल आणि त्याचा अभिमान वाटेल हे जपलेले आहे.

अजिबात आत्मविश्वास नसलेल्या, कधीही कॉम्प्युटर न पाहिलेल्या, ऑफिसमध्ये काम न केलेल्या, मोडके तोडके मराठी/इंग्रजी लिहिता येणाऱ्या मुली अन्नपूर्णा परिवारात काम करायला लागल्या, की ३-४ महिन्यात त्यांचा कायापालट झाल्याशिवाय राहत नाही. प्रत्येकीच्या हातात सदैव डायरी आणि कामाचे व्यवस्थित प्लानिंग हे त्यांच्या अंगात इतके भिनते, की त्यांच्या घरीही सर्वांमध्येच ही शिस्त आपोआप येते, हे त्या अभिमानाने सांगतात. सक्षमीकरण म्हणजे फक्त पैसे मिळवणे नाही, तर आपल्या आयुष्याचा प्रत्येक भागात प्रयत्नपूर्वक बदल करत सतत यशस्वी होत राहणे हे, अन्नपूर्णा परिवारातल्या प्रत्येकीला अचूक जमलेले गणित आहे हेच खरे! मी अन्नपूर्णाच्या सर्व स्टाफला आणि असंख्य कर्जदारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना भेटले पण मला एकही व्यक्ती दुर्मुखलेली, तक्रार करणारी, कंटाळलेली दिसली नाही ह्याच कारण एकच आहे अन्नपूर्णा परिवाराने निर्माण केलेली खऱ्या सक्षमीकरणाची जाणीव!

अन्नपूर्णातल्या प्रत्येक स्त्रीच्या दु:खाची गोष्ट वेगळी, पण प्रत्येकीच्या आयुष्याला लागलेले वळण मात्र एकच- माणुसकीचे, आनंदाचे, आपल्या आयुष्यरथाची सूत्रे आपल्या हातात घेऊन आपणच आपल्या वाट्याला आलेले युद्ध जिंकायचे, तेही कुणालाही न हरवता हे समजून जगण्याचे वळण!

मेधाताईंची रोजच आठवण येते आणि मन प्रसन्न झाल्याशिवाय राहात नाही आणि प्रश्न पडतो की, एका व्यक्ती मध्ये एवढे सगळे गुण कसे काय असू शकतात?

मला वाटतं मुळात मेधाताईंचा पिंड आहे तो एका कलाकाराचा, संशोधकाचा आणि नेतृत्व गुण असलेल्या कार्यकर्त्यांचा. त्याशिवाय का त्या उत्तम लेख आणि कविता लिहितात, पेंटिंग करतात, स्वयंपाक आवडीने करतात, बागेची

आवड जोपासतात, लहान मुलांमध्ये रमतात, उत्तम भाषण देतात, एखादी नवीन योजना राबवताना त्याचा संपूर्ण अभ्यास करतात आणि त्यातले खाच खळगे सर्वांबरोबर चर्चा करून त्यावर समग्र विचार करून मगच ती योजना राबवतात!

ह्याविषयी त्यांच्याशी बोलल्यावर त्यांनी अगदी सरळपणे सांगितले की ''हे सर्व श्रेय माझ्या आई वडील आणि त्यांच्या संपर्कात असलेल्या कार्यकर्त्यांच्या संस्कारांना आहे. I am a product of my upbringing. आणि अन्नपूर्णा परिवार घडला तो माझ्या पतीच्या साथीमुळे!''

आपल्या तुताऱ्या वाजवण्यात मग्न असलेल्यांच्या जगात मेधाताई उठून दिसतात त्या त्यांच्या ह्या साधेपणामुळे, सच्चेपणामुळे!

त्यांना कधीही व्यावहारिक जगातल्या मानाचा, पैशांचा, पदव्यांचा, बेगडी कौतुकाचा मोह पडला नाही- कारण ज्या बायकांच्यासाठी त्या काम करतात त्यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद ही गोष्ट मेधाताईसाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे संस्थेमधल्या इतरांनाही तोच आनंद महत्त्वाचा वाटतो ह्यात आश्चर्य ते काय?

सगळ्यांना बरोबर घेऊन चालतांना प्रत्येक व्यक्तिमधला गुण ओळखून त्याला वाव देणे ह्याचं प्रशिक्षण केंद्र कुठे असेल तर त्या आहेत मेधाताई! अन्नपूर्णा परिवारातली प्रत्येक व्यक्ती अभिमानाने सांगते की मला इथे येऊन स्वत: मधले सुप्त गुण कळले आणि ते मी वापरायला शिकले- माझ्या कामात आणि घरातही!

गंमत म्हणजे स्वत: मेधाताई पण हेच सांगतात, की त्याही अन्नपूर्णा परिवाराची स्थापना करुन आयुष्य आनंदात जगण्याची कला शिकल्या आणि त्यांचे अनेक गुण फुलत गेले, व्यक्तिमत्व बहरत गेले.''शेवंताबाईंकडून मी अत्यंत

दुःखातही हसायला शिकले. जहीदाबी नी गटाच्या दबावाचा प्रभावी वापर करून थकित सभासदांना नमवायला शिकवले. कॉम्प्युटर पासून बॅलन्स शीट पर्यंत सर्व काही शिकले ते अन्नपूर्णा परिवारामुळे व परिवारासाठी''

असे असले तरी आपली खुर्ची पकडून ठेवण्याची कोणतीच धडपड त्यांच्यात नाही, उलट ह्यापुढे नविन टीम कशी जास्त चांगली घडेल ह्यात त्या उत्साहाने मग्न आहेत!

अन्नपूर्णा परिवाराची वार्षिक सभा म्हणजे लोकशाही कशी असावी ह्याचे उत्तम उदाहरण आहे. दहा पंधरा हजार महिला समूहापुढे इतक्या सहजतेने मेधाताई वार्षिक अहवाल आणि पुढे अमलात येणाऱ्या योजना, निर्णय सांगतात आणि महिलांकडून उत्स्फूर्त संमती येते.

हा सोहोळा ज्यांनी पहिला आहे त्यांना हे सहज समजेल, महिलांचे सक्षमीकरण करताना कोणतीही गोष्ट कुणावरही लादायची नाही, तर स्वत:च्या आणि इतरांच्या सद्सद्विवेक बुद्धीला, लॉजिकला पटेल आणि त्याला खऱ्या संशोधनाच्या आकडेवारीचा पाठिंबा देऊन मगच सर्वानुमते निर्णय घ्यायचा ही कला आणि शास्त्र मेधाताईंनी अन्नपूर्णा परिवाराच्या डी.एन.ए. मध्ये इतक्या सहजतेने मुरवली आहे की तिथे प्रत्येक महिलेला हे आपसूकच बाळकडू मिळते.

समाजासाठी उत्तम कार्य केलेल्या सर्व व्यक्तीमध्ये एक सामान धागा आढळतो तो म्हणजे स्वप्न बघण्याचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्याचे विवेकावर आधारलेले मानसिक, भावनिक, वैचारिक सामर्थ्य! मेधाताईंमुळे मला हा धागा जवळून उलगडून बघता आला हे माझे मी भाग्य समजते!

त्यांच्या व्यक्तिमत्वाला इतके सुंदर पैलू आहेत की मला वाटते की त्या कोणत्याही क्षेत्रात गेल्या असत्या तरी त्यांनी

त्या क्षेत्राला नविन वळण दिले असते आणि आपला ठसा उमटवला असता.

शेवटी आयुष्य म्हणजे काय तर आठवणी- मेधाताईं विषयीच्या माझ्या सर्व आठवणी अत्यंत सुंदर, प्रेरणा देणाऱ्या आहेत! मेधा हे नाव सार्थ करणारी ही माझी थोरली बहीण असे काहीसे माझे त्यांच्याशी भावनिक नाते आहे.

**सुकन्या कुलकर्णी**
**कॉर्पोरेट मॅनेजर**
**रिसर्चर**

## ४५. मानसपुत्राचे मनोगत

ताईंना साठाव्या वाढदिवसानिमित्त अनंत अनंत शुभेच्छा. ताईंचा जन्म सोमवार दि.१३ एप्रिल १९६० रोजी झाला. योगायोग म्हणजे त्या दिवशी हनुमान जयंती होती. हे मला एक पुस्तकात वाचून माहित होते. आणि दुसरा योगायोग बघा ज्या दिवशी सुषमाला प्रसूतीसाठी हॉस्पीटलमध्ये दाखल केले तो दिवस ही हनुमान जयंतीचा होता, आमच्याबरोबर ताई रात्री उशिरापर्यंत हॉस्पिटलमध्ये होत्या. खूप उशिर झाला म्हणून ताई म्हणाल्या की, " मी आता निघते रे घरी." ताई घरी गेल्या अन् काही वेळातच वेद जन्माला आला. मी आनंदाने इतका भारावून गेलो की, ही बातमी पहिल्यांदा कोणाला कळवायची, तर मी क्षणातच ताईना फोन करून सांगितले. हे सांगण्याचा उद्देश असा आहे की, माझे जगात कोण अगदी जवळचे आहे की, ज्यांना मी माझे सारे सुखःदुख सांगू शकतो त्या म्हणजे माझ्या ताई.

मी ताईंचा मानसपुत्र आहे. मला ताई माझ्या बालपणापासूनच ओळखतात. आईवडील लहानपणी गेल्यामुळे आम्ही दोघे भाऊ पोरके झालो. ताईंनी माझा छोटा भाऊ परशुराम ह्याला लहानाचे मोठे केले. माझी जबाबदारी होती ती, त्यांनी पार पाडली. हे मी त्यांचे उपकार कधीच विसरू शकणार नाही. मी खूप हुशार होतो. १०वी ला उत्तम मार्कस् मिळवून पास झालो इंजिनियरिंगला गेलो, पण पूर्ण करु शकलो नाही.

मी गावाकडे असतांना शिक्षण सुटल्यावर काकांचे पेंटींगचे काम सांभाळत होतो. गोव्यातील काकांच्या साईट मीच पहायचो. खिशात पैसा भरपूर असायचा. कामगारांच्या संगतीत राहून दारूची सवय कशी लागली ती कळलीच नाही. मी इतका व्यसनी झालो की, मला गोवा सोडावा लागला. माझी वाताहत

सुरू झाली. एकेदिवशी बऱ्याच वर्षांनी मी परशुरामला फोन करायचा म्हणून फोन केला, अन् तो फोन नेमका ताईंनी उचलला. त्या बोलल्या 'कसा आहेस?' मी उत्तरलो ''ठीऽऽक'' आहे. बस्स एवढ्या वरूनच त्यांनी हेरलं की मारूतीचे काही आलबेल चाललेलं नाही. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या.

त्यांनी माझा कॉन्टॅक्ट नंबर घेतला. आठवडाभराने मला ताईंचा फोन आला. म्हणाल्या, ''तुला पुण्याला यायचं आहे, दादांचं तसं मत आहे.'' मी आनंदाने भारावून गेलो. मी लागलीच पुण्याला यायची तयारी केली. कसाबसा पुण्याला येवून पोहचलो. घरी ताईदादा, परशुराम मी मिळून मिटींग घेतली. मला सर्व समजावून सांगण्यात आलं की, ''तुला नासानमध्ये काम करायचे आहे. तुझी हेळसांड होत आहे, हे मला एकंदर माहितीवरून समजलं आहे. आता आम्ही असं ठरविलं आहे की, तु परवाणूला (हिमाचलप्रदेश) म्हणजे दादांच्या नासानची सिस्टर कंपनी 'सानस' मध्ये काम करशील. मी लगेच तयार झालो.

मी बायपोलार डिसऑर्डरचा पेशंट आहे. इथं आल्यानंतर पहिल्यांदा मला मनोविकारतज्ञ डॉ. परळीकर यांच्याकडे ट्रिटमेंट सुरू केली. प्रत्येक अपॉइंटमेंटच्या वेळी ताई स्वुद्द माझ्याबरोबर असायच्या. कधीकधी आमचा नंबर रात्री १२-३० वा. यायचा. पण ताई कधीच वैतागल्या नाहीत, हे विशेष. ताईंनी बऱ्याच जणांसाठी बरंच काही केलं असेल, पण माझ्यासाठी जे त्या करताहेत ते शब्दांत व्यक्त करणं अवघड आहे. माझ्या आईची कमी त्यांच्यामुळे भरून निघालीय. त्यांचं मन इतकं विशाल आहे की, ते सर्वांना सामावून घेतंय. कोणतेही धाडस करायचं त्यांच्यात बळ आहे.

त्या काय आहेत हे अन्नपूर्णाच्या लोगोवरूनच कळते. स्वतःला कॉसमॉस करणं हे त्यांना जन्मजात अवगत आहे.

आईवडीलांचं नांव त्यांनी रोशन केलं आहे. ताईंचा जन्म झाला तेव्हा हॉस्पिटलमध्ये आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, दत्ता देशमुख अशांसारखी बरीच प्रतिष्ठीत मंडळी बघायला आली होती. एवढी मोठी माणसे ताईना बघायला येतात, म्हणजे बालपणीच त्या एक रत्न होत्या. आता त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येतं तो त्यांच्या कामाचा लेखाजोखा आहे. एक व्यक्ती म्हणून त्या जगावेगळ्या आहेत. यात वाद नाही.

आजपर्यंत ताईंच्या संपर्कात जी माणसे आली त्यांचा वेगवेगळा अनुभव असेल, आठवणी असतील पण माझा अनुभव सांगतो, की जेंव्हा त्या मला ओरडतात तेव्हा मला माझी आईच आहे असं जाणवतं आणि ते ओरडणं खाण्यासाठी अधूनमधून मी राडा करत असतो, नकळत तो होत असतो. हे त्यांनाही माहित आहे. मी बायपोलर डिसऑर्डरचा पेशंट असल्यामुळे कामावर जाता-जाता मध्येच दांडी मारतो. मग त्यांनी माझ्या मॅनेजर शितल मॅडमना सांगून ठेवलेलं आहे की, ‘‘मारूती जर न सांगता कामावर आला नाही तर मला लगेच मेसेज करणे.’’ मॅडमने तशाप्रकारचा मेसेज केला की, दुसऱ्याच क्षणी मला ताईंचा फोन येतो आणि मग ‘‘कुठे आहेस तिथून आत्ताच्या आत्ता ऑफिसला जा.’’ हे जे दरडावणे आहे तेच मला पटरीवर चालायला शिकवते. ताईंच्या सिस्टीममध्ये मी आहे म्हणून माझे सर्व काही व्यवस्थित चाललेलं आहे. हाच ताईंचा माझ्यासाठी मोलाचा आशिर्वाद आहे.

मी पुण्यात आल्यानंतर ताईंनी पहिल्यांदा माझा वाढदिवस साजरा केला. त्यादिवशी मला खूप आनंद वाटला, कारण आजपर्यंत माझा वाढदिवस कोणीच साजरा केला नव्हता. मी परवाणूवरून राडा करून आल्यानंतर मी

लुणावतलाच नासानमध्ये रूजू झालो. परत एक संधी मला मिळाली. मी यावेळी त्या संधीचे सोने केले.

त्यातच काही दिवसांनी मुंबईच्या ऑफिसचे मॅनेजर आणि काही कामगार सोडून गेले. मग पुण्यावरूनच सर्विस पुरविली जात होती. अशातच मुंबईसाठी माझी निवड करण्यात आली. माझे काम पाहून ताईदादांनी मला तिथंच ठेवण्याचा निर्णय घेतला. आता रहायची सोय वाशीतल्या अन्नपूर्णात केली गेली. काही दिवसांनी माझ्या लग्नाचा विचार सुरू केला. माझ्यासाठी अन्नपूर्णातच ऑफिस आणि माझ्या रहाण्यासाठी एक फ्लॅट नविन बांधून दिला. ताईंनी पुढाकार घेवून माझे लग्न लावून दिले. ताईंकडे बघूनच मला मुलगी मिळाली, नाहीतर ते शक्य नव्हते.

ताई मुंबईला दर महिना दोनदा भेट द्यायच्या, त्यावेळी माझ्यावर त्यांचे कटाक्षाने लक्ष असायचे. थोडे दिवस व्यवस्थित चालले होते, पुन्हा मित्रांच्या संगतीने मला दारूचे व्यसन लागले. इतके की, मी त्याच्या आहारी गेलो. याचा कामावर वाईट परिणाम होत होता. परत ताईदादांनी मला पुण्यात आणले. माझी दारूची सवय एकदाची सुटावी म्हणून ताईंनी बाबा अवचटांच्या ‘मुक्तांगण’ या व्यसनमुक्ती केंद्रात दाखल केले. मी पूर्णपणे बरा होऊन बाहेर पडलो. पुन्हा कामावर रूजू झालो. ताई आता माझ्यासाठी स्वतःचे घर शोधू लागल्या. बघता बघता माळवाडीमध्ये एक फ्लॅट ठरला. व्यवहाराच्या शेवटच्या टप्प्यात मला अति एक्साईटमेंटमुळे परत मानसिक आजार झाला.

माझा हा अॅटॅक एवढा तीव्रतेचा होता की, मला मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. त्यादिवशी ताई माझ्याबरोबर दिवसभर हॉस्पिटलमध्ये होत्या. मला अॅडमिट करूनच घरी गेल्या. त्या दिवशीच्या त्यांच्या सर्व मिटींगस् रद्द करून माझ्यासाठी एवढा वेळ दिल्याबद्दल मी त्यांना माझ्या

जीवनात कधीच विसरणार नाही. कोणी स्वतःच्या मुलाला एवढे करणार नाही तेवढे माझ्यासाठी त्यांनी केलेलं आहे. हॉस्पिटलमध्ये भेटायला यायच्या, एवढं कोण कुणासाठी करतं? मी कुठला त्या कुठल्या, नातं असं पाहिलं, तर दूरदूरपर्यंत नाही. पण अंतरिक नाते काय आहे की त्या माझ्यासाठी एवढा जीव लावतात. वेदसाठी तर त्या खूप जीव लावतात, त्याला खेळणी, बुक्स, ड्रेस गिफ्ट देणं वारंवार सुरू असतं. त्याचा वाढदिवस त्या कधीच विसरत नाहीत. तो दरवर्षी वाढदिवस गावी साजरा करतो म्हणून तो गावी जायच्या आधी ताई घरी येऊन त्याचा वाढदिवस साजरा करतात. सांगायची गोष्ट म्हणजे मी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतो तर वेदचा शाळेचा पहिला दिवस होता. ताई स्वुद्द वेदला शाळेला सोडायल्या आल्या होत्या म्हणे. हे ऐकून मला आनंदाश्रू आवरता आले नाहीत.

माझ्यासाठी घर घेण्याचा पाठपुरावा त्यांनी सुरूच ठेवला आणि मला एकदाचे स्वतःचे घर घेवून दिले. एका घरासाठी जे फर्निचर लागते ते सर्व फ्रिजसहीत मला दिले. मला घर घेतल्या नंतर एकही वस्तू खरेदी करावी लागली नाही. मला माझ्या कंपनीमधील माझे सहकारी मित्र म्हणायचे की ‘‘तू कोणते नशिब घेवून आलास? ताई तुला एवढे करतात.’’ एकदा माझे सुषमाशी भांडण झाले की, ‘‘मला अंगठी पाहिजे म्हणून’’ हा विषय सुषमाने ताईंना सांगितला. ताईंनी मला लगेच बोलवून घेतलं. समजावून सांगितले आणि म्हणाल्या की ‘‘मी स्वतः तुला तुझ्या लग्नाच्या वाढदिवसाला अंगठी देईन’’ आणि खरंच त्यांनी मला अर्धा तोळ्याची अंगठी दिली. माझा ताईंविषयी अनुभव आहे की, त्यांनी एखादी गोष्ट करायची म्हणून ठरविली की त्या करणार म्हणजे करणारच.

ताई एकदा बेळगावला गेल्या असता माझ्या सासरवाडीला, सुषमाच्या घरी भेटायला जावून आल्या. त्या

लोकांना इतके कौतुक वाटले की, ताई आपला वेळेतला वेळ काढून सर्व नाती जपतात. याचं मोठं समाधान त्या लोकांना झालं. एवढी मोठी व्यक्ति आपल्या घरी येते याचेच त्यांना अप्रूप वाटले.

मी ज्या ज्या वेळी आजारांने अग्रेसिव्ह होतो. त्या समोर आल्या की, मी एकदम शांत होतो. त्यांच्या नजरेतच एक विलक्षण ताकद आहे. ती मला वारंवार जाणवते त्यांनी फोनवरून जरी मला कॉन्सेलिंग केले तरी माझ्या विचारात बदल होतो. परवा घरी आल्या होत्या आणि एक असा मोलाचा सल्ला दिला की, मला अंतःर्मुख व्हावे लागले. त्या म्हणाल्या, ‘‘आता मुलगा मोठा होत चाललाय, तू जे काय करतोस ते वरून देव पाहत नाही तर तुझा मुलगाच वेद पाहत असतो आणि पुढे जावून तो त्याचे अनुकरण करेल. म्हातारपणी तुझ्या नशिबी आत्ता जे तू करतोस, तेच येईल तेंव्हा सांभाळून रहा.’’

सुषमाला माझ्या बायकोला अन्नपूर्णातच नोकरी दिली. तिला त्या कामाचा कोणताच अनुभव नव्हता, तरी ताईंनी तिला धीर देत म्हणाल्या,‘‘तू घरचा हिशोब करतेस ना, हा पण तसाच आहे.’’ असे सोप्या शब्दात सांगितले. आता अकरा वर्षे होत आहेत, ती अन्नपूर्णात व्यवस्थित काम करते आहे. महत्त्वाचे सांगायचे म्हणजे माझ्या गैरहजेरीत माझ्या मुलाला आणि बायकोला माझी कमी भासू दिली नाही. बायको वारंवार म्हणत असते की,‘‘आज ताई पाठीशी आहेत म्हणून मी तुझ्या सोबत आहे.’’ वेदला शाळेत एकदा ग्रँडमदर बद्दल बोलायचे होते, तेव्हा वेदने ताई त्याच्यासाठी कायकाय करतात ते सांगितले.

त्याच्या टिचरला ग्रँडमदर बुक्स देतात हे ऐकून अजब वाटले. हे जेंव्हा मी ताईंना सांगितले तेंव्हा त्यांना खूप समाधान वाटले. वेदला काही हवं असेल तर तो आम्हा दोघांपेक्षा ताईकडेच हक्काने मागतो आणि ताई त्याला ते दुसऱ्याच

दिवशी आणून देतात. ताईंचे आमच्या जीवनात मोलाचे स्थान आहे. आज ताई आमच्या जीवनात नसत्या तर आम्ही कुठे असतो, असा विचार मनात येवून जातो. त्यांच्याविषयी लिहिताना शब्द अपुरे पडतात. ताईबद्दल जर मी लिहित बसलो तर लिहितच जावे असे वाटते.

**मारूती आणि सुषमा कुडचीकर**
**मानसपुत्र व सून**

# ४६. मेधाताई: माझी आई

**ताई**, तुमची वयाची साठी पूर्ण झाली, त्याबद्दल अभिनंदन. तुमच्याबद्दल काय लिहावं हे मनात आलं की, आपोआप शब्द लिहिले जातात. तुमच्याबद्दल पुस्तक प्रकाशित केलं जातंय हे एकून खूप आनंद झाला. मनात आलं, आज आपणही ताईंबद्दलच्या आठवणींना उजाळा देऊयात.

मेधाताईंना ताई म्हणण्यापेक्षा त्या माझ्या आईच आहेत. कारण जन्म देणाऱ्यापेक्षा पालनकर्ता खूप महत्त्वाचा असतो. आई-वडील ज्या प्रमाणे आपल्या मुलांचा सांभाळ करतात, अगदी त्याप्रमाणे त्यांनी आमचा सांभाळ केला! केवळ माझाच नाही, तर माझ्या दोन छोट्या बहिणींचाही सांभाळ केला. ताईंची आठवण यायला, आधी विसरावं लागतं. मी त्यांना कधीच विसरणार नाही. आई आपल्यावर किती माया करते, खाऊपिऊ घालते, पोटाशी घेते, गोष्टी सांगते, किती छान असते आई! अगदी त्याप्रमाणे ताईंनी आमचा सांभाळ केला.

मी एका खेडेगावात राहत होते. ताईंनी मला त्यांच्या घरी राहायला आणलं, तेव्हा मी १२ वर्षाची होते. माझ्या घरची परिस्थिती खूप बिकट होती. वडील आम्ही लहान असतानाच वारले. आम्ही तीन बहिणी. आईला आमचा सांभाळ करणे खूप अवघड होऊ लागले. ताईच्या आईने म्हणजे प्रेमाताईंनी आमच्या शिंदेवाडी गावात अन्नपूर्णा महिला मंडळ नावाची संस्था चालू केली. या संस्थेमधून कंपन्यांना जेवण पुरविले जात होते. माझी आई या संस्थेत कामाला लागली. आई आमचा कसा बसा सांभाळ करत होती. काही गरजा अपूर्ण राहत होत्या. परंतु तिने आमचं, शिक्षण कधीच बंद केलं नाही. ही तिची धडपड प्रेमाताईच्या लक्षात आली. त्यांनी माझ्या आईला विचारलं, ''माझी मुलगी पुण्याला असते. तुझी एक

मुलगी तिच्याकडे पाठव, म्हणजे तुझी एक काळजी मिटेल. माझी मुलगी तुझ्या मुलीला सांभाळेल व तिचं शिक्षणही करेल.'' ही कल्पना माझ्या आईला खूप आवडली, आईने लगेच होकार कळवला.

मेधाताई मला घेण्यासाठी आमच्या गावी आल्या, तो दिवस होता १ मे २००२. मेधाताईंनी मला बोलवलं व विचारलं ``तुला पुण्याला यायला आवडेल? माझ्या घरी रहायला आवडेल? मी तुझा सांभाळ व अगदी डिग्री पर्यंत शिक्षण पूर्ण करीन.'' ताईचे शब्द अगदी आजही मला झोपेतून उठवलं आणि विचारलं तरी मी हेच सांगेन. मी चटकन होकार दिला. मी ताईना आवडले हे मला त्यांच्या स्मित हास्यामधून समजले व दुसऱ्या दिवशी सकाळी मी, ताई, दादा पुण्याला आलो.

ताईंना स्वच्छता फार प्रिय. घरात आल्या आल्या सांगितलं, ``तोंड हातपाय धुऊन घे. नाश्ता कर. आपल्याला मंडईत भाजी आणायला जायचंय'' मी मान डोलावली व ताईंनी सांगितल्याप्रमाणे सर्व कामे केली. मे महिना होता, पटकन निघून गेला.

जून महिन्यात शाळा सुरू झाल्या. माझी शाळेची ॲडमिशन इयत्ता नववी मध्ये केली. ॲडमिशन घ्यायला ताई स्वतः माझ्याबरोबर आल्या. अशा शाळेत घातलं की शाळा फक्त मुलींची होती. जेणेकरून मला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. दहावीचं वर्ष खूप महत्त्वाचं असतं, ताईंनी माझ्यासाठी खूप मेहनत घेतली, मला कुठे बाहेर क्लास लावण्यापेक्षा ताईंनी घरी येऊन अभ्यास घेणारी शिक्षिका माझा अभ्यास घेण्यासाठी बोलावली. मला शिकवणारी कॉलेजमध्ये शिकणारी एक मुलगी होती. तिला कमवून शिकवण्याची गरज होती. माझ्या मनात आले ``ताई आपल्यासाठी इतकी मेहनत घेतात, तर आपणही तितक्याच जोमानं अभ्यास करावा.''

परिक्षेच्या काळात पेपर वेळेत पूर्ण होण्यासाठी ताईंनी हातातलं घड्याळ आणलं. दररोज ताई स्वतः गाडी चालवत, मला घेऊन परिक्षा हॉलवर सोडायला व आणायला यायच्या. त्यांच्या या मेहनतीचं फळ त्यांना नक्कीच मिळालं. मला सेकंड क्लास मिळाला हे ऐकून त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी मला सायकल गिफ्ट दिली.

दहावी झाली, आता एस.एन.डी.टी कॉलेज मध्ये ॲडमिशन घेतली. मुलींना कॉलेज म्हटलं की जरा हवा जाते डोक्यात, फॅशन करायची. पण ताईंनी मला वेळोवेळी समजावून सांगितलं. माझं कॉलेज सकाळी ७.३० ला असायचं. कॉलेजला जाताना ताई नेहमी विचारायच्या, ‘‘काही खाल्लं का, डब्बा घेतला का?’’ कधी कधी तर त्या माझी बॅग चेक करायच्या की खरंच डबा घेतला आहे की नाही. मी ‘हो’ म्हटलं आणि डबा बॅगेत सापडला नाही तर त्या रागवायच्या, म्हणायच्या ‘‘मुलींनी आता खायचे दिवस आहेत, खाऊन घ्या.’’ माझे खाण्याचे खूप नखरे होते. ‘‘खाण्याचे नखरे करू नका, पुढे तुमचं लग्न, बाळंतपण व्हायचंय. कसं तुम्ही पेलवणार ? अंगात ताकद पाहिजे.’’

ताईंनी मला कोणत्याही गोष्टी कमी पडू दिल्या नाहीत. आईपेक्षाही जास्त प्रेम, माया, जिव्हाळा ताईंनी दिला. कॉलेज शिक्षण पूर्ण झालं. ताईंनी मला पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी प्रोत्साहन दिलं.

विद्यापीठात शिक्षण घेता घेता त्यांनी मला अन्नपूर्णा परिवारात पार्टटाईम काम करण्यास सांगितलं. माझं कॉलेज दुपारी होतं, त्यामुळे सकाळच्या वेळेत काम व दुपारी कॉलेज अशी सांगड घातली. त्यांनी मला कमवा व शिका हे शिकवलं. कारण पुढे लग्न झाल्यावर अचानक जर जबाबदारी अंगावर पडली तर पेलवता आली पाहिजे. हा त्यांचा दूर दृष्टीकोन होता.

ताईंनी आमच्या प्रत्येक इच्छा पूर्ण केल्या. त्यांनी आम्हाला नाटक दाखवलं, सिनेमा दाखवला, अगदी थिएटरमध्ये घेऊन गेल्या. सगळ्या गोष्टी शिकवल्या. स्वयंपाक असो, नोकरी असो. भाजी आणणे, घरातील सर्व बारीक सारीक गोष्टी, सगळे घरगुती हिशोब कसे लिहायचे, कसा व्यवहार करायचा सगळ्या गोष्टी शिकवल्या. ताईंनी मला पूर्णपणे सक्षम बनवलं, कोणाच्याही आधारांची गरज लागणार नाही असं बनवलं.

ताईं पुढे म्हणायच्या ''नशिबात काय आहे हे, कोणालाही माहित नसतं. कोणावरही अवलंबून राहता कामा नये.'' पुढे माझं लग्न झालं. लग्नात ताईंनी मला कपडे, साड्या, भांडी, दागिने असं दिलं. पण मी ताईकडून एक वस्तू घेतली ती म्हणजे ताईचे 'सखी' हे कवितेचं पुस्तक! त्यांनी स्वतः लिहिलं होतं. मी कधी उदास असले की हे पुस्तक वाचते. हे वाचल्यावर मन प्रसन्न होते.

अशा ताईंबद्दल आठवणी खूप आहेत त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा !

**रूपा प्रवीण पवार**

**मानस कन्या**

# ४७. मेधाताई : आमचं वरदान

**को**ठेही न मागता भरभरून मिळालेलं दान म्हणजे आई! विधात्याच्या कृपेचं निर्भेळ वरदान म्हणजे आई!

ताई हया शब्दात आई हाचं शब्द दडलेला आहे आणि खरं म्हणजे मेधाताई हया आमच्या पालनकर्त्या आईच आहेत. त्यांनीच आम्हाला सांभाळलं, आमचं पालनपोषण केलं, शिक्षण दिलं, चांगले संस्कार दिले.

आमचे वडील लहानपणी वारले. एकटी आई आम्हा तीन बहिणींचा सांभाळ करू शकत नव्हती. अशातच मोठ्या ताईंच्या मार्गाने आम्ही मेधाताईंपर्यंत पोहोचलो. आई प्रेमाताईच्या मुंबईतील अन्नपूर्णात कामाला लागली. मी आणि रूपा ताईच्या इथे राहून काम करू लागलो व शिक्षण घेऊ लागलो.

ताईनी नेहमीच आम्हाला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. तसेच स्वतःच्या पायावर उभे केले. वेळ प्रसंगी त्यांनी आमचा कानही पकडला आहे, कधी एखादा धपाटाही मारला आहे, तर कधी शाब्बासकीही दिली आहे. सांगायचं झालं तर ताईच्या सान्निध्यात कशी दहा बारा वर्षे गेली ते कळलंच नाही. आता माझ्या लग्नाला ७ वर्ष झाली.

त्या दिवशी दादांचा फोन आला, कधी नव्हे तो दादांचा फोन आल्यामुळे क्षणभरासाठी मनात नको नको ते विचार आले. दादांनी बोलायला सुरवात केली, आणि मन शांत झाले. त्यांनी सांगितले, ‘‘तुझी ताई आता म्हातारी झाली. त्यांचा साठावा वाढदिवस आहे. त्यांच्याबद्दल काही लिहू शकशील का?’’ मी क्षणात ‘‘हो’’ म्हणाले. मनात विचार आला ‘‘बरंच झालं, ही संधी मिळाली. स्वभाव लाजरा

असल्याकारणाने मनात वाटून सुद्धा काही गोष्टी मी बोलू शकत नाही. चला हया मार्गांने तरी त्या भावना व्यक्त होतील.''

खरं म्हणजे मी लहानपणापासूनच खोडकर, मस्तीखोर असल्यामुळे सगळे मला आगाऊ म्हणत, आणि आता लग्नानंतरही मला आगाऊच्च म्हणतात. खरं म्हणजे हया आगाऊपणामुळेच मला मेधा ताईंच्या प्रेमाची, आपलेपणाची जाणीव नव्हती. माझी मोठी बहीण रूपा त्यांच्या खूप जवळची वाटे, ती सारखे ''ताई ताई'' करायची म्हणून मला त्यांचं फारसं कधी सोयर सुतक वाटलं नाही. आणि इथेच फसगत झाली. १० ते १२ वर्षे ताई दादांसोबत कशी गेली ते कळलंच नाही. शिक्षण पूर्ण झाले १,२ वर्षे अन्नपूर्णात नोकरी केली. लग्न झाले, मी सासरी आले.

लग्नानंतर घडलेला एक प्रसंग सांगते. गोष्ट तशी छोटीच आहे, पण माझे डोळे उघडून गेली. नविनच लग्न झालेलं, रोज आम्ही एकत्र जेवायचो. एके दिवशी मी अगदी दरवाज्याला दरवाजा असलेल्या शेजारणीच्या घरी तिच्याशी बोलत बसलेले. जेवणाची वेळ झालेली, तरीही मी तिच्याशी बोलतं बसले. बराच वेळ झाला, मग मी आमच्या घरात गेले आणि बघितले तर घरातील सर्वजण जेवत होते. मला खूप वाईट वाटले.

थोड्या वेळाने हयांनी म्हणजे नवऱ्याने सांगितले, ''मी तुला हाक मारणार होतो, पण आईवडीलांमुळे हाक मारू शकलो नाही.'' त्यादिवशी मी खूप रडले, त्यांना माझ्याएवढे रडण्याचे कारण कळत नव्हते, ते मला समजावत होते. थोड्यावेळाने मी त्यांना सांगितले, ''आमच्या ताईं रोज न चुकता आम्हाला म्हणायच्या, 'रूपा, शिल्पा तुम्ही जेवलात का?' जेवलो नसलो, तर म्हणायच्या 'तुम्ही जेवून घ्या' ही गोष्ट त्या रोजच विचारायच्या, अगदी न चुकता! जर

बाहेरगावी गेल्या असल्या, तरी त्यांचा आम्हाला फोन असायचा व फोनवर इतर बोलून झाले की म्हणायच्या, ‘‘तुम्ही जेवलात का?’’ तसेच शाळेत कॉलेजमध्ये जाताना विचारायच्या ‘‘डबा घेतला का? नाष्टा केला का?’’ पण माझ्या आगाऊपणामुळे मी मनातल्या मनात म्हणायचे, ‘‘कशाला विचारतात जेवलात का म्हणून? भूक लागल्यावर जेवणार नाही तर काय करणार?’’

लग्नानंतर घडलेल्या ह्या प्रसंगामुळे शहाणपण आले. मला समजले की, आपण आता ताईंच्या प्रेमाला मुकलो आहोत. ताईंना समजण्यात मी कमी पडले हयाची जाणीव झाली, त्या दिवशी मी माझ्या आईसाठी रडत नव्हते, तर ताईंसाठी रडत होते.

ताईंनी आमच्यात कधीच भेदभाव केला नाही. कोणताच असा पदार्थ नाही की जो नचिकेत दादाने खाल्लाय व तोच पदार्थ आम्ही खाल्ला नाही. घरात श्रीखंड पुरी बनली असली तर आम्हीही तेच जेवलोय, किंवा आज पिठलं भाकरी बनवलीये तर आम्हीही तेच जेवलोय.

आम्ही शाळेत कॉलेजमध्ये असताना पुस्तके घेऊन दिलीयेत, दप्तरे आणलीयेत तसेच महिन्याला पॉकेटमनी द्यायच्या. उन्हाळ्याच्या सुट्टीत एखाद्या सिनेमाचं तिकीट काढून द्यायच्या किंवा हॉटेलमध्ये न्यायच्या. तसेच मुली म्हटल्यावर निसर्ग नियमाप्रमाणे येणाऱ्या मासिक धर्माचे ज्ञानही त्यांनीच दिले. मुली म्हटल्यावर सासरी जाणार, हया अनुषंगाने स्वयंपाक बनवायला शिकवला, स्वच्छता, काटेकोरपणा शिकवला.

खरं सांगायचं, म्हणजे ताईना बघतच मोठे झाल्यामुळे माझी विचार करण्याची पद्धतच ताईंसारखी आहे. त्यांनी दिलेले संस्कार अंगी भिनलेले आहेत. कधी कधी तर मी

माझ्यातच ताईना बघतीये. म्हणजे ताईंनी कधी जातपात मानली नाही, भेदभाव केला नाही. तसेच देव देव केला नाही .मानवता हाच खरा धर्म असे त्या मानतात. तसेच स्त्रीपुरूष समानता. मुलींनी शिक्षण पूर्ण घेऊन घराबाहेर पडावे. चूल व मूल करत बसू नये, हया कट्टर मतांच्या ताई आहेत. माझ्या जडणघडणीच्या काळात ताईंबरोबर राहिल्यामुळे किंबहुना हया गोष्टी मनाला पटल्यामुळे मीही असेच विचार करते व ते स्पष्टपणाने मांडते.

सासूला नास्तिकपणा आवडत नाही त्यामुळे देवाला नमस्कार वगैरे करते आता. तरी काही गोष्टींमुळे म्हणतात, ‘‘ही जरा आगाऊ आहे’’ पण मी विचार करते या गोष्टींमुळे मला आगाऊ म्हणणार असाल, तर आहेच मी आगाऊ मग! ताईचं आमच्या आयुष्यातील महत्त्व खूप मोठे आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा हे मनाने मनाशी जोडलेले नाते खूप मोठे आहे. कधी कधी ताईसोबत असताना त्यांनी लादलेल्या बंधनांचा जाच वाटे, पण आता कळतंय त्यांच्या जागी त्या बरोबर होत्या! आता दोन मुलांची आई झाल्यावर त्या गोष्टी जास्त जाणवतात.

ताईंबाबत इतकं लिहीत असताना दादांना विसरून जमणार नाही. त्यांनीही आमच्यावर वडीलांप्रमाणेच प्रेम केले आहे. कधी कधी ताईंनी खूप रागवल्यावर मिस्कीलपणे आमच्याजवळ येवून काहीतरी बोलून आम्हांला हसवले आहे. वेळप्रसंगी ओरडाही दिला आहे. खरं म्हणजे ताईंपेक्षा जास्त धाक आम्हांला दादांचा होता. पण तो बरोबर होता. ते आम्हाला म्हणत, ‘‘तुम्ही दोघी ताईच्या चमच्या आहात’’ मी मनात म्हणायचे ‘‘अहो काय सांगू, मला सुद्धा भात, डाळीची आमटी आणि काचऱ्या आवडतात तुमच्या सारख्या आणि मला चिकन, मटण बरोबर ताईप्रमाणे पावच आवडतो.’’ तरी पण दादांनी आम्हांला ताईच्या चमच्या म्हणणे म्हणजे गंमत वाटे.

रुपा आणि मी दोघीही संसारात रमलो आहोत. रूपाचा फोन येतो, इतर गप्पा झाल्या की म्हणते, ‘‘आपण ताईंकडे होतो, तेव्हा किती बरं होतं? आपल्याला कशाचंच टेंशन नव्हते!’’ मीही हो म्हणते. अधूनमधून ताईंना फोन चालू असतो. इतर बोलून झाले की त्या म्हणतात, ‘‘कामाचा व्याप खूप वाढलाय, खूप दमायला होतंय’’ हे ऐकलं की खूप वाईट वाटते. आपण कोणताच खारीचा वाटा उचलू शकत नाही हयाची खंत वाटते. कारण मी त्यांना बघितलंय दिवसभराची धावपळ करताना. मुंबईहून जाऊन यायला तर त्यांना १०-१०.३० वाजायचे. उशीर झाल्यानंतरचा त्यांचा दमलेला चेहरा आजही आठवतो. कधी कधी व्हॉटसॅपच्या डिपीचा फोटो झूम करून बघते व त्या किती बदलल्यात याची नोंद घेते. तेवढेच समाधान वाटते.

ताईनी दादांनी दिलेले संस्कार मी कधीच विसरू शकत नाही, विसरणार नाही. ताई आमच्यासाठी आदर्शच आहेत आणि राहतील. मी म्हणणार नाही की ताईंशिवाय आम्ही मोठ्या झालो नसतो! कुठंतरी नक्कीच वाढलो असतो पण मी हे जे काय लिहीतेय ते लिहू शकले नसते एवढे मात्र नक्की! मेधाताईंना उदंड आयुष्य लाभावे!

**शिल्पा गौरव शेलार**

**मानसकन्या**

# ४८. मेधाताई : माझा आधार

**डॉ.** मेधाताई सामंत यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांनी माझ्यासाठी बरेच काही केले आहे. ते थोडक्यात लिहीत आहे.

मी अन्नपूर्णा मध्ये गेल्या बरेच वर्षापासून काम करत आहे. मेधाताईना मी मोठ्या ताईची मुलगी म्हणून बऱ्याच वर्षापासून पाहत आलेली आहे. त्यांचा स्वभाव धाडसी, मेहनती आणि अत्यंत हुशार असा आहे. कुठलेही काम मग ते अवघड असो की सोपे ते त्यात अत्यंत सक्षमपणे हाताळतात व ते पूर्ण करतात.

मी अन्नपूर्णा महिला मंडळ मुंबई मध्ये निराधार महिला म्हणून २००० साली कामाला लागले. परंतु अन्नपूर्णा परिवार मध्ये येऊन मी आज स्वत:च्या पायावर उभी आहे.

मी गेली २० वर्ष मोठ्या ताईसोबत म्हणजेच प्रेमा ताईसोबतच रहात होते. आधी आम्ही वाशीत रहात होतो. तिथे माझ्यासारख्या अनेक अनाथ महिला मोठ्या ताईंनी सांभाळल्या होत्या. आम्ही सर्व जणी एका कुटुंबातील असल्याप्रमाणे रहात होतो. पण काही अडचणी सुरु झाल्या. अन्नपूर्णा महिला मंडळाची पैशाची स्थिती ठीक नाही असे आम्हाला समजू लागले. आमचे छोटेसे मानधन सुद्धा वेळेत मिळेना.

तेव्हाही म्हणजे १५ वर्षांपूर्वी, मेधाताई धावून आल्या. त्यांनी पैशाच्या अडचणी कशा सोडवल्या, मला काही सांगता येणार नाही. पण आमचे पगार वेळेत मिळू लागले. पगार वाढले. पी. एफ. पण मिळू लागला. मी व मंगलताई संस्थेतच राहिलो. बाकीच्या महिलांपैकी ज्या थकल्या होत्या, त्यांना मेधा ताईंनी चांगली पुंजी देऊन रिटायर केले. वैशूताई, रेखाताई, गोसावी सर, निलेश भाऊ यांच्या सोबत काहीकाही

महिला शिरवळ, दादर व इतर ठिकाणी कँटीन चालवतात. त्यांना सुद्धा मेधा ताईंनी मदत केली.

मेधाताईंनी सांगितले म्हणून मी प्रेमा ताईंसोबत पुण्याला आले. लुनावत कॉम्प्लेक्स मध्ये मी प्रेमा ताईंसोबत राहून गेली १५ वर्षे त्यांची सेवा केली. तेव्हा सुद्धा अन्नपूर्णाची स्टाफ म्हणून मेधाताई माझ्याकडे लक्ष देत. माझी विचारपूस करत. मेधाताईंनी मला सांगितले होते,''तू माझ्या आईची शेवटपर्यंत सेवा कर. मी तुला शेवटपर्यंत साथ देईन.''

मला मोठ्या ताईंची शेवटपर्यंत सेवा करता आली नाही. ''ताईंना आता नर्स ठेवणार. तू तुझ्या घरी जा'' असे मला १.५ वर्षांपूर्वी छोट्या ताईंनी सांगितले, तेव्हापासून मी मेधाताईंकडे रहाते. अन्नपूर्णाच्या सुवास्तू मध्ये मावशी म्हणून काम करते.

मेधा ताईंनी माझ्यासाठी पुण्यासारख्या महागड्या शहरात एक वन.बि.एच.के फ्लॅट घेऊन दिला आहे. त्यासाठी मला अन्नपूर्णातून हाऊसींग लोन दिले. मी रिटायर्ड होईन तेव्हा माझे घर, पी. एफ. असेल. माझ्या भावाला अन्नपूर्णा मध्ये सिक्युरिटी म्हणून नोकरीला घेतले.

माझ्या भावाचा संसार हा सुरळीत चालला आहे. माझे घर झाले, फक्त आणि फक्त मेधा ताईंमुळेच! मी त्यांची शतशः ऋणी आहे! माझ्यावर केलेल्या या सर्व उपकारांची परतफेड मला माझ्या या जन्मी करता येणार नाही! पुढील वाटचाली साठी मेधा ताईंना शुभेच्छा.

**शारदा पाटील**

**मावशी , अन्नपूर्णा परिवार**

# ४९. मेधाताई माझे आदरस्थान

**मी** मेधा ताईच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून गेली ७ वर्षे कार्यरत आहे. मला त्याच्या विषयी लिहिणे म्हणजे मेरू पर्वत चढण्यापेक्षा अतिशय कठीण आहे. तरी देखील लिहिण्याचा प्रयत्न करत आहे. मेधाताईं विषयी लिहिणे, म्हणजे एका ज्ञानाच्या सागराला गवसणी घालण्यापेक्षा मोठी गोष्ट!

मी अन्नपूर्णांमध्ये १२ ऑक्टोबर २०११ रोजी रुजू झालो. माझा आधीचा अनुभव फक्त गाडी चालवणे एवढाच होता. माझा इंटरव्ह्यू थेट मेधाताईंनीच घेतला. त्यावेळी त्यांनी मला काही प्रश्न विचारले.

१.गाडी किती वर्षापासून चालवता?
२.पहिले काम सोडण्याचे कारण?
३.पहिल्या मालकाचा नंबर?
४.तिथे किती वर्षे काम केले?
५.घरची परिस्थिती?

या पाच प्रश्नांमध्ये ड्रायव्हरची सर्व माहिती मिळते. हे फक्त ज्ञानी व्यक्तीच विचारू शकते. हे मला समजले.

मला या ठिकाणी काम करून जास्त अनुभव आणि भरपूर शिकायला मिळणार याची मलाही खात्री झाली. मी अन्नपूर्णामध्ये ड्रायव्हर म्हणून नियुक्त झालो. काम करत असताना मला मिळणारे सेवासुविधा, वेतन यांमुळे मी खूप आनंदी होतो. कारण पहिल्यांदाच मला कार्मामध्ये वेतनाबरोबर इतर सेवासुविधा मिळणार होत्या. म्हणून मला कामात जास्त रस वाटू लागला. नंतर माझ्या कामात एक टर्निंग पॉईंट आला तो म्हणजे मी मुंबईला असताना मला अश्विनी ताईंचा फोन आला. ती तारीख मला अजून आठवते. ती म्हणजे ६ मे २०१३. अश्विनी ताईं मला म्हणाल्या 'उदयापासून तुम्हांला मेधाताईंच्या गाडीवर नियुक्त केले आहे' ही बातमी

ऐकून मला खूप आनंद झाला. तरीही मला सुरुवातीला विचार पडला, ‘एवढ्या महान व्यक्तीच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करणे मला जमणार की नाही?’ मी थोडा गोंधळात होतो. कारण मला जबाबदारी म्हणून वेळेचे बंधन, कामाच्या जबाबदाऱ्या या जमतील की नाही असे वाटत होते. परंतु मेधाताईंनी लहानातली लहान गोष्ट मला शिकवली. ना सर्वकाही त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले.

आज मी अन्नपूर्णांमध्ये ताईंच्या मार्गदर्शनाखाली काम करतो. माझ्या जीवनात आज मी स्थिरस्थावर झालो आहे. कुटुंबाची सर्व परिस्थिती सुधारली. आज आम्ही सहकुटुंब आनंदित आहोत. याचे सर्व श्रेय मी ताईंच्या महान व्यक्तिमत्वाला देत आहे.

छोट्यात छोटी वस्तू खरेदी कुठून, कशी, का करावी ह्यापासून तर ड्रायव्हींग मधील सुद्धा माहिती ताईंनी दिली. त्यांना ड्रायव्हींग छान येते, हे ही कळले.

ताईंनी इतरांसाठी म्हणजे महिला सक्षमीकरणामध्ये मोलाचे कार्य केले आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी अन्नपूर्णांसाठी दिले. आज कित्येकांची कुटुंबे स्थिर स्थावर झालेली आहेत. ते मेधाताईंनी दिलेल्या मदतीचा हातामुळेच. म्हणजे रोजगार, कित्येकांना चांगली कामे उपलब्ध झाली आहेत. व्यवसाय चालू झाले आहेत. कर्जाच्या स्वरुपात भांडवलाची मदत उपलब्ध झाली आहे. कर्जाबरोबर त्यांनी सर्वांना आर्थिक शिस्त सुद्धा शिकवली आहे. मेधाताई सोबत मी अनेक ठिकाणी जातो तेव्हा सर्व लोक त्यांचा आदर करतात, हे पाहून मला अभिमान वाटतो.

या सर्वांतून मी एकच सांगतो, की एवढ्या महान व्यक्तिमत्वासोबत काम करायला मिळणे हे माझे भाग्यच !

**अविनाश शंकर येनपुरे**

**ड्रायव्हर**

# ५०. आपुलकीने चौकशी करणाऱ्या ताई

**सौ.** मेधाताई सामंत पुरव यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

खरे तर त्यांच्याबद्दल लिहिण्या इतपत माझी उंची नाही. तरी देखील त्यांच्या बद्दलचे माझे छोटेसे मनोगत.

मेधाताई व माझा परिचय जवळपास वीस-बावीस वर्षाचा आहे. मी मेधा ताई यांच्या मिस्टरांच्या नासान कार्यालयात काम करतो आणि त्या निमित्ताने मला त्यांच्या समाजकार्याचा थोडाफार का होईना,परिचय आहे.

ताई ह्या स्वत: उच्चशिक्षित असून, शिवाय पतिचा उत्तम व्यवसाय असून देखील आरामाचे आयुष्य न जगता बँकेतील नोकरीचा त्याग केला. स्वत: ला समाज सेवेसाठी, विशेष करून गरीब स्त्रियांच्या मदतीसाठी व त्यांना स्वबळावर उभे करण्यासाठी झोकून दिले आहे. हा वारसा त्यांनी आपली आई पद्मश्री प्रेमा ताई पुरव यांच्याकडून घेतला आहेत.

स्वत:चा संसार व समाजसेवा या दोन्ही गोष्टी खरे तर तारेवरची कसरतच म्हणावी लागेल. पण या दोन्ही गोष्टी त्या आजही यशस्वीपणे पार पाडत आहेत.

माझ्या आणि त्यांच्या नात्याबद्दल सांगायचे झाल्यास त्या माझी व माझ्या कुटुंबाची आपुलकीने चौकशी करतात व माझ्या प्रत्येक सुखदु:खात सामील होतात. विशेष म्हणजे माझ्या मुलीला दरवर्षी तिच्या वाढदिवसानिमित्त भरभरून शुभेच्छा देखील देतात.

मेधाताईंचे मार्गदर्शन, सहाय्य सर्व दुर्बल व असहाय्य स्त्रियांना बळ देऊन जाते.

त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा!

**प्रमोद कदम**
**नासान**

# ५१. ताई : ज्ञानवृक्ष

**मे**धाताई म्हटलं की, लगेच डोळ्यासमोर एक मूर्ती उभी राहते. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेली, प्रत्येक गोष्टीचा १० बाजूंनी विचार करणारी, कायमच संकटाकडे संधी म्हणून बघणारी, प्रत्येकामधील कॅपिसिटी ओळखून त्याला पुश करणारी आणि सर्वांना सोबत घेऊनच पुढे जाणारी पर्सनॅलिटी.....

बँक गरीबांच्या दारात असायला हवी, हे ताईंचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले आणि अन्नपूर्णा परिवार उभा राहिला. लाखो मेंबरना याचा फायदा झाला, पण एकाची मालकी नसली पाहिजे या विचाराने को. ऑपरेटिव्हचेच मॉडेल त्यांनी खूप अभ्यास करून निवडले.

मेधाताईंचे ध्येय खूप स्पष्ट, नेमके असल्यामुळे कुठलेही काम प्रोजेक्ट बेसिसवर, परकीय ग्रँटवर आधारित त्यांना कधी आवडले नाही. म्हणून तर सस्टेनेबल पाळणाघरे त्या काढू शकल्या.

गरीबातील गरीब महिलांना कर्ज, बचत, आरोग्य विमा, कुटुंब व जीवन विमा, आपत्तीच्या काळात आर्थिक मदत, शैक्षणिक शिष्यवृत्ती, पाळणाघरे आणि पेन्शन असा कुटुंबातील लहान मुलापासून तर वयस्कर व्यक्तीपर्यंतचा विचार करून या प्रकल्पांना आकार दिला आणि सर्व सस्टेनेबल मॉडेल बनवले. जेणे करून बाहेरिल ग्रँट, फंडवर नंतर अवलंबून रहावे लागणार नाही.

आपण आजचा, फार तर उद्याचा, एक वर्षापर्यंतचा विचार करतो, मेधाताई मात्र ५ वर्षांनी आणि २५ वर्षांनी काय असेल याची चाहूल घेऊन आजची पाऊले उचलतात आणि हेच खऱ्या लीडरचे गुण आहेत.

मायक्रोफायनान्स, मायक्रो इन्शुरन्स फिल्डमध्ये आज खूप आदराने मेधाताईंकडे पाहिले जाते. यामध्ये पुढे प्रसार व ॲडव्होक्सी करून फक्त महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये हे मॉडेल राबवण्याबद्दल त्या आग्रही आहेत.

सभासदांना भेटले की मेधाताईंना उर्जा मिळते असं त्या नेहमी म्हणतात आणि सभासदांना मेधाताई त्यांच्या आई वाटतात. मला असं वाटतं की, हे सगळं जे नातं आहे ते व्यवहारा पलिकडचं आहे. पण ताईंनी नातं व व्यवहार याची मोट खूप छान बांधली आहे.

माझे आणि मेधाताईंचे नाते शब्दात मांडणे खरं तर कठीण आहे. मेधाताईचे माझ्या आयुष्यातील स्थान अनमोल आहे. एका सर्वसामान्य व्यक्तीला घडवण्यासाठी, त्याला आकार देण्याचे सामर्थ्य, कर्तृत्ववान व्यक्तीमध्येच असते. ते सामर्थ्य असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. मेधा पुरव सामंत, आमच्या मेधाताई, ज्यांनी मला घडवलं, मी आज जी काही आहे ती त्यांच्यामुळेच आहे.

२००३ मध्ये अन्नपूर्णामध्ये पेपरमधील जाहिरात पाहून आले आणि कोऑर्डिनेटर या पदावर जॉईन झाले. त्या आधी एम एस.डब्ल्यु करून ''नारी समता मंच'' मध्ये कामाचा थोडासा अनुभव घेतला होता. तेव्हा कर्वेनगर मध्ये पत्र्याच्या झोपडीत ऑफिस होते,व अन्नपूर्णात फक्त ८, १० स्टाफच होते. मी कोऑर्डिनेटर, सिस्टीम ऑडीटर, असिस्टंट मॅनेजर हे काम करत करत २०१३ पासून सिनियर मॅनेजर या पदावर काम करत आहे.

या १७ वर्षाच्या कार्यकाळात खूप खडतर, वाईट, चांगले प्रसंग आले त्या प्रत्येक प्रसंगात कसे वागावे, कसा विचार करावा, कसे निर्णय घ्यावेत हे मी ताईंकडून शिकले. स्वतःवर संयम कसा ठेवावा आणि नुसते गोड न बोलता

परखड पणे स्वतःचे ठाम पणे मत कसे मांडावे हे ही त्यांनीच मला शिकवले. माझ्यामध्ये अंतःर्बाह्य खूप बदल झाले किंबहुना मेधाताईंनी माझ्याकडून ते बदल माझ्यात करवून घेतले आणि मी ते करू शकले.

माझे स्वतःचे गुण, दोष, कमतरता याची जाणीव स्वतःला न होता मेधाताईंना ती 'दिसत' होती त्यामुळे मला माहित नसलेले गुण ताईंच्या चाणाक्ष नजरेने हेरले. त्यांनी मला माझ्या विचारांना, माझ्या दृष्टीकोनाला, माझ्यातील नेतृत्व गुणांना आकार देण्यासाठी खूप कष्ट घेतले, अजूनही घेत आहेत.

''माझी अन्नपूर्णा'' ही भावना आणि कायम अन्नपूर्णाचाच विचार ही भावना आज माझ्या नसा-नसात भिनली ती फक्त मेधाताईंच्या मुळेच!

ताईंचे प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य, प्रत्येक कृती ही विचारपूर्वक असते, त्यांच्या प्रत्येक बोलण्यामागे खूप मोठा अर्थ असतो. सहज बोलून गेले असे कधीच त्यांचे नसते. नोटाबंदीचा काळ असो वा करोनामुळे संचारबंदी असो मेधाताई अशा कठीणात कठीण प्रसंगात ठामपणे उभ्या राहून अन्नपूर्णाची संपूर्ण नौका सांभाळत असतात. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळणे हे माझे पूर्वसंचितच म्हणायला हवे. एक उत्कृष्ट लीडर कसा असावा हे त्यांच्याकडून शिकत आहे.

ताईंच्या बाबतीतील एका अविस्मरणीय प्रसंगाचा मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. २००९ साली सेवा बँक अहमदाबाद कडून 'ताईंना बेस्ट मायक्रो फायनान्स लीडर' व 'ताईंनी घडवलेली एक लीडर' असे ॲवॉर्ड द्यायचे होते. अन्नपूर्णाच्या सर्व स्टाफ मधून मेधाताईंनी माझे नाव निवडले. त्यांच्या सोबतच हा सन्मान मला 'पद्मभूषण इलाबेन भट'

ह्यांच्या हस्ते मिळावा हा माझ्या आयुष्यातील अतिशय अभिमानाचा प्रसंग होता व कायम राहील!

घर आणि ऑफिस याचा कसा बॅलन्स करावा हे ही मेधाताईंकडून शिकले. ''क्वॉलिटी टाईम'' ही संकल्पना ताईंनी शिकवल्यापासून माझ्या कुटुंबाला तक्रार करण्याची संधी मी दिली नाही.

माझ्या कुटुंबातील प्रत्येक लहान गोष्टी त्या आवर्जून विचारतात, लक्षात ठेवतात आणि असे त्या अन्नपूर्णाच्या प्रत्येक स्टाफबाबत करतात. यावरून स्टाफबाबतची काळजी, प्रेम दिसून येते. प्रत्येक स्टाफना प्रत्येक प्रसंगात मार्गदर्शन हे त्यांच्याकडून असतेच.

ताईंसोबत अहमदाबाद, दिल्ली, इंडोनेशिया अशा देश विदेशातील कॉन्फरन्सेसना जाण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यांचे प्रेमळ, काळजी करणारे, आपुलकीचे रूप आणि सोबत ज्ञान देणाऱ्या, मला स्वावलंबी बनवणाऱ्या ताई दिसल्या. अगदी सहज साधी वाटणारी गोष्ट पण ती जाणीवपूर्वक केली तर किती आनंद मिळू शकतो. हे मी त्यांच्या कडून शिकले. भावनांना फार मोल असते, पण भावनेला विचारांची जोड नसली तर निर्णय चुकतात. हे ही त्यांच्याकडून खूप वेळा शिकले म्हणून विचारपूर्वक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांनी आम्हाला शिकवून सक्षम केले आहे.

अन्नपूर्णा परिवाराला ''उत्कृष्ट कम्युनिटी ॲान्ड मायक्रो फायनान्स संस्थेचा'' पुरस्कार २०१४ मध्ये मिळाला. त्यातच कॅनडाला जाऊन तीन आठवडयांचा मॅनेजमेंट कोर्स करण्याची संधी होती. ती ताईंनी मला दिली.

ताई हया ज्ञानाचा पाझरता झरा आहेत. त्या सतत ज्ञान देतच राहतात. अशा मेधाताईंच्या सावलीत मला घडण्याची संधी मिळाली. एका वटवृक्षावर जशी अमृतवेल

असते तशी ताईंच्या सान्निध्यात, सहवासात मी घडत आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा आमच्या सर्वांच्या लाडक्या मेधाताईंना साठाव्या  वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**उज्वला वाघोले**

**सिनियर मॅनेजर,अन्नपूर्णा परिवार**

# ५२. परिसस्पर्श

**मे**धाताई विषयी लिहायला मिळावे हे मी माझे अहोभाग्य समजते आणि ही संधी मला दिल्याबद्दल या उपक्रमात सामिल असलेल्या कमिटीचे मी आभार मानते.

मेधाताईंसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा सहवास लाभणे हेच माझे सौभाग्य आहे.

मी लॉ ग्रॅज्युएट, अगदी सनद घेतलेली, कोर्टात ३ वर्षे प्रॅक्टीस केलेली ॲडव्होकेट म्हणा ना.... पण स्थिर उत्पन्नाच्या शोधात नोकरीकडे वळले. पहिले दिड वर्षे ''सुसंवाद'' ह्या सामाजिक संस्थेत समुपदेशनाचे काम केले. मग २००६ साली अन्नपूर्णामध्ये दत्तवाडी या ब्रँच ला ब्रँच मॅनेजर म्हणून रूजू झाले.

मी इनफॉर्मल सेक्टर मधून फॉर्मल सेक्टरमध्ये येताना अन्नपूर्णाचे ॲटेंड केलेले २ दिवसांचे ट्रेनिंग पुरेसे होते. सिस्टीम, सभासद, स्टाफ व हायरारकी समजून घेत मी मायक्रो फायनान्स शिकत होते. माझा हा प्रवास १० महिन्यांचाच होता. सहकारी व्यक्तीसोबत संघर्ष झाला व मी अन्नपूर्णा सोडण्याचा निर्णय घेतला. ताईंनी काउन्सेलिंग मध्यस्थी केली. पण माझा निर्णय पक्का होता. मात्र मेधाताईंबरोबरच्या शेवटच्या भेटीत त्यांनी मला त्यांचा ऑटोग्राफ देऊन दिलेले 'क्रांतीकारी अन्नपूर्णा' हे पुस्तक मला खूप जास्त प्रभावित करून गेले.

एक वर्षाच्या गॅपनंतर परत अन्नपूर्णातून फोन आल्यावर अन्नपूर्णामध्ये रिजॉईन होण्याचा निर्णय घेतला, हा अन्नपूर्णा व ताईंसोबतचा 'ऋणानुबंध' च आहे.

२००८ मध्ये मी परत ज्युनिअर मॅनेजर म्हणून रूजू झाले. २०१२ मध्ये असिस्टंट मॅनेजर झाले. ताईंबरोबर घालवलेल्या या १३ वर्षाच्या कार्यकाळात खूप काही शिकले.

ताई ध्येयवादी आहेत, तत्वनिष्ठ आहेत. शिस्तप्रिय आहेत. त्यांचे भाषांवर प्रभुत्व आहे, उत्तम संभाषण कौशल्य त्यांच्यात आहे.

ताईंचे व्यक्तिमत्त्व खूप मोठे आहे पण त्यांचे पाय मात्र आजही जमिनीवरच आहेत. प्रत्येक स्टाफ विषयी, त्यांच्या घरातील व्यक्तिंविषयी ताईंना संपूर्ण माहिती आहे.

कोणताही प्रश्न वर-वर न हाताळता प्रश्नाच्या मुळाशी जाऊन प्रश्न मुळापासून सोडवणे व परत हा प्रश्न उपस्थितच होऊ नये यासाठी सिस्टीम तयार करणे हे मी ताईंकडून शिकले व अजूनही शिकत आहे.

ताईंच्या सहवासात आल्यापासून आर्थिक दृष्टया बेशिस्त असलेल्या माझ्या कुटुंबाला मी शिस्तीत आणू शकले. उद्याचा पैसा आज वापरायचा नाही, तो उद्यासाठीच ठेवायचा हे तंत्र मला घरच्यांना पटवून सांगता आले. ताईंनी मला वैयक्तिक आयुष्यात खूप मदत केली. विशेषतः श्लोक (माझा मुलगा) स्पेशल चाईल्ड आहे हे समजल्यावर ताईंनी स्वतःचे मूल असल्यासारखी ऑटीझमवर माहिती वाचून माझ्यापर्यंत पोहचवली. प्रत्येक प्रसंगात खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. ताईंचा प्रचंड आधार वाटतो.

माझ्याकडे लिखाणाची थोडी कला आहे, हे ताईंच्या लक्षात आल्यावर अन्नपूर्णाच्या छोटया व्हिडिओ, नाटकात गाणी, संवाद लिहायला ताई  मला प्रोत्साहन देतात. व स्वतः त्याचे हिंदीत भाषांतर सुद्धा करतात.

ताई परिस आहेत आणि त्यांच्या परिसस्पर्शाने या दगडाचं सोने होतंय असे म्हटले तरी वावगं ठरणार नाही.

ताईंच्या वाढदिवसानिमित्त खास ४ ओळी,

'कर्तव्यदक्ष आयुष्य आहे,

अखंड ध्येय, अनंत इच्छा,

लाख गुणांनी उजळो तुमचे जीवन

वाढदिवसाच्या तुम्हास शुभेच्छा'

**आरती शिंदे**

**असिस्टंट मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार**

## ५३. परिवार जोडायला ताईंकडून शिकले

**म**ला लहान पणापासून नेहमी असा प्रश्न पडायचा, हे जे मोठ्या व्यक्तिमत्वाचे लोक असतात, ते एवढे मोठे कसे होतात? असे त्यांच्यात वेगळे काय असते, जेणे करून ते त्यांच्या जीवनात एवढे काम करतात.

मला नेहमी अशी व्यक्ती माझ्या आयुष्यात असावी, असे वाटायचे. बारा ऑगस्ट २०१० ला अन्नपूर्णाच्या डॉ.मेधाताईंच्या रूपाने अशी व्यक्ती मला मिळाली.

त्यांचा कामाप्रती प्रामाणिकपणा, त्यातील तळमळ, कामात झोकून देणे या सर्व विशेष गुणांनी मी त्यांच्याकडे आकर्षली गेले. आज १० वर्षात मी त्यांच्याकडून खूप काही शिकले आणि ते मांडण्याची संधी मला दादा, तुमच्यामुळे मिळाली म्हणून मी तुमची ऋणी आहे.

ताईंचा शिस्तबद्धपणा, एखाद्या गोष्टीचा ध्यास घेणे, प्रश्नांच्या मुळापर्यंत जाणे, प्रत्येक गोष्टीचे ज्ञान घेणे, आयुष्यात माणसांना जोडणे, त्यांच्या या सर्व गुणांनी मी प्रभावित झाले, आणि रोज होत असते. त्या मोठ्या मिटींगला मेंबरना जेव्हा भेटतात तेव्हा तो क्षण बघण्यासारखा असतो. त्या मेंबरना किती जीव लावतात, यातून मी माझ्या आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आणि माझ्या कुटुंबातील काही काळ दूर गेलेल्या सदस्यांना पुन्हा एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. यातून माझे कुटुंब पुन्हा एकत्र आले.

ताई, तुम्हाला ६० व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा आणि पुढे तुम्ही अशीच प्रेरणा कायम द्यावी.

**अश्विनी भरम**

**ॲडमिन मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार, पुणे**

# ५४. गुरु माऊली

ताई म्हणजे माझ्या आयुष्यात आलेली माझी दुसरी आई.

२०११ मध्ये मी अन्नपूर्णा परिवारामध्ये आले आणि इथे सामावून गेले. दर वर्षी ताई मला नव्याने कळत गेल्या.

शिस्तबद्ध, नेहमी कामासाठी तत्पर, भविष्याचा विचार करून आजचे काम करणाऱ्या ताई मला नेहमी दिसतात. पैशाचे नियोजन कसे करावे, निर्णय कसे घ्यावे, त्यासाठी काय अभ्यास करावा हे सर्व मी ताई कडून शिकले.

आयुष्यात कोणत्याही अडचणी आल्या तरी त्यावर न डगमगता मार्ग कसा काढावा व ती अडचण हळूहळू कशी सोडवावी. हयांचे मार्गदर्शन ताईकडून खूप छान मिळते.

ताईचे माझ्या आयुष्यामध्ये गुरूचे स्थान आहे. ज्या शिष्याला नेहमी न थकता,न कळवळता, समजेपर्यंत शिकवण्याचे काम करतात.

ताईंच्या बरोबर काम करताना खूप अभिमान वाटतो व ताईंच्या कार्यामध्ये आपला पण खारीचा वाटा आहे हया बद्दल मन भरून येते.

अशा नेहमी गरीबांचा विचार करणाऱ्या, त्यांच्या भविष्याबद्दल चिंतेत असणाऱ्या, त्यांना सर्व सुविधा कशा मिळतील हया बद्दल काम करणाऱ्या ताईंना माझा नेहमी पाठिंबा राहील.

ताईंना ६० व्या वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा. ताई तुम्हाला उदंड आयुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सविता भोर**

**ॲडमिन मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार, मुंबई**

# ५५. मेधाताई: प्रोफेशनल व पर्सनल जीवनाचा समतोल

**अ**न्नपूर्णा परिवाराच्या मेधाताई यांचे मायक्रो फायनान्स व मायक्रो इन्शुरन्स क्षेत्रातील कार्य खूप मोठं आहे. मी त्यांच्या बद्दल काही लिहीणे म्हणजे, लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखे आहे. तरीपण अन्नपूर्णा परिवाराच्या सी.एम.डी. व एक माणूस म्हणून मला त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. त्या मला जशा भावल्या, ते मांडण्याचा मी केलेला हा प्रयत्न.

मला मेधा मॅडमची ओळख प्रत्यक्ष त्यांना भेटायच्या आधीच झाली. मी सामंत सरांच्या नासान मेडीकल इलेक्ट्रॉनिक प्रा. लि. या कंपनीत १९९८ साली सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून जॉईन झाले. सामंत सरांकडून मेधा मॅडमच्या कामाबद्दल नेहमी ऐकायला मिळायचे. सामंत सरांना त्यांच्याबद्दल असणारे कौतुक आणि अभिमान पदोपदी जाणवायचा.

माझी मेधा मॅडमशी पहिली भेट दिवाळीत झाली. नासान मधील सर्व मुलींना त्या दरवर्षी दिवाळीत एक दिवस जेवायला बोलवायच्या. त्यांच्या एवढ्या बिझी शेड्युलमधून त्या आम्हाला एक दिवस द्यायच्या व प्रत्येकीची आपुलकीने चौकशी करायच्या.

एका वर्षी आम्ही नासान मधून कार्डीओलॉजी कॉन्फरन्स साठी कोलकत्याला चाललो होतो. मेधा मॅडम पण त्यांच्या कामासाठी कोलकत्याला चालल्या होत्या. तेव्हा त्या आमच्या नासान च्या टीम बरोबर ट्रेन मध्ये होत्या. ''ट्रेन मध्ये का?'' तर मेधा मॅडम म्हणाल्या की, 'माझ्या संस्थेला विमानाचं तिकीट परवडत नाही!' इतके कौतुक वाटले मला त्यांचे आणि आदरही!!

पुढे २०११ साली त्यांच्या अन्नपूर्णा परिवार या संस्थेसाठी सॉफ्टवेअर डेव्हलप करण्याची संधी चालून आली. सुरूवातीला मी स्वाती पांडे आणि स्वाती पणदरे अशा तिघींनी या सॉफ्टवेअर वर काम करण्यास सुरूवात केली. सॉफ्टवेअर रिक्वायरमेंट मिटींग च्या निमित्ताने मेधा मॅडमशी खूप वेळा संवाद होऊ लागला. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व खूप जवळून बघता आले, अनुभवता आले. माझी सॉफ्टवेअर ची टीम हळूहळू तीन वरून बारा जणींची झाली, आणि मेधा मॅडम आमच्यासाठी मेधाताई झाल्या.

मेधाताईंनी आपल्या आईचा, पद्मश्री प्रेमाताई पुरव व वडील, कॉ. दादा पुरव यांचा समाजसेवेचा वारसा पुढे चालवत, गोर गरीब महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याचे काम हाती घेतले. या महिलांना मायक्रोलोन्स देताना त्यांची बचत कशी वाढेल हे बघितले. पुढे गरजेप्रमाणे मायक्रो इन्शुरन्स सेवाही सुरू केली. महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण करतानाच त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती कशी सुधारेल हा नेहमी त्यांचा दृष्टीकोन असतो.

एक सामाजिक संस्था असूनही ती नेहमी सेल्फ सस्टेन असली पाहिजे, हा त्यांचा आग्रह. टेक्नॉलॉजी चा योग्य वापर संस्थेच्या कामासाठी करण्याबद्दल त्या नेहमी आग्रही असतात.

२०१४ साली संस्थेला 'उंच माझा झोका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या नेहमी म्हणतात, 'आपण पुरस्कारांसाठी काम नाही करायचे.' पण त्यांच्या प्रामाणिक व चांगल्या कामामुळे असे अनेक पुरस्कार त्यांना आणि संस्थेला मिळाले आहेत.

कामाच्या बाबतीत कडक शिस्त व प्रत्येक कामाचे प्लॅनिंग हा त्यांचा शिरस्ता आहे. त्याचबरोबर त्यांना अन्नपूर्णा परिवारातील प्रत्येक व्यक्तीबद्दल आपुलकी पण आहे. प्रोफेशनल आणि पर्सनल लाईफ चा बॅलन्स खूप छान

सांभाळताना मी त्यांना पाहिलं आहे. इतक्या वर्षाच्या त्यांच्या सहवासामधून मला खूप काही शिकायला मिळाले आहे आणि पुढेही मिळत राहील. मेधाताईंना त्यांच्या पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा.

**मंजिरी परांजपे**
**सॉफ्टवेअर डिपार्टमेंट हेड**
**अन्नपूर्णा परिवार**

# ५६. ताईंच्या ज्ञानाचा समाजाला फायदा व्हावा

**म**ला अन्नपूर्णात तेरा वर्षे झाली. मी माविम मध्ये समूह संघटीका म्हणून बरीच वर्षे काम केले होते. ताई प्रत्येक व्यक्ती मधील चांगले गुण ओळखून त्याप्रमाणे त्या गुणांचा उपयोग करून त्या व्यक्तीला काम देतात. जे गुण चांगले नाहीत, ते स्पष्टपणे सांगून ते दुर्गुण कशा प्रकारे कमी करू शकतो, हे सांगतात. फक्त शिक्षणाला महत्त्व देत नाहीत, तर त्याच बरोबर त्या व्यक्तीतले इतर गुण पाहतात.

२००९ मध्ये जेव्हा माझ्या घरात खूप प्रॉब्लेम होते. तेव्हा माझी ऑफिसमध्ये खूप चिडचिड व्हायची, स्टाफ बरोबर अति कडक वागले जायचे. ताईंनी माझ्याशी वैयक्तिक बोलून समजून घेतले व मला त्यांच्या ओळखीच्या काऊन्सेलरकडे काऊन्सेलिंगसाठी पाठवले. त्यानंतर कळले मला, घरी व ऑफिसमध्ये समोरच्याकडून अपेक्षा ठेवल्यामुळे चिडचिड होते. माझ्यामध्ये हळूहळू बदल झाला. आई जशी मुलाला चांगल्या गोष्टींसाठी सपोर्ट करते व वाईट सवयी समजून सांगते व वेळ पडल्यास शिक्षा करते, तसेच ताई करतात. त्यामुळे प्रत्येक स्टाफला ताईंनी काही बोलले तर अवघड वाटत नाही. ताई रागाने बोलल्या तरी नंतर लगेच पुन्हा समजावतात.

ताईंच्या मुळे मला स्वाभिमानी जीवन जगता आले व माझ्या वैयक्तिक जीवनातही मानाने जगता आले. भविष्यात अन्नपूर्णा अशीच पुढे जाण्यासाठी ताईंचा वयानुसार सहभाग कमी होणार आहे. हे त्यांनी आम्हाला समजून सांगितले. प्रत्येक काम नीट होण्यासाठी त्या प्रत्येकाला घडवतील. जे स्टाफ तसे घडणार नाहीत, तिथे बदल करून अन्नपूर्णा भविष्यात पुढे जाईल हे ताईंनी आम्हाला स्पष्ट सांगितले आहे. अन्नपूर्णा स्थिर होण्यासाठी प्रत्येक अडचणी व प्रश्न स्टाफला पडतील, त्यावर रिसर्च करून निर्णय घ्यायचे, बदल करायचे.

जेणे करून पुढे काम करायला सोपे जाईल. भविष्यात प्रत्येक गोष्टीत ताईंना विचारण्याची गरज भासणार नाही.

ताईंनी आत्तापर्यंत अन्नपूर्णासाठी खूप जास्त वेळ दिला व आम्हाला त्यांच्या ज्ञानाचा उपयोग झाला. त्यांची विषय समजून सांगण्याची पद्धत खूप चांगली असते. आता त्यांनी लिखाण करावे. जेणे करून भविष्यात अन्नपूर्णा व्यतिरिक्त सर्वांनाच त्याचा उपयोग होईल व संपूर्ण समाजाला ताईंच्या ज्ञानाचा फायदा होईल.

**मोहिनी निगडे**
**डेप्युटी मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार, पुणे**

# ५७. सोशल वर्कर ते डेप्युटी मॅनेजरः मेधाताईंच्या सावलीतील प्रवास

**मी** अन्नपूर्णात ९ जुलै २००४ मध्ये जॉईन झाले. मी एम.एस.डब्ल्यु. करत असताना अन्नपूर्णामध्ये एक महिना ब्लॉक प्लेसमेंटसाठी आले होते. माझा एम.एस.डब्ल्यु. चा रिझल्ट लागायच्या आधीच मी अन्नपूर्णात जॉईन झाले त्यानंतर माझे लग्न, माझ्या दोन मुली व आता माझे स्वतःचे घर असे अन्नपूर्णात जॉईन झाल्यापासून जीवनात पुढे पुढे गेले.

अन्नपूर्णात जॉईन होताना मी सोशल वर्कर म्हणून जॉईन झाले. २००४ ते २००६ या दोन वर्षात मी स्वास्थपूर्णा या प्रकल्पात काम केले. त्यानंतर २००६ ते २०१० ही चार वर्षे ब्रँच मॅनेजर म्हणून काम केले. यानंतर २०१० पासून ज्युनिअर मॅनेजर, कोऑर्डिनेटर, डि.एम. अशा वेगवेगळया पदांवर काम करताना मेधाताईंच्या मार्गदर्शनाचा खूप उपयोग झाला.

माझ्या पर्सनल आयुष्यात मला मेधाताईंचा आलेला अविस्मरणीय अनुभव सांगते. २००९ साली माझे लग्न झाले व २०१० साली ३ महिन्यांची प्रेग्नंट होते. साडेतीन महिन्यांनंतर बाळाची ग्रोथ होत नसल्याने अॅबॉर्शन करायला डॉक्टरांनी सांगितले. तो माझ्यासाठी पहिलाच मोठा धक्का होता.

मला ते अॅबॉर्शन डॉक्टरांनी करायला सांगितल्यावर मी के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये अॅडमिट होऊन माझे अॅबॉर्शन करून घेतले सोबत माझे पती व घरातील इतर लोक होते.

मी हॉस्पीटलमध्ये अॅडमिट आहे व माझ्याबाबतीत असे घडले आहे हे मेधाताईंना समजताच मेधाताई त्यांच्या बिझी शेडयुल मधून सुद्धा मला के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये भेटायला आल्या. त्यांनी मला जेव्हा पहिले, तेव्हा त्यांच्या

डोळयात माझ्यासाठी आलेले पाणी मी कधीच विसरू शकणार नाही. तो अनुभव माझ्या आयुष्यात मला खूप मोलाचा वाटला. मेधाताई प्रत्येक स्टाफची जातीने विचारपूस करतात. त्यांना प्रत्येक स्टाफच्या कुटुंबातील परिस्थिती माहिती असते.

मेधा ताईंची सर्वात आवडणारी गोष्ट म्हणजे शिस्तप्रियता. मेधाताईंकडून मी काय शिकले- प्रत्येक गोष्टीची डायरी नोट घेणे, कोणतेही व कितीही मोठे काम असेल तर ते नियोजन करून कसे साध्य करता येते हे शिकले.

भविष्यात अन्नपूर्णा खूप पुढे घेऊन जायची आहे. अनेक हजारो गरीब महिलांपर्यंत अन्नपूर्णाच्या सर्व सुविधा पोहचवायच्या आहेत. अन्नपूर्णाच्या या समाज उपयोगी कामामध्ये खारीचा वाटा उचलण्यासाठी संधी मला मिळाली. अन्नपूर्णा परिवाराचे व मेधाताईंचे मनापासून आभार मानते.

मेधाताईंना ६० व्या वाढदिवसाच्या खूप-खूप शुभेच्छा आहेत. त्यांचे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल. त्यांना इथून पुढील वाटचाल करताना आरोग्यदायी आयुष्य लाभू दे ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**माया महेश जाधव**
**डेप्युटी मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार,पुणे.**

# ५८. ताईंनी घातलेल्या कार्यपध्दतीमुळे मिळतो कामात आनंद

**ताईं**बद्दल मी काय लिहावे? तरी माझ्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न .

मी अन्नपूर्णात २००९ साली जॉईन झाले त्यावेळेस स्वत: मेधाताईंनी माझ्याकडे लक्ष देवून कामामध्ये मार्गदर्शन केले. ताई कामामध्ये मार्गदर्शन करतात. तसेच स्टाफच्या वैयक्तिक आयुष्यातही मार्गदर्शन करतात. मला सुद्धा ताईंनी वेळोवेळी वैयक्तिक आयुष्यात मार्गदर्शन केले आहे.

माझ्या मिस्टरांचा अपघात झाला होता तेव्हा आईच्या मायेने व माहेरच्या आपुलकीने ताईंनी माझी चौकशी केली. ओरिएंटेशल इन्शुरन्स मधून मला आर्थिक मदत मिळण्यासाठी स्वत: लक्ष घातले. तेव्हा मला आर्थिक अडचण असल्याने एखादी आई जशी आपल्या मुलीला मदत करते, तसेच मला त्यावेळेस अन्नपूर्णाकडून मदत मिळाली होती.

मी एम.एस.डब्ल्यु. केले आहे. आधी इतर ठिकाणी काम केले आहे. आधी इतर ठिकाणी काम केले आहे. पण मला अन्नपूर्णा मध्ये जॉब करताना कधी ताण तणाव असा वाटला नाही. मी करत असलेल्या कामामधून मला कायम आनंद मिळतो याचे श्रेय मी ताईंनी अन्नपूर्णात घालून दिलेल्या कार्यपद्धती ला देते.

ताईंनी भविष्यात अन्नपूर्णाच्या कामातून थोडा वेळ काढून स्वतःला वेळ दयावा म्हणजे साधनच्या बोर्ड मेंबर ताई आहेतच, तर तिथे वेळ देऊन मायक्रो फायनान्स हया क्षेत्रात

नविन कायदा किंवा काही बदल करण्यामध्ये कार्यभाग जास्त वाढवावा असे मला वाटते.

।। खुद को कर इतना बुलंद

की खुदा खुद तुझे आके पूछे

बोल तेरी मर्जी क्या है ।।

**शितल कदम**

**डेप्युटी मॅनेजर,अन्नपूर्णा परिवार,पुणे.**

## ५९. मेधाताईंच्या वटवृक्षाची मी एक फांदी

मेधाताई, तुमच्याबद्दल लिहायचं म्हणजे कोठून सुरुवात करावी, कोणत्या शब्दात  करावी हा विचार करत असताना आठवला, तो माझा अन्नपूर्णातील पहिला इंटरव्ह्यूचा दिवस, तो माझ्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला. २/११/२०१० आतापर्यंत दिलेल्या इंटरव्ह्यू मध्ये कोणत्याही पोस्टला असणारे हेड इंटरव्ह्यू घेतात, असं पाहिलं होतं, पण अन्नपूर्णा संस्थेत यापेक्षा वेगळं पाहायला मिळालं, की प्रत्यक्षात स्वतः ताईंनी  इंटरव्ह्यू घेतला.

ताई तुमची व माझी पहिली मुलाखत, तुमचा प्रसन्न व तेजस्वी चेहरा अजूनही डोळ्यासमोर उभा राहतो. मी तसा पूर्ण खेडे गावात राहणारा मुलगा. इंग्रजी म्हटलं की अंगाचं पाणी पाणी होणारा, पण तुमच्या सोबत बोलताना तुम्ही इंटरव्ह्यू घेत आहात असे वाटले नाही, उलट माझ्या पोस्टच्या जॉब डिस्क्रीप्शन मधील विषय समजावून माझी भूमिका व जबाबदारी या संदर्भात दिलेले इनपुट खूप महत्त्वाचे होते. मी एम.एस.डब्ल्यु. करून 'जलस्वराज्य' या शासनाच्या प्रोजेक्टमध्ये महिलांचे बचत गट या विषयावर काम केले होते. परंतु ते काम ''शासनाचं काम आणि पाहिजे तेवढं थांब'' अशा पद्धतीचे होते.

अन्नपूर्णा मध्ये ९९ टक्के महिला स्टाफ व महिलांची संस्था अशा संस्थेत मला काम करायचे होते. मला अन्नपूर्णा मध्ये ९/११/२०१० मध्ये ज्युनियर मॅनेजर या पोस्टवर काम मिळाले. त्याप्रमाणे कविताताई पण त्याच दिवशी जॉईन झाल्या. आमचा अन्नपूर्णा परिवार मधील प्रवास सुरू झाला. आम्हाला अन्नपूर्णाचा प्रवास करताना उज्वलाताई वरिष्ठ म्हणून हाताळत होत्या. प्रत्यक्षात मुंबईमध्ये मी व कविताताई ब्रांचेस हाताळत होतो.   मेधाताई नेहमी म्हणायच्या ''कविता व सुधीर म्हणजे माझे दोन हात व दोन डोळे आहेत.  मी त्यांच्या

माध्यमातून मुंबईतील अन्नपूर्णाचे सभासद व कामकाज पहाते.''
त्यावेळेस वाटायचं, ''आपण खूप मोठी जबाबदारी पेलवतो आहे.''

अन्नपूर्णामध्ये आल्यानंतर शिस्त, नियम, जबाबदारी या सर्व गोष्टी प्रत्यक्षात कळल्या व पाळायला शिकलो. कोणतेही काम करताना टूल, गोल-का? कशासाठी? कधी, कुठे- या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली. सर्व मायक्रो प्लॅनिंग करूनच काम करावे लागते. त्यामुळे विचार करायला लागतो व त्याप्रमाणे मी स्वतः मध्ये बदल घडवत गेलो.

मेधाताई, एखाद्या कच्च्या मडक्याला भाजून घडवले जाते, त्याप्रमाणे तुम्ही आम्हाला घडवले आहे. तुम्ही प्रत्येक मीटिंग मध्ये आम्हाला घडवत शिकवत होतात. मेधाताई, उज्वलाताई ह्यांच्या कडून आम्ही शिकत राहिलो, करत राहिलो.

मेधाताई मला एक गोष्टीचं खूप आश्चर्य वाटायचं की, एका संस्थेच्या एम.डी. असून सुद्धा त्यांना आपल्या सर्व स्टाफचे नाव, स्टाफची माहिती घरात कोण कोण आहेत व प्रॉब्लेम तोंडपाठ कसे आहे? प्रत्येक वेळी मी व कविताताई नेहमी म्हणायचो, ''असे आपल्यालाही जमले पाहिजे.''

ताई, खरंच तुम्ही केलेले काम म्हणजे खूप मोठया वटवृक्षाप्रमाणे आहे. आणि त्या वटवृक्षाला सांभाळायच्या व वाढवायच्या जबाबदारीमध्ये तुम्ही आम्हाला सहभागी करुन काम करण्याची संधी दिली, त्याबद्दल मानावे तितके आभार कमीच आहेत.

मी तुमच्या, उज्वलाताई व आरतीताईंच्या मार्गदर्शनाखाली अजूनही शिकत आहे. स्वतः ला घडवत आहे. हे करत असताना मला संस्थेने दिलेल्या कामाची संधी व मिळालेले डेप्युटी मॅनेजर पद ही आजपर्यंतच्या कामाची पोचपावती होती. मेधाताई तुमच्यामुळे एका खेडेगावातील मुलगा त्याला पहिल्यापासून इंग्रजी अक्षरांची भीती असलेला

आणि आता तो अन्नपूर्णा परिवारात दहा वर्षे काम करतो आहे. त्याला तुम्ही घडवलं, जगायला शिकवलं, परिस्थिती बरोबर कसं जगायचं, मार्ग कसा काढावा आणि हे सर्व करत असताना आनंद कसा मिळवता येईल या सगळ्या गोष्टी जसे आईवडील आपल्या मुलांना लहानाचे-मोठे करेपर्यंत, सर्व गोष्टी करत असतात. त्या प्रमाणे ताई तुम्ही मला घडवले आहे आणि अजूनही घडवत आहात.

अन्नपूर्णामुळे मी स्वतः चे हक्काचे घर, लग्न अशा जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी करू शकलो. फक्त तुम्ही दिलेल्या संधी व दाखवलेल्या विश्वासामुळेच.

मला मुलगा झाला आणि सहा महिन्यातच त्याला ताप आला. फार जास्त म्हणजे १०२°, १०३° काही कळेना, आमच्या फॅमिली डॉक्टरांनी केईएम हॉस्पिटलला घेऊन जाण्याचा सल्ला दिला. त्या ठिकाणी थॅलॅसिमिया या रोगाची रक्ताची चाचणी केली. माझ्या व माझ्या घरच्यांच्या पायाखालची जमीन सरकली, सगळे सुन्न झाले. समोर काळाकुट्ट अंधार, कारण मुलाच्या शरीरात रक्त तयार होत नव्हते, तो मेजर थॅलॅसिमिया या आजाराचा प्रकार होता. लगेच मी रडतच सर्व रिपोर्ट उज्वलाताई, आरतीताई, अनिताताई यांना व्हॉट्सअपने पाठवले. ताई त्यानंतर तुमचा स्वतःहून आलेला फोनकॉल आणि तुम्ही दिलेला धीर. माझ्या मुलाचे सर्व रिपोर्ट घेऊन तुम्ही तुमच्या संपर्कातील सर्व डॉक्टरांना पाठवून तातडीने सर्व केलेली चौकशी व उज्वलाताई, आरतीताईंना माझ्याबरोबर बोलण्यास सांगून दिलेला धीर म्हणजे मला खूपच मोठा सपोर्ट झाला. मी तुमच्या मार्गदर्शनाने पूर्वपदावर आलो. आणि मार्ग शोधू लागलो. जसे काही आपल्या घरातील मुलालाच काही झाले आहे, असे समजून तुम्ही मला धीर देत व मार्गदर्शन करत होतात. ही आयुष्यातील खूप मोठी गोष्ट तुम्ही शिकवली. मोडून न पडता,

ताठ मानेने आलेल्या संकटावर मात कशी करायची हे शिकवलंत.

मेधाताई, तुम्ही दाखवलेल्या वाटेवर आयुष्यभर चालत राहीन व जोपर्यंत प्रत्येक संकटावर मात करत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही. यातच माझे व माझ्या कुटुंबाचे हित असेल. माझ्या वैयक्तिक अडचणींचा माझ्या कामावर परिणाम होणार नाही. तुम्ही दिलेल्या मार्गदर्शनाखाली घर आणि काम याचा ताळमेळ साधण्याचा प्रयत्न करत राहिन.

शेवटी एवढेच सांगतो, तुम्ही वाढवलेल्या अन्नपूर्णा च्या वटवृक्षाची फांदी होऊन तो वटवृक्ष अजून कसा वाढत राहील यासाठी मी कटीबद्ध असेन.

**सुधीर गायकवाड**
**डेप्युटी मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार,**
**मुंबई.**

# ६०. ताई, तुमची शिकवण भविष्याला सावरते

ताई,

माझा नमस्कार, मी या पत्रातून माझ्या जीवनातला तुमच्या सोबतचा प्रवास लिहीत आहे.

पहिल्यांदा माझ्या मुलाखतीत तुम्हाला बघितले २०१० साली. डोळ्यांसमोर तुम्ही जेव्हा आठवता, तेव्हा उंच बांध्याच्या, साडी मधल्या व नुकत्या प्रवास करून दमलेल्या आहात हे चेहऱ्यावर दिसत होते. परंतु तुमच्या समोर मुलाखत देताना अजिबातच दमलेला आवाज जाणवला नाही. बोलण्यास आनंद वाटत होता तो तुमच्या मधील उत्स्फूर्तपणा मुळे! पहिल्या मुलाखती मधील तुमची मूर्ती अजूनही डोळ्यात साठलेली आहे .

कामाच्या प्रवाहात तुम्ही आम्हाला कधीही अंतर न देता, प्रत्येक प्रश्नांची उत्तरे दिली. सुरुवातीला जेव्हा मुंबई मधील अन्नपूर्णा लहान होती, तेव्हा तुम्ही स्वतः आम्हाला घेऊन प्रत्येक गोष्ट शिकवायच्या. मिटिंग, ट्रेनिंग मध्ये one to one Reporting घेणे-देणे. या मधून मला खूप शिकायला मिळाले. प्रत्येक प्रश्नाचे सोल्युशन, निर्णय कसा घेणे, कसे बोलणे, आत्मविश्वास वाढवणे, खंबीर होऊन रहाणे, यामुळे कामाचा उत्साह वाढायला लागला. वरिष्ठ व मी यामध्ये फरक जाणवला नाही. फक्त होते आपुलकीचे नाते व तुमचे जिव्हाळ्याचे मार्गदर्शन! या गतीने पुढे पुढे जायला मदत मिळाली. अश्या वातावरणामुळे भीती कधी जाणवलीच नाही.

अजूनही डोळ्यासमोर येतो, मुंबईतील अन्नपूर्णातील पहिला फ्रॉड! माझ्या ब्रँचमधील लोन व सेव्हींग ऑफिसरने केला होता. माझ्या साठी नविन व धक्कादायक होते. मला वाटलं नव्हतं, की ते इतके मोठे प्रकरण होईल. मी अननुभवी व नविन होते. मी एम.एस.डब्ल्यु. केले होते, पण मायक्रोफायनान्सचा

काहीच अनुभव नव्हता. आर्थिक फ्रॉडचं गांभीर्य इतकं कळत नव्हतं. कारण मी अज्ञानी होते. फक्त जश्या सूचना मिळत, तसे मी करत असे. पोलिसांचा ही अनुभव यामधून मिळाला. ताईंनी मला अश्या वेळी ''घाबरली तर नाही ना!'' असे स्वतः हून विचारले. हे अजूनही शब्द ऐकू कानांना येतात. मी नविन स्टाफ व पोलिस केस यामुळे मला टेंन्शन आलेलं असावं. असं ताईंना वाटलं असावं. म्हणून ही मायेची हाक मला आवडली. यातूनच अन्नपूर्णा मध्ये आपुलकीचं नातं जोडलं गेलं.

अश्याच चढ उतरामध्ये अन्नपूर्णा मध्ये मी कधी एकरूप झाले हे कळलंच नाही. याचे श्रेय 'ताई.'

सुरुवातीला मी, सुधीर नविन असताना उज्वलाताईंना सोबत घेऊन ताई यायच्या. वस्ती मधील कामे शिकवली. नविन ब्रँच उघडण्या आधी स्वतः वस्ती मध्ये येऊन आम्हाला एरिया कसा निवडावा, सर्वे कसा करायचा, ब्रँचला स्टाफ कुठला असावा असे प्रत्येक गोष्टीचे प्रशिक्षण दिले, हँड होल्डींग केले. यातूनच पुढे मुंबईत हळू हळू ताईंच्या मार्गदर्शनाने पाच ब्रॅचेच्या दहा ब्रॅचेस झाल्या व मुंबईचा स्टाफ वाढत कसा गेला या कामाच्या प्रवाहातुन कळालेच नाही.

ताईंच्या प्रेमळ स्वभावामुळे व व्यावसायिक दृष्टीकोन यामुळे आम्ही घडत गेलो.

जसा स्टाफ वाढला तसा ताई व आमच्यातलं अंतरही वाढलं, हायरारकी जास्त निर्माण झाली. अगोदर जे डायरेक्ट बोलण्याची संधी असायची, ती आता कमी झाली. वाढलेल्या स्टाफ सारखा, प्रत्येक निर्णय सुद्धा खूप प्रक्रियेने करावा लागत आहे. ताईंचे वैयक्तिक मार्गदर्शन दुर्मिळ झाले. आता मिळतं मिटींगमधून सर्वांसोबत मार्गदर्शन व वाट बघत असतो, ताईंच्या दर्शनाची.

ताईंच्या दृष्टीकोनातून विचार केला, तर वास्तव हे इतकंच, जशी मला ऊब मिळाली मायेची, शिक्षा मिळाली आत्मविश्वासाची व संधी मिळाली कामाची, तोच वारसा मला

पुढे नविन स्टाफला द्यायचा आहे. अन्नपूर्णा माझ्यासाठी मर्यादित न ठेवता इतरांसाठी वाढवायची आहे. मला आता एक म्हणायचं आहे, ताई.....

''नजरेपुढे कठोर होते, नजरेआडून पाझरते,
ताई, तुमची शिकवण अजून भविष्याला सावरते.''

**कविता शेळके**
**डेप्युटी मॅनेजर, अन्नपूर्णा परिवार, मुंबई.**

## ६१. ''आई'' नंतरची ''आई'' म्हणजे ''ताई''

**मी** अन्नपूर्णा परिवार या कुटुंबामध्ये २०१६ मध्ये सहभागी झालो. अन्नपूर्णाने माझे स्वप्न पूर्ण केले होते. शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते, आपल्याला चांगली नोकरी मिळावी. मी एम.एस.डब्ल्यु. केले व अन्नपूर्णामध्ये जॉईन झालो. आईला सोडून पुण्यामध्ये राहण्याची वेळ आली. गावावरून आल्यामुळे शहरामध्ये ॲडजेस्ट होणे हे पहिले आव्हान होते, पण आई नंतर इथे आधार दिला तो म्हणजे ताईंनी!

ताई संस्था प्रमुख जरी असल्या, तरी माझी वैयक्तिक चौकशीही करत असत. त्यामुळे गावापासून दूर असल्याचे कधी जाणवले नाही.

मी अन्नपूर्णा परिवाराच्या सामूहिक विमा प्रकल्पामध्ये असल्याने सभासदांना सेवा देण्याचा प्रत्यक्षात संबध येत असे. त्यामुळे सभासदांना मदत दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्या वरील आनंद मला वेगळेच समाधान मिळवून दयायचा.

मागील २/३ वर्षांच्या काळात दांडेकर पूल वस्तीत कॅनॉल फुटी, पाटील इस्टेट वस्तीत आग अशा प्रत्येक ठिकाणी अन्नपूर्णा परिवाराची मदत पोहचवणारा दूत बनण्याची संधी मिळाली. त्याबद्दल ताईंचा मी ऋणी आहे.

रणरागिणी है वह
शेरनी है भारत माँ की
जब जब बात आयी गरिब महिला की
लढी देश विदेश मै वह!

ख्वाब है उनका अन्नपूर्णा की हर महिला को
सक्षम बनाना!
यह ख्वाब पूरा करना फर्ज है हमारा!
बनके अन्नपूर्णा का कार्यकर्ता!

**गणेश जगदाळे**
**डेप्युटी मॅनेजर,अन्नपूर्णा परिवार,पुणे.**

# ६२. मेधाताई: माझे प्रेरणास्थान

**मे**धाताई बद्दल विचार केला की मला नेहमी असे वाटते की ताईंमध्ये किती आणि काय काय गुण व बुध्दीमत्ता आहे .

ताई म्हणजे, ज्ञानाचा उगम आणि ज्ञानाचा अखंड वाहणारा झरा!

ताई म्हणजे, निष्ठा आणि कर्तव्य!

ताई म्हणजे, विश्वास आणि वात्सल्य!

ताई म्हणजे, आदर्श आणि प्रमाणतेचे मूर्तिमंत प्रतीक!

मी माझे भाग्य समजते की मला ताईंचे मार्गदर्शन मिळत आहे व त्याचा उपयोग मी माझ्या प्रोफेशनल व पर्सनल जीवनामध्ये करू शकते. अन्नपूर्णामध्ये २०१७ मध्ये मी जॉईन झाले. या चार वर्षात माझ्यामध्ये खूप बदल झाले. वेळोवेळी ताईंनी दिलेले मार्गदर्शन, प्रोत्साहन यामुळेच हे शक्य झाले असे वाटते. मी एम.एस.डब्ल्यु. करून अन्नपूर्णात येण्याआधी इतर ठिकाणी कामाचा अनुभव घेतला आहे. पण इथे जे शिकायला मिळाले ते इतरत्र नाही मिळाले.

आपण करत असलेले काम नेहमी आनंदाने, समजून होऊन तसेच त्या कामामध्ये समरस होऊन केले की त्या कामामध्ये मिळणारा आनंद, समाधान हे किती विलक्षण व अमाप आहे हे ताईंसोबत काम करताना जाणवले. सोपी व सहज शक्य असणारी गोष्ट सगळेच करतात पण न आवडणारी, अवघड गोष्ट केली की ती आपण करू शकतो याबद्दलची जी शाबासकी ताईंकडून मिळते तिचा अनुभव अन्नपूर्णामध्ये ताईंच्या मार्गदर्शनाखाली काम करताना येतो.

ताई आम्हाला सगळयांना घडविण्यामध्ये तुम्ही खूप कठोर मेहनत घेत आहात. ही मेहनत मी वाया जावू देणार नाही.

ताई माझ्या आयुष्यातील प्रेरणास्थान तुम्ही आहात!

शेवटी एवढेच म्हणावे वाटते,

**''You have been more than a guide**

**You have stood by us and taught us to live."**

ताई तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!

**शिल्पा लिहिणे**
**बॅक ऑफिस डेप्युटी मॅनेजर,**
**अन्नपूर्णा परिवार,**
**पुणे**

# ६३. मेधाताई: माझ्या गुरू

**प्रथम** माझे प्रेरणास्थान असलेल्या माझ्या गुरू आदरणीय मेधाताई यांना माझे कोटी कोटी प्रणाम. ताई तुम्हाला ६० वर्षे पूर्ण झालेल्या वाढदिवशी शुभेच्छा देताना ऊर भरून येतो. या निमित्ताने तुमच्या मार्गदर्शनाखाली अन्नपूर्णामध्ये व्यतीत केलेल्या प्रवासातील काही आठवणी मांडण्यासाठी माझ्या हृदयातून आलेले हे चार शब्द लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

अज्ञानाचा अंधकार दूर करून प्रकाशाची वाट दाखविणे, सतत दुसऱ्याचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील असणे हा सततचा ध्यास आम्ही तुमच्या प्रत्येक कृतीतून बघत आहोत. असा गुरू लाभणे म्हणजे आम्ही स्वतःला खूप भाग्यवान समजतो.

५ जून १९९४ साली मी माझी मैत्रीण वैशाली चवाथे हिच्या ओळखीने अन्नपूर्णा महिला मंडळमध्ये अकाउंटस चे काम करण्याआधी प्रवेश केला. १९९४ ते २००३ या दरम्यान मी मेधाताईंच्या आई पद्मश्री प्रेमामाई पुरव यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आणि शिकले. काम करत असताना प्रेमाताईंनी अडचणीत असलेल्या महिलांना मदत करण्याच्या कार्याचा आदर्श माझ्यासमोर होता, तेंव्हापासून अन्नपूर्णा बद्दलचा अभिमान मनामध्ये बिंबत गेला. महिलांना किती वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते, किती प्रकारची दुःखं असू शकतात याची समज अन्नपूर्णामध्ये आल्यानंतरच मिळाली आणि अन्नपूर्णा एक कुटुंब वाटू लागले. आपण काम करत असलेले ठिकाण हे इतर ठिकाणांपेक्षा वेगळे आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली आणि कधी पाऊल दुसरीकडे वळलेच नाही.

सन २००३-२००४ या वर्षापासून मेधाताईंनी मुंबई अन्नपूर्णाचे व्यवस्थापन पहावयास सुरूवात केली, त्यावेळी आर्थिक स्थिती बरीच ढासळलेली होती. मेधाताईंनी प्रथम छोट्या छोट्या कामकाजाची माहिती करून घेतली आणि एक एक भाग सुधारणेकडे लक्ष दिले. तेव्हा मी अन्नपूर्णा महिला मंडळमध्ये कॅशियर कम अकाऊंटंटचे काम पहात होते, मेधाताईंनी त्यावेळी छोट्या छोट्या गोष्टी आम्हाला शिकविल्या. संस्थेची आर्थिक स्थिती नेहमी कळावी, यासाठी कामाची रचना कशी असावी, रिपोर्ट्स कसे बनवावे, मिटींग मध्ये मुद्दे कसे मांडावे, अशा प्रत्येक गोष्टी त्या जातीने आम्हाला शिकवत होत्या, आज जे काही मला येते तो त्यांच्याकडून मिळालेल्या ज्ञानाचा प्रसाद आहे.

सन २००९ मध्ये मेधाताईंनी माझी अन्नपूर्णा पतसंस्थेसाठी कॅशीअर म्हणून नियुक्ती केली. ज्या विश्वासाने मला त्यांनी तिथे नियुक्त केले, ते मला शिकायचे होते आणि नविन अनुभव पण मिळणार होता. त्यांची शिकवण तर माझ्यासोबत होतीच, त्यामुळे कोणतीही अडचण झाली नाही.

अन्नपूर्णा मुंबईचे कामकाज सुधारत अन्नपूर्णा महिला को.ऑप.क्रेडीट सोसायटीचा वटवृक्ष मुंबईत रुजवताना, वाढवताना त्यांचा खडतर प्रवास मी स्वतः माझ्या नजरेतून पाहिला. त्यांच्या वयाचा विचार करता त्यांच्यामध्ये असलेली ऊर्जा, जिद्द, चिकाटी हे तरूण पिढीला लाजवणारे आहे. ही ताकद त्यांच्यामध्ये येते कुठून, आणि आपण कुठे आहोत? हा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही त्यामुळे नव्या उमेदीने काम करण्याची शक्ती मिळते.

महिलांना सक्षम करणे हे त्यांचे ध्येय तर सत्यात उतरताना आपल्या डोळ्याने बघतच आहोत. आज हजारो महिलांना एकत्र आणून त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या बळकट करण्यासाठी प्रशिक्षण देऊन सुशिक्षित करणे,

मेहनत आणि काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रेरित करणे, सामाजिक ज्ञानाचे धडे देणे आणि चांगले विचार त्यांच्या मनावर बिंबवणे, यासाठी त्यांची सततची धडपड बघून या कामाच्या प्रती आपला काहीतरी खारीचा वाटा असावा असे नेहमीच वाटते. म्हणूनच अन्नपूर्णात स्टाफ म्हणून जोडली गेलेली व्यक्ती ताईंच्या विचाराने, स्वतःला झोकून देऊन काम करु लागते व अन्नपूर्णा तिच्या अंतरंगात इतकी भिनली जाते की, अन्नपूर्णा बरोबर समरस कधी झाले हे तिचे तिलाच कळत नाही!

मला तर नेहमी असे वाटते, आणि मी इतरांनाही नेहमी सांगत असते की, बाहेर व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी पैसे मोजावे लागतात, पण मेधाताई प्रत्येक स्टाफला जे शिकवतात त्याचे मोल करता येणार नाही. कारण त्यांची शिकवण्यातील तळमळ, समोरच्या माणसाला तो परिपक्व होईपर्यंत धडे देत रहाणे! यापेक्षा वेगळे गुरूत्व काय असावे? तुमच्या सारखा गुरू सर्वांना मिळाला तर कोणतेही क्षेत्र प्रगती केल्याशिवाय राहणार नाही.

ताई तुमच्या बद्दल आम्हाला खूप अभिमान वाटतो.

**रागिणी संजय वाघमारे**
**कॅशियर, वाशी ऑफीस**

## ६४. ‘‘माझ्यात सामावलेल्या मेधाताई’’

आत्ताच म्हणजे १० फेब्रुवारी रोजी मला महाराष्ट्र पोलिस यांच्या मार्फत निर्भया हा पुरस्कार मिळाला व काल ५ मार्च ला मा.पोलिस अधिक्षक तेजस्वी सातपुते हयांच्या हस्ते कर्तृत्ववान महिला हा पुरस्कार मिळाला. हे पुरस्कार घेताना माझे मलाच फार कौतुक व अभिमान वाटला. पण हया सगळया सन्मानाचे श्रेय जाते, अर्थात माझ्या गुरूंना म्हणजेच मेधाताईंना!

मेधाताईंचे माझ्या आयुष्यातील स्थान खूप मोठे आहे. त्यांनी मला घडविले आहे त्यांच्याबद्दल लिहिण्याचे ठरविले तर खूप प्रसंग आहेत, मी एवढेच सांगते की, माझ्याबाबतीत त्यांनी एका मातीच्या गोळयाला सुंदर आकार दिला.

मेधाताईंची प्रथम ओळख म्हणजे त्या प्रेमाताईंच्या जेष्ठ कन्या, पण वटवृक्षाच्या छायेत राहूनही त्यांनी स्वत:चे खूप मोठे अस्तित्व निर्माण केले व अन्नपूर्णा परिवाराचा महावृक्ष तयार केला. त्याच्या शाखा दूरवर पसरल्या आहेत. मायक्रोफायनान्सचा त्यांचा अभ्यास इतका खोलवर आहे की त्यातच त्यांनी पी.एच.डी. केली.

मी १९९७ साली शिरवळला प्रेमाताईंच्या अन्नपूर्णा महिला मंडळात आले. तिथे महिलांसाठी पॉलीटेक्नीक उभारण्याचे काम जोरात सुरू झाले होते. त्यांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला तेव्हा डॉ. उषा मेहता व कॅ. लक्ष्मी सहगल उपस्थित होत्या. हया दोघींना कार्यक्रमासाठी मेधाताई स्वतः जिप्सी गाडी चालवत घेऊन आल्या. तेव्हाच मी मेधाताई व जयंतदादांना भेटले.

मोठे बांधकाम शिरवळ सारख्या छोटया गावात सुरू झाले. गावातील सगळयांचे लक्ष त्या अवाढव्य इमारतीकडे

होते. कारण तो पर्यंत हया गावात दोन मजली इमरत एकही नव्हती. हळूहळू हया इमारतीला रूप येऊ लागले. हया सगळया प्रेमाताईंच्या कष्टात मेधाताईंचा सुद्धा सहभाग होता. पॉलीटेक्नीकची सुरवात व्हावी म्हणून त्यांनी अनेक कार्यक्रम हया वास्तुमध्ये घेण्यास सुरवात केली होती. मला आठवते एका ग्रुप सोबत मेधाताई व जयंतदादा स्वतः आले होते व रूमची साफसफाई व्यवस्थित झाली नव्हती, तेव्हा ते स्वतः रूम साफ करायला गेले होते.

मी तिथे गेले तेव्हा ते मला खूप रागावले होते. त्यांना स्वच्छता व नीटनेटकेपणा नेहमीच लागतो. कामात परफेक्शन असावे असा त्यांचा नेहमीच अट्टाहास असतो. त्यातून मी बरेच शिकले.

शिरवळ मध्ये २००२/०३ पर्यंत पॉलिटेक्नीक उभे करण्याची आम्ही धडपड केली. परंतु त्याला यश आले नाही. प्रेमाताई वयोमानानुसार थकत गेल्या. अन्नपूर्णा महिला मंडळ आर्थिक अडचणीत सापडली. तेव्हा मेधाताई एखादया योद्ध्या प्रमाणे त्यात उतरल्या. अन्नपूर्णाच्या आर्थिक दलदलीत फसलेल्या रथाला त्यांनी कौशल्याने व कष्टाने बाहेर काढले. मी त्या सर्व धडपडीची जवळची साक्षीदार आहे व मेधाताईंना त्यात मी साथही दिली आहे.

शिरवळची जागा विकून अन्नपूर्णाची कर्जे फेडण्याचा कठोर पण आवश्यक निर्णय घेताना व नंतर त्यासाठी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करताना मेधाताईची चिकाटी, धाडस, ज्ञान जवळून पाहिले व त्यांच्याविषयीचा आदर व्दिगुणित झाला.

शिरवळ प्रोजेक्ट बंद झाला तरी तिथल्या कुठल्याही स्टाफचे मेधाताईंनी नुकसान होऊ दिले नाही. विशेषतः मला तर त्यांनी परत पुण्यात काम करण्याची सुद्धा संधी दिली. पुण्यात काम नको, मी शिरवळलाच कँटीन चालवते म्हटले

तेव्हा पूर्ण पाठींबा, मदत दिली. एवढेच काय, पण पूरक व्यवसाय म्हणून गरवारे इंडस्ट्रीजचे काम मिळवून दिले. आज मी खऱ्या अर्थाने 'निर्भया' बनले आहे. एक सक्षम महिला म्हणून उभी आहे!

हल्ली जागतिक महिला दिनानिमित्त मेधाताईंनी माझा सत्कार केला तेव्हा अन्नपूर्णाच्या नवीन सुवास्तू इमारतीमध्ये जाण्याचा योग आला. ही भली मोठी इमारत बघून मी वॉचमनला विचारले की,''अन्नपूर्णाचे ऑफीस कितव्या मजल्यावर आहे?'' तर त्यांनी अभिमानाने हसत म्हटले,''अहो कितव्या मजल्यावर काय विचारता? ही पूर्ण वास्तू अन्नपूर्णाची आहे.'' मिटींग झाल्यावर प्रत्येक मजल्यावर फिरताना मेधाताईंच्या भव्य कामाची साक्ष मिळत होती.

प्रत्येक डिपार्टमेंटची सुसूत्रता, प्रत्येक ठिकाणी ताईंचा हात व नजर असण्याची साक्ष मिळत होती. त्यांच्या कामाचा आवाका पाहून आश्चर्य वाटले नाही, तरच नवल.

देव काही लोकांना त्याचा अंश देऊन पाठवतो जसे ज्ञानेश्वर, जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, मदर तेरेसा, डॉ अब्दुल कलाम ह्यांच्या असामान्य कामाप्रमाणेच मेधाताईंच्या बाबतीत ही असेच काहीतरी असावे असे मला वाटते. कारण समाजातील इतक्या लोकांसाठी इतकेच चांगले काम साधारण व्यक्ती करूच शकत नाही. स्वतःचे आरामात असलेले जीवन गरीब, गरजू, लोकांसाठी कष्टात घालविणे हे आजकाल कोण करू शकते?

अशा ह्या असामान्य व्यक्तीचा ६० वा वाढदिवस साजरा होताना खूप खूप आनंद होतो आहे. मेधाताई तुम्हाला खूप सुदृढ आयुष्य लाभो व तुमच्या छत्राखाली आम्हाला खूप काही शिकायला मिळो हीच सदिच्छा!

**वैशाली चवाथे**
**एक्स अन्नपूर्णा स्टाफ**
**शिरवळ**

# ६५. मी अन्नपूर्णातली पहिली स्टाफ

**अ**न्नपूर्णाच्या अगदी सुरुवातीला मी पहिली स्टाफ म्हणून कामाला लागले, मी आणि शुभांगी असे दोघेच स्टाफ होतो. मला व शुभांगीला ताईंनी हाताला धरून शिकवलं. टू व्हीलर गाडी चालवायला ताईंनी स्वत: शिकवलं.

फिल्ड मधील अडचणी धावत येऊन ताईंना सांगायचो. मेंबरच्या काय-काय अडचणी असायच्या, जे काही प्रॉब्लेम यायचे, ते आम्ही ताईंसोबत बसून शेअर करायचो आणि त्यातून ताई आम्हाला मार्गदर्शन द्यायच्या. बऱ्याच वेळा काय व्हायचं की, शुभांगी आणि मी भांडण करायचो. आमच्या दोघींना त्यांनी भरपूर शिकवलं, म्हणजे एखादी आई कशी शिकवते तशी! अन्नपूर्णा घडत गेली. शुन्यातून उभं केलं त्यावेळेस फक्त आमच्याकडे टेबल म्हणून मशिन होती. ताई किती जरी मोठ्या झाल्या तरीही आजपर्यंत त्या मला विसरलेल्या नाहीत. मला शुभांगी म्हणते, की ताईंना तुझी नेहमी आठवण येते.

मी सुद्धा ताईच्या वाढदिवसाला, गुरुपौर्णिमेला ताईंना कॉल करते.

मेधाताईंनी मला घडवलं, शिकवलं. मी त्यांना कायम आईप्रमाणेच पाहिले. आज मी अन्नपूर्णात नाही पण दरवर्षी आठवणीने मेधाताई मला कॉल करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देतात त्यांच्यामुळेच आज मी स्वतःच्या पायावर उभी आहे. त्यांनी मला घडवलं, स्वतःच्या पायावर उभं केलं यासाठी मी कायम त्यांची ऋणी असेल.

**कल्पना भंडारे**
**एक्स अन्नपूर्णा स्टाफ, पुणे**

# ६६. माझी दुसरी आई

**स**र्वांच्या अतिशय लाडक्या मेधाताई.

मेधाताईंबद्दल किती लिहावे ते कमीच! सर्वांच्या सुख-दुःखात त्या सहभागी होतात. ताईंनी स्वतःची बँक ऑफ इंडियाची नोकरी सोडून १९९३ ला अन्नपूर्णा महिला परिवाराची स्थापना केली.

आई -पद्मश्री प्रेमाताई पुरव, आणि वडील- कॉम्रेड दादा पुरव हयांच्याकडून त्यांच्या रक्तात समाजसेवा रूजली. त्या लहानपणापासून खूप चळवळी बद्दल, बँकेचे ज्ञान, तसेच त्यांच्या घरी होणाऱ्या मिटींगामधून खूप शिकत गेल्या.

पुढे ताई पुण्यात आल्या. त्या बँकेतून घरी जाताना पौड फाटा भाजी मार्केटला भाजी घ्यायला जायच्या, तेव्हा त्यांना त्या भाजीवाल्यांकडे सावकार लोक पैसे घेण्यासाठी यायचे हे पटत नव्हते. त्यांनी शेवंताबाई म्हणून ज्या भाजीवाल्या होत्या, त्यांना विचारले ‘‘हे कसले पैसे तुमच्याकडून घेतात?’’ त्या उडवाउडवीची उत्तरे देत असत, पण ताईंच्या लक्षात आले होते. ते सावकार त्यांच्याबरोबर भाईगिरीत बोलायचे तेव्हा ताईंना कळले होते.

नंतर ताईंनी त्यांना प्रस्ताव मांडला की,‘‘तुम्हाला १००० रू. कर्ज देते. तुम्ही ग्रुप करा.’’ तेंव्हा त्यांनी ग्रुप केला व त्यांना ९ जणींना प्रत्येकी १००० चे कर्ज दिले व त्यांचे डेली कलेक्शन ताई स्वतः करत होत्या. त्यांच्याकडे जाऊन ताई त्यांची सुख दुःख समजून घेत होत्या.

त्यांचे पहिले कर्ज फिटल्यावर ताईंनी त्यांना हिशोब दिला. त्यांच्या कर्जफेडी सोबत बचत किती जमा झाली, हे सांगितल्यावर शेवंताबाई व गटाला खूप आनंद झाला.‘‘ताईंच्या पैशाला जादू आहे’’ असे त्या म्हटल्या. कारण

सुरूवातीपासून सावकाराकडून कर्ज घेतले, त्याच्याकडे कधी त्यांची बचत झाली नव्हती उलट तो पैसे नाही भरले, की चक्रवाढ व्याज लावायचा. शेवंताबाईंना खूप आनंद झाला.

त्यांच्या ओळखीने औंध- आयटीआय, पौड फाट्याला, पद्मावती, मार्केटयार्डला मेंबर वाढू लागले. असा ताईंचा प्रवास एकटीचा सुरू झाला. मेंबर वाढू लागले. त्यांनी मेंबरमधून पाटीलबाई हयांना डेली कलेक्शनचे काम दिले. पण त्यांच्याकडे मेंबर्स नियमित हफ्ते भरत नव्हते. ताईंना अन्नपूर्णा खूप पुढे न्यायची होती. पण तेव्हा स्टाफ ठेवला तर पगार देण्यासाठी पुरेसे उत्पन्न नव्हते. तरी ताईंनी विचार करून पेपरला जाहिरात दिली, अन्नपूर्णा मध्ये नोकरीसाठी मुली पाहिजे.

माझ्या आईने ही जाहिरात वाचली व मला इंटरव्हूला घेऊन गेली. मला व आईला माहित नव्हते, हे कसले काम आहे. नावावरून मला केटरींगचे वाटले होते. पण लुनावत कॉम्प्लेक्समध्ये गेल्यावर नचिकेत दादाने फॉर्म भरायला दिला. त्या नंतर माझा इंटरव्ह्यू मेधाताईंनी घेतला. तेव्हा माझे वय १८ वर्षे होते. नुकतीच माझी १२ वीची परिक्षा झाली होती.

ताई जे प्रश्न विचारतील त्यांची उत्तरे मी देत होते. ताईंनी विचारले,‘‘तू वस्तीत फिरून काम करशील का?’’ मी हो बोलले. मला जॉब करायचा होता. मला दुसऱ्या कुठल्याच जॉबचा अनुभव पण नव्हता, ‘‘८०० रू. पगार असेल’’ असे सांगितले ‘‘तू मे मध्ये जॉईन होशील का?’’ मी हो म्हटले. त्या दिवशी बरेच इंटरव्ह्यु झाले, मला वाटत नव्हते, माझे सिलेक्शन होईल. पण नंतर ताईंचा फोन आला ‘‘जॉईन हो’’.

ताईंनी त्यावेळी माझ्यावर एक विश्वास टाकला तो विश्वास मी आत्तापर्यंत जपला आहे. २/५/९७ ला मी व कल्पना दोघी रूजू झालो. मला क्रेडीट, डेबिट पण येत नव्हते,

ते सर्व ताईंनी शिकवले. पहिल्या दिवशी ताईंनी आमची मिटींग घेतली, कामाचे स्वरूप समजावून सांगितले व त्याच दिवशी पौड फाटा भाजी मार्केटला मेंबरशी ओळख करण्यासाठी घेऊन गेल्या. अशा रितीने महिना-दोन महिने ताई स्वतः जिप्सी चालवत मला व कल्पनाला औंध, पद्मावती, मार्केटयार्ड, पिंपळे निलख इथे मेंबरची घरे दाखवायला व ''इथून पुढे हया तुमच्याकडे येणार'' ही ओळख करून देण्यासाठी घेऊन गेल्या.

आमच्या ताईंनी स्वतः मला व कल्पनाला टु व्हिलर शिकवली. लुनावतमध्ये त्या आम्हाला गाडी चालवायला शिकवायच्या. १५ दिवसात आम्हाला गाडी बऱ्यापैकी यायला लागली होती. त्यांच्यामुळे गाडी चालवायला शिकले. लायसन्स काढायला कुठे जायचे, कसे हे सर्व त्या समजून सांगायच्या व लिहून द्यायच्या. पहिल्या दिवसापासून आम्हाला डायरी व प्लॅनिंग करायला ताईंनी शिकवले.

पत्ता शोधायला घाबरायचे नाही. आपल्याला देवाने तोंड दिले, त्याचा वापर करायचा, विचारत विचारत जायचे, असे ताईंनी सांगून मी व कल्पना बरोबर त्या ठिकाणी जायचो, आम्हाला पण खूप आनंद होत होता. आम्ही अन्नपूर्णामध्ये नोकरीला लागलो हयाचा खूप अभिमान वाटत होता.

पुढच्या १० वर्षांनी काय असेल हे ताई सांगायच्या, तसे तसे घडत गेले. त्या फक्त बोलत नाही, तर करूनच दाखवतात. ताईंचा एवढा अभ्यास झालाय. त्यांना काहीही विचारले तरी त्या सांगतात. प्रचंड इच्छाशक्ती, वाचन, बुद्धिमत्ता ताईंकडे आहे. सकाळी पाहिले तरी तेच तेज चेहऱ्यावर, संध्याकाळी एवढ्या मिटींगामध्ये दमतात तरी तेच तेज चेहऱ्यावर असते.

त्यांच्याकडे पाहून स्फूर्ती येते, काम करायची. मी आईला सांगितले होते ''माझे लग्न ठरवायचे असेल तर पुण्यातला मुलगा बघ. नाही तर मला लग्न करायचे नाही. कारण मला अन्नपूर्णा व ताईला सोडून जायचे नाही.''

माझ्या घरी माझ्या लग्नाची चर्चा सुरू होती. मला माझ्या मनासारखा नवरा पाहिजे होता, एक दोन स्थळं आली होती. स्थळं आले की, मी ताईंना त्रास द्यायला यायचे व ''मला लग्न नाही करायचे'' असे म्हणायचे. ताई मला समजून सांगायच्या व घरी पाठवायच्या. अविनाश राऊत हयांचे स्थळ आले तेव्हा ताईंनी कर्वेनगरच्या सभासदांकडे सर्व चौकशी केली होती. मला लग्न नाही करायचे असे मी म्हटले कारण ते सावळे होते, ताईंनी मला एक गोष्ट तेव्हा समजून सांगितली ''तू स्वतः आरशात बघ व विचार कर. तू सावळी आहेस. त्याला व्यसन नाही, स्वतःची लाँड्री आहे, कर्वेनगरमध्ये स्वतःचे घर आहे.''ताईंनी मला इतके छान समजावून सांगितले की, मी घरी जाऊन लग्नाला होकार दिला व २/५/९९ ला माझे लग्न पार पडले.

माझ्या लग्नानंतर माझा संसार चांगला सुरू होता. मला दोन मुले झाली. माझ्या नवऱ्याला खूप कर्ज झाले होते. ते खूप शांत बसायचे, घरात कटकटी व्हायला लागल्या. मी ताईंना ही गोष्ट सांगितली, ताईंनी मला त्यांचा मोलाचा वेळ दिला,कारण मला माझे मिस्टर सांगत नव्हते. मला माहिती होते ताईंसमोर हे सर्व सांगतील. तसेच झाले व फॅमिली बरोबर ताईंनी मिटींग घेतली, नंतर एक मिटींग नवऱ्याबरोबर. त्याचे किती ठिकाणी व किती टक्क्याने कर्ज आहे हे विचारले व ताई स्वतः मला व त्यांना दोन दिवसांनी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये घेऊन गेल्या. कापगाते म्हणून मॅनेजर होते. त्यांना आमची परिस्थिती समजून सांगितली व स्वतः जामीन राहून आम्हाला

१ लाखाचे कर्ज काढून दिले व काही कर्ज अन्नपूर्णातून दिले. अशा प्रकारे ताईंनी आम्हाला कर्जमुक्त केले.

आमच्या छोट्या पत्र्यांच्या घराचे रूपांतर ओनरशिपमध्ये झाले, तेव्हा पण आमच्याकडे पैसे जमा नव्हते. स्वतः बिल्डरने खर्च करून व काही दिराने दिले होते. अन्नपूर्णातून मला ६ लाखांचे कर्ज ताईंनी दिले आज कर्वेनगर मध्ये आमची ३ मजली इमारत उभी आहे. त्यासाठी मी ४ बँकांचे, दोघांच्या नावावर कर्ज काढले होते. मी न चुकवता दर महिन्याला हप्ता भरून माझे कर्ज निल केले. हे सर्व ताईंच्या मार्गदर्शनाने साध्य झाले.

खरंच मेधाताई माझ्या आयुष्यात आल्या, आणि मी माझ्या पायावर उभी आहे ठामपणे.

जन्म दिला देवकीने, सांभाळ केला यशोदेने जे म्हणतात ते माझ्या बाबतीत झाले. मी खूप खूप शिकले ताईंकडून! त्या खूप समजून सांगतात व जास्त वेळा सांगून नाही आले तर ओरडतात व त्यांत पण शिकण्यासारखेच असते.

ताई तुम्हाला ६० व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**शुभांगी राऊत**
**एम.आय.एस.मॅनेजर**
**अन्नपूर्णा परिवार**

# ६७. ताईंनी घडवले मला टीम लीडर

ट्रींग ट्रींग! आईचा फोन आला म्हणून मी घाईघाईने लगेच फोन उचलला तर आई बोलली 'अगं, लगेच का फोन उचलला? तुझं अन्नपूर्णाचे गाणे ऐकते ना ते ऐकले की तुला भेटण्याचा आनंद वाटतो,'' मला तर नवलच वाटलं,''अगं मी एवढी तुझ्याशी बोलत आहेना''.

मी अन्नपूर्णात येण्याआधी काम तर करतच होते, एक वर्कींग वुमन कम हाऊस वाईफ. पण अन्नपूर्णात आल्यावर माझा कायापालटच झाला''एक ट्रिमेंडस चेंज!'' सर्व महिलांना एक स्त्री म्हणून बघण्याचा नवाच दृष्टीकोन मिळाला. एक स्त्री, जी घरासाठी झटते, घरच्यांसाठी झगडते, सोबत आजूबाजूच्या परिस्थितीला सांभाळते, तिच्या अडचणी सोडवत सोडवत,सर्व सोसत कामावर जाते व नवीन उमेदीने कामावर होणाऱ्या बदलांचा स्वीकार करते. ही स्त्री, मी प्रकर्षाने अन्नपूर्णाने, म्हणजेच मेधाताईंनी मला दिलेल्या जबाबदारीमुळे शिकू शकले. ताईंची स्त्री सक्षमीकरणासाठीची जी तळमळ आहे ती पूर्ण करण्यासाठी मी माझा खारीचा वाटा उचलते, ते समाधान माझ्यासाठी खूप मोलाचे आहे. मी घडले व इतर ३० जणींना घडवले. मी ताईंकडून बचतीची व्याख्या शिकले व ते आर.डी. व एफ.डी. चे ज्ञान मी माझ्यासोबतच्या सर्व स्टाफला शिकवले.

परिस्थितीवर मात करून, सर्व बदलांचा स्वीकार करून नवीन नवीन गोष्टी कशा शिकाव्यात हे मी ताईंकडूनच शिकले. अंथरूण पाहून पाय पसरावेत आणि उगीच पैसा आहे म्हणून खर्च करू नये हे सुद्धा ताईंकडून शिकले. हाताखालच्या टीमची कामे करवून घेताना जेव्हा मी टीमला ओरडते तेव्हा मला ताईंची वाक्यं आठवतात. ''मी बोललेली वाक्यं तुमच्या कानातून मेंदुपर्यंत जायलाच सहा महिने लागतात''आणि माझे मलाच हसू येते की खरंय ताईंचं!

ताईंचा दूरदृष्टीकोन खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. त्या आजपेक्षा उद्याची काळजी जास्त करतात आणि त्यांच्या सक्षम नेतृत्वामुळे अन्नपूर्णामध्ये ४०० लोकांचा समूह एका तालात व एका सुरात काम करू शकत आहे.

ताईंची बौद्धीक व वैचारिक पातळी अतुलनीय आहे. त्यांचा कामाचा व्याप इतका अफाट आहे, तरीही त्यांची स्मरणशक्ती तितकीच दांडगी आहे, त्यामुळे मी व माझ्या टीमने केलेली सर्व कामे व त्यातील खाचखळगे त्यांना माहित असतात आणि त्यामुळे ताईंना कोणतीही गोष्ट विचारली तर मला त्यावर लगेचच तोडगा मिळतो.

ताईंचा मानसशास्त्राचा, जागतिक, आर्थिक उलाढालींचा, समाजशास्त्राचा, राजकारणाचा व दैनंदिन घडामोडींचा प्रगल्भ अभ्यास आहे. अन्नपूर्णासोबत स्वतःच्या घराची घडी सुद्धा कशी विस्कळीत होणार नाही याचीही त्या जातीने काळजी घेतात. कामासोबत त्यांचा मित्रपरिवारही त्यांनी जोडून ठेवला आहे. अशा मेधाताईंना त्यांच्या ६० व्या वाढदिवसाबद्दल खूप खूप शुभेच्छा!

**प्राची अतुल गांधी**
**एम.आय.एस.मॅनेजर**
**अन्नपूर्णा परिवार**

# ६८. कर्तव्य पूर्तीची ६० वर्ष

**मी** सुरेखा आनंद पाटील. मी आज ज्यांच्या बद्दल माझे मनोगत व्यक्त करणार आहे, त्या गुरुवर्य डॉ. मेधाताई पुरव- सामंत.

प्रत्येकाचे जीवन हे अनेक घडामोडींनी रचलेले असते. आणि अश्या या जीवनाला कळत- नकळत कुणी तरी आकार देत असते. आई वडील जन्म देऊन पालनपोषण करतात. माझे आई-वडील दोन्ही सुशिक्षित असून वडील शिक्षक होते. माझे दोन्ही भाऊ ग्रॅज्युएट आहेत. पण मी मात्र दहावीपर्यंतच शिक्षण घेतले. शाळेमध्ये भाषणे करणे, मैदानी खेळ, नाटकात काम करणे, गाणे ह्या गोष्टींची मला जास्त आवड असल्यामुळे मला नेहमी बक्षिसे मिळाली, पण डिग्री नाही मिळाली.

एकोणिसाव्या वर्षी मी एका छोट्या गावातून मुंबईसारख्या शहरात अंधेरी येथे राहण्यास आले. आणि नंतर कळवा येथे राहू लागले. दोन मुले झाली, आणि संसाराची सुरुवात झाली. पण संसारात रमून राहणे मला शक्य नव्हते. हे मुंबईचे जीवन म्हणजे पिंजऱ्या सारखे वाटायचे. एक दिवस अन्नपूर्णा मध्ये मायक्रो फायनान्स मध्ये नोकरी करण्याची संधी आहे, असा निरोप मिळाला. तो दिवस आहे, २२ नोव्हेंबर २००५! अन्नपूर्णा संस्थेच्या प्रमुख डॉक्टर मेधाताई इंटरव्हयू घेणार आहेत असे सांगण्यात आले. मग मी पेनाने लिहिलेले नाव, अर्धवट शिक्षण असा कागद, व मनात आशा घेऊन कळवा ऑफिस मध्ये आले. थोडी भीती मनामध्ये होती.

मेधाताई कळव्याच्या ब्रँच ऑफिसमध्ये स्वतःच्या मांडीवर लॅपटॉप घेऊन बसल्या होत्या. इंटरव्हयू ला सुरुवात झाली. आणि अगदी डॉक्टर ने पेशंट तपासावा तसा इंटरव्हयू

झाला. आणि एक डिसेंबर २००५ रोजी कामावर रुजू व्हा असे सांगण्यात आले.

माझे करिअर पूर्ण करण्यासाठी मेधाताईची भेट झाली, असे मला वाटते. मी आज स्वतःला खूप भाग्यवान समजते की ताईंसारखी आदर्श, शिस्तप्रिय, व्यक्ती माझ्यासमोर आहे. अगणित माणसे जन्माला येतात, पण तुमच्या सारखे व्यक्तिमत्व एखादंच जन्माला येतं. अनेक मीटिंग च्या माध्यमातून ताई तुम्ही मला घडवले आहे. अगदी सुरुवातीच्या काळातील मिटिंग मला आजही आठवत आहे. पुण्याच्या अन्नपूर्णाच्या कामकाजाचा तेव्हा आम्हाला इतका अंदाज नव्हता, पण तुम्ही स्वतः ड्रायव्हिंग करत सकाळी पुण्याहून निघून कळवा येथे दहा वाजता पोहोचायच्या. वाऱ्याचा वेग आणि तुमच्या कामाचा वेग सारखा होता. ताई तुम्ही मला आणि आशाताई ला अगदी जवळ बसून सुरुवातीला थकित सभासद रिपोर्ट शिकवला होता. आज त्याच्या स्टेप्स सांगायच्या म्हटल्या तर, आजही तशाच लक्षात आहेत. ताई असे गणित मला दहावीपर्यंत कोणीही शिकवले नव्हते. पण ह्या गणिताप्रमाणे तुम्ही माझा कायापालट केला आहे.

सुरुवातीला दादर येथे हेड ऑफिस आणि कळवा ब्रांच ऑफिस होते. मुंबईतील ब्रँचेसची सुरुवात कळवा येथून झाली. फार मोठे आवाहन स्वीकारून तुम्ही मुंबईत एका ब्रांचच्या दहा ब्रांच केल्या. माझ्यासारख्या अनपढ व्यक्तींना आकार देऊन पुढे घेऊन जात होतात. ही साधी गोष्ट नव्हती. फार धाडस आणि प्रेरणा तुम्ही सतत आम्हाला देत होता. अगदी सुरुवातीला अन्नपूर्णा मध्ये टेक्नॉलॉजी नव्हती. तेव्हा सभासदांशी संवादाचे साधन म्हणजे ताईंनी हाती लिहिलेली मॅन्युअल सिस्टीम. सभासदांना समजावताना असे जशी एखाद्या किल्ल्यावर जाऊन लढाई! प्रमोशन, ओरिएंटेशन,

लोन डीसबर्समेंट, कम्युनिटी मीटिंग करून समाधान मिळायचे. कारण ताई तो संवाद साधताना कागदावरची भाषा तुमची होती पण शरीर आमचे होते! काय उर्जा असायची, त्या प्रत्येक शब्दांमध्ये, प्रत्येक शब्दांना खूप किंमत होती. ताईच्या अंगावरच्या कडक साडी प्रमाणे सगळं कडकच होऊन जायचं. सगळे मेंबर माझे होते, असेच मला वाटायचे, त्यांना सगळी अन्नपूर्णा खूप छान समजली पहिजे. असेच मला नेहमी वाटायचे. २०१० पर्यंत अन्नपूर्णा खूप छान होती, लहान होती आमची अन्नपूर्णा होती. आमच्या मेधाताई होत्या, फार जवळ होत्या,  ताई तुम्ही आमच्या मीटिंग साठी दहा तारखेला आणि बावीस तारखेला मुंबईला यायच्यात. वाट पाहायचो ताई आम्ही तुमची. तुमचे शब्द आमच्या कानावर पडणार, एका महिन्यासाठी ती ताकद ताई आम्हाला पुरायची.

आणखी एक गोष्ट मला आवडीने सांगावीशी वाटते, २००८ सालची गोष्ट आहे. आय. ओ. बी. बँकेच्या काही कर्मचारी अधिकारी अन्नपूर्णा मध्ये मायक्रोफायनान्स समजून घेण्यासाठी येणार होते. आणि त्यांना अन्नपूर्णा ची कार्यपद्धती समजावून सांगायची जबाबदारी ताईंनी मला दिली होती. मला आजही आश्चर्य वाटते, पहिल्याच दोन वर्षातच सगळी अन्नपूर्णा मला  तोंडपाठ असल्यासारखी मी त्यांना सांगून टाकली होती. इतका छान फिडबॅक त्यांनी दिला होता. अन्नपूर्णा कुणा समोर मांडताना समजवताना कुणीच घाबरायचं नाही, तशी शिकवण ताई तुम्ही आम्हाला दिली होती.

अन्नपूर्णा हे नाव ऐकताना एक कौटुंबिक संस्थेचे नाव वाटत असले तरी, अन्नपूर्णात सर्व आर्थिक घडामोडी होत असतात. लाखाच्या घडामोडी करत असताना सुद्धा ताई मला

कधीही भीती वाटली नाही. अन्नपूर्णाची रचना इतकी सुंदर तुम्ही बनवली आहे, की सिस्टीम तोडण्याची हिम्मत कोणी सुद्धा करणार नाही. ताई अन्नपूर्णा तुम्ही फार कष्टाने, विचारांनी बनवलेली आहे. फार अभिमान वाटतो ताई.

जग बदलत गेले तशी २०१० पासून अन्नपूर्णा ही फार वेगाने बदलली. अन्नपूर्णा बदलत असताना मी आपल्या विचाराच्यां कष्टांच्या सर्व सीमा ओलांडून आपल्या बरोबरीने सर्व स्टाफला घेऊन, खूप मोठ्या प्रमाणात बदल घडवले. टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून तुम्ही मुंबई पुणे एकत्रित आणली. संस्थेच्या एवढ्या मोठया एम. डी. असून स्वतःला कधीच एयर कंडीशन वातावरणामध्ये कोंडून घेतले नाही. सभासद व स्टाफ शी समरस होऊन, सर्वांना सोबत घेऊन कामकाजाची पद्धत अन्नपूर्णाला पुढे पुढे घेऊन जात आहे. मग ती नोटाबंदी असू द्या, नाहीतर कोरोना! ताई तुम्ही खरंच अन्नपूर्णा च्या शिल्पकार आहात.

ताई, म्हणूनच मला तुमच्याबद्दल लिहिण्याची आवड निर्माण झाली. नुसतं मेधाताई असं नाव जरी डोक्यात आलं, तरी शंभर शब्द तयार असतात. ताई मी मोडक्यातोडक्या भाषेत लिहिलं आहे. कारण मला हे लिहिताना इतकं काही आठवत आहे, सगळीकडे अन्नपूर्णा चे रूप दिसत आहे. ते तुमच्या रूपात सगळ्यांचे झाले आहे. ताई तुम्ही, मी अन्नपूर्णा चा स्टाफ म्हणून काम करत असताना माझ्यावर प्रचंड विश्वास दाखवला. सर्व पदांवर बढती देत. माझी कुठलीच इच्छा अपूर्ण ठेवलेली नाही.

''ज्ञानदेव रचिला पाया तुका झालाशी कळस'' हे वारकरी संप्रदायाचे ब्रीदवाक्य! जगाला पसायदानाची भेट

मिळावी, तशीच अगदी अन्नपूर्णा घराघरां मध्ये जाऊन पोहोचलेली आहे.

एखादे रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर व्हावे, त्या वटवृक्षाच्या मुळापासून ते शेंड्यापर्यंत ची जपणूक करून, प्रत्येक क्षणाक्षणाला काळजी घेऊन, तुम्ही आज अन्नपूर्णा परिवारमध्ये ४०० लोकांना नोकरी देऊन त्यांच्या कुटुंबाचे पालन पोषण करत आहात. हे कार्य म्हणजे तुमच्या कर्तृत्वाची पोच पावती आहे.

एवढं भरभरून ज्ञान देऊन, जीवनात प्रचंड बदल घडवणाऱ्या मेधा ताईंना मनापासून खूप खूप शुभेच्छा.

**सुरेखा पाटील**

**एक्स स्टाफ, अन्नपूर्णा परिवार**

# ६९. सदैव सकारात्मक ताई

**आ**दरणीय मेधा ताई, आपल्या बद्दल काय लिहावे?

लहान तोंडी मोठा घास घेत आहे.

खरं तर लिहू तेवढे कमी, आणि न बोलून सगळे सांगता येईल असे आहे.

तरीही त्यांच्या बद्दल लिहीण्याचा एक प्रयत्न ..

फक्त मेधाताई म्हटले की नावातच सगळे आले. एक खणखणीत रूबाबदार व्यक्तीमत्व.

आज वयाची साठी आली, पण उत्साह तरूणीलाही लाजवेल असा. आयुष्याकडे बघायचा दृष्टीकोन हा फक्त आणि फक्त ऑप्टीमेस्टीक. कोणतेही संकट आले तर त्या कडे संधी म्हणून पहाण्याचा अ‍ॅप्रोच, समोर अचानक आलेल्या परिस्थितीला खंबीरपणे सामोरे जाण्याची जिद्द! वैयक्तिक आयुष्यात व संस्थेच्या कामकाजात अतिशय शिस्तबध्द व प्लॅन्ड अ‍ॅप्रोच!

तुमचा स्वभाव, वरून कडक पण आतून प्रत्येक व्यक्ती साठी असणारा ओलावा! कठोर तितकेच भावनिक (सेंसेटिव्ह) व्यक्तिमत्व, कवयित्री, उत्तम संभाषण कौशल्य. तुमच्या आजूबाजूला किंवा संपर्कातील असलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी जे जे शक्य असतील ते ते सर्व करणाऱ्या, गरीब महिलांसाठी सतत झटणाऱ्या, समोरच्या व्यक्तीच्या शूज मध्ये पाय घालून त्या व्यक्तीच्या नजरेतून बघणाऱ्या, चूक कबूल करणाऱ्याला मोठया मनाने माफ करणाऱ्या, चुकीला माफी देवून पुढची संधी उपलब्ध करून देणाऱ्या, सगळयांवर सम समान प्रेम करणाऱ्या, पुढे काय करायचे आहे हयाचे पूर्ण आराखडे तयार असणाऱ्या, ताईंचे सर्वांकडे म्हणजे व्यक्ती असो किंवा सॉफ्ट/हार्ड कॉपी! हया वर बारीक लक्ष असते. कोणाचीही

कोणताही अडचण असेल, तर त्यावर १०० टक्के सोल्यूशन ताईंकडे असतेच.

मेधाताई आजूबाजूला असतील तर एक प्रकारचे सकारात्मक वलय तयार होते. आणि सगळयांच्या अंगात उत्साह संचारतो. त्यांच्या कडून शिकण्यासारखे खूपच आहे. त्या सतत ज्ञान वाटतच असतात आणि त्यांना स्वतःला सुद्धा सतत शिकण्याच्या मोड मध्ये रहायला आवडते.

अशा आपल्या सर्वांच्या लाडक्या मेधा ताई! एक अतिशय प्रेरणादायी, सक्षम, परखड आणि सक्सेसफुल व्यक्तिमत्व.

**अनिता सोनवणे**

**एक्स स्टाफ, अन्नपूर्णा परिवार**

# ७०. दुर्बलांना सबल करणाऱ्या ताई

‘‘**जा**णावया दुर्बलांचे दु:ख आणि वेदना
तेवत्या राही सदा रंध्रातूनी संवेदना’’

समाजाप्रतीच्या या संवेदना मी पाहिल्यात, सर्वस्व झोकून देऊन गरीबांसाठी काम करणारे हात, मेंदू, मन मी पाहिलंय.....ताईंकडे! एका उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या, पण समाजासाठी काहीतरी करण्याचे बाळकडू मिळालेल्या ताईंनी, आई-वडिलांकडून मिळालेली अन्नपूर्णा नावाच्या छोट्या रोपट्याचा वटवृक्ष केला आणि त्यासाठी तन, मन, धन अर्पण केले.

बँकेतील सुखवस्तू नोकरी सोडून, पहिल्या नऊ भाजीवाल्यांना कर्ज दिले. त्याकाळी पैसेही हाताशी नव्हते. खरंच हे खूप मोठं धाडस होतं. शून्यातून विश्व निर्माण करणं! किती अडचणी आल्या असतील? ही कन्सेप्ट पण तेव्हा नवीन होती. ‘‘गरीबांना कर्ज देण्याची माहिती नाही, गट कितीजणीचा असावा? नक्की किती हजारांचं कर्ज असावं? पण शेवंता मावशी, साळेकर मावशी, यांच्या कडून ज्या गोष्टी कळल्या तसं केलं’’. खरं तर ताईंनी असं म्हणणं हा ताईंचा मोठेपणा!‘‘कोणाकडून मी शिकले’’ असं म्हणण्याचा.

हे सर्व घडवत असताना, पहिले ऑफिस कर्वेनगरचं उभारताना ताईंच्या डोळ्यात टिपे आली. कष्ट तर खूपच होते. स्वत: वस्त्यांमध्ये फिरून गट बांधणं, लेजर हातानं लिहीणं. गोणपाटावर बसून कर्ज वाटणं, रिकव्हरी करणं हे सगळं त्या एकट्याच करत होत्या. आता हे प्रत्येक काम करायला वेगवेगळी स्टाफची टीम आहे. तरी करताना खूप अवघड जाते. पण त्यावेळी हे ताईंनी एकटीने केलं. केवळ २-४ स्टाफ होते. तेव्हा त्यांनी गाडीवर जाऊन वस्त्या वस्त्यामधून जाऊन काम करावं, म्हणून स्वत: त्यांना गाडी शिकवली, संस्थेच्या पैशातून हेल्मेट घेतलं. इतकी आत्मीयता उपजतच ताईंकडे

होती. स्टाफने लेजर हाताने लिहू नये म्हणून सॉफ्टवेअर घेतलं, कम्प्युटर घेतला.सभासदांना काय हवे हे पाहण्यासाठी कुठला कन्सलटन्ट नेमला नाही. नेहमी सभासदांशी बोलत राहिल्या. त्यांनी सांगितलेले अंमलात आणलं. सभासदांना सगळ्या सुविधा सेवा मिळाव्यात आणि हे करताना स्टाफला सोपे पडावे हेच उद्दीष्ट समोर ठेवलं. म्हणून अन्नपूर्णा वाढत गेली.

हे एवढे मोठे कार्य एकटीने खांद्यावर पेलवणे म्हणजे खरंतर कठीण, पण दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर वटवृक्ष उभा केलं.

हे सगळं चालू असताना त्यांनी समाजाचं भान ठेवलं. स्टाफच्या वैयक्तिक समस्या यावरही काम केलं. असं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व सर्वांच्या सान्निध्यात येवो. ज्यामुळे प्रत्येक व्यक्ति प्रगतीची सीमा गाठू शकेल.

मी ही अशीच एक स्टाफ, माझ्या मुलीच्या, घरच्या समस्यांमध्ये ताईनी खूप आधार दिला, मार्ग सांगितले. माझ्या तब्येतीसाठी डॉक्टर सुचवले, हे इतकं तर सख्खी नात्याची माणसंसुद्धा करत नाहीत.

ताईंनी जगावं कसं, घर कसं सांभाळावं, समाजाचं ज्ञान हे सगळं सगळ्यांना दिलं.

पारदर्शकता, लोकशाही, या तत्त्वावर उभी राहिलेली अन्नपूर्णा बहरू दे. ताईंना चांगले स्वास्थ्य लाभू दे आणि अशाच प्रकारे गरीबांच्यासाठी काम करण्याची संधी मिळू दे.

**सिद्धी कुलकर्णी**
**एक्स स्टाफ , अन्नपूर्णा परिवार**

## ७१. मेधा मॅडम: आमच्या मार्गदर्शक

**सौ**.मेधा सांमत यांना ६० व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

मी मेधा मॅडमना ओळखायला लागले ते त्यांचे मिस्टर जयंत सामंत यांच्यामुळे. मी नासान कंपनीत काम करते. सरांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या घरी मॅडम आम्हाला (ऑफिसमधल्या सर्वांना) जेवायला बोलवायच्या, त्या खूपच अप्रतिम स्वयंपाक बनवतात. त्या जितक्या कर्तृत्ववान आहेत तितक्याच त्या उत्तम गृहिणी आहेत.

त्यांचं कर्तृत्व हे जगाला माहित आहेच, पण त्या एक उत्तम व्यक्ती ही आहेत. हा अनुभव मला मिळाला जेव्हा त्यांनी परशुराम व मारूती या दोन भावंडांना बेळगावहून पुण्याला घेऊन आल्या. परशुरामाला त्यांनी लहानपणापासून शिक्षण दिले व त्यांचा संसारही थाटून दिला.

मारूती ही व्यक्ती अशी होती की, तो व्यसनी व मेंटल डिस्ऑर्डर असलेला होता. त्याला त्यांनी नासान कंपनीमध्ये नोकरीला लावले. मी मारूतीची डायरेक्ट बॉस होते. मॅडमनी मला त्याच्याशी कसं वागायचं तेही सांगितले. मॅडमनी त्याचे सतत काउन्सेलिंग करून त्याची गाडी ट्रॅक वर आणली. त्याचं लग्न करून दिले. त्यांचा संसार पण थाटून दिला. त्याच्या बायकोलाही त्यांनी अन्नपूर्णा परिवार मध्ये नोकरी दिली.

मारूतीचा जर मेंटल डिस्ऑर्डर चा अटॅक सुरू झाला, तर मॅडम त्याला दिवसभर त्यांच्या ऑफिसमध्ये स्वतःच्या शेजारी बसवून ठेवायच्या व स्वतः त्याची काळजी घ्यायच्या. त्याच्या बरोबर मेंटल हॉस्पिटलला ही त्या जायच्या अजूनही त्या त्याची रोज ‘‘ऑफिसला आला का’’ चौकशी करतात.

या गोष्टीमध्ये त्यांचा वैयक्तिक कोणताही फायदा नाही, तरीही त्या माणुसकी म्हणून करतात. ही गोष्ट

त्यांच्याकडून स्वरंच शिकण्यासाठी आहे. मी ही त्यांच्याकडून ही गोष्ट शिकले की, ‘‘कोणालाही मदत करताना त्यात ‘‘माझा काय फायदा’’ हा कधीच विचार करायचा नाही.

नासानमध्ये भरपूर बायका काम करतात. कामा निमित्त बाहेर जावे लागते. पूर्वी मॅडमनी आम्हाला प्रवासामध्ये व हॉटेलमध्ये कसं वागायचं, महिला म्हणून स्वत:ला कसं सुरक्षित ठेवायचं याचंही मार्गदर्शन केलं आहे.

**लीना अकीवटे**
**मॅनेजर नासान**

# ७२. ताई, पाणी मागितलं तर समुद्र दिला

**ताई**, तुमच्याशी बोलू शकणार नाही,पण तुमच्याविषयी वाटणारे दोन शब्द मी मांडत आहे. क्षमा असावी,मी तुमच्याबद्दल लिहिणे हे मला माझ्या विचारांना आणि माझ्या लेखणीला दिलेलं तुमचंच एक सामर्थ्य आहे.

आई आणि ताई या दोन शब्दात जे साम्य आहे तितकंच साम्य मला तुमच्यासोबत राहून तुमच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनातून, शिकवणीतून, अनुभवातून जाणवलं. माझ्यासाठी तुम्हीच माझ्या सद्‌गुरू आहात. तुम्हाला आवडणारी प्रत्येक गोष्ट, तुमचा स्वभाव, यातून बरंच काही शिकण्याला मिळतं. कष्ट, प्रामाणिकपणा, नियोजन, धाडस, वक्तृत्व, दगडालाही आकार यावा असं बरंच काही. तुम्ही आम्हाला घडवण्यासाठी घेतलेले अहोरात्र परिश्रम या सर्वांचं मोल जगात कुठेही न सापडणारं आहे.

श्रीकृष्णाने महाभारतात अर्जुनाचा सारथी होऊन जी लढाई जिंकून दिली. तशीच लढाई माझ्या आयुष्यात मला तुमच्या साथीने जिंकता आली. वेळोवेळी येणाऱ्या अडचणी, संकटं यावर मात करून आपला भूतकाळ विसरून वर्तमानात माणसांनी कसे जगावे, भविष्याची आखणी करावी, हे सर्व आम्ही आज तुमच्याकडूनच शिकलो. तेवीसाव्या वर्षात अन्नपूर्णात आले. पन्नाशीपर्यंत आयुष्याची वाटचाल खडतर होती. पण केवळ तुमच्या मायेच्या आणि पाठीवरच्या प्रेमळ हाताच्या स्पर्शामुळे हा आयुष्याचा एक टप्पा ओलांडल्याचे समाधान लाभले.

अन्नपूर्णामध्ये कष्टकरी महिलांचा विकास कसा होतो हे मी स्वत:च्या अनुभवातून व्यक्त करते. कधीही साधा किराणा घरात भरण्याचा व्यवहार सुद्धा न केलेल्या माझ्या सारख्या व्यक्तिला आज गणितातील बेरीज वजाबाकी पासून ते बँकेतील डेबिट क्रेडीट पर्यंत, लाखो रूपये हाताळण्याची जबाबदारी

तुम्ही ज्या विश्वासाने दिली त्या विश्वासाला कधीही तडा जाऊ नये हीच इच्छा. घरात स्वत:चं मत मांडायला घाबरणाऱ्या आम्ही आज शेकडो, हजारो महिलांसमोर उभे राहून ठामपणे बोलू शकतो, नव्हे भाषणच देतो!

माझे ताईसोबतचे अनुभव अविस्मरणीय आहेत. रिझर्व्ह बँकेमध्ये मुलाखती; कॉन्फरन्स, प्रेझेंटेशन हे सर्व काही त्यांनी आम्हाला घडवल्यामुळे शक्य झाले. नोकरीत तीच तीच कंटाळवाणी कामे न करता आमच्यातील हुन्नर ओळखून वेगवेगळ्या पदांवर काम करण्याच्या जबाबदारी आणि संधी आम्हाला दिल्या. सुरूवातीला पोस्ट बदलली की, आम्हाला निराशा यायची, पण काही दिवसातच काम करताना येणाऱ्या निराळया अनुभवात आम्ही स्वत:ला कधी झोकून दिले हे कळलेच नाही.

अन्नपूर्णा म्हटलं की, ताई दिसतात. त्यांच्याशिवाय भविष्यात अन्नपूर्णा ही कल्पनाच सहन होत नाही. छोट्या रोपट्याचे आज झालेला वटवृक्ष आम्हांला मायेची जिव्हाळ्याची सावली आहे. हा असाच बहरलेला असावा, जगभर याचा लौकीक वाढवावा असे वाटते. शेवटी वाचलेल्या चार ओळी तुमच्यासाठी.!

"पाणी मागितलं तर समुद्र दिला
फुलं मागितली तर बागच दिली
घर मागितलं तर राजवाडाच दिला.
आणि मग देवापाशी देवच मागितला
तर त्यांनी तुमच्यासारखी गोड माणसं दिली."

**तुमची,**
**बंडखोर वात्रट पुष्पा**
**ब्रँच मॅनेजर,कर्वेनगर,पुणे.**

# ७३. ताईं शिवाय अन्नपूर्णा? विचारच करु शकत नाही

मी १९९४ मध्ये अन्नपूर्णाच्या पिग्मी डेली बचत मध्ये १००/- रूपये प्रमाणे भरत होते. ते पैसे घेण्यासाठी मी लुनावत कॉम्प्लेक्स येथे अन्नपूर्णा च्या ऑफिसमध्ये गेले. त्यावेळी त्यांची फिल्ड स्टाफ मिटिंग चालू होती. त्यावेळी ताईंनी माझी चौकशी केली. शुभांगी ताईंना मी ''काम मिळेल का'' विचारले. ताईंनी मला संध्याकाळी फोन करण्यास सांगितले. त्यानंतर माझा एल.एस.ओ. चा फॉर्म भरून घेतला. तो फार्म इतका साधा व सुटसुटीत होता. परंतु मला तो नीट भरता आला नाही. त्यातील काही शब्दाचे अर्थ कळत नव्हते. शाळा सोडून खूप वर्षे झाली. कॉलेज नाही. शिक्षण जेमतेम १० वी पर्यंत झालेले! ताईंनी माझा तोंडी इंटरव्ह्यू घेतला आणि पेपर दिला. त्यातील एक साधा प्रश्न, ''तुमची फॅमिली बॅक ग्राऊंड काय?'' मी त्यांचे उत्तर ''नाही'' असे लिहिले. कारण अर्थ कळला नव्हता. त्यावेळी माझ्या घरात १६ माणसे होती. ताईं माझा पेपर वाचला. हसल्या आणि ''मला कामावर कधीपासून येणार?''असे विचारले. १ जुलै २००० ला मी जॉईन झाले.

त्यांची मला सर्वात आवडणारी गोष्ट म्हणजे, त्यांची बोलण्याची भाषा शैली व समजून सांगण्याची पद्धत खूप आवडते. पूर्वीपासून ताईंची एक प्रतिमा माझ्या मनात ठसली की, माझी सख्खी आई जिने मला जन्म दिला. लग्न झाल्यानंतर फक्त आमच्यासोबत पत्रव्यवहार करण्याइतके शिक्षण दिले. आर्थिक परिस्थिती यापेक्षा जास्त नव्हती. म्हणून जशी माझी दुसरी आई म्हणजे मेधाताई.

मी पहिल्यांदा खूप वर्षांनी प्रेग्नेंट राहिले. ताईंना ही बातमी समजली, त्यांना खूप आनंद झाला. कारण त्या मला त्यांच्या मुलीप्रमाणे समजतात. त्यांनी ''मला रजा घे''

म्हटल्यावर मी रडू लागले. कारण घरची परिस्थिती माहिती होती. घरात पैशांची अडचण येणार! ताई म्हणाल्या ‘‘काहीतरी मार्ग काढू’’ मॅटरनिटी लिव्हची सॅलरी मला त्यांनी डिलीव्हरीच्या आधी दिली.

माझा सार्थक ४ महिन्यांचा असेल, आपल्या ट्रस्टी अंजलीताई यांनी मला त्याला हेड ऑफिसला घेऊन येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी गेले. परंतु ही गोष्ट मेधाताईंना माहिती नव्हती. मी त्यांच्या केबिनमध्ये सार्थकला घेवून गेले त्यावेळी शुभांगीताई व अनुसया मावशी यांनी सांगितले की, ‘‘संगीता आली.’’ त्यावेळी ताई त्यांच्या खुर्चीतून उठून माझ्या सार्थकला पटकन हातात घेवून फोटो काढले व पापे घेतले. मला खूप आनंद झाला.

भविष्यात अन्नपूर्णा व ताईंच्या विषयी बोलेन की, जेव्हा अन्नपूर्णा सुरू झाली, त्यावेळी कधी वाटले नव्हते, ‘‘मी जिथे नोकरी करते ती संस्था भविष्यात इतकी मोठी होईल.’’ वेगवेगळे पुरस्कार, ताईंना मिळतात, संस्थेला मिळतात. ताईंच्या तोडून जेंव्हा एक वाक्य ऐकते की ‘‘माझ्या माघारी संस्था चालायला पाहिजे.’’ त्यावेळी मला मनातून खूप रडू येते. कारण संस्थेचा व्याप फक्त ताईंच चालवू शकतात. त्यासाठी स्वतः झगडतात. तरी प्रत्येक विषयाला त्या स्वतः जातीने लक्ष घालून प्रत्येक गोष्टीला न्याय देतात. मला कुणीतरी म्हटलेलं ‘लाख जण मरावे, परंतु त्यांचा पोशिंदा जगावा’ हे सर्व शिकताना, ऐकताना किंवा काम करताना मनात येते. कोणत्याही प्रकारचा प्रसंग आला, तर त्या न खचता समजून सांगतात. न डगमगता सामोरे जावून मार्ग काढतात.

त्याप्रमाणे मी स्वतःच्या आयुष्यात काही प्रसंग आले, त्यातून मार्ग काढत राहिले. ताईंच्या मार्गदर्शनामुळे काम करताना घर व ऑफिसमध्ये समतोल राखता येतो. घरात पूर्वी पेक्षा जास्ती मान मिळतो. प्रत्येक गोष्टीमध्ये घरातील माणसे

आमचे मत विचारून निर्णय घेतात. आता घरच्यांना माहिती झाले,की संगीता काही करेल ते पूर्ण विचार करून करणार. तसेच ऑफिसमध्ये मी एल.एस.ओ म्हणून जॉईन झाले. पण माझ्या कामातून, वागण्यातून,रिझल्ट वरून ब्रँच मॅनेजर पदाला पोहचले.

ताईंच्या सोबतच्या इतर काही आठवणी सुद्धा आहे. नोकरीला लागताना गाडी यायला पाहिजे हे सांगितले. स्वतः ताईंनी गाडी स्वतःच्या घराच्या पार्किंगमध्ये शिकवली. प्रत्येक दिवशी ऑफिसला १० मिनिटे आधी जावून गाडीवर प्रॅक्टीस करायची. जेव्हा ताई मिटींग घ्यायच्या, कम्युनिटी मिटिंग किंवा फिल्ड स्टाफ मिटिंग, त्यावेळी जे रिपोर्टस लागायचे ते शेजारी घेवून बसायचो. मिटिंगचे मिनिट्स लिहिण्याची माझी जबाबदारी, परंतु ताई इतक्या विषय बोलायच्या की, मी फक्त ऐकायची आणि ताईंचे माझ्याकडे लक्ष गेले की म्हणायच्या ‘‘मिनिटस् लिहीतेस ना,’’ मी ‘‘हो म्हणायची, आधी मी पूर्ण ऐकते, मला खूप आवडते.’’

अजून एक जेंव्हा मागील वर्षी मी माझ्या मुलाला घेवून अन्नपूर्णा गेट-टु-गेदरला आले आणि ताईंची ओळख मी मुलाला ‘‘माझ्या टीचर’’ म्हणून केली त्यावेळी सार्थक ला जवळ घेवून ताई म्हणाल्या, की ‘‘तुझ्या मम्मीची मी मम्मी आहे.’’ मला त्यावेळी किती आनंद झाला म्हणून सांगू!

ताईंचे स्थान माझ्या मनात खूप मोठे आहे.

**संगीता क्षिरसागर**
**ब्रॅंच मॅनेजर,धायरी पुणे.**

# ७४. ताईंमुळे डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आली

ताई नेहमी स्वत:चा विचार न करता समाजाचा विचार करत असतात. समाज चांगल्या प्रकारे कसा घडू शकेल हे ताईंच्या सतत मनात असते. गरीब, कष्टकरी महिला सक्षम करणे हे ताईंकडून मला शिकायला मिळाले. ताईंचे वाक्य नेहमी कानावर पडत असते. ‘‘कर्जासाठी दुसऱ्यांना स्वतःचे कागदपत्र देऊ नका, कर्ज घेऊन दुसऱ्याला वापरण्यास देऊ नका, लागेल तेव्हढेच घ्या.’’

माझा सख्खा भाऊ खूप आग्रह करत होता. ‘‘मला तुझ्या नावावर ५,००,०००/- (पाच लाखाचे) कर्ज काढून दे.’’ परंतु ताईंचे शब्द कायम मनात ठेवून मी मन घट्ट करून त्याला नकार दिला. दोन वर्षांनी त्याचा मृत्यु झाला. अशा प्रसंगी ते लोन मला फेडावे लागले असते.

ताई नेहमी खरेपणाला प्रोत्साहन देतात. ताई कोणावरही अन्याय होऊ देत नाही. कोणाचे चुकले की नाही, याची शहानिशा योग्य पद्धतीने करून त्या व्यक्तीला न्याय मिळवून देतात. जर चुकले असेल तर पुन्हा चूक न करता पुढे कसे जावे याचा मार्गसुद्धा देतात.

अन्नपूर्णा व ताई यांच्याविषयी सांगायचे म्हटले तर अन्नपूर्णा मध्ये कामाला लागल्यापासून जीवनात खूप काही बदल झाले. स्वत:चे घर नव्हते ते झाले. मुलीचे उच्च शिक्षण कॉलेजमध्ये करता आले. मुलांच्या शिक्षणाची हवी ती इच्छा पूर्ण करता आली.

ताईंकडून खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या. शाळा, कॉलेजमध्ये फी भरून ही मिळत नाही ते ज्ञान मिळाले. ‘‘नेहमी समोरील माणसाशी बोलताना तोंडात साखर व

डोक्यावर बर्फ ठेवावे.’’ ह्या वाक्यामुळे माझ्या स्वभावामध्ये खूप बदल झाला. पहिल्यांदा समोरच्या व्यक्तीचे मी कधीही ऐकून घेत नव्हते. खूप राग यायचा. परंतु स्वभावात बदल झाल्यामुळे माझ्या कुटुंबात आणि ऑफिसमध्ये काम करण्यास मदत झाली. घरातील माणसे, नातेवाईक यांच्याशी नाते चांगले टिकले व मान सन्मानही मिळत गेला.

ताईंबद्दल खरे पहाता शब्दात पेनाने लिहीणे हे अशक्य! शब्द किंवा त्यांची शाई कधीही जाऊ शकेल, पान कधीही फाटू शकेल पण ताईंबद्दलची भावना, आदर हे नेहमी आणि नेहमी राहणार आहे. तना-मनात आहे. हे शब्दात सांगणे अशक्य आहे.

**अश्विनी वंगारी**
**ब्रँच मॅनेजर, हडपसर, पुणे**

# ७५. आमच्या माऊली मेधाताई

**मे**धा ताईंना पाहिल्यांदा पाहताना खूपच कडक दिसतात. परंतु त्या जेवढ्या कडक दिसतात, तेवढ्याच त्या प्रेमळ पण आहेत.

मेधा ताईंचा मला आलेला एक अनुभव, तसे खूप आहेत. पण मी एकच सांगते. मी स्वत: आजारी झाले व मला मायनर ॲटॅकची शक्यता सांगितली होती. मी १५ दिवसानंतर ताईंना १० तारखेच्या मिटींगला भेटले तरी ही ताईंनी आठवणीने मला विचारले "हसीना कशी आहेस? काळजी घे." मला खूप बरे वाटले. म्हणजे एवढ्या मोठ्या पोस्टवर ताई असताना, एवढा मोठा स्टाफ असतानाही ताईंचे प्रत्येक स्टाफकडे किती बारकाईने लक्ष असते. त्या आमच्याशी वरिष्ठाप्रमाणे न राहता संपूर्ण अन्नपूर्णा बरोबर एका परिवाराप्रमाणेच राहतात.

भविष्यात ताईंचे नाव व अन्नपूर्णाचे नाव प्रत्येक गोरगरीबापर्यंत पोहोचेल. अन्नपूर्णा संस्था ही खरंच खूप मोठे शिखर गाठणार आहे, हे मात्र नक्की आहे.

ताईंच्या कडून शिकण्यासारखे खूप आहे व आज मी जी घडले ती फक्त आणि फक्त ताईंमुळेच. कारण आमच्या समाजात महिला बाहेर जात नाहीत. परंतु मी आज ज्या पोस्टवर काम करते ती फक्त आणि फक्त ताईंमुळेच हे मी कधीही विसरणार नाही.

ताईंनी आम्हाला आपल्या बरोबरच्या स्टाफशी कधी, कसे बोलावे, त्यांच्याशी कसे वागावे, आपल्या सभासदांशी कसे बोलावे हे शिकवले. एवढेच नव्हे तर मी त्यामुळे घरच्यांना पण मी शिस्त लावली. प्रत्येक गोष्टीचे कार्यक्रमाचे प्लॅनिंग पण ऑफिस प्रमाणेच घरी करायला शिकले.

ताईंच्या सोबतच्या खूप आठवणी आहेत. ताई मुंबईच्या १० ता. मिटींगला आल्या की, ताईंनी बीएम बरोबर मिटींग नाही घेत तर, आमच्याशी त्या गप्पाच मारतात. त्यांच्या त्या गप्पांनी माझे मन खूप हलके होत असते.

ताई, प्रत्येक महिना आड करून १० ता. येण्याची मी आतुरतेने वाट पाहत असते. कारण त्या १० ता. तुम्ही आम्हाला बीएम मिटींगला खूपच जवळून भेटता व आमच्याशी गप्पा मारता व खूप गोष्टी आमच्याशी शेअर करता.

अशा या आमच्या मेधा ताई आमच्या ताई नसून सर्वांच्या माऊलीच आहेत.

**हसीना शेख**
**ब्रँच मॅनेजर, ठाणे, मुंबई**

# ७६. अन्नपूर्णाने ओळख दिली

**ख**रे सांगायचे तर सुरूवात कुठून करायची आणि शेवट कुठे करायचा हेच समजत नाही.

माझे शिक्षण फक्त १० वी झाले आहे. तरी पण मला त्यांनी ब्रँच मॅनेजरच्या खुर्चीवर बसवले आणि खूप मोठा विश्वास माझ्यावर ताईंनी ठेवला आहे. पण ताई तुमचा विश्वास मी कधीच कमी होऊ देणार नाही.

कामाबद्दल आणि इतर वेळी ही, ताई तुम्ही कधीच वाटू दिले नाही, की तुम्ही आमचे बॉस आहात म्हणून. कायम आमच्या सोबत आहात! छोट्या, छोट्या गोष्टीत पण तुम्ही आम्हाला मदत करता. एवढ्या मोठ्या स्टाफमध्ये प्रत्येकाचे प्रॉब्लेम समजून घेता. प्रत्येकाचे नाव, फॅमिली प्रॉब्लेम, पण तुम्हाला माहिती, अगदी मनापासून आपुलकीने आम्हाला समजून घेता!

ताई, तुमच्याकडे अगदी सगळे काही असताना फक्त धडपड गरीबांसाठी. त्यामुळे आम्ही तर काहीच करत नाही असे वाटते. रामाला लंकेमध्ये जाण्यासाठी हनुमंतने आणि त्यांच्या वानर सेनेने दगडाचा सेतु बांधला असे म्हणतात. पण त्यांना पाहून खारूताईला वाटले, काहीतरी मदत करावी! अशीच खारूताईची मदत माझी, पण पगार घेऊन मी काम करते असे मला वाटते. तुमचे पुढील सगळे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माझ्याने जे होईल ते मी नक्की करणार ताई. कारण माझा संसार आज फक्त आणि फक्त अन्नपूर्णामुळे चालतो आहे. माझ्या पाठीशी तुम्ही आहात ताई, मला कोणाचीही गरज वाटत नाही. मी माझ्या पायावर उभी आहे. ती फक्त तुमच्यामुळे ताई.

मी २०१० ला अन्नपूर्णा मध्ये लागले. मुंबई आणि जॉब सगळे माझ्या साठी नविन होते. पण अन्नपूर्णाने म्हणजे ताई, तुम्ही एवढे मला शिकवले आहे की, मी कधीच विसरू शकत नाही. मी काम करत असताना नेहमी लक्षात ठेवते, पुढे मेधाताई आणि मागे आरतीताई, उज्वलाताई आहेत. त्यामुळे कामात चुका, मेंबर बरोबर चुकीचे बोलणे, शॉर्टकट, असे काही होत नाही आणि मला असे वाटते हेच प्रत्येक स्टाफने मनामध्ये ठेवले की ताई आपल्या पुढे आहेत, तर प्रत्येकाला छान काम करता येईल.

ताई तुम्हाला जेव्हा त्रास होतो तेव्हा माझा जीव खूप तुटतो. वाटते तुम्हाला कधी त्रास होवू नये. आज प्रत्येक वस्तीत, घरात आमची एक ओळख आहे. अन्नपूर्णाची ताई म्हणून ओळखतात. मेंबर समोर खूप अभिमान वाटतो मला, कारण बाकी ठिकाणी पाहतात ते फक्त शिक्षण, डिग्री, मग त्यांना ज्ञान असो वा नसो! शिक्षण कमी असेल पण, ॲक्टीव असेल तर त्यांना जॉब मिळत नाही. पण माझ्या ताईंनी ४००, ४५० स्टाफला जॉब दिला. त्यांना घडवले, ट्रेनिंग दिले आणि कामकाज चालू ठेवले. वेळेवर पगार दिला, कारण आर्थिक अडचण प्रत्येकालाच आहे! ताई तेच तुम्ही जाणले आहात.

म्हणून प्रत्येक स्टाफ आपुलकीने, प्रेमाने अन्नपूर्णात काम करतात. पहिले तर व्यवहार हा मला समजत नव्हता, तो कसा करायचा ते शिकले. वेळेवर पगार होतो. म्हणून कोणापुढे मान खाली घालायची वेळ येत नाही. ताई तुमच्याबद्दल किती लिहावे, काय लिहावे असे वाटते. तुमच्या बद्दल लिहावे एवढी नक्की मी मोठी नाही पण मनातले बोलू नये एवढी लहान पण नाही, मी खूप लिहावे वाटते पण प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतात, अगदी लिहायला पण! म्हणून मनाला वाटले ते मन मोकळे केले माझे.

ताई सुखाची नोकरी तुम्ही सोडली, पण मला आणि माझ्या सारख्यांना नोकरी मिळाली हे खूप काही आहे माझ्यासाठी. मी नेहमी कम्युनिटी मिटींगमध्ये बोलते. ताईंनी बँकेची नोकरी सोडली आणि गरीबीची अडचण जाणली. तुम्ही मिटींगमध्ये आमच्या बरोबर शेअर केलेले अनुभव, गोष्टी या कायम आठवतात. गोणपाटावर बसून प्यायलेला चहा! ताई तुम्ही हे जर गरीब गरजू महिलांसाठी करत आहात तर तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी नक्की शेवटपर्यंत अन्नपूर्णात असणार!

**ज्योती शिंदे**
**ब्रँच मॅनेजर, कळवा, मुंबई**

# ७७. माझी दुसरी आई, गुरूमाऊली !

**मे**धाताई म्हणजे माझ्यासाठी दुसरी आई आहे. मी जर अन्नपूर्णामध्ये कामाला नसते, तर आज जीवनाला काही वेगळेच वळण लागते असतं. ते वळण नक्कीच काहीतरी अर्धवटच असते. पण चुकून का होईना, मी अन्नपूर्णात कामाला आले. पहिले तर असे वाटले, की काम करू शकते की नाही. एका महिन्यात असे वाटले, आपण काम सोडून घरीच बरे आहोत. मला काही हे काम जमणार नाही. त्यासाठी मी रडले सुद्धा! पण त्या नाजूक वेळेत ताईंनी मला छान मार्गदर्शन केले. त्यानंतर कामाकडे वेगळ्याच नजरेने बघितले. सोपी कामे सर्वच करतात. अन्नपूर्णात आपल्याला काही वेगळे करायचे आहे, हे लक्षात आले.

या पुढे सुरू झाला अन्नपूर्णाचा प्रवास. म्हणतात ना माणूस किती जरी शिकला, तरी तो गुरू शिवाय अर्धवटच आहे. माणसाला आयुष्यात चांगला गुरू भेटणे गरजेचे आहे. मेधाताईंचे स्थान आयुष्यात गुरूच्या ठिकाणीच आहे, गुरूमाऊलीचे आहे. मेधाताई प्रत्येक ट्रेनिंग, मिटींग मधून भेटल्या. त्या प्रत्येक ट्रेनिंग किंवा मिटींग मध्ये मी नवीन काहीतरी शिकले. कुणाशी कसे बोलावे, साध्या शब्दांत मोठी गोष्ट समजावून सांगणे, म्हणजे त्यांनी सांगितलेली गोष्ट आपल्या मनाला भिडली पाहिजे. कदाचित घरी राहिलो असतो तर लोकांशी बोलण्याचा आत्मविश्वास आलाच नसता. आपण आपल्या एरियात बोलू शकतो. पण दुसऱ्याच्या एरियात जाऊन आपले मत बरोबर आहे ते त्यांना पटवून देणे अवघडच आहे. तेच काम सोप्या पद्धतीने मेधाताईंनी शिकवले.

माणूस जन्मला की त्याने काहीतरी चांगले काम करावे, असे म्हणतात. पण मेधा ताईंनी हे काम आमच्याकडून करून घेतले आहे. तसेच सभासदांच्या घरी किती दु:ख आहे.

त्याही परिस्थितीत सभासद कसे उभे राहतात हे मला कळले. आपण पुष्कळ सभासदांच्या घरी जाऊ शकलो. प्रत्येकांचे सुखदु:ख समजू शकलो. अन्नपूर्णा मधून मिळणाऱ्या कर्जातून सभासदांची बरीच स्वप्नं साकार झाली. कुणाची मुलं शिकली, कुणाचे व्यवसाय छान सुरू झाले, तर कुणाची घरे नीटनेटकी झाली. आपल्या इथून मिळणाऱ्या आरोग्याच्या मदतीतून त्यांच्या कुटुंबाला हातभार लागला. या सर्वांतून सभासदांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहिला की एक वेगळेच समाधान मिळते.

हे समाधान मेधाताईंमुळेच मिळाले आहे. ताईंनी जे काम आमच्याकडून करवून घेतले ते मी आयुष्यात कधीच विसरू शकत नाही. मेधाताईंना कधी काही अडचण आहे. हे सांगण्याची वेळच आली नाही. त्यांनी ती नजरेतूनच ओळखली. त्यांनी प्रत्येकाला मायेने व शिस्तीने वळण लावूनच घेतले. तसेच कुणाच्या हातून काही चूक घडली तर त्याला कडक शिक्षा ही केली. पण त्या व्यक्तीपेक्षा जास्त दु:ख हे त्यांनाच होताना दिसले. अशा आमच्या प्रेमळ मेधाताई यांना उदंड आयुष्य मिळू दे व त्यांचा हात सदैव आमच्या पाठीशी असू दे.

**संगिता कांबळे**
**ब्रँच मॅनेजर**
**शिवडी, मुंबई**

## ७८. ‘‘ताई मालक नाहीत, आम्ही कामगार नाही, आम्हीच सर्व काही’’

**१०** वर्षापूर्वी मला आलेला अनुभव- माझ्या मुलाला तेव्हा १० वी ला ९२% मार्क्स पडले होते. तेव्हा मला कामावर रूजू होऊन १ वर्ष झाले होते. मी नवीनच होते. तरी सुद्धा ताईंनी मला पर्सनली फोन करून माझे अभिनंदन केले व घरी जाऊन परिवारासोबत आनंद व्यक्त करण्यास सांगितले. ताई स्वतः संस्थापक असूनही कर्मचाऱ्यांचे सुख किंवा दुःख, स्वतःचे समजून त्यामध्ये सामिल होतात.

अन्नपूर्णात येण्याआधी माझी परिस्थिती अशी होती की, मला कामाची खूप गरज होती. इतर काम पण मी करत होते. पण अन्नपूर्णा संस्थेमध्ये कामाला लागल्यापासून माझ्या जीवनातच बदल झाला. माझ्या इतर ठिकाणाच्या कामाच्या अनुभवामध्ये कामगार-कामगार असतो आणि मालक-मालक, त्याला कामगाराशी फक्त काम करून घेणे इतकेच नाते असते, त्याच्या पलीकडे काही ही नाही. पण ताई स्वतः ला कधी मालक समजत नाहीत.

मी अन्नपूर्णा परिवार संस्थेमध्ये रूजू झाल्यापासून मला कळले की, आपले अडचणी किंवा आपले दुःख काहीच नाही. वस्तीमध्ये कित्येक लोक खूप मोठ्या अडचणीशी लढतात व खूप मोठे दुःख सहन करतात. अन्नपूर्णा परिवार आम्हाला दुःखावर मात करणे व त्यांच्यांशी लढणे शिकवते.

नातेवाईकांमध्ये माझ्याकडे बघण्याचे दृष्टीकोन पण बदलले. माझ्या एका नातेवाईकाच्या लग्नाला गेल्यावर तिथे एक मेंबर आली होती ती मला ‘‘अन्नपूर्णाची मोठी ताई’’ म्हणून ओळखत होती. तिच्या सर्व नातेवाईकांना सांगत होती ‘‘आमची मोठी ताई.’’ हे बघून माझ्या सासूला इतका आनंद

झाला की, ‘‘आपल्या सुनेला लोक किती मान-सन्मान देतात.’’

मी ताईंचे खूप आभार मानते.

**रेखा म्हस्के**

**ब्रँच मॅनेजर, अप्पर इंदिरानगर , पुणे.**

# ७९. प्रिय ताई

**आ**मच्या मेधाताईंनी एक तर कमी शिकलेल्या व्यक्तिंना नोकरी दिली, प्राधान्य दिले. प्रोत्साहन दिले. मी तर खूप कमी शिकले आहे. तरी ताईंनी कधी भेद भाव केला नाही. मेधाताई तर आम्हाला आई समान आहेत.

ताई माझं कमी शिक्षण आहे, पण स्वप्नं खूप मोठी साकार झाली आहेत अन्नपूर्णातून.

मला ट्रेन मध्ये कसे चढायचे, हे पण माहित नव्हते. बाहेर जाण्याची भीती वाटायची. हिंम्मत अन्नपूर्णातून आली आहे. आत्मविश्वास पण वाढला, ताई मी तर झोपडपट्टीत राहात होते. असे कधीच वाटले नाही की मी फ्लॅटमध्ये राहीन. पण अन्नपूर्णातून सगळे स्वप्न साकार झाले. ताई माझी गाडी आहे. मुलीचे लग्न केले व मुलगा माझा आता बँकेत कामाला लागला आहे. केवळ अन्नपूर्णात आल्यामुळे धाडस वाढले.

पहिली तर गोष्ट म्हणजे माझे पती मला दोन वर्षे सोडून गावी राहात होते. पण अन्नपूर्णात असल्याने कधी दु:ख भासले नाही. कारण जगात खूप दु:ख आहे. पण अन्नपूर्णामुळे इतर गरीब महिलांची दु:खं हलकी करण्याची संधी मिळाली त्यात माझं दु:ख मी विसरुन गेले.

**वैजयंता वाळुंज**
**ब्रँच मॅनेजर,देवनार, मुंबई**

## ८०. ‘‘ताई म्हणजेच अन्नपूर्णा’’

१) ताईंची सगळ्यात महत्त्वाची आवडणारी गोष्ट म्हणजे ताईंचा स्वभाव,

२) स्पष्ट बोलणे, खरं बोलणे.

३) ताईंनी कधीच कोणत्या स्टाफला वरिष्ठ आहे किंवा कनिष्ठ आहे कधीच मानले नाही. ताईंनी फिल्ड स्टाफला नेहमीच समजूनच घेतले आहे.

४) फक्त ताईंनी आता पुढच्या आयुष्यात थोडंसं शांततेत घ्यावं. स्टाफचे काहीही चुकले तर ताईंची हल्ली चिडचिड होते आणि त्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर होईल अशी आम्हाला भीती वाटते. ताई म्हणजे आमच्यासाठी अन्नपूर्णा आहे.

५) ताईंकडून आम्ही खूप काही शिकलो. मिटींग आणि ट्रेनिंगला एकदा जरी ताई आल्या नाही तर मिटींग झाल्यासारखी वाटत नाही.

६) ताईंकडून मी सभासदाशी कसे बोलायचे, आणि सभासदाला कसे समजून घ्यायचे हे शिकले. कशी विचारपूस करायची हे शिकले आणि सभासदांचे दु:ख ऐकले, तर आपले दु:ख त्यापुढे काहीच वाटत नाही.

**सायरा पठाण**

**ब्रँच मॅनेजर, येरवडा पुणे.**

## ८१. मेंबर म्हणून आले, ब्रँच मॅनेजर झाले

**मी** अन्नपूर्णात १०००/- रू. पासून कर्ज घेतले होते. त्यावेळेची अन्नपूर्णा संस्था व आजची अन्नपूर्णा संस्था खूप मोठी झाली आहे. यामागे मेधाताईंचा खूप मोठा वाटा आहे. त्या स्वतःपेक्षा दुसऱ्याचा विचार करतात. सर्व स्त्रियांबद्दल आपुलकीची भावना ठेवतात. मी अन्नपूर्णात कामाला लागायच्या अगोदर मला घराशिवाय दुसरे काहीही माहिती नव्हते. आता मला गाडी चालवता आली, बाहेरचे जग माहिती झाले. तसेच मोठ्या मुलीला डॉक्टर केले व दुसऱ्या मुलीला हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण पूर्ण केले. हे मी फक्त अन्नपूर्णात आहे म्हणूनच झाले.

मेंबर म्हणून अन्नपूर्णात आले, एल. एस. ओ. झाले आणि आता ब्रँच मॅनेजर म्हणून काम हाताळते आहे.

**ज्योती पवार**

**ब्रँच मॅनेजर, खैरेवाडी,पुणे**

# ८२. अन्नपूर्णा आणि मेधाताई

**मी** पुष्पा तायडे माझ्या आयुष्याबद्दल बोलायचे म्हणजे, मी शेतकऱ्याची मुलगी. मी गावाकडून आले. नवी मुंबईत १० वर्षांपासून राहात होते. कधी घराबाहेर पडलेली नव्हते आणि समोरच्याशी कसे बोलावे हेही मला समजत नव्हते. मी जेव्हा अन्नपूर्णाच्या ट्रेनिंगला आले तेव्हा मला इंटरव्ह्यूमध्ये फेल केले. कामाची खूप आवश्यकता असताना .

नंतर मेधाताईंनी मला अन्नपूर्णामध्ये नोकरी दिली. अन्नपूर्णामधून मला आर्थिक मदत मिळाली आणि त्यामुळे माझ्या दोन्हीही मुलांचे इंजिनिअरिंगमध्ये डिग्रीचे शिक्षण झाले. माझ्यावर विश्वास ठेवून मला फील्ड ऑफिसर वरून ब्रँच मॅनेजर केले. ताईंनी मला मुलीसारखे सांभाळून घेतले. त्यांच्याबदल बोलावे तेवढे कमीच आहे. त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. माझ्या आयुष्यात मेधा ताईंचे देवाचे स्थान आहे. त्यांनी मलाच नाही तर माझ्यासारख्या ३०० गरजू महिलांना नोकरी दिलेली आहे. त्यांचा महिलांच्या सक्षमीकरणासाठी फार मोलाचा वाटा आहे. त्यांचे खूप उपकार आमच्यावर आहेत. ते आम्ही कधीही विसरू शकत नाही. त्यांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच पडतील.

**पुष्पा तायडे**
**ब्रँच मॅनेजर, तुर्भे, मुंबई**

## ८३. ताईंनी आई होऊन सर्व शिकवलं

**म**ला अन्नपूर्णात येऊन जवळ जवळ १५ वर्षे होत आली. आज पर्यंत ताईंनी मला कधी परकेपणाची जाणीव होऊनच दिली नाही. घर आणि ऑफिस कसं सांभाळायचं हे ताईंनी मला खूप चांगल्या प्रकारे समजावलं.

दि. ०२/१२/२००५ या दिवशी मी अन्नपूर्णाची पहिली पायरी चढले. पहिला दिवस, तसं म्हणायला गेलं तर चांगला ही नाही, ना वाईट! आता पुढे याच वातावरणात आपल्याला वावरायचे आहे, या विचाराने पुढे चालत गेले. आपल्याकडून कोणती चूक झाली तर ताई आपल्याला काय बोलतील? या गोष्टीचाच नेहमी मनात विचार असायचा, पण झालं सगळं उलटंच! त्या खरं तर ताई नव्हत्याच, त्या एक मायेची सावली होत्या, त्यांचा नेहमी मदतीला हात पुढे येत राहिला.

अन्नपूर्णात जॉईन होण्याआधी मी पुण्यात पहिल्यांदा आले. सोबत कोणीच नव्हते. नवरा आणि हातात सहा महिन्याची मुलगी, पहिले मला मुलीचे टेन्शन आले! परंतु मला जेव्हा कळले अन्नपूर्णामध्ये पाळणाघर देखील आहे, त्यावेळेस एका अर्थाने माझी सगळीच काळजी मिटली. तेथून पुढे माझ्या अन्नपूर्णाचा प्रवास सुरू झाला. घर, ऑफिस, नवरा आणि मुलगी या सगळ्यांना कसे हाताळायचे, हे ताईंनी खूप चांगल्या प्रकारे शिकवले.

ताईंनी नेहमी पुढे कसे जायचे हे शिकवले. त्यासाठी आपल्याला काय करणे गरजेचे आहे व का आहे याचे महत्त्व त्यांनी खूप चांगल्या प्रकारे समजावले. आयुष्य खूप छोटे आहे व आपल्याला आयुष्यात यशस्वी होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे प्रत्येक वेळेस ताई आम्हाला सांगत आल्या आहेत. आपण एखादी गोष्ट का करावी, आपल्याला त्यामुळे काय फायदा होऊ शकतो.अशा पद्धतीने शिकविले.

ताईंनी मला माझ्या मोठ्या आजारपणात खूप मदत केली. संस्थेच्या नियमापलिकडे जाऊन निर्णय घेतला. उत्तमनगर ते दापोडी रिक्षाचे पैसे मला दिले.

वार्षिक ट्रीपच्या दिवशी अचानक माझी आई वारल्याचा निरोप मिळाला. तेव्हा ताईंनीच पाठीवरून मायेचा हात फिरवला, खूप सावरून घेतले. लवकरात लवकर मला गावाला, आईच्या शेवटच्या दर्शनाला कसे पोहोचता येईल याची व्यवस्था केली. तेव्हा मला ताईंमध्ये आई दिसली.

आता आणि भविष्यात पुढेही ताईंची अशीच साथ व मार्गदर्शन हवे अशीच अपेक्षा आहे.

**सुनिता कमले**

**ब्रँच मॅनेजर ,शिवणे,पुणे**

# ८४. अन्नपूर्णाने कर्जमुक्त केले

**मी** अन्नपूर्णामध्ये कामाला लागले त्यावेळी माझ्या अंगावर १,५०,०००/- च्या आसपास कर्ज होतं. पण मी अन्नपूर्णात कामाला लागले, म्हणून हळूहळू का होईना पण माझं कर्ज निल झाले. जर मी कामाला लागलेच नसते तर आज माझं घर विकून मी कुठेतरी भाड्याने रहात असते. पण अन्नपूर्णामुळे माझ्यावर तशी परिस्थिती आली नाही. त्यामुळे मला मेधाताई देवाप्रमाणे वाटतात.

माझ्याकडून खूप चुका झाल्या, पण कधीच ओरडल्या नाही. त्यांनी समजावून सांगितलं. ताई दोन महिन्यातून एकदा मुंबईत बी.एम मीटींगला येतात, त्या आमच्याशी बोलतात. त्यानंतर मन हलकं झाल्यासारखं वाटते. आधी मला उभे राहिले तरी मनात धडधड व्हायची, पण आता मी ताईंमुळेच धीट बनले. अन्नपूर्णात आल्यामुळे खूप काही शिकायला मिळाले.

**सुहासिनी प्रकाश कुळ्ये**

**ब्रँच मॅनेजर,चेंबुर, मुंबई**

# ८५. अन्नपूर्णा माझे सासर माहेर

ताईंना अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यांना मी माता म्हणूनच मानते. जशी आई मुलांना शिकवते, तशीच ताई पहिले आपल्या कर्मचाऱ्यांना सक्षम करतात. नंतर त्या स्टाफला सभासदांना कसे सक्षम करायचे ते शिकवतात. ताईंनी मला फक्त काम नाही शिकवले, तर मला स्वत: कसे जगायचे, वागायचे, बोलायचे, फॅमिलीशी कसे राहायचे. हे ही अन्नपूर्णामध्येच शिकू शकले. ए.टी.एम. कसे वापरायचे, बँकेचे व्यवहार सर्व अन्नपूर्णातच शिकले. प्रत्येक गोष्टीवर मात कशी करायची, ती गोष्ट आपल्याला कशी साध्य करता आली पाहिजे यावरती मार्ग सांगितला जातो, मेधाताईंकडून.

''उंच माझा झोका'' यामध्ये जेव्हा ताईंना पुरस्कार मिळाला तेव्हा गावोगावी म्हणजे, आमच्या गावी (कोल्हापूर) माझ्या आई-वडिलांना खूप अभिमान वाटला की, ''माझी मुलगी चांगल्या संस्थेमध्ये काम करते. सक्षमीकरणाची सुरूवात माझ्या मुलीने घरापासून केली आहे.''

मला अन्नपूर्णाने (ताईंनी) स्वत: सक्षम कसे व्हायचे हे शिकवले. हे काम करताना सार्थ अभिमान वाटतो. अन्नपूर्णांचे काम करताना माहेरचा विसर पडला आहे. हेच सासर, हेच माहेर.

**सुनिता पाटील**
**ब्रँच मॅनेजर, कल्याण, मुंबई**

# ८६. आमच्यासाठी चॉकलेट आणतात आमच्या ताई

**मे**धा ताईंना सगळ्यात आवडणारी गोष्ट ''सभासदाचे चेहऱ्यावर हसू फुलवणे'' नेहमी ताई पुढचा विचार करत असतात. मेधाताईंनी सभासदांचा विचार करून पुढे त्यांनी कर्ज नाही घेतले, तरीही आधारपूर्णा मुळे त्यांचे म्हातारपण सुरक्षित केले आहे. तसेच इथे काम करणाऱ्या प्रत्येक स्टाफने रिटायरमेंट नंतर कोणावर अवलंबून राहू नये, अशी काळजी घेतली आहे. त्यामुळे काम करत असताना घराची काळजी न करता स्टाफ काम करु शकतात. हे आपले माहेर घर आहे. इथे जशी आपली जन्म दिलेली आई काळजी घेते, तसे माझी आई मेधाताई असे मला वाटतं.

माझं कमी शिक्षण म्हणजे दहावी पास! कंपनीमध्ये मला वर्कर म्हणून घेतलं, आणि पगार ७००० ते ८०००! इथे मी ''अन्नपूर्णाची ताई'' अशी माझी ओळख आहे. एस.ई.होते. मला प्रमोशन देऊन ''ब्रँच मॅनेजर'' अशी पोस्ट दिली. त्यामुळे घरी पण माझ्या बद्दल नातेवाईक आणि पती, मुलं हयांचा दृष्टीकोन बदलला. मला घरी जायला उशीर जरी झाला तरी ते म्हणतात ''घरच्या कामासाठी आपण बाहेर गेलो, तर उशीर होतो ना? मग ते तुझं माहेर आहे, तिकडे गेल्याने आम्हाला काहीही प्रॉब्लेम नाही.''

जसे माहेरी जाण्यासाठी आपण आनंदित असतो तसे प्रत्येक ट्रेनिंगला, फिल्ड स्टाफ मिटींगला, ताई ज्या ज्या वेळी आमच्या सोबत असतात त्या दिवसाची मी वाट पाहत असते. इव्हेल्युशन ट्रिपमध्ये सगळे काम, घर विसरून आम्ही खूप मजा करतो. घरच्यासोबत आम्हाला इतक्या वर्षात शक्य झालं नाही, ती स्वप्नं पूर्ण करतो.

मला सगळ्यात जास्त आवडणारी गोष्ट, म्हणजे जेव्हा आपण बाहेर जातो, तेंव्हा मुलांसाठी काहीतरी घेऊन येतो. तसेच ताईदेखील बाहेर गेल्या की आमच्यासाठी चॉकलेट घेऊन येतात. चॉकलेट मी घरी नेल्यानंतर, घरात सगळ्यांसाठी थोडं थोडं देऊन खाते. ''ताईंनी आमच्यासाठी आणलंय.'' आणि नेहमी मिटींगमध्ये ऐकले की, ''ताईंचा तुमच्यावर खूप जीव आहे.'' एल.एस.ओ., एस.ई., बी.एम. सगळ्या उन्हातान्हातून फिरून काम करतात. ''ह्या माझ्या मुली आहेत''. पुन्हा आमची काळजी, की ''कर्जाच्या पाशात तर नाहीत ना अडकत, माझ्या मुली?'' सगळं मला सांगणं शक्य झालं नसतं परंतु लिहिण्याची संधी मिळाली.

**अनिता होनागुडी**

**ब्रँच मॅनेजर, दापोडी, पुणे**

# ८७. ताई: आमच्या वाळवंटातील गोड झरा!

**मे**धा ताई म्हणजे स्त्रियांना भेटलेला वाळवंटातील गोड पाण्याचा झरा. 'ताई' म्हटलं की, मोठी बहीण जी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी. तसेच काही मेधाताईंच्या बाबतीत होते. त्यांच्या सगळ्याच गोष्टी आवडतात पण त्यातल्या त्यात त्यांची निर्णय क्षमता, कोणत्याही गोष्टीचे प्लॅनिंग किंवा एखादा विषय कुठपर्यंत घ्यावा, समोरच्याला समजून घेणे आणि समजून सांगणे हे त्या खूप चांगल्या पद्धतीने करतात.

ताईंचा मला आलेला अनुभव म्हणजे मी २०११ ते २०१७ अन्नपूर्णात एस.ई. म्हणून काम करायची. मला २०१७ ला प्रमोशन देऊन ब्रँच मॅनेजर केले. एस.ई. असताना मी घरी ७.३० पर्यंत जायची. ब्रॅच मॅनेजर झाल्यावर मला घरी जायला नेहमी उशीर होतो, म्हणून घरातील वातावरण खूप बिघडले. मध्यंतरीच्या काळात माझी स्वत:ची तब्येत खूप खराब झाली. एका १० तारखेच्या दिवशी आमची बी.एम. मिटींग झाली आणि सर्व बी.एम. गेल्या, मी थांबले होते. ताईंनी इतक्या सहजपणे मला विचारले, ''सुवर्णा काय झाले? मला तुझी तब्येत बरी दिसत नाही.'' तेव्हा मात्र माझ्या डोळ्यात पाणी आले की ''ज्या ताई आम्हाला नेहमी भेटत नाही. निवडक तारखेलाच भेटतात त्यांना हे जाणवलं की काहीतरी बिनसलं आहे.'' मग मी ताईंना सांगितले की, ''नेमकं काय झालं.'' तर ताईंनी इतकं छान समजावलं की, ''सुवर्णा काही गोष्टी सोडून दे, दुर्लक्ष कर'' मला कोणत्या महिन्याची १० तारीख हे नाही आठवणार, पण तेव्हापासून माझी घरात होणारी चिडचिड पूर्ण बंदच झाली. मला माझ्या सासूने सुद्धा विचारले, ''तुझ्यात बदल कसा झाला?'' तेव्हा मी पण त्यांना हेच सांगितले की, ''आई काही गोष्टी तुम्ही बदलू शकत नाही. मी

मग त्याच गोष्टीवरून भांडण करण्यापेक्षा, त्या गोष्टी सोडून दिल्या तर काय वाईट आहे.''

मला याचा ऑफिसमध्ये किंवा बाहेरच्या जगात सुद्धा खूप उपयोग होतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहनशीलता ही खूप वाढली.

ताईंकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. पहिले समोरच्याला काय म्हणायचे ते त्या अगदी उत्तमपणे ऐकतात आणि समजावून सांगताना असं वाटतं, ह्या अडचणी आपणच कवटाळत होतो. हे तर काहीच नाही, किती सहज होते आणि आपण त्यावरच विचार करतोय आणि मग स्वत:लाच हसायला येते.

स्त्रिया खूप पुढे गेल्या आहेत, जसे एक पुरूष पुढे जातो तर त्याच्या पाठीमागे एक स्त्री खंबीरपणे उभी असते. तसेच एक स्त्री जेव्हा पुढे जाते तेव्हा तिचा पती हा खंबीरपणे उभा असायला पाहिजे. मी अन्नपूर्णात काम करण्यापूर्वी आणि आताही खूप पाहते की स्त्रिया स्वत: निर्णय घेऊ शकत नाही. उदा. गावची सरपंच स्त्री असते. परंतु सगळे निर्णय पतीच घेतात. मग तिला आवडो किंवा न आवडो. नगरसेवक स्त्री असते. परंतु सूत्रं सगळी नवऱ्याकडेच. म्हणजे स्त्री नाममात्र असते.

तसे आमच्या ताईंबद्दल नाही. त्या जे निर्णय घेतात ते आमच्या सोबत चर्चा करुन,व ते अगदी बरोबरच असतात. ताईंबद्दल कितीही लिहीले तरी कमीच पडेल. कारण मेधाताई म्हणजे मेधाताईंच आहेत. पहिले दुसऱ्यांचे चांगले करायचे आणि मग आपले.

आमच्या ताईंच्या खूप गोष्टी आहेत की ज्या आवडतात. ताई मोठी मिटींग घेतात. दहा हजाराहून अधिक महिला असतात. परंतु त्यांना बसवून घेणे, काय हवं नको ते पाहणे, हे सगळं त्या अन्नपूर्णामध्ये स्वत: करतात. परंतु ताईची एक शिस्त, त्या बायकांना सुद्धा ३ तास एका जागेवर

बसवतात. जेव्हा मोठ्या नेत्यांच्या सभा घेतात. तेव्हा त्यांना बॉडीगार्ड लागतात. पोलीस लागतात आणि आमच्या ताई हे कोणतेही साधन न वापरता किती छान पद्धतीने ती मिटींग घेतात. खरंच कौतुकास्पद आहे.

ताईंबद्दल कितीही लिहिले तरी कमीच पडेल अशा आमच्या ताई! त्यांनी फक्त बरोबर असणे, हेच खूप असेल आमच्यासाठी (म्हणजे माझ्यासाठी)

''देवाकडे एकच मागणे
भरपूर आयुष्य लाभो
आमच्या मेधाताईंला
माझ्या प्रत्येक जन्मात
त्यांची सेवा करण्याची
संधी दे मजला''
''सत्य न्यायके पथ पर चलना
मेधाताई हमे सिखाती है ।
जीवन संघर्ष में लडना ताई हमे
सिखाती है ।
जीवन में कुछ पाना है ।
तो मेंबरका सम्मान करो ।

स्वत:ची चांगली नोकरी सोडून गरीब महिलांसाठी काम करण्याची धडपड फक्त माझ्या मेधाताईंच करू शकतात. ताई खूप काही आहे तुमच्याकडून शिकण्यासारखे आणि मी नेहमी शिकतच राहणार तुमच्याकडून.

**सुवर्णा वाघमारे**
**ब्रँच मॅनेजर, घाटकोपर, मुंबई.**

# ८८. मेधाताई: आमचा उर्जास्त्रोत

॥**गु**रूर्ब्रम्हा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरा

गुरूर्साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरूवे नमः ॥

मेधा ताई विषयी बोलायचं,तर सर्वात प्रथम हा श्लोक आठवतो. मेधाताई एक असं व्यक्तिमत्व आहे की, ज्यांच्याकडे बघून खूप ऊर्जा निर्माण होते. आपण ही समाजासाठी काहीतरी करावं असं वाटतं.

मेधाताईंची सर्वात आवडणारी गोष्ट म्हणजे, त्यांनी बँक ऑफ इंडिया मधील नोकरी सोडून महिलांसाठी अन्नपूर्णा संस्था सुरू करून ४००-४५० महिलांना रोजगार मिळवून दिला. आजच्या काळात ८ वी - ९ वी - १० वी शिकलेल्या महिलांना धुणी भांड्याची कामे मिळतात, पण अन्नपूर्णा संस्थेमध्ये १० वी पर्यंत शिकलेल्या महिलांना नोकरी मिळते. नोकरीमुळे आम्हाला समाजात वावरताना आदर मिळतो. मेधाताई व अन्नपूर्णामुळे मिळालेला हा सन्मान मी कधीच विसरू शकत नाही.

मेधाताईंनी अन्नपूर्णा परिवार २७ वर्षापासून ज्या पद्धतीने उभारला आहे, पुढे आणला आहे, ते पाहता अन्नपूर्णाचं भविष्य अत्यंत उज्वल आहे. त्यांच्या बद्दल काय बोलावं, त्यांचा प्रेमळ स्वभाव, समजून घेणं, वेळ प्रसंगी आईसारखं मायेने बोलणं व तितक्याच अधिकाराने रागावणं हा त्यांचा स्वभाव मला खूप आवडतो.

मेधाताईंचा मला खूप जवळून अनुभव आला आहे. जेव्हा मी चेंबूरला मॅनेजर होते, त्यावेळेस एका एल.एस.ओ.ने फ्रॉड केला होता. तेव्हा त्या महिलेविरोधात आम्ही एफ.आय.आर. केली होती. ती ज्या कॉलोनीमध्ये राहत होती तेथील तिच्या शेजारील लोक माझ्या विरोधात झाले होते.

त्यावेळेस ताई सतत माझ्याशी फोनवर बोलायच्या ‘‘घाबरू नकोस, आम्ही आहोत, तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही’’ म्हणजे अन्नपूर्णात काम करणाऱ्या सगळ्यांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते. जो पर्यंत सर्व स्टाफ घरी व्यवस्थितपणे जात नाही तोपर्यंत त्या झोपत नाहीत मग कितीही वाजू द्या.

मेधाताईंकडून शिकण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. स्वत:च्या हिताचा विचार न करता समाजाच्या हिताचा विचार करणे, इतरांना रोजगार उपलब्ध करून देणे, महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे, महिलांच्या प्रगतीसोबतच त्यांच्या घरच्यांच्या उन्नतीचा विचार करणे, सगळ्यांना सोबत घेऊन चालणे इत्यादी.

**कल्पना सोनवणे**
**ब्रँच मॅनेजर, भांडुप, मुंबई**

## ८९. मेधाताई: माझ्या आयडॉल

**ताई**, तुमच्या साठाव्या वाढदिवसानिमीत्त मनातले सांगण्याची संधी मिळाली आहे त्या निमित्ताने एवढेच म्हणेन, की तुम्ही जे दिले त्याबद्दल मी तुमचे आभार नाही मानणार! कारण सरितेचा गुणधर्मच आहे की जाईल तिथे जीवन फुलविणे! मी माझे सौभाग्य समजते की या ज्ञानाने, विचाराने, कष्टाने, ममतेने, नेतृत्वाने, समानतेने, सामाजिक बांधिलकीने ओतप्रोत वाहणाऱ्या सरितेत मला माझे जीवन फुलवण्याची संधी मिळाली.

पहिले मला कोणी विचारले की, ''हू इज युवर आयडॉल?'' तर मी लगेच सांगायचे 'आई' पण आता कोणी विचारले तर सांगते ''आई आणि ताई''

तुमच्या भावी आयुष्यासाठी माझ्या मंगलमय शुभेच्छा !

**संजना जंगम**

**कोऑर्डीनेटर, अन्नपूर्णा महिला मंडळ, मुंबई**

# १०. जगण्याला उमेद देणाऱ्या ताई

**मी** निलिमा निलेश दळवी, पुणे ऑफिसला ॲडमिन कोऑर्डिनेटर म्हणून काम करते. २० फेब्रुवारी २००८ रोजी मी अन्नपूर्णामध्ये रूजू झाले. १ डिसेंबर २०११ साली ॲडमिन डिपार्टमेंटमध्ये माझी ट्रान्सफर झाली. अन्नपूर्णामध्ये जॉबसाठी आल्यावर मेधाताईंच्या मार्गदर्शनाखाली बऱ्याच काही गोष्टी शिकायला मिळाल्या व समजल्या. आज या मनोगताच्या माध्यमाने ताई बद्दल चार शब्द लिहायला मिळत आहे हे माझे थोर भाग्य आहे.

मध्यमवर्गीय स्त्रीप्रमाणे माझ्या पण बऱ्याच इच्छा व भविष्यातील स्वप्नं होती. रोज ऑफिसला जाणे, काम करणे, घर-मूल संभाळणे, असा माझा पण दिनक्रम असायचा. अन्नपूर्णाच्या साथीने आयुष्यातील बरेच टप्पे मी यशस्वीरित्या पार केले होते. सगळं कसं व्यवस्थित चालू होतं. पण अचानक काळाने घात केला. अन् सर्व घडी विस्कटली.

जानेवारी २०१७ साली एका गंभीर आजाराने मला व माझ्या पतीला घेरलं. त्यातून मी हळूहळू बाहेर निघाले पण माझ्या पतींना मात्र त्याने विळखा घातला व कायमचं दूर केलं. डोळ्यासमोर सगळा अंधार होता. आजारामुळे व मानसिक कमजोरीमुळे मी पार खचून गेले होते. त्यामध्ये आजारपणामुळे झालेल्या दवाखाना व औषधाचा खर्च व देणी हयामुळे कर्जाच्या विळख्यात पण सापडले होते. मी आणि माझा मुलगा! दुसरा काही आधार नव्हता. पुढे काय होईल, कसं होईल, काय करु, मी निघेन की नाही या परिस्थितीतून बाहेर? काही सुचत नव्हतं.

आयुष्याच्या या खूप मोठ्या वेड्यावाकड्या वळणावर मेधाताई पाठीशी उभ्या राहिल्या. त्यावेळी लागणारी सर्व प्रकारची सर्व मदत (आर्थिक-मानसिक) ताईंनी केली. त्यांच्या

शब्दाच्या व पाठिंब्याच्या उर्जेने आयुष्यात परत उभे राहण्याची उमेद आली. जमा झालेल्या सर्व अडचणी हळूहळू सुटू लागल्या.

एक नियमित आयुष्य परत सुरू झालं.

आज अन्नपूर्णामध्ये काम करताना असं कधीच वाटत नाही की, मी आयुष्यात एकटी आहे. ताई सावली सारख्या सर्व परिस्थितीत मागे उभ्या असतात,असा आधार वाटतो.

माझ्या आयुष्यातले ते दिवस आणि मेधाताई व अन्नपूर्णाने मला दिलेली साथ मी कधीच विसरू शकत नाही.

मेधाताईंची ही सावली सदैव अशीच माझ्या पाठीशी राहू दे व माझ्या सारख्या अनेक स्त्रियांची सावली होण्यासाठी मेधाताईंना ईश्वर उदंड आयुष्य व सामर्थ्य देऊ दे.

माझ्या आयुष्यातील या वाईट दिवसांमध्ये मला साथ दिलेल्या व माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या मेधाताई व माझे अन्नपूर्णा मधील सर्व वरिष्ठ व सहकारी यांची मी कायम ऋणी राहीन.

**निलिमा निलेश दळवी**
**ॲडमिन कोऑर्डीनेटर,पुणे हेड ऑफीस**

# ११. अन्नपूर्णा परिवारचा आधारस्तंभ

**मे**धाताईंनी पुणे आणि मुंबई मध्ये अन्नपूर्णाचे बीज रोवले
वस्ती तिथे अन्नपूर्णा शाखा, स्वप्न जागेपणी पाहिले

बघता बघता मातीमधून रोप तरारले
अन्नपूर्णाचे सुंदर रोप त्यातून अंकूरले

वस्ती वस्तीतून सहकाऱ्यांच्या निगराणीने रोप बहरले.
सोनुले ते रोपटे संस्था संस्थांनी बहरले.

कर्ज वाटप, आरोग्य विमा, पाळणाघर, विद्यापूर्णा, आधारपूर्णा
एक ना अनेक संस्थांचा आधार लाभत गेला

कुटुंब, वस्ती अन् सहकाऱ्यांचा आधार त्याला मिळाला.
परिवार हा सर्वांचा वाढत वाढत गेला.

अन्नपूर्णा परिवाराच्या आधाराचा लळा लागला.
दिर्घायु आरोग्याचे वरदान लाभो मेधाताईंना

सावलीत राहून हा आधारस्तंभ लाभो
सहकारी आणि सभासदांना

अन्नपूर्णा परिवाराच्या आधारस्तंभाच्या
परिसस्पर्शाने जीवनाचे सोने होवो.

**लता महाजन**
**कोऑर्डीनेटर अन्नपूर्णा महिला मंडळ, पुणे**

# १२.‘तुम जियो हजारो साल’

“**“सर्व** प्रथम मेधाताईंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!””

‘तुम जियो हजारो साल, साल के दिन हो पचास हजार’

ताईंचे पूर्ण नाव **मेधा यशवंत सामंत**

- **मे** = मेरू मंदार धाकुटे,पर्वताएवढी झेप आहे ताईंची
- **धा** = धारणा, ध्येय अंगी बाळगून धावपळीचे जीवन त्यांनी जगले
- **य** = यशाचे शिखर ज्यांनी गाठले
- **श** = शक्तीने, बुद्धीने, युक्तीने स्वतःचे जीवन गोरगरीबांसाठी वाहिले.
- **वं** = वंदन करावे असा, आई वडीलांचा वारसा पुढे चालविला
- **त** = तत्परतेने, आईच्या मायेने अन्नपूर्णा परिवार जपला
- **सा** = सावधतेने, स्वबळावर अन्नपूर्णाचा वटवृक्ष उभारला
- **मं** = मंथन जसे करावे (ताकातून लोणी काढावे) तसे त्यांनी कर्जवाटप + बचत इतर सेवांचे जाळे करुन महिलांचे सक्षमीकरण केले.
- **त** = तन्मयतेने, तळमळीने अन्नपूर्णा परिवार विकसित केला.

अशा आमच्या ताईंना उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा!

**स्मिता पेडगावकर**

**अकाऊंट डिपार्टमेंट, अन्नपूर्णा परिवार**

## १३. ताई, तुमच्यामुळे ताठ मानेने जगतो

ताईंनी बँक ऑफ इंडियाची नोकरी सोडून ९ भाजीवाल्यांना महिलांना कर्ज देऊन त्यांना सक्षम केले. त्यानंतर शेकडो महिलांना नोकरी देऊन त्यांचे जीवन सक्षम केले. फक्त सभासदांचे नव्हे तर कर्मचाऱ्यांचे ही जीवन सक्षम केले. आमच्या सारख्या कमी शिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांना एवढी उत्तम दर्जाची नोकरी मिळणार, हे स्वप्नातही वाटत नव्हते. हे स्वप्न तुमच्यामुळे साकार झाले आहे. त्यामुळे आज आम्ही ताठ मानेने आमचे जीवन जगत आहोत.

आम्हाला समाजात कसे वागायचे ह्याचे सुद्धा चांगले ज्ञान मिळते, कुठल्या माणसांशी कसे बोलायचे हे समजते.

ताईंनी सर्वात महत्त्वाचे केले, म्हणजे संस्थेला किती ही अडचण आली तरी स्टाफला पगाराबाबत कधीही अडचण आली नाही. पगार हा तारखेचा तारखेला मिळाला आहे. ताईंनी आम्हाला काम तर मिळवून दिले पण घरामध्ये जर काही अडचणी असतील तर त्यावर सुद्धा चांगल्या प्रकारे मार्गदर्शन दिले. सभासदासारखीच स्टाफच्या पण आजारपणाची काळजी घेतली.

ताई बद्दल किती ही सांगावे ते कमीच आहे. त्यांची कीर्ती महान आहे.

**जोत्स्ना सर्णेकर**
**सर्व्हीस एक्झीक्युटीव्ह, मानखुर्द ब्रँच**

# १४. ‘‘मी’’ नाही ‘‘आम्ही’’

**ता**ईंबद्दल काय लिहावं? जितके लिहावे तितके कमी! कामाला लागले तेव्हा अन्नपूर्णा संस्था काय आहे, काहीही माहिती नव्हती. संस्थेत जॉईन झाले. तेव्हापासून माझ्या आयुष्याला खरी सुरूवात झाली. मी माझ्या जीवनात एक टार्गेट घेवून घराबाहेर पडले. माझ्या मुलांना चांगले शिक्षण देवून, त्यांच्या पायावर उभे करावे, आणि आता मी ते स्वप्न पूर्ण होतांना पाहतेय ते फक्त ताईमुळेच.

मी ११ वर्षांपासून संस्थेत काम करतेय. आधी १० वर्षांमध्ये महिन्यातून एकदा ताईंना जवळून भेटायचो. इतकी मोठी व्यक्ति त्यांच्यासमोर बसून त्यांना बघण्याचा आनंदच वेगळा. ताईंनी किती जणांना आधार देवून उभे केलंय, हे पाहिलं तर डोळ्यातून पाणीच येते.

मागील दोन वर्षामध्ये ताईंनी वात्सल्यपूर्णा परत एकदा नव्याने उभी केली. ताई मार्गदर्शन करत गेल्या, आम्ही घेत गेलो. त्यावेळेस कळले,ताई प्रत्येक व्यक्तिचा किती विचार करतात. सर्व बघितल्यानंतर नव्या उमेदीने पुढील काम करण्यास उभे राहिलो.

मी आज ताईंमुळे माझ्या मुलांना घडवू शकले, ताई म्हणजे आईच आहे. मी खूप भाग्यवान आहे. मला दोन प्रकारे आईचे प्रेम मिळाले.

एक आई जिने जन्म दिला, सांभाळ केला, तिचे कर्तव्य म्हणून मुलीचे लग्न केले व पुढील आयुष्य चांगले जावे हयाची काळजी माझी आई करते.

तशीच दुसरी आई म्हणजे ‘मेधाताई!’

हया आईने प्रत्येक मुलीला स्वतःच्या पायावर उभे राहून स्वाभिमानाने जगायला शिकवले. हया आईला बघितल्यावर नव्या उमेदीने पुढे जायला शिकले. या आईच्या सावलीत आम्हाला रहायला मिळते ही माझ्यासाठी खूप भाग्याची गोष्ट आहे.

हया आईचे एक वाक्य असते, ''मी स्वतः नाही केले, आम्ही केले'' यामध्ये सर्वजण ताईंचेच आहेत हे इतक्या मायेने स्पष्ट होते. स्वतःमध्ये कणखरपणा, ठामपणा हया सर्व गोष्टी असूनही ताई टीमला श्रेय देतात,सामावून घेतात.

हया आईचे मनापासून खूप खूप आभार. ज्यांनी कुणालाही अपंग बनवलं नाही. स्वतःच्या पायावर उभे राहून चालायला शिकवले. हया आईला बघून अपंगही चालायला शिकेल इतके तेज हया आईमध्ये आहे.

ताईंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**ज्योती पाटील**
**सुपरवायझर वात्सल्यपूर्णा**

# ९५. ताई कुंभार, आम्ही मडकी

ताईंबद्दल आम्ही काय लिहायचे? जितके लिहू तितके कमी! मला संस्थेत कामाला लागून ११ वर्षे पूर्ण झाली. सुरूवातीला फक्त ताईंचे नावच ऐकले होते. परंतु जेव्हा ताई दर महिन्याला आमची मिटींग घेवू लागल्या व सामाजिक विषय आम्हांला शिकवू लागल्या, तेव्हा पासून खरी ताईंची ओळख झाली. कितीही अवघड गोष्ट समोरच्याला कशी समजावून सांगायची हे ताईंकडून शिकावे.

ताईंची धडपड खूप मनापासून असते, त्यामुळे आम्ही नेहमी ताईच्या मिटींगच्या दिवसाची वाट पाहायचो व त्या मिटींगमधून काही ना काही शिकायचा प्रयत्न करायचो.

ताईंचा प्रयत्न गरीब गरजू महिलांना सक्षम करण्यासाठी आहे. जे काही आहे हे त्या गरीब सभासदांचे आहे, हयात आपले काहीच नाही हाच ताईचा मोठेपणा मनाला खूप आनंद देवून जातो.

ताईंनी कुंभार आपले मडके कसे उत्कृष्ट बनेल तसे घडवतो त्याच प्रकारे आम्हांला वेळोवेळी मार्गदर्शन करून शिकवले. कुठल्याही परिस्थितीत हार न मानता नव्या उमेदीने उभं राहावं हे ताईंनी घडवले.

मी स्वतः खूप भाग्यवान आहे की, इतक्या-चांगल्या गोष्टी ताईंकडून शिकायला मिळाल्या की ज्या आपल्या आयुष्यात, आपल्या कुटुंबासाठी व समाजासाठी सुद्धा उपयोगी आहेत.

ताई तुमच्या आशिर्वादाची सावली सदैव आमच्या पाठीशी असू दे, तुम्हाला माझ्याकडून व माझ्या परिवाराकडून वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**सुजाता गुंड**
**सुपरवायझर वात्सल्यपूर्णा**

# १६. आम्हाला मान मिळवून देणाऱ्या ताई

मेधाताईंमुळे मी आज अन्नपूर्णामध्ये नोकरी करते व स्वतःच्या पायावर उभी आहे. जर मेधाताईंनी अन्नपूर्णा ही संस्था सुरू केली नसती तर मी धुणी किंवा भांडीची कामे करत असते. परंतु मेधाताईंमुळे मी स्वतंत्र आहे, कोणावर अवलंबून राहत नाही.

आम्ही नोकरी करतो, म्हणून आम्हाला घरी मान सन्मान मिळतो. तसेच बाहेरच्या ठिकाणीसुद्धा लोक आपुलकीने बोलतात, आदर करतात. हे बघून खूप छान वाटतं. घरी कधी-कधी महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करताना आम्हाला समाविष्ट करतात, आम्ही देखील आमचे मुद्दे मांडतो. घरातल्या व्यक्तींना पटतात, त्यावर विचार केला जातो व निर्णय घेतला जातो.

अशा प्रकारे कुटुंबात आम्हाला मान मिळतो. हा मान आम्हाला अन्नपूर्णामुळे मिळाला.

अन्नपूर्णा ही देवता, एक पूजनीय देवता! पण आम्ही अन्नपूर्णात काम करणारे, ह्या देवतेकडून नुसतंच सन्मानाचे काम करणंच शिकलो नाही, तर स्वतः चे घर असावे, असे फक्त स्वप्नच बघितले होते, ते या नोकरीमुळे शक्य झाले.

समाजकार्य करण्याची संधी सर्वांनाच मिळते असे नाही पण आमचं नशीब इतकं चांगलं आहे, की ताईंमुळे समाजकार्य करण्याची संधी मिळाली.

सभासदांना मदत केल्याचं समाधान, त्यांच्या शुभेच्छा मिळाल्या म्हणून मेधाताईंना मनपूर्वक धन्यवाद.

**एक स्टाफ**

# १७. मेधाताई म्हणजे जिद्द

**अ**न्नपूर्णा नावाप्रमाणेच मेधाताईंमध्ये अन्नपूर्णा देवी लपलेली आहे. मेधाताईंनी आपल्या पंखाखाली सगळ्यांना सामावलेले आहे. आज मेधाताईंनी कितीतरी लोकांचे संसार मार्गी लावले आहेत. मुलांबद्दल सुद्धा मेधाताईंना खूप आपुलकी आहे. पाळणाघरासाठीही त्या खूप झटतात.

मी स्वतः तर अन्नपूर्णात कामाला लागल्यापासून दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वतःचे स्वतः कसे जगायचे ते शिकले. मेधाताई अशी व्यक्ती आहे की, तिच्याकडे पाहून आपल्याला जगण्याची उमेद येते. आपल्याला खूप काही करायचं असतं ते मेधाताईंकडून शिकायला मिळतं. मेधाताई म्हणजे जिद्द!

**कल्पना टेमघरे**
**संचालिका, रिमझिम पाळणाघर**

# १८. मूर्ती व कीर्ती दोन्ही महान

**मे**धाताई विषयीचे मनोगत

आपण म्हणतो ‘‘मूर्ती लहान पण कीर्ती महान’’ पण मेधा ताईंचं म्हटलं तर ‘‘मूर्तीही महान आणि कीर्तीही महान.’’ मेधा ताईंचं व्यक्तिमत्व हे प्रभाव टाकणारं आहे. गरिबाविषयीची आपुलकी त्यांना खूप आहे. एकही रूपया कुणाचाही जास्तीचा घ्यायचा नाही हे त्यांचं तत्व आहे. त्यांची समजून सांगण्याची पद्धत खूप छान आहे. कोणत्याही गोष्टीचा त्या सकारात्मक पद्धतीने विचार करतात.

पाळणाघराच्या बाबतीत सांगायचं तर ताईंना असं वाटतं की माझ्या पाळणाघरातल्या मुलांवर चांगले संस्कार झाले पाहिजे, तसेच पाळणाघराच्या तायांनी पण सगळं शिकून घेतलं पाहिजे. त्यांची शिकवण्याची पद्धत खूप छान आहे. एखाद काम करायचं म्हटलं तर ते लगेच पूर्ण करायचं हा त्यांचा स्वभाव आहे. वात्सल्यपूर्णाची पाळणाघरे त्यांनी स्वत: शुन्यातून तयार केली आहेत. आणि स्वत:च्या पायावर उभी केली आहे. असे व्यक्तिमत्व आम्हाला लाभले म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**प्रियंका कानगुडे**

**मदतनीस, रिमझिम पाळणाघर**

# १९. मेधाताईंनी जीवनाला दिशा दिली

प्रत्येकाच्या आयुष्यात उतार चढाव होत असतात, पण त्याला दिशा देणारी व्यक्ती मिळाली तर? मला मिळाली म्हणजे आमच्या मेधाताई! पहिल्यांदा मला वाटले, ''अन्नपूर्णा म्हणजे काय? कोणी संस्था स्थापन केली? मेधाताई म्हणजे कोण?'' असे बरेच प्रश्न मनात होते. पण पाळणाघरात कामाला लागल्यावर कळलं की, ''मेधाताई म्हणजे अन्नपूर्णा'' आम्हाला मार्गदर्शन करतात, स्वतःमध्ये हिम्मत निर्माण करतात, योग्य निर्णय कसा घ्यावा ते शिकवतात, प्रत्येकाची काळजी घेतात! थोडक्यात सांगायचे म्हणजे त्यांनी, मला एक झाड हातात दिले आहे. ते कसे मोठे करायचे ते आम्हाला शिकवतात. कधी विचार पण नव्हता केला, की अशा व्यक्तीमुळे आपल्या आयुष्याला वेगळे वळण मिळेल. माझं स्वप्न होतं घराचं ते पूर्ण झालं. सर्वात मोठी गोष्ट आहे, स्वतःच्या हिम्मतीवर कर्ज फेडले, ते पण स्वतःच्या पगारातून, नवऱ्याच्या पगारातले पैसे न घेता! मला हया गोष्टीचा खूप अभिमान वाटतो. खरं सांगायचं म्हणजे स्त्रियांनी स्वतःच्या पायावर कसे उभं राहायचे, आणि तिने तिचा व्यवसाय कसा पुढे नेला पाहिजे, ते मेधाताई आम्हाला शिकवतात. मी खूप आभारी आहे मेधाताईंची.

**मनिषा पवार**
**तुर्भे पाळणाघर, मुंबई**

# १००. माझी ओळख मिळाली

**आ**मच्या प्रिय मेधाताई

हे नाव फक्त ऐकले होते कर्ज घेताना. जेव्हा मोठी मिटींग होती जेव्हा बघायला मिळाले, तेव्हा लांबून बघून खूप आनंद झाला. मग अन्नपूर्णा मध्ये मला पाळणाघराचे काम मिळाले आणि संचालिका म्हणून मी रूजू झाले .तिथून माझा आत्मविश्वास वाढला. पहिले वस्तीत कुणी ओळखत नव्हते. मेधाताईंचा डोक्यावर हात आला,''अन्नापूर्णाचे पाळणाघर आहे ना?''असे लोक विचारतात, ते एकून मनात आनंद होतो. एक शिक्षिका म्हणून माझी ओळख झाली. खरंच आता मेधाताईंना जवळून बघतो, बोलतो त्यांनी पायावर कसे उभे रहायचे आम्हाला शिकवले. मिटींगमध्ये दर महिन्याला नवीन काही शिकवतात. मेधाताई, मी आणि माझा परिवार आपले खूप खूप आभार मानतो.

**खैरुन्निासा शेख**
**विमल - गोपाळ पाळणाघर,पुणे**

## १०१. स्वतःच्या पायावर उभी राहिले

**प्रथम** मी अन्नपूर्णा संस्थेचे आभार मानते. मी वात्सल्यपूर्णा संस्थेत ५ वर्ष झाले, काम करते. ताईंचा स्वभाव खूप चांगला आहे. आज ताईंमुळे माझे स्वत:चे घर झाले. ०१/०६/१७ रोजी ताईंनी मला ७ लाखाचे कर्ज दिले व मी तिथे पाळणाघर चालविते. जर चुकलं, तर ताई समजून सांगतात. आज पाळणाघरात ४६ मुले आहेत. ताई म्हणाल्या, ‘‘तुझ्या पगारातून हप्ता गेला पाहिजे व घरात थोडे तरी पैसे तुला दिले पाहिजे.’’ ताई खूप चांगल्या प्रकारे सहकार्य करतात. आज मी ताईंमुळे स्वत:च्या पायावर उभी आहे.

**सौ. सुवर्णा लक्ष्मण चोरघे**
**नंदन पाळणाघर**

## १०२. स्वतःचे घर, व्यवसाय झाला

**माझं** नाव आम्रपाली विनोद सोनवणे. मी अन्नपूर्णात कामावर २२/१०/२०१५ पासून रूजू झाले. मी कामाला लागले तेव्हा पाळणाघरात ३० मुले होती, त्यानंतर ४० मुले झाली. त्यामुळे प्रमोशनसाठी वस्तीत फिरावे नाही लागले. त्यानंतर २०१९ मध्ये मला संस्थेने ७ लाखाचे कर्ज दिले व माझे स्वतःचे घर झाले व स्वतःचा व्यवसायही झाला. पण पहिले पाळणाघर बाजार गल्लीत असल्यामुळे घरोघरी फिरावे नव्हते लागत. पण पाळणाघराची जागा बदलली, मुलांची संख्या खाली आली. मुले १५, १६, २० च्या आत मध्येच होती, पण मला मेधाताईंनी खूप मदत केली, मुले वाढावी म्हणून माझ्यासाठी घरात १५०००/- चे कारपेट व लाईट बसवून दिला. माझ्या पाळणाघरात दोन सुपरवायझर विजीट ठेवल्या, मी बोलण्यात कमी पडत होते. ताईंनी मला खूप मदत केली. आता माझ्या पाळणाघरात २५ मुले आहेत.

**आम्रपाली विनोद सोनवणे**
**अंकुर पाळणाघर , पुणे**

# १०३. शून्यातून वर आणले

**मी** जेव्हा गावाकडून आले, तेव्हा मला काहीही माहित नव्हते. शहरांमध्ये कसे रहायचे,कसे बोलायचे. मी जेव्हा पाळणाघरात कामाला लागले तेव्हा नविनच असल्यामुळे थोडी तारांबळ झाली. पण नंतर ट्रेनिंग, मिटींग मधून मिळणारा सर्व ताईंचा सहवास आपलासा वाटू लागला! शिक्षिकेसारखा सन्मान मला कुठेच मिळाला नसता.

प्रत्येक महिन्याला ट्रेनिंगचा पण आम्हाला खूप फायदा होतो. मी पुण्यामध्ये येऊन माझे स्वतःचे घर होईल म्हणून कधीच विचार केला नव्हता. पण ताईंच्या आशिर्वादाने माझे स्वतःचे घर झाले. मी ताईंची खूप खूप आभारी आहे. जसे लहान मुलाला बोट धरून आई-वडील चालायला शिकवतात तसेच, ताईंनी आम्हाला शून्यातून वर आणले.

दोन वर्षां पूर्वी ताई महिन्यातून एक तास भेटायच्या, पण आता प्रत्येक मिटींगला भेटतात आणि पाळणाघराबद्दल कौतुक करतात. आम्हाला खूप छान वाटते. वेगळे वेगळे बदल घडवून आणतात. ते मला खूप आवडते.

**कविता थोरात**
**मोगरा पाळणाघर**

## १०४. ताईंनी दिले सन्मानाचे जीवन

**मी** अन्नपूर्णा संस्थेबद्दल काय सांगू? माझी आई कमल हरिदास पंडीत ही अन्नपूर्णा संस्थेची सभासद होती. मी चौथी किंवा पाचवीमध्ये होते. पहिले कर्ज तीन हजार घेतले होते, कर्वेनगरला जे दोन खोल्यांचे ऑफिस होते, तेथे आईबरोबर तो हप्ता देण्यास मी जायचे. तेव्हा पासून अन्नपूर्णा बद्दल माहिती होती.

मेधाताईंनी लावलेले हे छोटे रोपटे आज इतके मोठे वटवृक्ष झाले. या वटवृक्षामध्ये सामावलेल्या हया सहा संस्था उदा. मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स, पाळणाघरे, शैक्षणिक शिष्यवृत्ती, रिसर्च सेंटर त्या मधील एका संस्थेची मी घटक आहे. ती म्हणजे वात्सल्यपूर्णा स्वंरोजगार संस्था म्हणजे (पाळणाघर). एका पाळणाघरात गेली आठ वर्षे मी काम करते.

मला कधी वाटले सुद्धा नव्हते की, या संस्थेत मी कधी कामाला येईन पण ही संधी मला १/५/२००९ रोजी मिळाली. २/३वर्षे काम केल्यानंतर काही कारणाने एक दिवस मला माझे काम सोडावे लागले. एक वर्ष मी घरी होते. त्यातून चाललेला माझ्या संसाराचा गाडा कोठेतरी डळमळायला लागला. पुन्हा सुरू झाला तो संघर्ष, आणि त्यासाठी मी पाळणाघराचे सन्मानाचे काम सोडून घरकाम करू लागले. पण माझे मन त्या कामात समाधानी नव्हतं. कारण वस्तीतील गरजू महिलांची मुलं संभाळण्याची मला इतकी सवय झाली होती की, माझा वेळ त्याच्यात कसा जायचा हे कळायचे नाही! मुलांच्या प्रत्येक ॲक्टिव्हिटीमध्ये मी इतकी रमून जायचे की, घरचे किती दुःख, घरचे काही टेन्शन, असले तरी त्यांचे विचार कधी यायचे नाहीत. सर्व आलेले दिवस आनंदात जायचे. ती आठवण, विचार येऊन ज्योती ताईंना फोन केला, ''ताई मला

मी केलेले काम पुन्हा करायचे आहे.'' मला ज्योती ताईंनी सांगितले, की ''तुम्हाला मेधाताईंनी भेटायला बोलवले आहे''. मी ताईंना भेटायला गेल्यावर ताईंनी मला विचारले ''आधी तू कशी आहेस? तब्बेत कशी आहे?'' त्यावेळी मला खूप भरून आले होते. तो दिवस मी कधी विसरणार नाही. मला ताई म्हणाल्या,''आपल्याकडे मदतनीसची जागा शिल्लक आहे. तू उद्या पासून कामावर रूजू हो'' पुन्हा अन्नपूर्णामध्ये मला संधी दिल्याबद्दल मी ताईंची खूप ऋणी आहे. मला पुन्हा कामावर येऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. माझा मोठा मुलगा एफ.वाय. होऊन छान फोटोग्राफी शिकत आहे. मुलगी राधा ८ वी मध्ये शिकत आहे आणि पुन्हा आनंदी आहोत.

**छाया महामुनी**
**पाळणाघर, वारजे, पुणे**

# १०५. तुम्ही माय मी लेकरु

**मे**धा ताईंबद्दल मनोगत सांगणे म्हणजे आकाशाची लांबी मोजण्यासारखे आहे. कारण त्यांचे कार्य इतके महान आहे की,त्यांचे शब्दात वर्णन करणे अशक्यच आहे. तरी पण एक छोटासा प्रयत्न.

मला पाळणाघरात येऊन जवळ जवळ १० वर्षे होत आली. पूर्वी ताईंशी भेट ही एच.आर. मिटींग दिवशीच व्हायची, तीही दोन किंवा तीन तास, तीन महिन्यानी एकदा. पण मागच्या दोन वर्षात ताईंना खूप जवळून पाहिलं. त्यांना तसा वेळ कमी असतो, पण कमी वेळेत खूप काही शिकवून जातात. अगदी प्रत्येकाला ती गोष्ट समजली पाहिजे,ही त्यांची तळमळ जाणवते.

प्रत्येक वेळी ताई जेव्हा येतात, तेव्हा त्यांच्याकडून नवनविन गोष्टी आम्ही शिकत असतो. पाळणाघरात आम्हाला कोणत्या ट्रेनिंगची गरज आहे हे त्यांना न सांगताही समजते. तसेच गरीब मुलांबद्दल ही त्यांना खूप काळजी असते.

मी तर माझे भाग्य समजते, की मी या अन्नपूर्णा संस्थेत कामासाठी आले आणि माझ्या आयुष्यात खूप चांगल्या गोष्टी घडल्या. तसेच काही वाईट प्रसंगातही त्या खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. मेधाताई बद्दल खूप खूप लिहिता येईल, पण ते पानावर उतरवणे शक्य नाही. त्यांचे मोठेपण शब्दात मांडणे शक्यच नाही. कधी कधी तर असे वाटते की, आम्हाला जर मेधाताई भेटल्या नसत्या तर आमची कायम प्रगती झाली नसती. येथे आल्यावर जे स्वप्न पाहीले ते पूर्ण झाले, ते पूर्ण होण्यासाठी मेधाताई पाठीशी उभ्या होत्या.

जसं वटवृक्षाच्या सावलीत अनेक छोटी छोटी झाडे, वेली, पक्षी विसावतात व त्या आनंदाने नाचतात व सुखात

वागडतात तसेच आम्ही त्यांच्या छायेत सुखाने वागडत आहोत व स्वाभिमानाने जगत आहोत.

मेधाताईंनी अन्नपूर्णा संस्था स्थापन करून माझ्या सारख्या प्रत्येक वस्ती पातळीवरील व्यक्तीसाठी स्वतःचा देह चंदनासारखा झिजवतात हे पाहून डोळयात पाणी आल्याशिवाय राहत नाही. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, ‘‘पूर्व जन्मीची पुण्याई भेटली, मेधाताई सारखी कर्तव्यदक्ष आई भेटली’’

मेधाताई तुम्ही माय मी लेकरू

सांगा कसं विसरू

जीवनपथ हे अवघड भारी

कुठवर मी सावरू, सांगा कसं विसरू

मेधाताई तुम्ही असता संगती

दुःख लागले सरू, सांगा कसं विसरू.....

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर असू द्या ताई तुमची साथ! हेच देवाकडे मागणे मागते जोडून दोन्ही हात!

**अनिता ढोले**
**वारजे पाळणाघर**

# १०६. दुःखात दिली साथ

**प्रिय** मेधाताई,

असं म्हणतात की, आयुष्यामध्ये जेव्हा आपल्या गरजेला जो माणूस धावून येतो तोच आपल्यासाठी देव असतो आणि माझ्या जीवनात ते स्थान तुमचं आहे.

मेधाताई तुम्ही माझे हात तेव्हा धरले, जेव्हा मला कोणाचाही आधार नव्हता त्या आधारासाठी तुमचे कितीही आभार मानले, तरी कमीच आहे. माझ्या प्रत्येक दुःखाच्या क्षणात तुम्ही माझ्यासोबत आहात, तो प्रत्येक क्षण मला अभिमानाचा वाटतो.

मला अजूनही आठवणीत आहे २००१ साली तुमची आणि माझी भेट झाली, तेव्हा मला माझ्या आयुष्यामध्ये आधाराची गरज होती, तेव्हा मला निवारा हवा होता. तेव्हा तुम्ही मला कर्ज देऊन खूप मोठे उपकार केले आहे. फक्त कर्ज देऊन नाही, तर अनोळखी स्त्रीला आपलं माणूस म्हणून आधार दिला. तेव्हा मला मराठी लिहिता आणि बोलता सुद्धा येत नव्हतं, तुम्ही मला बोलायला तर शिकवलं, तसेच मला लिहिण्याचे ज्ञान सुद्धा दिले. तुम्ही मला स्वाभिमानी होण्यास प्रवृत्त केले. एका स्त्रीसाठी तिचा स्वाभिमान किती महत्त्वाचा असतो मला तुम्ही शिकवले, तेवढेच नाही तर मला एक रोजगार सुद्धा दिला. पाळणाघर चालवण्याची प्रेरणा दिली. आज माझे घर आणि माझा पाळणाघराचा उद्योग तुमच्यामुळे आहे. मी आज कोणापुढेही न झुकता माझे आयुष्य जगते आहे, ते फक्त तुमच्यामुळेच.

माझ्या आयुष्यामध्ये कितीही सुखाचे काळ आले तरी मी तुम्हाला विसरू शकणार नाही. कारण माझ्या दुःखाच्या काळामध्ये तुम्ही माझ्यासोबत होतात. तुम्ही माझ्या

आयुष्यातील अविभाज्य भाग आहात दोन वर्षांपासून तुम्ही उत्कृष्ट उद्योजिकाचे प्रशस्तीपत्रक देऊन मला अजून चिकाटीने काम करण्याची प्रेरणा दिली या सर्व गोष्टीसाठी कोटी कोटी धन्यवाद!

**निर्मला चंदरगी**
**ममता पाळणाघर, गोसावी वस्ती, पुणे**

## १०७. ताईंमुळे पायावर उभ्या राहिलो

**मे**धाताई दोन वर्ष झाले, पाळणाघर हातात घेतले. मेधाताईमुळे स्वतःची घरे झाली. दर महिना आम्हाला ट्रेनिंग देऊन, चांगले शिकवले. ट्रेनिंगमुळे मुलांसोबत गाणे, गोष्टी, आवाज चढ-उतार हयाचे ज्ञान मिळते. मेधाताईं सोबत मिटींगला बसायला मिळते. मेधाताईंनी पाळणाघरात कॅमेरा लावून आम्हाला सुरक्षित केले. त्यांच्या मते ''स्वतःच्या पायावर उभे रहा, कष्ट करा, तुम्ही तुमचं कमवा!''

**भारती सिरसाल**
**अनमोल पाळणाघर, मार्केटयार्ड**

# १०८. माझे घराचे स्वप्न पूर्ण झाले

**मा**झ्या मेधाताई, त्यांच्याबद्दल जेवढे माझे मनोगत व्यक्त करेन, तेवढे कमीच आहे. पहिले म्हणजे मेधाताईंनी बँकेची नोकरी सोडून समाजाला चांगली दिशा दाखवली. दुसरे गरीब, गरजू महिलांना छोटे छोटे कर्ज दिले आणि तिसरे म्हणजे वस्तीतल्या मुलांवर कुठल्याही प्रकारचा अत्याचार होऊ नये म्हणून वस्तीत पाळणाघरे उघडली व इतरही सामाजिक कार्य केले. मी जेव्हा ही मेधाताईंना भेटते तेव्हा ताईंना बघून मला काम करण्याचा व प्रगती करण्याचा उत्साह येतो.

मी माझ्या घरातल्यासाठी किती कष्ट केले, पण त्यांना कोणाला माझी जाणीव नाही. पण जेव्हा ताई ट्रिपला आम्हाला नेतात, त्या दिवशी मात्र जो आनंद मी घेते, तो मी कधीच विसरणार नाही. जेव्हाही ताई मला भेटतात व पाठीवर हात ठेवून जेव्हा म्हणतात की ''मीनाताई कशा आहात?'' तेव्हा माझ्या खूप खूप जवळच्या माणसाने मला विचारल्यासारखे वाटते. ताईंनी जर ही अन्नपूर्णा सुरू केली नसती, तर एवढे सभासद, एवढी अन्नपूर्णा टीम प्रगती करू शकली नसती.

जीवन जगण्यासाठी महत्त्वाचे असते ते म्हणजे आपले स्वतःचे घर! माझे हे स्वप्न फक्त मेधाताईंमुळेच पूर्ण झाले.

**मीना वाघ**
**वृंदावन पाळणाघर, पुणे**

# १०९. मेधाताई- जीवनाला उमेद देणाऱ्या

"मेधा ताई" म्हणजे एक असे व्यक्तिमत्त्व आहे की ज्यांना पाहिल्यावर आपणही काही तरी करू शकतो आणि करू" ही भावना मनात जागृत होते. त्यांचे विचार एवढे परखड असतात, की त्या विचारांवर आपण विचार करून जीवन जगण्याची नवीन उमेद मिळते. त्या स्वत: एवढ्या खंबीर आहेत. समाजातील सर्व तळागाळातील महिलांना स्वबळावर उभे करण्याचे कार्य त्या करतात.

समाजातील "अंधश्रद्धा व भेदभाव" नष्ट करून एकमेकांसोबत एकत्र येऊन कार्यक्षम होण्याचे कार्य त्या करत आहेत. समाजात जागृती निर्माण होण्यासाठी त्या सर्व पातळीवर कार्यरत आहेत. त्यांचे विचार, त्यांची सांगण्याची पद्धत, त्यांची एखाद्या विषयांची माहिती समजावून सांगण्याची त्यांची पद्धत, दोन वाक्यात विषय समजून जातो. "त्यांच्या बद्दल लिहावे तेवढे कमीच आहे. कारण त्यांचे कार्य एवढे मोठे आहे की, त्याबद्दल लिहीणे म्हणजे अशक्यच आहे." त्या नेहमी दुसऱ्यांना आनंद देण्यासाठी तत्पर असतात व त्यांच्यामध्ये त्या स्वत: खूप आनंदी होतात. आज त्यांच्या कार्यामुळे "समाजातील गरीब गरजू महिला सक्षम आहेत व पूर्ण "अन्नपूर्णा परिवार" कार्यक्षम आहे.

खरं सांगायचं, तर माझी पण खूप इच्छा आहे, "माझं स्वत:चे घर व्हावं आणि माझ्या घरी पाळणाघर चालू करावं". मी ही आशा कधीच सोडणार नाही, एक दिवस नक्की येईल की माझं घर हे पाळणाघराच्या स्वरूपातच असेल. एवढा विश्वास आहे माझ्या मेधाताईंवर. मला पाळणाघरात काम करायला खूप आवडतं. लहान मुलांमध्ये राहणं, वावरणं, खेळणं ही वेगळीच मजा असते हो. माझं जीवनच झालंय पाळणाघर. नेईन मी नक्कीच माझ्या पण घरी.

माझ्या मेधाताईंना खूप खूप उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा! त्यांना प्रत्येक कामात यश मिळो. हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**संध्या नागटिळक**
**वृंदावन पाळणाघर,पुणे**

## ११०. आमच्या मैत्रिण ताई

**मे**धा ताई खूप चांगले विचार करतात. त्यांचे बोलणे ऐकून विचार करावासा वाटतो. त्या सगळ्यांना समान धरतात व भेदभाव करत नाही. एखादे उदाहरण किंवा शब्द एखाद्याला कळला नाही तर त्या व्यक्तीस समजावून सांगतात व स्वतःपेक्षा दुसऱ्यांचा जास्त विचार करतात. प्रत्येक महिला स्वतःच्या पायावर उभी राहावी म्हणून त्या त्यांच्यासाठी खूप काही करतात आणि त्या मॅडम म्हणून नाही तर एक मैत्रिण म्हणून व्यवस्थित समजावून सांगतात. त्यांना बघून बोलावंस वाटतं, त्यांचा स्वभाव खूपच छान आहे. सगळ्यांना आवडेल असा.

**सुलभा ढवळे**
**ममता पाळणाघर, पुणे**

# १११. अबला नाही सबला

**मी** पालवी पाळणाघरात १४/६/२०१४ पासून काम करते. मी एक गृहिणी म्हणून होते. मला पहिले काहीही काम नव्हते. पण आज सहा वर्ष पूर्ण झाली, मी अन्नपूर्णा संस्थेच्या पाळणाघरात काम करते. अन्नपूर्णाच्या संस्थापक मेधाताई. त्यांच्याबद्दल मी आज माझे मनोगत व्यक्त करणार आहे. आमच्या ताईंनी जेंव्हापासून वस्ती पातळीवर पाळणाघरे चालू केली, तेव्हा पासून गरजू महिलांना कामे मिळत गेली व त्या महिला आता आपल्या मुलांना पाळणाघरात ठेवून निर्धास्तपणे कामे करू लागल्या आहेत. पाळणाघरात काम करणाऱ्यांना स्वतः ची घरे बांधण्यास कर्ज उपलब्ध करून दिले. आज आमच्यापैकी काही जणींची ताईंमुळे स्वतःची घरे झाली. त्या महिला स्वतःच्या घरात आज छानपैकी पाळणाघरे चालवत आहेत. आमच्या ताईंनी त्यासाठी आम्हाला खूप छान मार्गदर्शन केले, आणि अजूनही करत आहेत. आम्हाला सक्षम बनवून ताईंनी आम्हाला स्वतःच्या पायावर उभे केले आहे. ताई आमच्यासाठी खूप करत आहेत. आज मी पाळणाघरात काम करत आहे. तिथे मला जो सन्मान मिळतो तो फक्त ताईंमुळे. ताई आज आमच्या पाठीशी उभ्या आहेत. ताईंच्या मार्गदर्शनामुळे आम्ही मुलांची छान काळजी घेऊन पाळणाघर व्यवस्थितपणे सांभाळत आहोत. ताईंनी विश्वास निर्माण करून दिला की, तुम्ही आज 'अबला' नाहीत तर 'सबला' आहात. मला ताईंचा खूप अभिमान सुद्धा आहे. त्या माझ्या आदर्श आहेत.

**संतोषी गाढवे**
**पालवी पाळणाघर**

# ११२. आभाळा एवढ्या उंच ताई

**मे**धाताई विषयी बोलणे म्हणजे आभाळाची उंची मोजणे इतके आहे. वस्तीतील गरीब व गरजू महिलांसाठी, ताई एक दैवत आहे. वस्तीमधील मुले सुरक्षित व चांगल्या जागी रहाण्यासाठी, त्यांचा विकास होण्यासाठी, वात्सल्यपूर्णासाठी ताईंचा मोठा आधार आहे. उदाहरण देते माझंच, मला अनुभव आहे, गरीब परिस्थितीचा, बिगारी कामाचा. प्रत्येक जणाची इच्छा असते, की खूप शिकून मोठे व्हावे, मला ही वाटायचं, मी पण खूप शिकावं आणि टीचर व्हावं पण माझ्या आई-वडीलांची गरीब परिस्थिती. यामुळे माझी इच्छा अधुरी राहिली. अर्धवट शाळा झाली. पण ताईंमुळे माझे हे स्वप्न व इच्छा ही पूर्ण झाली. मुले आम्हाला 'बाई' म्हणतात, टीचरचा मान मिळतो. टीचरचा हा मान कायम राहण्यासाठी, ताई आम्हाला ट्रेनिंग देतात. मला कामाला लागून १० महिने झाले. एवढ्या दिवसात मला हे जाणवलं की, आयुष्याच्या प्रत्येक मार्गावर गुरू भेटतात. पण ताई सारखे गुरू मला इथे येवून मिळाले.

**सोनी संतोष सबावल**
**सदाफुली पाळणाघर, वारजे**

# ११३. गोरगरीबांच्या देवमाणूस ताई

**आई** वडीलांच्या नंतर कोण असेल,तर त्या आमच्या मोठया ताई मेधाताई. आई वडील जसे आपल्या मुलांना घडवतात.त्यापेक्षा ही जास्त म्हणजे आमच्या मेधाताई आम्हाला घडवत आहेत. दर महिन्याच्या मिटींगला पाळणाघरांत काय केले पाहिजे, काय नाही ते समजावून सांगतात.

माझं पुण्यात सिमेंटचं घर असावं, हे स्वप्न ताईंनी पूर्ण केले आहे. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहीन. मला तर त्यांनी काम दिलं आहेच.पण माझ्यासारख्या इतर महिलांना पण त्यांनी बाहेर पडून काम करण्यासाठी मदत म्हणजे, त्यांच्या मुलांना वस्तीपातळीवर पाळणाघरे उघडून दिली आहेत. जिथे त्या आपल्या मुलांना निर्धास्तपणे सोडून कामाला जातात. त्यांनी वस्तीपातळीवरील अनेक महिलांना बचत गट (मायक्रोफायनान्स) या मार्फत कर्ज दिले आणि त्यांनी त्यांचे छोटे मोठे व्यवसाय सुरू केले आहेत. त्या महिला त्यांचे व त्यांच्या मुलांचे योग्य संगोपन करत आहेत.

जगात ताईंसारखी माणसं खूपच कमी आहेत. म्हणजे गरजेच्या वेळेस आपले नातलग, सगे सोयरे आपल्यापासून दूर होतात. पण ताई मदतीला नेहमीच आमच्या हातात हात देतात. आम्ही कुठे चुकलो असलो तर ताई आम्हाला रागावतात पण दुसऱ्याच क्षणाला आम्हाला खूप चांगल्या प्रकारे योग्य मार्गदर्शन करतात.

ताईंनी आम्हांला व पाळणाघरातील मुलांना आरोग्यनिधी दिला आहे. पाळणाघरातील मुलांचे वर्षातून एकदा चेकअप केले जाते. तसेच आमचे पण चेकअप केले जाते. योग्य व्यक्तीकडून आम्हाला दर महिन्याला ट्रेनिंग दिले जाते. त्या ट्रेनिंग मध्ये आम्हाला पपेट वरून गोष्टी कश्या

करायच्या, त्या मुलांना कशा सांगायच्या हे शिकवतात. छोटे मोठे खेळ, मुलांशी संवाद कसा साधायचा हे शिकवले जाते.

माझ्या लाडक्या मेधाताईंसाठी बोलायचं म्हणजे शब्दच अपुरे पडतात. प्रेमळ, प्रामाणिक, गुणवंत, एकनिष्ठ असे गुण त्यांच्यात आहे. गरिब भाबडया लोकांसाठी तर त्यांचा जीव तुटतोच हो! त्यांचे आयुष्यच आहे ते! माझ्या लेखी तर त्या आम्हा सर्वांच्या गोरगरीबांच्या देवमाणूस आहेत.

प्रत्यक्षात मी जेव्हा माझ्या ताईला भेटले, तेव्हा मी तर नुसती बघतच राहिले होते की, ''का करत असतील त्या गरीब लोकांसाठी?'' पण त्यांनी मदत करताना कोणती जात, कोणता धर्म कधीच पाहीले नाही हो! सरसकट सर्वांना मदत करतात. मला पण माझं आयुष्य मेधाताईंसोबतच आणि पाळणाघरात घालवायचं आहे.

मी स्वतः मेधाताईंना पाहिल्यावर व त्यांचे विचार ऐकल्यावर मला जगण्याची नवी दिशा मिळाली व मी माझ्या स्वतःच्या कुटुंबासाठी खूप खंबीर झाले. हे फक्त मेधाताईंमुळेच.त्यांच्या या कार्याला व मेधाताईंना खूप खूप शुभेच्छा! त्यांचे हे कार्य असेच पुढे पुढे यशाची उत्तुंग शिखरांची उंची गाठो ही सदिच्छा!!

**स्वाती रणदिवे**
**संचालिका, निसर्ग पाळणाघर.**

## ११४. ताईंसोबत आम्ही आमची बँकच काढली

**ताईं**विषयी मला खूप आदर वाटतो, मला असं वाटतंय की, त्या सगळ्यांची आईच आहे. पहिल्यापासून आम्हाला आधार दिला, त्यांच्यासारख्या आधार देणाऱ्या दुनियेत कुणीच नाही, इतका त्यांनी आधार दिला, माझ्या एकटीच्याच नाही तर अख्ख्या सृष्टीची आई आहेत, असं मला वाटतंय, मी अन्नपूर्णाची पहिली मेंबर आहे. ताईंनी स्वत: मला माझ्या भाजीच्या गाडीवर येऊन मेंबर केलं.

ताईंना समोर बघितल्यावर तोंडातून 'माझी आई' असा शब्द निघतो, माझी आईच आहे असं मला वाटतंय! आणि या आईने आम्हाला जे शिकवलं ते आम्हाला कुणी शिकवलं नाही.

त्यांच्यासारखं शहाणपण जगात दुसरं कुणाला नाही, ताई आमच्या पाठीशी उभ्या आहेत, म्हणजे एखादा देव आमच्या पाठीशी उभा असल्यासारखा आहे.

आमच्या ताई आम्हाला कुठे कमी पडू देणार नाहीत आणि आमच्या ताई आम्हाला कुठे अडू देणार नाहीत. याची खात्री आहे, आम्हाला कुठे त्या नडू देणार नाहीत, आम्हाला कुठे खड्यात पडू देणार नाहीत.

ताईंकडून कसं पोट भरावं, कसा पैसा कमावायचा, कसा पैसा सांभाळायचा. हे शिकलो. कसं दोन दोन रूपये मागं पाडायचं, कसं खायाचं, कुणाला द्यायचं, कुणाला न्हाय द्यायचं... सगळं शिकलो.

अण्णा लोकांचं पैसं घेत होतो, १०-१० रूपये रोजचे त्यांना देत होतो, हे ताईंना लई उशीरानं सांगितलं, पण सांगितलं, की ''आम्हाला भांडवल कमी पडतंय ना ताई म्हणून आम्ही घेतो,'' आणि मग ''कसं देता,'' ''साडेबारा टक्के ह्या व्याजाने आम्ही हे पैसे घेतो, आणि आम्ही रोज त्यांचे १० रू,

१५ रू फेडतो. ह्या पद्धतीनी आम्ही फेडून टाकतो.'' ताई मला म्हणाल्या, ''हे असं करण्यापेक्षा, आपली बँक चालू करूया का!'' सुरूवातीला झालेलं आमचं बोलणं ''आपलीच बँक चालू करूया का!'' माझ्या हाय चांगलं लक्षात ते, ताईंनी सांगितल्यावर 'हो' म्हटले मी. ताईंनी मला मुंबई फिरवून आणली, मला मुंबई माहित नव्हती, पहिल्यांदा ताईंसोबतच माझी बहिण आणि मी दोघीजणी गेलो. भाकरी बांधून घेवून आम्ही ताईसोबत गेलो, गेल्यावर आम्हाला ताईंनी सगळं दाखवलं, त्यांच्या आईचा कारभार, लई छान होतं तवा तिथं! सगळं बघितलं आम्ही, मग विश्वास बसला आपण पण कायतरी करु शकू . ताईंनी संध्याकाळी परत आम्हाला पुण्याच्या गाडीत बसवून दिलं, रात्री ११ वाजता शिवाजी नगरला उतरलो, तिथून रिक्षा करून घरी गेलो, सगळा खर्च ताईंनी केला, तेव्हा मग आम्हाला वाटलं, ''हे माणूस खरं हाय, आपल्याला कुठंतरी पुढं नेईल,'' मग तो विश्वास पटत गेला, ताई आमच्या घरी यायच्या-अहो, गोसावी वस्तीत एवढ्या एवढ्या चिखलातून येत होत्या, गोणपाटावर बसत होत्या.

आम्ही अन्नपूर्णात सभासद असेपर्यंत आम्हाला पेन्शन देता आली नाही म्हणून मेधाताईंनी आमच्या नावावर ५०,०००/- रक्कम एफ.डी. ठेवून त्याचे व्याज आम्हाला पेन्शन रूपाने बँकेच्या खात्यात जमा करत आहेत. अशा माझ्या मेधाताईंना खूप खूप धन्यवाद.

**शेवंताबाई (प्रथम कर्जदार)**
**गोसावी वस्ती,पुणे**

# ११५. कोणी साथ देत नव्हतं, तेव्हा ताईंचा हात मिळाला

**मी** ताईंकडून पहिल्यादां एक हजार रूपयाचं कर्ज घेतलं, ते मी भाजीच्या धंद्याकरिता घेतलं होतं. मेधाताई चांगल्या आहेत, माणुसकीच्या आहेत, जीवाला जीव देणाऱ्या, मायाळू आहेत.

ज्यावेळी कोणीच साथ देत नव्हतं, त्यावेळी ताईंनी आम्हाला हात दिला.

आमची आमच्या मुलाबाळांची घरं त्यांच्यामुळे उभी राहिली. कुटुंबाला आधार मिळाला. आजारपण असो, नाहीतर इतर अडचण आम्ही मेधाताईंकडेच धावत यायचो आणि त्या आम्हाला मार्ग दाखवायच्या अशा आमच्या लाडक्या मेधाताई.

आता आमची ५०,०००रु. ची एफडी आहे. मेधाताईंनी दिलेलं पेन्शन आहे ते.

**सुशीलाबाई साळेकर (प्रथम कर्जदार)**

**पौड फाटा, पुणे**

# ११६. मेधाताई नेहमी डोळयासमोर दिसतात

**लि**लाबाई ढोक, राहणार पौड फाटा, पोलिस चौकीच्या समोर, मेधाताई म्हणजे माझी आई. मी त्यांच्यापेक्षा वयाने मोठी असले तरी हे नाते इतके सुंदर वाटते. त्यांचे नाव घेतले की मला खूप आनंद वाटतो. पूर्वी माझी परिस्थिती बरी नव्हती. पण ताई बँकेत नोकरीला जाताना आमच्याकडे भाजी घ्यायला यायच्या. आमचा पहिला गट मेधाताईंनी केला. मेधाताईंचा मला इतका आधार वाटतो की, वर्षातून एकदा भेटले, तरी पण असे वाटतं, की रोज मला भेटतात. आम्हाला मेधाताई असे म्हणतात की, ''तुम्ही आल्याशिवाय मिटींग पूर्ण नाही होतं'' जेव्हा भाषण करताना आम्हाला कुशीत घेतात, तेव्हा छान वाटते तेव्हा त्यांची मिटींग सार्थक होते. आम्हाला बघून त्यांना वर्षभराचा कामाचा हुरूप येतो. त्या म्हणतात, ''मला वर्ष भर पुरतो हा हुरूप'' वर्षभर कुठंबी जा हेच माझ्या ध्यानात असतं, दुसरं काही नाही! आई गेली तरी मला आईचं काही वाटलं नाही, पण ताई मला अगदी कुठं बी जा, समोर दिसतात, नसल्या तरी जाणवतात. खूप छान भावना आहेत. त्यांनी खूप लोकांचे चांगले केले, खूप लोकांचं अजून चांगले होईल.

मेधाताई आम्ही अन्नपूर्णात असताना पेन्शन योजना सुरू करू शकल्या नाहीत म्हणून रुपये ५०,०००/- आमच्या नावे अन्नपूर्णात एफ.डी. ठेवली आहे व या एफ.डी. वरील व्याज मला माझ्या म्हातारपणाच्या खर्चापाण्यासाठी मिळते, आजारपणाच्या गोळ्यांसाठी मिळते म्हणजे आमची म्हातारपणाची सोय त्यांनी केली. मी त्यांना याबद्दल खूप धन्यवाद देते.

**लिलाबाई ढोक (प्रथम कर्जदार)**
**पौड फाटा, पुणे**

# ११७. ताई देतात चांगली शिकवण

**प्रिय**, मेधा ताई

मेधा ताई खूप खूप चांगल्या आहेत. मेधा ताई आम्हाला समजून घेतात. सगळ्यांशी मिळून मिसळून राहतात व त्या गरिबांना कर्ज देतात ज्यामुळे गरिबांचे कल्याण होते. आमच्याशी चांगले बोलतात. आम्हाला चांगली शिकवण देतात आमची जर काय चूक असेल तर त्या आम्हाला समजून सांगतात, म्हणून त्या आम्हाला खूप खूप आवडतात.

**तुमची स्वप्नाली**

## ११८. ताईंनी माझ्या चंच्या ऑस्ट्रेलियाला नेल्या

**मी** टेलरिंगचा व्यवसाय करते. अन्नपूर्णा मध्ये दोन वर्ष सीआर होते. टी.व्ही. ला माझी मुलाखत झाली होती,पेपरला पण माझं नाव आलं होतं, उद्योजिका म्हणून माझ्या दुकानात मेधाताई आल्या होत्या.

माझ्याकडून ताईंनी चंच्या शिवून घेतल्या होत्या. मला दहा हजाराची ऑर्डर दिली होती, मेधा ताईंनी दहा हजार बँकेतच जमा केले होते. या चंच्या (पिशव्या) ताईंनी ऑस्ट्रेलियाला नेल्या होत्या. खूप अभिमान वाटला तेव्हा! अन्नपूर्णाने माझं आयुष्य बदलून टाकलं.

मेधाताई माझी आई आहे, माझी टी.व्ही.ला मुलाखत आली. म्हणजे जे माझं स्वप्न नाही, ते पूर्ण केलं, जो स्वप्नात ही सन्मान बघितला नाही, तो मला मिळाला.

एक रूपया कसा कमवायचा, व्यवसाय कसा करायचा, तो पैसा कुठे वापरायचा हे मला मेधाताईंनी शिकवलं, तेव्हा मी खूप अनाडी होते, आता हुशार झाले.

**कविता रमेश जाधव**
**सभासद, कर्वेनगर पुणे**

# ११९. आर्थिक व वैचारिक बदल अन्नपूर्णामुळे घडले

**मी** गेली १२ वर्षे अन्नपूर्णाबरोबर आहे. मी प्रथम कर्ज माझ्या घरासाठी घेतले,त्यानंतर मी काही छोट्या मोठ्या कारणाने माझ्या व्यवसायात बदल घडवत गेले. मला अन्नपूर्णातून साथ मिळाली. अन्नपूर्णामुळे मला समाजातील घडामोडींना सामोरे जाण्याची माहिती मिळत राहते. त्याच प्रमाणे मी माझ्यातबदल करत गेले. माझ्या घरातील आर्थिक परिस्थिती आणि वैचारिक बदल अन्नपूर्णामुळेच झाले. मला याचा अभिमान वाटतो की माझे नाते अन्नपूर्णाशी जोडलेले आहे.

आज मी फक्त कर्ज न घेता बचत करणे, एफडी करणे, स्वत:साठी म्हातारपणाचा आधार मिळवण्याची, पैसे बाजूला ठेवण्याची सवय मला अन्नपूर्णातून मिळाली. माझ्या प्रत्येक यशस्वी कामाच्या मागे अन्नपूर्णाचा आधार आहे. आणि हा आधार शेवट पर्यंत माझ्यासोबत रहावा. हाच प्रयत्न मी करेन. अन्नपूर्णा ही आम्हाला मेधाताईमुळे मिळाली, त्यांचे मी मनापासून आभार मानते. आमच्या घरातील प्रत्येक गरजा जाणून त्यातून एक एक प्रकल्प उभा केला. याचा महिलांना उपयोग झाला. अशी कार्ये कोणतीही कर्ज देणारी संस्था करत नाही. ते अन्नपूर्णातून मिळते. आज अन्नपूर्णामुळे माझे आयुष्य सुलभ झाले आहे,आणि मी आर्थिकदृष्ट्या सफलतेने जगू शकते.

धन्यवाद अन्नपूर्णाआणि धन्यवाद मेधाताई!

**शिवानी राहुल कांबळे,**
**सभासद प्रतिनिधी, येरवडा, पुणे.**

# १२०. ताईंनी सामाजिक ज्ञान वाढवले

**मी** स्वाती गौतम वाघमारे, विश्रांतवाडी भीमनगर मध्ये राहते आहे. आता माझे चौथे कर्ज चालू आहे. अन्नपूर्णा परिवारामध्ये आल्यापासून आणि मिटींग अटेंन्ड केल्या, तेव्हापासून बरेच आर्थिक ज्ञान, सामाजिक ज्ञान वाढले. मेधाताई आपल्याला सामाजिक ज्ञान देतात. त्यांच्या मार्फत बऱ्याच मान्यवर लोकांची ओळख होते. त्या मान्यवरांकडून मिळणारी माहिती ही अनमोल आहे.

अन्नपूर्णा परिवारामुळे आम्हाला आर्थिक मदत तर आहेच, आणि आमचे म्हातारपण सुद्धा सुरक्षित आहे. आम्हाला पैश्यांसाठी कोणत्याही बँकेत जाऊन कर्ज घ्यावे लागत नाही. आमच्या उद्योगासाठी अन्नपूर्णा परिवाराकडून खूप मदत होते.

**स्वाती गौतम वाघमारे**

**सभासद प्रतिनिधी, विश्रांतवाडी पुणे**

# १२१. 'स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी'

**हे** वाक्य जसे आईसाठी आपण बोलतो. पण मी म्हणते,आमच्यासाठी आमच्या मेधा ताईच आई आहेत. त्यांनी अन्नपूर्णा ही सामाजिक संस्था चालू केली. गरीब कष्टकरी महिलांना कर्ज देणे, तसेच त्यांना सक्षम करणे, आर्थिकदृष्ट्या त्यांचे सक्ष्मीकरण करणे, विविध योजनांच्या माध्यमातून तळागाळातील गरीब महिला, मुले, एकट्या महिलांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती, आमच्या आरोग्यासाठी निधी अशा सर्व सेवा दिल्या.

तसेच समाजातील वेगवेगळ्या गोष्टी आमच्या सारख्या महिलांना माहित नसतात. सामाजिक विषयाच्या माध्यमातून ताई आमच्या पर्यंत पोहचवतात. अशी काळजी एक आई जशी मुलाची घेऊ शकते. तशी मेधाताई आमची काळजी घेतात. तसेच आमचा हात धरून आम्हाला प्रगतीपथावर नेतात. नागरिकत्व सिद्ध करण्याविरुद्ध त्यांनी खूपच चांगल्या पद्धतीने जनजागृती केली.

अशा आमच्या ताईंना ६० वर्ष पूर्ण होत आहेत. तरी त्यांचा उत्साह, कष्ट, तळमळ उदंड आहे. ताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**जयश्री वि. मोहिते**
**वस्ती प्रतिनिधी, मानखुर्द**

## १२२. आज माझ्याकडे बचत आहे

**अ**न्नपूर्णामुळे घरातून बाहेर जाण्याचे धाडस माझ्यात निर्माण झाले. अन्नपूर्णामुळे मी बोलायला शिकले. जिथे चुकते तेथे मी प्रतिउत्तर देऊ लागले. मी जेव्हा सी आर झाले,तेव्हा मला खूप भारी वाटले व मला एक प्रकारे वेगळाच मान मिळाला. माझ्या गटातील बायका मला म्हणाल्या ''तू अन्नपूर्णा मध्ये असल्यामुळे तू खूप धाडसी झाली आहेस. तू तुझे स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ लागली आहेस.'' माझ्याकडे आज पैसे आहेत, बचत आहे. मला चांगल्या प्रकारे त्या बचतीचा फायदा झाला. कर्जामुळे मला माझ्या वडापावच्या गाडीवर थोडीफार सुधारणा करता आली.

मी अन्नपूर्णामध्ये असल्याचा मला खूप अभिमान आहे. ताई खूप छान वागतात. आमच्याशी त्या आपुलकीने बोलतात. सर्वांशी प्रेमाने वागतात .त्या सर्व सभासदाची भविष्याची काळजी घेतात.

**कोमल राहुल गायकवाड**
**वस्ती प्रतिनिधी,पुणे**

# १२३. ताईंची शिकवण: घेण्यात नाही, तर देण्यात मजा आहे

**प**रिवार ह्या शब्दाविषयी माझे मनोगत व्यक्त करण्यास आज संधी मिळाली. परिवार म्हणजे सर्वसाधारण आपण म्हणतो, आपल्या घरातले सगळे! घरातील कमावती व्यक्ती पुरूष असतो, तो कुटुंब प्रमुख. कुटुंब प्रमुखाची जबाबदारी मोठी असते. परिवाराचे पालन, पोषण, शिक्षण, संरक्षण, आजारपण हे महत्त्वाचे खर्च व जबाबदाऱ्या असतात.

अन्नपूर्णा परिवाराच्या कुटुंब प्रमुख आपल्या मेधाताई आहेत. त्या आपल्या परिवाराची काळजी कशी घेतात? त्यासाठी ताई काय-काय करतात? ताई आपल्यासाठी पहिलं काम करतात, ते आपल्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करतात. त्यामुळे आपण मुलांचे पालन, पोषण, शिक्षण करू शकतो. कामावर जाणाऱ्या महिलांसाठी पाळणाघरे आहेत. तिथं सुरक्षितता आहे. आजारपण आल्यावर मदत मिळते. अन्नपूर्णा परिवाराच्या प्रमुख या नात्याने ताईंनी आपली किती काळजी घेतली हे जागोजागी दिसते. आपल्या अन्नपूर्णा परिवारात ६०,००० पेक्षा जास्त सभासद महिला आहेत आणि त्या प्रत्येक सभासदाच्या घरातील सदस्य मिळून २ ते ३ लाख माणसं एवढ्या मोठ्या परिवाराच्या प्रमुख, मेधाताई आहेत. तर मग विचार करा ताईंना किती काम करावं लागत असेल.

४ मार्च ला टिळक स्मारक मंदिर इथे ताईंची मुलाखत झाली. सभासद प्रतिनिधी म्हणून मी हजर होते .खूपच छान मुलाखत झाली. ताईंच्या विचारांना भरभरून टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला. ताईंच्या बोलण्यातून खूप काही शिकण्यासारखं आहे. मलाही वाटलं ,मी पण ताईसारखं काम करावे. स्वतःसाठी जगत असताना दुसऱ्याचाही विचार करावा. घेण्यात नाही तर

देण्यात मजा आहे. साधं रहाणीमान, शिस्त, खोटं बोलणे आवडत नाही. ताईंचे ध्येय काय आहे, पुढे काय करणार आहेत, अशा बऱ्याचशा गोष्टी ताईंनी सांगितल्या.

फक्त पुण्यातच नाही, महाराष्ट्रात, भारतात पूर्ण जगात ताईंसारख्या विचार असणाऱ्या महिला आल्या, तर पूर्ण समाजाचा कायापालट होईल. असा आदर्श, प्रेरणा, नम्रता, दया, क्षमा, ताईंकडून मला मिळाला.

**वर्षा गायकवाड**
**सभासद प्रतिनिधी, पुणे**

## १२४. समान संधी सर्वांना

**मे**धाताईंच्या सान्निध्यात वस्ती प्रतिनिधी झाल्यापासून आले. निर्णय कसे घ्यायचे असतात हे आम्हाला मेधाताईंनी शिकवले. सर्वांना समान न्याय मिळायला हवा, कोणावरही अन्याय होता कामा नये, संधी सर्वांना मिळावी अशी मेधाताईंची तत्वं मी अनुभवली आहेत.

त्यांची सभासदांबद्दलची तळमळ मला विशेष वाटते. त्या आधी सभासदांच्या स्वप्नांचा विचार करतात.

मी खूप घडले ताईंमुळे.

**रेश्मा तांबोळी**
**सभासद प्रतिनिधी, पुणे.**

## १२५. ताईंनी आम्हाला शिखर दाखवले

**आ**ज आम्ही स्त्रिया तुमच्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहोत. आम्हाला १०० रुपयांसाठी पण कोणी दारात उभे करत नाही. पण तुम्ही आमच्यावर विश्वास दाखवून मोठी मोठी रक्कम आम्हाला कोणतेही तारण न घेता दिली त्यावरच आम्ही आमचे व्यवसाय उभे करू शकलो.

माझा मुलगा अपंग आहे पण तो आज तुमच्या मदतीतूनच जीवन जगतो आहे. मी तुम्हाला जोपर्यंत मी आहे तोपर्यंत विसरू शकत नाही.

आम्हाला आमच्या पायावर उभं करून उंच शिखरावरचा रस्ता दाखवण्यासाठी धन्यवाद ताई!

**आशा एम. रेड्डी**

**सभासद प्रतिनिधी, घाटकोपर ब्रँच,मुंबई**

## १२६. ताई निर्णयात आमचा विचार घेतात

**घर** आणि काम याच्या,पलीकडे पण एक जग आहे याचा अनुभव मला अन्नपूर्णात मी सी आर म्हणून निवडून आले, आणि आमच्या जश्या जश्या मिटींग होत गेल्या त्यामधून आला! ताईची आमच्या बद्दलची तळमळ खूप जाणवली. त्या खूप छान बोलतात. मला ताई बद्दल खूप आपुलकी वाटते. त्यांनी आम्हाला सी.आर. / वस्ती प्रतिनिधी या महत्त्वाच्या पदावर कुठल्याही भेदभाव न करता बसवले.

प्रत्येक निर्णयात आमचा विचार त्या ऐकतात आणि अगदी आपुलकीने आमच्याशी बोलतात याचे मला खूप कौतुक वाटते. म्हणूनच मेधाताई मला खूप खूप आवडतात.

**नंदा जाचक**

**सभासद प्रतिनिधी, पद्मावती, पुणे.**

# १२७. ताईंनी आनंद व हिंमत दिली

**मी** अन्नपूर्णाची गेले १३ वर्षे सभासद आहे. माझे १३ वे कर्ज चालू आहे. आता मी वस्ती प्रतिनिधी आहे. मला अन्नपूर्णामध्ये खूप काही शिकायला मिळाले आहे. मी घेतलेल्या कर्जांचा वापर घरदुरूस्ती साठी केला. मला अन्नपूर्णा मुळे बोलायची खूप हिंमत मिळाली. मी अन्नपूर्णातून कर्ज घेवून मुलांचे शिक्षण केले. मुलींच्या लग्नाला देखील थोडी फार मदत झाली. मी बाहेर एकटी कुठे कधीही जात नव्हते. पण मी आता धाडस करून एकटी घराच्या बाहेर पडते. दोन वेळा ट्रिपला पण गेल्यामुळे खूप आनंदी होते. एवढा आनंद आणि एवढी हिंमत मला अन्नपूर्णा परिवारामुळे मिळाली, मेधाताईंमुळे मिळाली.

मी अन्नपूर्णाची खूप आभारी आहे.

**आशा डोळस**
**वस्ती प्रतिनिधी, मुंबई**

# १२८. ताईंनी माईक हातात दिला

**मी** अन्नपूर्णात आल्यानंतरच मला बाहेरचे जग कळू लागले त्याआधी मी फक्त घरातच घरकाम, शिवणकाम करत असे. त्याव्यतिरिक्त कुठेही बाहेर पडले नव्हते. ताईंमुळे मी प्रथम मुंबई ट्रिप केली व नंतर पुण्यातील ट्रिपला गेले. त्यातून खूप आनंद मिळाला. घराबाहेरच मी पहिल्यांदा पडले होते, तेही ताईंमुळे.

ताईंमुळे स्टेज डेअरिंग आले, माईकवर बोलायला शिकले. ताई आमच्याशी घरातील व्यक्ती प्रमाणेच बोलतात, आपुलकीने, प्रेमाने बोलतात. मी ताईमुळे इतरही खूप मोठ्या मोठ्या व्यक्तिंना भेटू शकले. ताई तुमच्यामुळेच मी आज खूप खूप आनंदी आहे. मी माझ्या आयुष्यात कुटुंबाची जी प्रगती करू शकले ती फक्त तुमच्यामुळेच.

**संगिता फरांदे,**
**सभासद प्रतिनिधी, शनिनगर**

# १२९. आधारपूर्णा मुळे म्हातारपणी स्वातंत्र्य मिळेल

**अ**न्नपूर्णा परिवारात आम्ही पहिले पाऊल टाकले, आणि महिलांनी पाचजणीचा गट तयार करून कर्ज घेतले. त्यातून आम्ही आमचा उद्योगधंदा चालू केला. हे सर्व मेधाताईंमुळे. मी साधी कर्ज घेणारी महिला आता सी.आर. झाले,आणि मेधाताईचा सहवास लाभला. त्यानंतर पुढे (सीग्नेटरी) बनले. म्हणजे हे माझ्यात परिवर्तन झाले, ते फक्त मेधाताईंमुळेच!

आम्हा महिलांना सक्षम करण्याचे काम ताईनी केले. जनजागृतीचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. ह्यामध्ये आम्ही सर्व त्याच्या पाठीशी आहोत. महिलांना स्वातंत्र्य नाही. लहानपणी आईवडीलांच्या ताब्यात, तारूण्यात पतीच्या बंधनात, वयोवृद्ध महिला मुलगा व सून यांच्या विळख्यात अडकते. ते सांगतील तेच ऐकायचे? मग आम्हाला आधार कोणता? म्हणूनच मेधाताईनी अन्नपूर्णांमध्ये 'आधारपूर्णांची योजना' आखली त्यांनी आम्हाला पुढचा आधार देण्याचे काम केले. म्हणजे आता तरी महिलांना स्वतंत्रपणे जगता येण्यासाठी त्यांनी फार मोलाचे काम केले आणि आमच्या सारख्या महिलांचे जीवन उजळवले आहे.

**श्वेता कांबळे**

**वस्ती प्रतिनिधी, मानखुर्द, मुंबई**

## १३०. ताठ मानाने जगायला शिकलो

**मी** अन्नपूर्णात गेली ११ वर्षे सभासद आहे आणि वस्ती प्रतिनिधी म्हणून काम करते. अन्नपूर्णाचे कर्ज घेऊन मी माझ्या मुलांना खूप चांगले शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करू शकले. मुलगी आय.टी. कंपनीत कामाला लागली व मुलगा व्हिडीओ शूटींग करतो.

मेधाताईंनी आम्हाला कष्ट करून ताठ मानाने जगायला शिकवले.

मी माझ्या कुटुंबाला पुढे नेऊ शकले ते मेधाताईंच्या मार्गदर्शनामुळे व प्रोत्साहनामुळेच!

**सौ.सुमिधा घोंडगे**

**खैरेवाडी,सभासद प्रतिनिधी, पुणे**

# १३१. ताईं तुमच्यामुळे कळले ''आम्ही कमी नाही''

**ताई** तुमच्या मुळे आज आम्हाला खूप प्रगती करायला मिळाली. तुमच्यामुळे समजलं की, महिला पण पुढे जाऊ शकतात. आज आम्ही न घाबरता घराच्या बाहेर पडतो आणि एक स्त्री पण काही कमी नसते, असे दाखवून देतो. न घाबरता पुढे जाऊ शकतो. अन्नपूर्णाच्या कर्जामुळे मी माझा व्यवसाय वाढवू शकले व स्वतःच्या कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावू शकले.  हे मला ताईमुळे शक्य झाले. अन्नपूर्णामुळे आम्हाला कुठे काय घडते ते पण कळते. आम्ही सर्व महिला अन्नपूर्णा सोबत आहोत, आणि राहणार ताई. तुम्ही गरीब महिलांसाठी देव आहात. मी कधी कोणाबद्दल काही लिहिले नव्हते, पण तुमच्या बद्दल लिहावं वाटलं म्हणून लिहिले ताई. तुमची खूप मी आभारी आहे.

**वंदना कांबळे**
**देवनारब्रँच, सभासद प्रतिनिधी**

# १३२. अन्नपूर्णा सोडून दुसरे कुठले कर्ज नको

**अ**न्नपूर्णा हा शब्दच इतका चांगला आहे, स्वरंच तो उच्चारताना अगदी मनाला आनंद होतो.

मी अन्नपूर्णा परिवारात येण्यासाठी खूप खूप प्रयत्न करत होते. माझी मुले तेव्हा शिकत होती, मला खूप अडचणी होत्या.

मी अन्नपूर्णामध्ये २०१५ पासून सभासद झाले, पहिले माझे कर्ज होते. १५०००/- ते मी अगदी नियमित हप्ता न चुकवता फेडले. नंतर दुसरे कर्ज २५०००/- रूपये मिळाले. मी खूप खुष झाले. ते ही मी नियमित, व्यवस्थित फेडले. त्या पैशाचा चांगल्या प्रकारे मी उपयोग केला. त्याचा मला आनंद वाटतो. त्यानंतर तिसऱ्या कर्जाच्या वेळी एका दुसऱ्या संस्थेचे कर्ज घेतलले असल्यामुळे माझे कर्ज रद्द झाले. तेव्हा मी अक्षरश: खूप रडले एखाद्या लहान मुलीप्रमाणे रडू आले. माझे रडूच थांबेना.

अन्नपूर्णात माझी बचत जमा होती, आरडी होती,पेंशन चालू होते. ते मी तसेच चालू ठेवले. मग मी दुसऱ्या संस्थेचे कर्ज नील केले.

नंतर आमच्या देहूरोड मध्ये येणाऱ्या ताईंना मी भेटले. २०१८ पासून पुन्हा अन्नपूर्णात आले आणि पुन्हा नविन सभासद म्हणून मला ३००००/- रूपये कर्ज मिळाले. आता मात्र अन्नपूर्णा व मेधाताईंना सोडणार नाही.

**एक सभासद**

# 133. My Mamma

**I** am sure, there are many who would have a lot of nice things to say about my mother. She has achieved so much, with Annapurna and beyond, touched the lives of so many people through her work, and continues to do so… and one just needs to attend one of Annapurna's Annual Gatherings, to feel the overwhelming love all those people have for her. But I am in the unique position of being the only one, who can speak about her as my mother, and hence I would like to speak about that aspect of her.

One keeps reading about Women Empowerment constantly. Lots of people – before my mother, have also worked in the field, strived towards that common goal, and will continue to do so after her. But I had the privilege to witness her – a strong, independent woman, who has strived for and achieved tremendous success, on her own terms. I have seen her work hard as the typical working-hard-over-time mother, balancing her Bank of India job, and life at home. I have seen her start her own initiative with Annapurna Pune and be at it relentlessly, till she made something out of it. I have seen her balance the toddling Annapurna Pune and family and still study long, lonely night hours to get her Masters and subsequently her

PhD. A lot of people would have given up in the face of these fights. I know I would have. But she didn't. She is the strongest person I know. And so, by not just saying it, by showing me, by setting the right example, she has left absolutely no doubt in my mind as to which is the fairer gender.

I feel super-duper lucky for my daughters... they too can have her as a role model to look up to!

Which brings me to family. Family is family, which is to say it is above and beyond anything else, because it stands by its own, unconditionally. The love for family isn't like a Capitalist market-driven economy, dependent upon the productivity of the person in the family. On the contrary, it is similar to the gentler Socialist approach, undeterred by outside, market forces. [Trust my parents' son to plug in an unnecessary socio-political reference! ;)]

And this is an important lesson, which I would like to pass on to my daughters. Which is why, again, it is cool that I have my mother's example to give to them… I had my rebel years, many tough years, where I wasn't the easiest son to have. I still don't think I am. But somewhere deep down I knew that I could take her for granted, trusting fully, that her love for me was

going to be unaffected. Somewhere during the aforementioned rebel years of mine, I once had a fight with my father, threw a tantrum, and left the house, promising to not come back. But I did that, knowing fully that my mother would come after me, and bring me back. And she did too. And lucky me, that she did. Because if she hadn't, I didn't really have a Plan B.

Throughout those years of mine, she kept motivating me. She stood by me, encouraged me to strive to achieve my dreams on my terms, still supporting me all along the way. And when it was my moment to shine, after achieving a little something of my own, I don't think there was anybody in the world prouder than my mother.

For some reason, face-to-face dialog is difficult. It just seems so dramatic, especially when you are physically present in that moment. Which is why, writing about something is a tad bit easier. Also, it happens to be something I kind of do professionally. So I will take this opportunity to let my mother know, something that I don't often tell her in person, that I'm super proud of her, and everything she has achieved. And I will, I can't promise, but I will try to let her know that in person more often in her impending sixties and beyond!

To the first person I knew. To the first person I loved. To the strongest person I know.

Happy Birthday Mamma. I love you.

**Nachu.**

# 134. My Sister Medha

Everyone who meets Medha now is awed by her passion, determination, eloquence and conviction. But it is not at all a surprise to those who grew up with her. As I reminisce about out childhood together, I know that there was never a question in her mind whether she should help those in dire needs. It was only a question of how and when.

I was the first child on my mother's side of the family and Medha was the second. So naturally WE were best friends (still are) and always played together. On weekends, my parents used to drop me off at our grandparents' apartment on D. L. Vaidya Road. The apartment was full of books and people. That is where we both picked up our love for reading. I remember Medha being scolded by my maushi (her atya) for reading books during dinner.

She used to love talking and debating as a young girl; I could only manage to get in a few words. Her arguments were always passionate and yet intellectual. I do not remember ever being angry with her. Because she has a way of arguing her position without antagonizing the other person. Even at a young age, she used to write very well. She was especially good at

composing poems. I do not know if she has any time for that now.

Her dad and mom used take us not just to Shivaji Park and Chaupati but also to their places of work and to political gatherings. Her dad, my mama, was an intellectual. He would analyze and study all aspects of any situation, political or otherwise. Her mom, my mami, is driven by het desire to help the poor and the needy.

And you can see both in Medha. She has the strong will and determination of her mother, augmented by the intellectual discipline of her father. She used to always tell me, "Best way to help a family is to help the women. Best way to help the women is to teach them how to help themselves. And I want to do that systematically and professionally." That is why she went back to school for her Ph.D. in social work .And that discipline has paid off for Annapurna Pariwar.

You can see the professionalism in the way the staff starts their day with a (secular) prayer, how they track the progress of loan repayments, how they disburse the monies, how they manage the medical insurance; and moss of all how they treat their clients with dignity and respect.

I moved to the USA almost 40 years ago. So, I do not get to talk to her as often. But anytime WE start a conversation we do not miss a beat. It is as if we are finishing what we started talking about just yesterday. And even today, I only manage to get in just a few words!

**Viren Pathare**
**Brother**
**Philadelphia USA**

# 135. My Medha Atya

The last time I was told about her age by Jayant Kaka, she was 38 years old. This year she is completing 60 years. An eventful journey indeed which exemplified tenacity, courage, passion to touch lives of the downtrodden and exhibited shades of being the father’s daughter What a wonderful journey till now. I was fortunate, I had the privilege to see it from close quarters.

I was 18 years old , an under graduate , working for Nasan Medical electronics based out of Goa, and struggling to find my feet. Medha Atya had quit her banking job and had started something called AnnaPurna Micro Finance and was also perusing her Master’s in Social Work. I’m 43 now, the last 25 years I have had a very close personal bonding with Atya.

“One can choose friends, but Not relatives” said a wise person. Our family relation with Medha Atya also is a wise choice which dates back 3 generations. My Grandfather Shri. Ramchandra Utagi was a rakhi brother to PremaTai Purav. My baba grew in the company of (under the tutelage) of Com. Dada Purav in the trade Union Movement of AIBEA. Medha Atya calls my father, Shri.Prasanna Utagi, “Dada” and

calls my mother ,Smt.Jayasheree Utagi, “Vahini”. More importantly loves them like “Dada & Vahini”.

When I look back, I feel, the job in Nasan Medical Electronics as a liaising & administrative officer landed at my doorstep because of this family relation. I also feel they were sure about my incredible ability to do work and perform because of my linage.(hahahah). What I cherished most when I was working for Nasan are my frequent trips to Pune and the time spent with Jayant Kaka, Medha Atya & Nachiket. The evenings were generally long and would go deep into the night. Those of you who know Medha atya will agree that she is an extremely good hostess. The neatness of her house, the finer details of her planning, the comfort that she provides her guests and the ease with which she mingles and converses with them creates a very relaxing atmosphere. I have not come across another Lady “who is so successful in her career and remains busy with her work and still is such a good host”.

On one such visits of mine to Pune, when atya and kaka were residing in Gopinath Nagar, I saw Medha Atya, under the staircase with table and chair. And seated across the table were on a stonewall with a blanket on it were a

few ladies who looked like domestic workers to me .I did not make much of it as I thought Atya must be the a office bearer of the housing society and she must be giving these ladies some instructions or advice and guidance. It was only later during the evening , that I was told it was the office of Annapurna Mircro Finance . I was also told about the journey of this fine couple Medha & Yeshwant Samant from a stable and secure job in Bank of India, a flat in Andheri, Mumbai and generally the comforts of Middle class in Mumbai to life in Gopinath Nagar an outskirts of Pune. A husband who wanted to be an industrialist & a wife who wanted to start a micro finance company for the uplift the life of slum-dwelling poor and hard working enterprising women (downtrodden). And more importantly peruse all this while taking care of the family commitments .

I have seen top executives of multi-national companies wearing fine suits and driving the Micro Finance juggernaut, with profit driven motives and then I have seen Annapurna Micro Finance. The emotional bonding with the borrowers , the allied services to cater to medical & insurance needs , the Day Care support systems for the working women, the educational classes, the soft skill trainings and all other allied

services that will uplift and develop the most down trodden slum dwelling people of the society and a large part of them who are women.

Medha Atya is also a qualified Psychologist. That makes her more compassionate as a person because she understands the even more complex and complicated psyche of the human mind. To rationalize, to understand , to empathize, to connect to situations that a person is going through and to correct, to channelize, to put in perspective , to motivate and set the person on his path in life as confident person are some of her most admirable qualities. I say this from my personal experience. When I dropped out of college , When I struggled in my professional careers ,When I struggled with my emotional upheavals , my discussions with Medha Atya and the time spent with her have gone a long way in resetting my line of thinking and moving ahead in a confident manner. Like, I owe to my Aai & Baba a lion’s share for success in life, I owe in equal measure it to my Medha Atya & Jayant Kaka too.

I only feel fortunate.

**Sagar Utagi**
**Nephew**
**Goa**

# 136. My Little Sister who has become a big Sister to many

**M**Y MEDHU - Medha is born in Purao family, which has a tradition of working for the welfare of common people. Our grandfather Shri Shantaram Laxman Purao was the founder member of DADAR CONSUMER COOPERATIVE SOCIETY, an organization devoted to cater to the middle class people in Dadar area, quality products required for the daily consumption for the household at a very concessional rates. It was very popular and very well organized society. The society was awarded as the best consumer society in Bombay and were the first recipient of RAJA MAHARAJSIGH TROPHY FOR THE BEST CONSUMER SOCIETY IN MUMBAY.

Our grandfather,we used to call him as Bhau, was also the chairman of Kshatryikya Samaj, Vanmali hall, a charitable institute founded for the welfare of our community people. His profound knowledge of legal matters, and his devotion to the welfare of the people of our community gave him a very respectable position in our community affairs.

Medha's father Dada Narendra Purao, had totally devoted his entire life for the welfare the banking employees. A very unselfish person,

never bothered for the gains from the position he was occupying but worked tirelessely for the welfare of the people. It will take another book if I had to describe all his great work. The most respected by one and all at all the levels he always was fair and well desciplined in his decisions and judgments.

Medha's mother Prema Purao also was from the same social worker community. She had a great role in Goa liberation and tirelessly working for the freedom of Goa. She had a great sympathy for the working class women and worked tirelessly for their welfare She started Annapurna Mahila Mandal to make them self supporting and gave them training and all the possible help to stand on their feet and live honorably. Annapurna was a very great success and was very well appreciated by one and all including Govt. She was awarded the great honour of our Nation “Padmashree.”

Medha grew in such great environment. Since childhood she has seen her parents strive for the welfare of the poor and common people. As a child medha was quite a healthy child, playful and highly energetic.I always used to take her out for a walk or visit places, I remember once I took her to my sister’s house at Santacruz. We travelled by train and she immensely enjoyed

the journey. Many a time I used to take her at places and at relatives house. Premakaki used to tell me that even in sleep she used to call my mame Balu dada.

Medha was a good student and used to do her studies very well always passing with good marks. Because of her playfulness and ready to mix with everybody, she had many friends from her school, as well as other fields too.

One incident I would like to narrate here. After her 10th std results were out, it was time to go to college. I went to her house to congratulate her, and also to check where she was going to take admission. I reached in the nick of the time as she was just getting ready to go and join Ruparel College as many of her friends were also taking admission there. I stopped her from that and took her to Ruia college as I was a staff member of Ruia college and knew that it was the best college. She agreed with me and we went to Ruia college and got her admitted there very quickly as the person in charge of admission was my college. We did not have to wait in the long Q.

It is proved lateron that was the main turning point of her life. At Ruia college she met Jayant, became friends with him and later married to him. After that her career started very

well. She joined Bank Of India and worked for a decade. After Dada's passing away there was a big void, Medha carried on his work , helping Premakaki & Annapurana also.

When they shifted to Pune she worked hard and got her doctorate in micro financing, a very proud moment for our family. With her hard work and zeal to help poor people she has established Annapurna Parivar and helping poor people to stand on their own feet and get empowered .Her organizing skill has taken her project to a very great height and is being appreciated all over the world. Her command on the subject is so great that she is invited all over the world to explain and give benefit of her knowledge to everybody.

I am so proud to see her reach such great height that I am really afraid now to call her as "Medhu". She deserves the respect and she has earned it and l am so proud of my Medhu's achievement.

**Balu Dada**
**Elder Brother**

# 137. My elder sister Medhatai

**D**ear,

Medhatai

I still remember those days I when I used to pester you by calling you Meduwada , and once I followed you ,teasing you but I was accosted by eunuchs near Vithal Mandir and you accompanied me back home.

All those memories are still in front of my eyes. I saw you grow from strength to strength even after the early demise of Kaka. The way you have taken Annapurna Pariwar to such lofty heights after taking over the reins from Kaki. The small tree nurtured by Kaki has now grown into a huge Banayan tree giving shelter to hundreds of women and making them smile and teaching them to be financially independent.

I salute you for this and am very proud of your achievements. Happy birthday dear elder sister. May this $60^{th}$ birthday be a harbinger of more progress in your Annapurna Pariwar and for whatever you want to achieve.

**Yatin Purao**

**Younger Brother**

# 138. My Neighbourhood Friend

I have known Medha from the age of her 7 years. She was a member of our extended "Navneet" family in Dadar. Throughout our childhood we shared not just a common building, but all aspects of everyday life. Medha was very different from girls of her age group. Friendly, but slightly aloof. Her best friends were always her books! She was intelligent, spearheaded and mature beyond her years. It therefore comes as no surprise that she has become a successful businesswoman and a respected social worker. Congratulations to you, Medha! Best wishes for many more years of success! HAPPY 60TH BIRTHDAY!

**Surekha Godbole**
**Neighborhood Friend**

# 139. Medha Mami

**I** cannot forget my 1st double decker bus ride which was with you.My memories of you run back to the time when I was in school and would visit Pune during vacations…. I distinctly remember the food menu pinned on the fridge door which would thoughtfully have the things I liked. You would strike off the items made and ask me if I wanted anything else.

Then can I forget that fall from that little tekdi in Pune? I vividly remember you gently washing the blood off my wound, as that was a totally different aspect of the 'strong', 'independent'& 'fierce' Mami, I knew then. These are my most cherished memories .

As I grew up I found that your detailing is not only restricted to the small needs of everyone in the family but to the many unaddressed issues in the society.

Your passion to make a difference in the world is unbelievable. Watching you do what you love and watching you make a difference in the lives of others is an incredible experience.

These are a few things which you reflect:

Believe in yourself
Push a little harder
Go out and meet people
Help others
Be kind
Give back
Share, create, inspire!

**Anish Parulekar**
**Nephew**

# 140. Medha Atya

**Y**ou have known me all my life, but I have vague recollections of the first 15 years or so and stronger memories from the recent past. Before reaching adulthood, the connection was largely limited to Nachiket , but I believe in the last 12 Years or so this has largely disappeared and we have had lots of gatherings even when he wasn't present. We have had innumerable trips & get - togethers and these have always been cherished and memorable to each and every one who has been present.

There have been lots of discussion and debatos, maybe some heated moments with lots of intensity and passion. However, all the hot feelings have never carried over the moment the topic was closed, indicating the underlying affection and love for each other. A brief reflection later on would often reveal a wide perspective or a diverse view point and would help in re-moulding or reinforcing our own views an important aspect in personal development. It goes without saying that to have such an influence you have to be well read with a broad mind.

For all of us you have been an inspiration by having the vision to first enter into the field of

social work by following in the footsteps of your parents, and then transforming the entire business into a vast organization. Indeed, it makes us very proud to hear all the achievements & honors that you have been bestowed upon.

Despite all the busy schedule, what hasn't changed is your eagerness to entertain us as charming & welcoming host. All the thing which one would require while staying with you a well thought out and prepared menu! You are a wonderful cook and there have been countless dishes which I have enjoyed at your place. One trust that I admire is that you always remember to bring some souvenirs from your trip; indicating that you have us in your thoughts on these trips. A footnote to this is also the car photos that you share with us even though you yourself have no interest in the cars.

Lastly I would like to wish you all the best for your future and it would make me even more proud to see you will get more accolades:

**Anshuman Shevade**
**Nephew**

# 141. My super model Mami

**T**he fondest memory I have with her is of my stay at Andheri after my 10th grade examinations. Where she had prepared for me my one true love : batata vada and served it to me with ketchup . That was the first and the last time she served ketchup to me without dilution as I finished off a whole litre of ketchup by myself . That's how amazing her skills in the kitchen are.

My mami is the first in our family to have innovative hair cuts , the impression of finding our mami was the experience my sister narrates about her awesome haircut which was the prime reason for us to discover our mami . My mami is the most dynamic personality who the ladies virtually follow and worship (including my wife, no pun intended) .

My mami is a living example of a personality which keeps every relationship at its prime and gives time, respect and effort to grow into a timeless bond that's inseparable.

My mami is a role model, a model and a super model . Wishing her most and more .

**Prasad Parulekar**
**Nephew**

# 142. My Own Medha Aaji

**T**he two women I deeply idolize for their immense passion about their respective work, family, friends and acquaintances are mumma and Medha aaji.

Speaking about aaji, as she is close to touching a milepost in her life, an epitome of elegance, grace, beauty, care and much more!! The way you ace all the kaleidoscopic events in life has been an element of awe for me and all the tiny tots of my generation.

I am simply awestruck at your craft , the way you deliver it, with so much ease.

The qualities you possess both professionally and personally are a paragon of perfection for all of us in the family and at work.

I do wish someday I can be a minuscule version of you and make you proud!!!

Lots of love,

-The one who promoted you way before time ;)

**XOXO**

**Pratyusha Sabnis**

**First Granddaughter of Samant Family**

# 143. My Cool Aaji

**A**AJI! AAJI! The sound of these words being called out brings to mind an image of tiny little granddaughters squabbling for the attention of their“Mey”. So when instead two full grown girls giggling at the fun they poked at their very young "aaji,” the Onlooking public is to putit lightly-shocked.

Medha aaji to me personally is one of the coolest people I know (and it's not to be taken lightly coming from a millennial) She's this amazing role model with a perfect mix of strong ideals, mötivation to work, ambition, ideal amounts of chill and an “oh so accommodating”nature! Have always personally looked up to her because she's so perfectly balanced, she's also excelling in each of her fortes.

There's no cutting comers when it comes to results anywhere. If were to use a term from millennial lingo to describe her, it would be- “Badass Queen.” Because to round it all off her personality is what stand out the most to me ! Year after year, it's the confidence and eloquence she conducts herself with that has this amazing pull on people. In the last four years my relationship with aaji has become so much more ,

discussing my projects and plans with her is something I looked forward to, not only becuase they came along with side of delicious dinner , but because her opinions on any discussion mean a lot to me. It's almost like her approval makes discussions valid. And like every grandmother stereotype you'll never be disappointed when it comes to a dinner spread she plans appear.

Coming back to what she means to me, my conversations with her were one of the few that showed me that the older generations aren't as rigid and unapproachable as they seem to show. It opened up a whole new chance for dialogue where I learnt that the stereotype of older people having fixed outdated opinions was just that , a stereotype.

But the shift in a conversation from poking fun to serious debates has never been forced or awkward its come to become another part of our relationship. To conclude, I may have been around for only a small part of her very cool life,but considering she's been around for most of mine,

she's grown to be my role model and she's that hope that tells me to keep going becuase nothing is unachievable, And doesn't hurt when l can humbly say that Dr. Medha Purao Samant is my aaji.

**Aaleen Parulekar**
**Grand Daughter**

# 144. My Medha Aaji : A Role Model

**M**edhaaaji for me, but for the world she is Dr.Medha Purao Samant: an impeccable woman and celebrated financial and woman inclusionist who is bestowed upon numerous awards and coronated graciously throughout her extensive years of work. For me, she is a flawless role model; intelligent, kind and painstakingly grounded.

A pioneer in feminism and social work, Medhaaaji is an erudite with no bound. The belief that, social work is a lacerated occupation, has been met with good riddance by our Medhaaaji.

Annapurna, an intelligent offspring of business and feminism, is one of Medhaaaji's most widely celebrated creations.

She truly lives Anne Frank's quote "How wonderful it is that nobody need wait a single moment to improve the world".

Well Anne Frank, you've got a patron!

With lots of love & regards.

**Siddhaanth Samant**
**Grandson**

# 145. Medha , My Friend Vahini

**M**edha is turning 60! We just can't believe it. Or it is just a meter that is incrementing like a meter on rikshaw or taxicab? As Medha's energy, her working capacity, capabilities are concerned, 60 number really doesn't make any difference to energy packed woman in her.

As far as I am (Raju) is concerned, I remember her as little elder guest girl visiting my Maternal Uncle's Arnala Ganapati in 1973 with her siblings and Mom. Later Medha was known as younger cousin to our eldest sister-in-law (her elder cousin sister has married to my eldest cousin brother) and subsequently Medha became our sister-in-law by marrying Jayantsheth. They have already achieved grandparenthood few years ago, 60 may confirm that she has really become Aaji to her (as well ours) cutie grand daughters.

Her journey from a Bank of India employee to a successful microfinance banker is astonishing, as she did the venture by leaving safe job from government owned bank and decided to follow the path of empowering poor and needy women by starting microfinance venture thru Annapurna, especially at the same

time, Jayantsheth was establishing his own venture of Nasan.

Starting, nurturing and growing any enterprise in India is most admirable task and Medha has demonstrated it by running it successfully and growing it, keeping motto unchanged. Sometimes we wonder, is it our same Medha, who holds Ph.D. in microfinancing and known as Dr. Medha, who is invited for Ted talk, as well many TV channel interviews and discussions on women empowerment? As far as, her women empowerment perspective is concerned, I know it has inherited into her DNA from Prematai & Com. Dada Purao, her parents. And most admiring fact is, she has nurtured and flexibly shaped it referring current world needs.

We both have hot political arguments, that seldom reach to fights, but it doesn't stop or resist me to salute her achievements in women empowerment thru microfinance. She has successfully transformed her Mom, Prematai's Ananpurna venture into new generation women empowerment house that may have followed completely different path than what Prematai chalked, but kept objectives unchanged, the women empowerment.

When today world is talking of Dr. Yunus of Bangladesh for his contribution to rural

finance and upliftment of poor Bangladeshi's, we should remember Medha's contribution to same class of women in Mumbai and western Maharashtra, balancing successfully own family life and career that is supporting social cause.

Her journey into new career started after she moved to Pune from Mumbai, so we may have to give credit to Punekar and may be pleasant, intelligent.etc. weather and environment of Pune too!!! Or it can be quoted, on the footsteps of PuLa, that she could achieve it, because she lives in Pune!!!She did her Ph.D. after moving to Pune, may be confirming the fact that all her wisdom has blossomed better in Pune weather.

Medha has other dimension as Marathi poetess, who has published her poems in Diwali publications, aka Diwali Ank. I dared to read them years ago but couldn't make out any meaning. I don't mind blaming my grasping power in understanding them. But then I was told, it is new wave poem in Marathi, known as NavKavita, hope at least Jayantsheth may understand it better. I can take chance to pull her legs by advising her to test her acting skills with a small role in Nachiket's next film!! At least we will be able to understand and compliment her skills in that field too.

Giving wishes for wonderful, happy and etc. life is always part of wishes for anybody in your close knitted family, we take an opportunity to wish her for long, happy, prosperous (in all terms) and healthy life with more vigor and more energy for those needy women, desperately looking for their own and family empowerments.

With love and regards to Medha, as usual !!

**Raju Khanolkar & Sadhana Samant**
**Brother in Law & Sister in Law**
**Chikago , USA**

## 146. My Kaki - The Torchbearer

**M**edha kaki as we fondly call her in the family, first and foremost wishing you a very happy birthday. You are 60 years young now. If anyone would ask me to write about you (psst which Jayant kaka did by the way) I would say you are like the sun to all the planets like us. You are strong willed, caring, strict yet loving and you bring a ray of sunshine in many people's lives.

My earliest memories of you have been the family visiting your family in Pune. Ahh! The good old days. We had fun all the time.

But as we grew up , we came face to face with the magnanimous personality you are. The stupendous amount of social work you have done is overwhelming. You have expanded your organisation to the horizons and supported the needy and made them strong enough to live a dignified life. You have been a pillar of strength as equally in raising a happy, satisfied and loving family too. You have shouldered equal responsibility of a parent , an entrepreneur, your social skills are commendable.

I am specially grateful for you and Jayant kaka taking out time from your busy schedules

and attending our functions as much as possible . You are the torch bearer. May the torch shine eternal and outlive all.

**Priti Khanolkar- Ranadive**
**Niece**

# 147. Medha Mavshi

**I** have known Medha mavshi for almost over 25 years now. She has just been as active now, as back then. Despite the busy schedule and all the running around cities she takes time out for a walk with her granddaughters whenever in town - I truly admire that. She's hosted several get together's other place and we have had fun and delicious treats every time, Her contribution towards society is tremendous and we all highly respect and admire it Me, Swapnil and Ivaan wish you a very very happy birthday and loads and loads of luck and success!

Warm regards,

**Kalyani Gadre**

# 148. Medha Mavshi

**T**he perfect woman you see is a working woman; not an idler; not a fine lady; but the one who uses her hands, head and heart for the good of others' You are the best example of this quote and probably the only example I can think of. Hat off to you for your efforts of all these years. Lakhs of people are living a happy life because you chose their happiness first over yours. I know how happy it feels to see that joy on their faces. You have so much warmth towards everyone. That's the best quality anyone can have.

I'm sure it wasn't an easy road but you stood strong and head held high and I love that about you. I admire how you divide your time between work and family. Navya and Myra are lucky to have you as their grandma ! ☺ Wishing you a very Happy 60th Birthday !!

Love, Medha Mavshi.

**Janaki Naralkar**

# 149. Medha Kaki

**W**ell Medha kaki, also fondly known as Medha tai or Tai is an inspiration to all. Not only because of the nature of work she does but also the way she handles her personal life too. Her commitment towards everything & everybody is simply amazing. She might have to travel a lot for her work but at the same time she takes out time for her grandchildren, social commitments, vacations with Jayant Kaka.

She has a very warm personality but at the same time is very stern in her professional life. One has to visit her in office to experience that. Lastly there is one very famous quote which I believe suits her perfectly "Not all of us can do great things, but we can do small things with great love". Feel proud to have known you for so long.

**Swapnil Gadre**

# 150. BOI STAR Our Own Com. Medha Purao Samant

**F**irstly, I take this opportunity to welcome Dr. Medha Purao Samant, to our YOUNGSTERS GROUP on her 60th Birthday.

As you all must be aware that Dr. Medha Purao Samant was an employee of Bank of India from the year 1981 to 1993. The formative years in Bank of India were very helpful and useful to her for setting up which was such a robust Micro Finance Institution.

My journey with Medha as we have always called her, began when she reported to Fixed Deposit Department at Mumbai Main Branch then Bombay Office. The Department was situated on the first floor of this huge building.

Myself, Francis Dharmai, Mohna Kothari & Smita Mirajkar all clerical staff was working in FCNR (Foreign Currency Non Resident Division) of Fixed Deposit under our Officer Shri. Isaar M. Moraes. We were a team who enjoyed our work and worked as a family. The interesting part of Medha's reporting to our department was, when she made her entry to our Department there was only a whispering from behind another six footer has come to join.

Shri Chaukulkar who was in- charge of our Fixed Department introduced her to every staff of the Department as was the custom during those days. As there was always work pressure in FCNR Division we were given an extra hand in Medha, who was welcomed by our team i.e. Myself, Francis Dharmai, Mohna Kothari , Smita Mirajkar and our officer in-charge Shri Isaar Moraes,

We were not aware then that she was the daughter our beloved Com.Dada Purao, who was an employee of our Bank and a prominent leader of AIBEA & Bank of India Staff Union. Only the next day we were informed of the same and we were very happy as the bright point was we were assured of Union protection. She was also an active member and elected Ladies' Representative of All India Bank Employees 'Association.

But she was the one who gave us the guts to fight for our rights not waiting for any Union representative or leader to come for each and every issue/problem. In our department when there was an issue against our Sub Staff (Peon) we stood by them, when the Department In charge and the Second Officer had a tiff with our Sub Staff team, which got aggravated and that's when we under the able leadership of Medha

stood by the Sub Staff and the issue was sorted out.

After she took transfer to Pune, I did visit her once during the Ganpati Festival. Soon She resigned from the services of our Bank in 1993 to set up Annapurna in Pune after which I had lost contact with her. Then on my transfer to Kerala on promotion,many year later I called her up when I intended to start Micro-finance through our Bank's Branch. That's when she gave me a shock of my life! I asked her what she was doing at present, cool as she is always, told me to visit Annapurna Website and forwarded me the link.

When I reached home that night itself I visited the Website, that's when I realized how much she had grown and was very happy to know this. Yet till date I can vouch she is the same old Medha, She always responds to my call and has always helped me whenever I have sought any information pertaining to different things from starting a Trust to how to start a Micro-Finance Unit.

Now, proudly called as Dr. Medha, the best part of her journey is she still aspires to reach more and more needy women and poor people through her vision ANNAPURNA PARIWAR.

I and all my colleagues alongwith the whole of BOI Pariwar are proud of Dr.Medha and wish her success in her future endeavors and alongwith that we wish her a long and healthy life in future also. We always tell in our BOI Pariwar the best is yet to come from Dr. Medha Purao Samant.

**Rammohan**

**Retired Staff Officer, Bank Of India**

# 151. Our Friend Medha : From 1981 to 2020

**W**e are celebrating Medha’s entry into the Senior Citizen’s Club.This is something I need to really come to terms with.Medha comes across as a vibrant, strong beautiful lady. I need to scratch my head and think” Oh so, truly, soon Medha turns 60?” Is this even true? This thought brings a trip down my memory lane .

I remember the Medha who entered Bank Of India, Opera House Branch near Panchratna Towers in the year 1981.I recall the tall, willowy, Medha emanating confidence & a look of No-Nonsense about her.This was her first branch exposure. Dada Purao was a dynamic leader of the Bank Of India Employees’ Union. She was Dada Purao’s daughter. Instantly a distance was formed in our minds, as she came with a kind of privileged person tag. There was a sense of awe. One could feel colleagues from all cadres of the branch keeping a distance with her in their interactions.

But as time passed, all of us realized that she was totally unaware of the impression we had about her. Opera House was a large branch with good number of staff. The female numbers of staff were also substantial. We shared good

camaraderie and would voice our problems on personal as also at work level. There were issues related to toilets in the branch. Medha aggressively took up the issue on our behalf & got the matter resolved. She came across as a natural leader, a fighter who would not take in injustice lying down.

After a year or so she was transferred to Bombay Main Branch. Later, I heard that she took a transfer to Pune & then She had resigned from the bank . Slowly, we lost touch with each other.

Over the years, I used to hear about her work .She had set up Annapurna Mahila Co-operative Credit Society, a Microfinance Institution. In the meantime she had completed her PHD in Microfinance. She had fully qualified herself in order to enter the hitherto unexplored niche area of Microfinance. Her very choice of working in Microfinance showed her empathy to the grass root, down trodden strata of our society. Bank Credit is the oxygen of our Economy. Medha realized that this Bank Credit is as much needed by the Industrialists, Small Businesses, as also the slum dwellers and marginalized strata of the society, to improve their quality of life. It is a well-known fact that she started her Micro finance Activity by giving loan of Rs1000/ to

some vegetable vendors. Then one day, I read in the Newspaper that Annapurna Mahila Co-Operative Credit Society had been adjudged as the best Microfinance Institution. Later I saw her on television talking on the Zee Marathi Channel for a 'Unch Maza Zoka' award. I also saw her getting Samaj Bhooshan award from the former Chief Minister Devendra Fadnavis.

It was only in the year December 2018, we actually met. Me and my husband Dilip Tandel, went to see Annapurna Pariwar Office. We looked and walked around nearly every department. The Accolades she received were displayed on the walls. Watching them we realized the magnitude of the work that she had undertaken .She has received awards from across wide range of institutions & authorities for all of this mammoth work.

We were much impressed by the dynamic use of technology in Annapurna Pariwar. The staff in every department has adopted computerization to achieve accuracy and efficiency, facilitating business growth.We could also feel the warmth & connect her staff felt for her.To see the entire gamut of banking being handled by women, was heart -warming. It was not just a lip-service to Women Empowerment,

but ground level implementation of Women Empowerment.

Yet, what makes me and Dilip feel so close to both Jayant & Medha, is her sincerity, concern & clarity of vision to execute what she feels about .It was only when we met that we realized that although she had a family background of social work done by her parents Dada Purao & Prema Tai Purao, she has carved her own path in a field, where few would think of venturing. Life flows. In this flow, It was a pleasure to be soaked in the friendship of such dear people like Jayant & Medha.

What do I say to Medha? She has evolved as a true human being. She is committed as much to her family as her work. She is blessed with a loving husband, Jayant, doting son, Nachiket ,daughter-in law, two lovely granddaughters and her own Mother Prema Tai .Life is brimming with Happiness. The much awaited second innings of her life, begins soon .Me and Dilip wish her a Very Happy Sixtieth Birthday. May she have a Healthy, Prosperous second innings of life.. May she continue & expand her good work to uplift the lives of the marginalized section of the society. God Bless !!!

**Sujata Tandel**

**Retired Manager, Bank of India**

# 152. Medha Tai: A transparent Leader

**I**n 2010, when I was looking out for some engagement to use my time fruitfully, my friend Arpita introduced me to Annapurna and said that the CEO needs someone to assist her and that I would fit the bill well! My first meeting with Medhatai thus took place sometime in June 2010 and after two meetings, she selected me for the job with the designation of ‘Secretary to the Board’.

There has been no looking back since then as I struggled in the initial years with a growing daughter’s demands on my time. In all these years Medhatai has been extremely supportive and has allowed me to work on a part time basis and now ‘work from home’ for which I am very grateful.

In the past decade that I have been associated with Annapurna, I have got an excellent exposure to the 'NGO' world and its various connects and have proudly represented Annapurna at various seminars, conferences and in training & educational institutions. Medhatai's philosophy has percolated down to each and every member of the organization, thanks to her expertise in effective communication.

Medhatai’s clarity of vision, excellent memory & ability to deal with adverse situations in a calm manner is unmatched! She comes across as a fighter with a ‘no giving up’ attitude, yet is patient enough to listen to a poor woman’s woes and offer her a solution!

Her insistence on transparency not only in work but also in relationships is something to be learnt by all. As a successful and passionate social entrepreneur, her belief in building self-sustainable projects as against grant-based projects is commendable.

On the occasion of Tai’s 60th birthday, I wish her many more achievements and recognitions along with good health & happiness in the years to come. May she now find time to follow her passion for writing!

Wishing Tai a very Happy 60th Birthday!

**Sujata Bhat**
**Financial Consultant**
**Annapurna Pariwar**

# 153. Medha Mam: Empathetic Wife of my boss

**1996**.....the year that brought me to Pune, Nasan and Medha tai.. My boss's wife is how I knew her. Dynamic, very well dressed, in command of her words.

A year passed and I was to expect. Away from home, parents, blood ties. I was very apprehensive at times. Y. B. Samant , my boss kept an eye on my sitution but Medha tai came in to the scene silently and quietly. Always an inquiry, many a time a tasty snack and in the seventh month a Dohale Jevan with frills n friends from office... I was overwhelmed and emotional.

Over time and many years, she emerges as a very successful social worker, savior of many women and winner of several awards ... but the empathy she showed to a newcomer stays close to my heart... and to many hearts. Her warmth, eye for detail and empathy for all... makes her special, so special! Happy birthday Medha tai !

**Arpita Guha**

**Ex. Nasan Staff**

# 154. Medha Samant : A Warm Person

**I** started my career in Nasan medical in the HR Department....it was less of a formal office more a family.

Mrs Samant was the wife of our Director, Mr Samant : She kept the Nasan family close knit always.

Diwali party, Office party, Haldi Kum Kum were her ways to stay in touch with one and all.

She was a very successful and busy profile then; however she always stayed connected.

Due to personal reasons I had to leave my job...After a break, Medha tai again offered me a job in her office.

She encouraged me to find myself, stay in touch with work and was always there.

I have stopped working a long ago however my ties with her stay close to my heart always...

**Uttara Kale**
**Ex. Nasan Staff**

# 155. Down to Earth Medha Mam

**W**ishing Medha Mam Happy 60th Birthday....

Medha Madam came in to picture, when I joined Nasan Medical, The company that is run by Mr. Yashwant Samant. During interactions with Mr. Samant, we used to listen about Medha Madam. Who she is , How her work affects the lives of many underprivileged women.

I always thought one day I should meet the person so admired by Samant Sir. Opportunity first came when the Samant Family had invited us for Lunch at their Home some 10 years ago.

1st impression was she was a down to earth person. Slowly I came to know about her grassroot level work for uplifting poor and downtrodden women in slums,the area where most women of our society don't normally go.

Some 5 years ago, I was fortunate enough to attend the Huge Huge annual meeting of Annapurna Pariwar, there I saw many women going and easily interacting with her. A truly down to earth person.....

Medha Madam's urge is not just empower the women , but also the future of their families , their children by way of providing educational

scholarships. This has impacted me the most. I feel education plays a vital role in a child's growth and how that child behaves when he/ she becomes Adult.

One more thing, Working on the root cause of the problem has always been her style of work and she has inculcated that in whole organization.

Managing a 200 crores organization is no joke and looking at the pace of growth, kudos to her.

Wishing Medha Mam Happy 60th Birthday....

**Veena Nagpurakar**
**Manager Nasan**

# 156. Medha Samant : A Banker Turned Micro Banker

**D**r. Mrs. Medha Samant, the founder promoter of Annapurana Parivar, is a social Change worker who has transformed the lives of thousands of poor women in Pune , Mumbai and other backward regions of Maharashtra and Karnataka.

A formidable woman Co-Operator, Dr.Medha Samant has been successfully steering and spearheading the Annapurna Parivar for the past 27 years.

A former Banker, Mrs.Medha Samant, could have risen up in her Banking Career, but instead, opted for working with the poor women of the slums of Pune and Mumbai, which itself, shows her commitment and single minded devotion to the chosen cause of emancipation and empowerment of the downtrodden women who have been struggling to earn out their livelihood.

Long before the words like "Financial Inclusion, Financial Literacy, Livelihood Financing" etc became the buzzwords, Mrs. Medha Samant, ensured that the poor women had access to banking and other financial services, besides extending micro credit facilities

to the poor women members of Annapurna Pariwar.

She has successfully blended both credit and non credit services, which are provided to the women beneficiaries as an integrated package. The women members of Annapurna Mahila Co-Op Credit Society not only get credit but are also given health insurance facility as well as Medicare through tie up with local hospitals and daycare facility to take care of the children of the working women, besides micro insurance products and other social security products to their long standing and loyal women members.

What I admire in Dr. Medha Samant is her tenacity in achieving the goals, the ferocity with which she pursues and promotes the cause of Women Empowerment, the abundant generosity and the benign magnanimity which characterizes her relationship with her friends , followers and the extended family of thousands of poor women members of Annapurna Family.

Unwavering in her chosen mission of providing a suite of financial services to the poor women, Dr. Mrs. Medha Samant, is a fiery crusader to whom Economic Upliftment of poor women is very close to her heart.

Despite the fact that she is turning Sixty years of age, the fire in her is burning bright and there is no slow down in her pace and” run “to serve the poor women to whom she is the most endearing and affectionate Medha Tai.

Knowing her as I do, I am sure she will continue her journey with the same zest, zeal and speed with which she commenced her crusade almost three decades ago.

On her Sixtieth Birthday, I have great pleasure in conveying my Greetings and Best Wishes to - Dr. Mrs. Medha Samant.

**Dr. S. Elangovan**

**GM, (Retd), Indian Overseas Bank**

**Ex- Trustee of AMM, Pune**

**Ex. Bord Member AMCCS**

# 157. Medha : A Charismatic Leader

**I** have the privilege of knowing Medhatai for the last 20 years i.e. since DISHA was founded as a Micro Finance Org. by Late Shri Mohan Dharia. DISHA was then operating on the Grameen Bank model. We often consulted Medhatai on various matters and she discussed with us without any hesitation. I personally developed high regard for her owing to her knowledge, open and helping heart and charismatic personality. When DISHA founded it's own Patsanstha, Annapurna offered to groom it for five years. Through this association a close bond has developed between Annapurna and DISHA Pat Sanstha. We have established sound operating systems which help us a lot. If our Pat Sanstha has achieved a measure of success, a large part of the credit goes to magnificent care which Annapurna and Medhatai personally bestowed on us.

I always remember an incident nearly 15 years ago when Annapurna was holding the annual meeting of it's Members at the Police Ground in Shivajinagar. About 10000 women had assembled to watch the proceedings. At one stage, there was a little timelag between the end

of an item and the start of the next one causing murmur among the women.However just as the murmur started getting a little loud, Medhatai came on the rostrum. She barely spoke half a sentence when there was complete silence . Such was the impact of her personality ! The great work done by Medhatai to help thousands of women to attain a better standard of living is now common knowledge. We wish Medhatai a long life ahead . May her work continue unabated se there will be smiles on the faces of lakhs of families in future !

**Brig Raghunath V Jathar**
**Chairman,**
**DISHA**

# 158. Medha : A Microfinance leader Who Chose a narrow path

**D**r. Medha Samant has chosen to walk the narrow path, the more difficult path, in the microfinance world in India. Dr Medha has scripted a fascinating story of building a microfinance institution, under the Annapurna Pariwar group, in the co-operative sector, owned by the members. Annapurna Pariwar offers a bouquet of services essential for the well being of it's women members- microfinance loans, community based micro-insurance and innovative savings products at attractive interest rates and deposits designed to provide old age pension to the members. The latest product offering is the housing loans to its graduating members.

Dr. Medha chose to empower the members of Annapurna Pariwar rather than to grab the opportunity offered by the microfinance sector for personal wealth creation by adhering to the co-operative model in delivering microfinance services. This needed a rare courage of conviction. The self-less commitment and hard work that Dr. Medha has invested in building up the Annapurna Pariwar is commendable, as also the pain staking effort in

building up a second line of women leaders capable of shouldering higher responsibilities in the future.

As I get to work more closely with Medha in the design and delivery of the micro-housing project in Pune, I have had the rare opportunity to observe the strength of her leadership, in the face of daunting challenges that face the community. And in those moments, I felt proud to be associated with a leader- a woman leader - who is so bold and unfazed in the face of great personal risk, to stand up for her people, for causes that matter to them. My friendship with Medha has continued for over 20 years, starting from the SIDBI days, continuing into the Dia Vikas phase and now through the collaboration with Habitat for Humanity India, and as the years roll on, my admiration for Medha and her exemplary work with Annapurna Pariwar keeps growing!

**K. C. Ranjani**

**Ex.Manager SIDBI**
**Ex.MD Dia Vikas**
**Advisor- Annapurna Pariwar**

# 159. Medha Samant : A Dynamic Person With An Unwavering Commitment To The Poor

The name of Medha Samant was introduced to me as Medha Mami more than eighteen years ago when her nephew came to my house as my son's friend to stay for a day. Ever since then we have been meeting, working together and getting to know each other constantly discussing various subjects, projects and also working together on some of them over a period of almost two decades.

Her virtues that were exceedingly transparent throughout have been her systematic and methodical way of working, her unswerving commitment to the upliftment of the poor and transparent way of working. These virtues have ensured that the organization she has been involved with have grown manifold and still the commitments remain and her leadership has helped create an army of dedicated workers who have carried the work and idealisms forward to usher in growth and build a large organization without losing any of the social commitments and providing a vision in which thousands now believe in passionately.

My involvement in the work of Medha Tai began seriously when I started work on Telemedicine which was at a very nascent stage in the state of Maharashtra. We had worked together for this for almost three years during which I used to constantly visit Annapurna office and watch her way of working at Annapurna which was growing and adding new activities.

Her methodical and systematic way of working and her commitment to the upliftment of poor was something that could be seen clearly. Moreover her way of interacting with the staff at Annapurna and her leadership quality brought in dedicated support for all the activities of Annapurna from each member of the staff. This was something unique for me.

I had worked in large corporate offices for many years and have always seen half hearted backing from subordinates for new ideas or difficult and more meticulous methods of work or bringing in more stringent controls or generally resistance to change. This was totally absent and Medha Tai's passionate commitments and her personal equations with all the staff combined with strong leadership were the real cause for this small miracle.

While working on Telemedicine I also saw the systematic way of organizing the work.

This was essential as we had to set up the organization and start from scratch. Yet within a short period we were able to set up many centres which helped the growth of the concept of Telemedicine. The work of I C E,( Inform, Communicate and Educate) the stake holders or the potential patients in rural areas were methodically handled and this is still a critical component of any Telemedicine initiative anywhere.

After Telemedicine there was a big gap as I moved on to work in the Construction industry and lost touch with Medha Tai as I became more and more involved in my job of heading construction companies. This kept me fully occupied and in the meanwhile Annapurna continued to grow by leaps and bounds to become what it is today.

Recently I got to work with Annapurna and Medha Tai as a process auditor. I was amazed to see the same commitment, the same zeal and enthusiasm and inspite of several obstacles and changes in the economy of the country as a whole, Annapurna has remained an organization with the same commitment to the poor and the same systematic and methodical way of working, the same passionate support

from all staff and other stake holders. It felt good to work with the team again.

I wish Medha Tai many more successful years of working with Annapurna and a very happy Birthday with many more to come.

**Ravi Kulkarni**

**Independent Consultant**

# 160. Medha Madam: Empowerment Personified

**I** have known Medha ma'am for more than ten years. In the first meeting itself, I was impressed with her confident personality and with the success story of Annapurna. People talk about women's empowerment and Medha Ma'am is empowerment personified. It does not stop there; it has resulted in the empowerment of countless women associated directly and indirectly with Annapurna Pariwar. To understand that, one needs to attend community meetings and annual general meetings of Annapurna Pariwar.

I have been associated with Annapurna Pariwar in reference to community health insurance. Health insurance is a complex and difficult aspect of insurance. Making it available to the marginalized section of society with a participative approach is the biggest challenge one can imagine. But looking at the Annapurna model if feels that it is so simple and easy to understand. Making it a reality is a humongous task. Annapurna model explains the amount of relentless work that has gone in community dialogue, setting up systems and processes for delivery of seamless services. It is made possible

because of the vision and the capability to build an organization that ma’am has. It’s amazing to see that it did not stop there; other risks like life, asset and old age were also covered subsequently.

The world has changed in the last decade, but not ma’am. She still carries the same passion, when she talks of health mutual and Annapurna Pariwar. The kind of grit and determination she displays in her conduct is awe-inspiring. I am also amazed at the clarity with which she speaks about any matter related to Annapurna and for that matter about microfinance and women empowerment. I keep wondering, what is the source of her energy, which has only increased with time. It has been an enriching journey for me and it has been an honor to be associated with Ma'am. May God bless Medha Ma’am with many more decades of this inspiring work! May Annapurna reach the pinnacle of good work it is doing for Women!

**Dr. Archana Singh**

**Faculty, National Insurance Academy, Pune.**

# 161. Medha Tai: A Pillar of Strength

**I** still remember the day when I was visiting a conference at NIA Pune along with my professor Dr. Samar Datta and we met professor Archana Singh. She introduced us to an organization that was doing exemplary work in the field of Microinsurance and Microfinance. We listened to the work done by Annapurna Pariwar with excitement and amazement.

The very next day we visited the office of Dr. Medha Samant (fondly Tai), who was very kind to tell us about her struggle. I have never forgotten how big an impact that few hours of discussions had on my life. Little did I realise then that then I would be so impressed and intrigued by Tai's work that I would dedicate my Ph.d thesis to support the evidence that she had dedicated her life for community based organisations can work!

Since then, I have never felt short of receiving her blessings on my thesis as well as on my books on community based insurance and demonetization. To me Tai resembles an exemplary figure of benevolence and resilience, who has devoted a major part of her life towards the upliftment of poor women and their families.

To her staff and researchers like us she embodies courage and leadership, never hesitating to take tough challenges.

Through her journey, I am sure she has created a large number of women leaders who aspire to take on even tougher challenges. Thus, on the occasion of Tai's 60th birthday I bow down in reverence to her free spirit and pray to the almighty for her health and happiness for more years to come.

**Kanish Debnath**
**Ph.D.,IIM, Ahmedabad**
**Faculty, Flame Institute.**

# 162. Medha Samant : A Torchbearer

**D**ear Medha Tai,

Hearty Congratulations on your 60th Birthday !!!!!

I met you about 18 years ago for the first time and we got together the approval from Central Government and there after every time when I meet you for discussions, I have observed that the subject is new for everyone but you are always ready with your ground work on the subject. You are always the leader who is starting a precedence which helps others walking on that path as a bench mark and guide.

You may be 60 today but as stated by International Tennis Icon of India Leander Peas that age is only a number. It rightly applies to you. You have the energy of a teenager. You have skill to connect with all persons in spite of their different educational backgrounds, different age groups, different social backgrounds etc. You are so simple and grounded that anyone can approach you any time. At the same time you are very strict when it comes to any type of discipline - organisational, procedural or financial.

I always learn from you whenever I get a chance to interact with you or meet you. I have also noticed that you are a very good Time Manager. I always keep in mind to give ANNAPURNA some new contact or new subject which will help you, may be in a very small way, to achieve your organisational aim effectively.

Last but not the least I believe that all the success that you have achieved is due to the FULL SUPPORT from your family which has stood by you at all times and which includes Purao-Samant - Annapurna Pariwar.

I wish you all the best in all your future projects and for fulfilling all your dreams.

With best regards !!

**Jayavant B. Bhave**
**Company Secretary,**
**Annapurna Pariwar**

# 163. An Institution called "Medhatai"

**I** met Dr. Mrs. Medha Samant Purao about 30 years ago when her husband appointed my firm of chartered accountants as statutory auditors of their private limited company. Gradually I realised why she was referred to as "Medhatai" by her women associates.

In traditional Marathi culture, the word "tai" simply means "elder sister". However, thanks to the role of elder sisters in a family of several siblings, the real meaning of this word is more wide. The "tai" is looked upon as a friend, guide and philosopher of the younger siblings. As a friend, tai is the confidant of the siblings; she takes care of the siblings by ensuring that the siblings get necessaries even at the cost of her sacrifice; she tries to cover their juvenile pranks. As a guide, she helps them in their schooling and plays the role of a teacher. As a philosopher, she explains to them the philosophy of life so that they grow up as worthy human beings. Thus tai is indeed like a big tree under the shade of which the siblings find peace of mind & timely support.

In the past, there would be several tais who moulded the character of siblings in a joint family. However, in the 21st century, joint

families are rare, especially in urban slum areas where a family consisting of husband, wife and one or two children just survives in abject poverty and its consequent misery. The meagre earnings of the husband are inadequate to provide good food to the family and good education to the children.

Being the tai in her family, Medhatai was naturally aware of role of a tai. Besides, thanks to her family legacy of social service she claims from her Father a leader of Bank Employees &Mother Padmashree Prematai Purao, she was aware of the reality of life in urban slums.But she could offer little more than lip sympathy because of her job in Bank of India.

Medha tai therefore quit her job in Bank of India and gave up the comforts & perquisites associated with it. She consciously chose to tread an unbeaten path which would lead to change the life of poor women in urban slums. She aimed at becoming the tai in the families living in urban slums.

Because of her experience in Bank of India, she was aware of the importance of finance in improving the quality of life. She was also aware that the procedures followed by commercial banks, despite nationalisation, were totally inadequate for providing timely finance to the

poor who had no security to offer except their integrity & character. She therefore decided to rely on the micro-finance model to self-help groups in order to meet their financial needs.

Today, Medhatai is looked upon as a successful entrepreneur in micro-finance. The self-help groups formed for the purpose of micro-finance consist of women who live next to each other in slums irrespective of their caste or religion. These women are have little formal education.

Thereby improve the lot of their families. Today the loan portfolio of Medhatai's cooperative credit society consists of more than a lac loans aggregating to more than Rs.200 crores. And the track record of these loans is immaculate with little default thanks to the peer pressure among the members of the self-help group.Medhatai's success in micro-finance has been appreciated by many banks & non-banking financial institutions who offer loans to the society for on-ward lending to the self-help groups.

But the efforts of Medhatai to improve the life of the women in urban slums is not limited to micro-finance.

A not-for-profit company offers micro-insurance cover to the family members of those who borrow from the cooperative credit society. The insurance cover includes health insurance, life insurance and also a pension scheme. For the purpose of health insurance, several reputable medical establishments have been empanelled to provide medical help at affordable cost.

Public charitable trusts formed by Medhatai run day-care centres to take care of the small children of the women borrowers who leave their house for the purpose of earning income These charitable trusts also offer scholarships to the children of the women borrowers and promote research for the purpose of improving the quality of life in urban slums. The activities of the trusts are supported by the CSR funds of many corporates.

These trusts & societies thus form Medhatai's pariwar.

Public charitable trusts & cooperative societies are often so engrossed in achieving their noble objectives that they tend to disregard their obligations under various laws. However, Medhatai's experience as a banker has impressed upon her the importance of legal compliances for the success & long-term survival of any venture. Hence Medhatai's trusts & societies seek to

meticulously comply with all applicable laws with the help & guidance of reputable advisors.

I am proudly associated with Medhatai’s Pariear as a Chartered Accountant For almost two decades, Over the last 27 years, Medhatai's efforts have succeeded in changing the life of more than a lac women& their families. She has received several awards in recognition of her contribution. But I have reason to believe that Medhatai's greatest achievement is the respect, admiration & obedience she commands as the tai of these families.

Medhatai has proved that despite the principles of capitalism and free market economy, developing countries can never give up the ideals of socialism. I wish her greater success in her humanitarian efforts & hope that her associates will emulate her example.

**S. M. Ghatpande**
**Chartered Accountant**

# 164. Medha Samant; The Social Entrepreneur

**V**ery rarely one comes across a Leader whose PRACTICES can be traced back to the PRINCIPLES taught in the books of Philip Kotler or Stephen Covey or Ken Blanchard.

In the world of 'Entrepreneurs' & 'Business' when ventures are started only for PROFITS, we have here Dr.Medha Samant quitting a cosy Nationalised Bank job 30 years back, to embark upon the challenging but greatly needed journey of 'Social Entrepreneurship'.

When Nepotism & Favouritism reign loud all around in Business & Politics, seeing Dr.Medha categorically state that “No one from my family will ever be my successor in ANNAPURNA "- is absolutely a commendable & laudable Leadership practice !

Way back in 1980s when Tom Peters advocated the principle of MBWA-" Management By Walking Around", it was a principle to be taught to MBA students. But I witnessed & experienced MBWA being practiced full-fledged by Dr.Medha @ ANNAPURNA. That not only gave her the REAL pulse of the grassroot level reality, but, also, helped her to manage the Top Management Team(TMT) effectively.

"Succession Planning & Planning for own Retirement" are words talked frequently in the corridors of Corporate Houses. Recent examples we saw in Infosys, Wipro, Tata, Mahindras & even At ANNAPURNA! We have heard Dr.Medha pronounce it, reiterate it , time & again & take proactive, concrete steps towards reaching there. This repeated announcement helps the Top Team s-t-r-e-t-c-h themselves to gear up to the impending challenges on Dr.Medha madam's stepping down.

**Hats off to the REAL actions.**

On this special day of her 6oth birthday, I congratulate Dr.Medha Madam for demonstrating exemplary Leadership in Social Entrepreneurship & Women Empowerment.

I also wish her great success in the next 5 years in Planning & accomplishing her succession in the field of Micro Finance, Micro Insurance & Inclusive Financing.

**Pramod Deshmukh**

**BE, MMS, HBX:CORe (Harvard)**

**Leadership Trainer,**

**Business Owner's Coach & HR Process Consultant.**

# 165. Crossing Paths with Medha

**I** have spent 6 months in Annapurna working to help the organization on calculations. I have discovered an incredible woman, leading with strength, kindness and intelligence thousands of other women. Medha, I am very proud to have crossed the path of such a character, you are a life lesson.

I wish you the best.

**Alizée Graf**
**Actuary France**

# 166. Inspiring journey with you! Medha

**F**irst we met on Feb 14$^{th}$2001

**"Common Vision on microfinance at a first sight!"**

Ten months earlier Anne-Claire and I just landed with a couple of suitcases in the Mumbai Chattrapati-airport.

First time in India, first impressions of an extraordinary density of happenings, first impression… or rebirth in a new relation with space and time: Nine hours were just enough to reach our new home for next 8 years in Pune.

As microfinance program managers for a French NGO … a few months later we were still lost in so many translations in this "Bharat ka Maha Rashtra," looking for a good "software " to understand people at work or organizations that could make a difference… Microfinance was looking for its model, and it was quite a challenge to start with a few charity organizations making all the efforts to obtain 50% repayments from the loans given to a handful of beggars.

Strongly animated by revolutionary and humanist leadership values, all set to develop a sustainable and impactful microfinance model

for women, meeting Medha gave us the occasion to clean our "butterered glasses" (with ghee and haldi powder) ! …and to discover good working principles to develop our activities, to enjoy working in this country : our best App to understand India what has become second motherland for all our family.

Sharing meetings with you is always inspiring : as a working woman, a mother, a wife, we quickly shared a common understanding of empowerment, responsibility and family values.

Working with you is magic, fuels everyone in the team to give its best and to deliver meaningful services…beyond a simple micro loan…

You are probably the reason why we didn't stay in India only a couple of years ! This new partnership offered many good reasons to make out Stay in India much longer. No doubt that the good weekends shared at Matheran or Panchgani with our families contributed a lot to enjoy this stay!

This Indian way of working " LESSON"started with your help to read between the lines in Microfinance management committee meetings … With a timely SMS to pull me out the negotiation room for not taking a bad

decision ! I remember also nice and loooong meetings sitting cross legs on the ground happy to understand one Marathi word out of 10 in passionate debates with members, testing for new ideas.

A great passion of innovation of programs like creches, early childhood development, family development, vocational training, and of course micro insurance with various products providing security to many families. We shared all with you.

As children are born in a family, new …new types of “Purnas” showed up in Annapurna : for deprived families, for parents, for patients ! We love your energy to test, implement and scale up projects !

During our 8 years journey in India, I enjoyed these biweekly lunches cum debates with you to push the ideas further on the action way :" why men should get loans ? how masculinists may survive in Annapurna :-) and why men are good for women (!)"

We also had debates about the guru attitude and the democracy based leadership, about impact of our actions, and the major illusion… about education, our kids, their choices, our worries or un-dared hopes…

The development roadtrip goes on with board meetings reviewing Annapurna activities, finance and projects, but also good times and great parties. A journey that happily keeps going, leveraging the best of your epoch,

Just keep en-joying your way, dear Medha! Happy birthday!

**Anne Claire & F. X. Hay**
**Consultants & Friends**

# उपोद्घात : मी कशी घडले- वाढले

**मा**झ्या साठाव्या वाढदिवसा निमित्त माझ्या प्रिय पतीराजांनी एक प्रेमळ कट माझ्या विरूद्ध वर्षभर शिजवला. त्यात माझा मुलगाही सामील होता, आणि माझ्या जिवलग मैत्रिणी अंजलीताई व चित्राताई ह्याही सामील होत्या. उज्वला सुद्धा हया मोठयांच्या कटात सामील झाली होती. धोपे काका तर एक व्रात्य मूल आहे. त्यामुळे कॉ. जयंतच्या जोडीने तो माझा म्हातारा काका असला तरी तो असे खोडकर उद्योग करत असतो. वृषाली ताई, प्रसन्न दादा, पिसाळ काका जरा गंभीर आहेत. पण हया सगळयांनी मिळून हा जो प्रेमळ कट केला, तो मला सुखद धक्का होता व एक आगळी वेगळी वाढदिवसाची भेट मिळाली.

१८.०८.२०२० हा माझ्या बाबांचा स्मृतिदिन, म्हणून आम्ही ''फाऊंडर्स डे'' साजरा करतो. हया दिवशी मला सुखद धक्का म्हणून ''मेधा'' हे माझ्यावर प्रेम करणाऱ्या अनेक व्यक्तींनी लिहिलेले पुस्तक मला मिळाले. मात्र त्यातील शुध्दलेखन, अनुक्रमणिका इ. मध्ये दुरूस्त्या करण्याचे कामही मलाच मिळाले! ते सर्व काम करतानाच मला वाटले, हया पुस्तकाची सांगता म्हणून मी ही थोडे लिहावे! मी कशी घडले, वाढले हे सांगणे व कृतज्ञता व्यक्त करणे हा माझ्या लेखाचा हेतू आहे.

साठावी वगैरे पार करणे म्हणजे फार मोठं नसतं, असं मला वाटतं. मी कार्यकर्ती म्हणून घडत गेले, कार्य करत गेले, त्यामुळे मला माझी 'साठी' आली असे काही कळले नाही. ''मी सी.एम.डी., सी.ई.ओ.'' हया पदावरून रिटायर्ड होणार आहे. असे मी गेल्या २ वर्षापासून माझ्या तरूण सहकाऱ्यांना सांगत असते. हयाचे कारण आता तरूण फळीने अन्नपूर्णा परिवाराची धुरा खांदयावर घ्यावी असं मला वाटतं.

माझ्याजवळ जो अनुभवाचं संचित निर्माण झालं आहे, ते समाजापर्यंत पोचवायचं आहे. आता मला पुढची दहा वर्षे लिखाण करायचे आहे. तसंच मायक्रोफायनान्स 'नफ्यासाठी नाही, तर सक्षमीकरणासाठी' ही संकल्पना सर्व दूर पोचवायची आहे. भारतामध्ये अजूनही मायक्रोइन्शुरन्स तळागाळापर्यंत पोहचलेला नाही, त्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. 'अॅडव्होकसी' म्हणजे कायदेशीर मार्गाने प्रयत्न करायचे आहेत.तसेच गेल्या पाच ते सहा वर्षापासून जी घातक धोरणे अंमलात आणली जात आहेत, विशेषतः ज्यातून ''दुय्यम नागरिकत्व'' समाजाच्या मोठया दुर्बल वर्गाला बहाल केलं जाईल, त्याविरूद्ध संघर्ष सुद्धा करायचा आहे. असे माझे सर्व पुढील नियोजन मनात सुरू आहे.

पण सर्वांनाच माहित आहे की, माझा आत्मा अन्नपूर्णात आहे आणि अन्नपूर्णा माझं जीवन आहे. दादा पुरव ही एक विचारधारा आहे, जी पुढे घेऊन मी वाटचाल करत आलेय. अन्नपूर्णा परिवार त्या विचारांवरच उभा आहे.

साठाव्या वाढदिवसाच्या टप्प्यावर फक्त मला समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. मी जशी घडले, तशी घडण्यामध्ये हजारो लहान- मोठया व्यक्तींचं, संस्थांचं, संस्कारांचं योगदान आहे. खरं तर कुणीच कार्यकर्ता नेता स्वयंभू नसतो. आपण सारेच आपापल्या परिस्थितीची 'निर्मिती' असतो. "All of us are products of our surrounding & upbringing."

मला भवताल खूप चांगला मिळाला, ह्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

माझ्या जीवनाचे शिल्पकार माझे बाबा कॉ.दादा पुरव! माझ्या बालवयातच मार्क्सवाद, भारतीय तत्वज्ञान व भारतातील बॅकींग इंडस्ट्री यांच्याशी माझा परिचय माझ्या बाबांमुळे झाला.

स्वातंत्र्यलढा, त्यातील उत्तुंग नेते हयांच्याशी परिचय होईल अशी पुस्तके घरातीलच वाचनालयात उपलब्ध होती. ती माझे आजोबा शांताराम लक्ष्मण पुरव हयांच्यामुळे! माझ्या आजोबांना सगळे भाऊ म्हणत. त्याचा व्यासंग एवढा होता की जुने लेखक-नाटककार हयांची सर्व नाटके, कादंबऱ्या आमच्या घरात होत्या. सुंदर खाकी कव्हर घालून त्यावर सुंदर अक्षरात आजोबांचे नाव लिहीलेले असे. मी ना. ह. आपटे पासून तर कृ. प्र. खाडीलकर, राम गणेश गडकरी हयांचे समग्र वाङ्मय शाळेच्या वयातच वाचले!

माझी आजी अन्नपूर्णा पुरव 'तिला आक्का म्हणत.' ती मुंबईच्या सेंट कोलंबामध्ये शिकली,त्यामुळे फार शिकली नाही तरी इंग्लिश वाचू शकायची. बेताचीच देवपूजा पण जास्त मनुष्यसंग्रह अशी आजी लाभली. सुशिक्षित काका, आत्या असलेल्या, माणसे व पुस्तकांनी भरलेल्या घरात दादर, मुंबईच्या रम्य वाडया असलेल्या वातावरणात मी जन्मले व वाढले.

माझी आई हाडाची कार्यकर्ती! गोव्यातील एका निसर्गरम्य, पण दुर्गम खेडयात प्रभू तेंडुलकर कुटुंबात जन्मली. माझे आजोबा रामचंद्र व आजी सीता प्रभू तेंडुलकर. माझ्या आजोबांना 'शाणु' म्हणत. भरपूर शेती, जमीन असलेलं सारस्वत कुटुंब, भरलेलं घर, प्रेमळ आई- वडिल अशा वातावरणात आई जन्मली. पण तिचा मोठा भाऊ काशीनाथ, माझा मामा सावंतवाडीला शिकायला गेला. तिथे त्याचा संबंध स्वातंत्र्य सैनिकांशी आला. आणि तो पोर्तुगीजां विरूद्ध गोवा मुक्तीसंग्रामात सामील झाला. त्याचं बोट धरून माझी आई सुद्धा मुक्तीसंग्रामात आली. तिचं शिक्षण फारसं झालं नाही पण एक धडाडीची कार्यकर्ती म्हणून मुंबईत तिने स्वतः ची ओळख निर्माण केली.

तर अशी माझी चळवळी, धडपडी आई! तिच्या धडपडींमधून चुकाही घडत. बाबा तिला, तिच्या विचारांना दिशा देत असत. हे बघत ऐकत मी घडले.बाबा AIBEA, CPI व आमच्या कुटुंबाचे ही Think Tank होते. बाबांच्या मागून आईला सल्ला, सपोर्ट देणे, सावरणे माझ्याकडे आले आहे.

आईच्या अनेक आंदोलनांमधील सहभागापैकी माझ्या कळत्या वयातील आंदोलन म्हणजे ''महागाई प्रतिकार संयुक्त महिला समिती''. १९७० च्या कालखंडात हया समितीत मोठमोठया महिला नेत्या मृणालताई गोरे, अहिल्याताई रांगणेकर, तारा रेड्डी, मंजू गांधी, मीनाक्षीबाई साने, प्रमिला दंडवते, सुशीला पटेल अशा साऱ्या रणरागिणी होत्या. ''लाटणी मोर्चा'' ची अभिनव कल्पना आमच्या घरात बसून हया रणरागिणींनी निर्मीली आहे, हयाची मी साक्षीदार आहे.

तसेच माझ्या बाबांकडे कॉ. प्रभातकार, कॉ. परवाना, कॉ. छड्डा, कॉ. मेनन, कॉ.मंडल, कॉ. तारकेश्वर, कॉ. सुशीलदा, कॉ. चिटणीस, कॉ. परांजपे आणि त्यातच आमचा धोपे काका येत असत. चिटणीस काकांच्या व धोपे काकांच्या कुटुंबाशी आमचा खास घरोबा होता, अजूनही आहे.

माझ्या आईबाबांच्या प्रचंड जनसंपर्कामुळे माझ्या लहानपणापासून घरात फार मोठमोठे नेते येत असत. आचार्य अत्रे ज्यांना मी पपा आजोबा म्हणत असे. त्यांनी माझा पहिलीत तिसरा नंबर आला म्हणून खादी भांडार मध्ये मला नेऊन एक कापडी बाहुली आणि स्वेटर घेतला होता. ''नवयुग वाचन माला'' हा पपा आजोबांचा लहान मुलांसाठीचा पुस्तकांचा खजिना मला दिला होता. पुन्हा मी सांगितले की ''प्रिय मेधास पपा आजोबाकडून'' असे लिहू

नका. ''प्रिय मेधास आचार्य अत्रे कडून'' असेच लिहा. माझ्या मैत्रिणींना कसं कळेल, तुम्ही माझे आजोबा ते?

माझं नाव 'मेधा' पपा आजोबांनी ठेवलं. त्यांनी सांगितलं, ''मेधा म्हणजे बुध्दी'' एवढं भाग्य मला लाभलंय!

कॉ. एस. ए. डांगे ज्यांना मी 'डी आजोबा' म्हणत असे. त्याचं मिश्कील, प्रसन्न हसू आजही डोळयांसमोर आहे. भाई एस. एम. जोशी, शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे हयांचं घरात येणं जाणं असे त्यातही अमर शेख भाईमामा व कॉ. दत्ता देशमुख भय्यामामा हे तर लाडही करत.

स्वातंत्र्यवीर नाना पाटील मुंबईत आले की आमच्या घरी उतरत. ''पत्रीसरकार'' ची कहाणी त्यांच्या तोंडून, त्यांच्या मांडीत बसून मी ऐकलीय. एवढी मी भाग्यवान आहे!

मी ज्या शाळेत शिकले,ती शिक्षण महर्षी दादा रेगे हयांची सुप्रसिद्ध बाल मोहन विदयामंदिर! बाळ गंगाधर टिळक व मोहनदास करमचंद गांधी यांच्या नावाचा संगम आमच्या शाळेच्या नावातच आहे, असं आमच्या दादांच्या तोंडून आम्ही ऐकलंय! धोतर, टोपी, कोट घालणाऱ्या रावले, ठाकूर गुरूजीनीं भाषा, भूगोल शिकवलंय आणि नऊवारी साडी नेसणाऱ्या काळेबाईं सारख्या शिक्षिकांनी बीजगणित शिकवलंय. ''बाल मोहन ची मुले'' आम्ही साठी-सत्तरीत आलो तरी ''दादांची मुलं'' च आहोत.

साने गुरूजींचं समग्र वाङ्मय हा माझ्यावरचा अमूल्य संस्कारांचा मोठ्ठा भाग आहे. माझी आई आमच्या घरात दादर मधील मुलांसाठी ''साने गुरूजी कथामाला'' चालवत असे. त्यात साने गुरूजीच्या कथाकविता वाचायचो,आणि स्वतः च्या ही रचू लागलो.

शाळेतच कविता, कथा लिहू लागले. माझे आवडते कवी नारायण सुर्वे, सुरेश भट. माझं भाग्य बघा, हेही दोघे घरी येत असत. त्यांच्या कविता त्यांच्या तोंडून ऐकल्या आहेत. माझ्या बालवयातील कविता त्यांच्या समोर वाचूनही दाखवल्या आहेत! कवि केशवसुतांपासून, मर्ढेकर, भा. रा. तांबे, कुसुमाग्रज, वसंत बापट, विंदा करंदीकर वाचले आहेत!

प्रा. श्री. नेरूरकर माझ्या आत्याचे पती व माझे मामा. त्यांनी माझ्यावरील वाचन, लिखाणाच्या संस्कारांमध्ये खूप भर घातली. ॲड. जयंत गडकरी आईबाबांचा मित्र, आणि माझाही! खूप लाड करायचा, आणि ‘‘प्रेम कविता’’ वगैरे बिनधास्त करत जा! ‘‘क्रांतीबिंतीचं नंतर बघू’’ असं प्रोत्साहन दयायचा.

आईबाबांच्या कम्युनिस्ट पक्ष व कामगार चळवळीतील सहभागामुळे मीही गिरणगाव लहानपणीच पाहिला आहे. टेक्टाईल मिल च्या गेट वरील सभांपासून मोठया मैदानी सभांमधली कॉ.डांगे, अचार्य अत्रे, भाई एस.एम.जोशी, राष्ट्रपती गिरी अशांसारखी भाषणे ऐकली आहेत.

आमचं दादर ‘‘नवनीत’’ मधील छोटंसं घर म्हणजे दादर रेल्वे स्टेशन, प्लाझा सिनेमा व शिवाजी पार्क हयांचा सुवर्ण मध्य होता. त्यामुळे खूप नातेवाईक,मित्र मंडळी अर्धा तास थांबून चहा पिऊन पुढे जात असत त्यात ‘‘अन्नपूर्णा निवास’’ म्हणजे माझ्या आजी आजोबांचं घर जवळच होतं. दोन्ही काका, चारही आत्या जवळजवळच रहात असत. त्यामुळे सतत भेटीगाठी चालूच असतं. माझ्या काका, आत्या एवढेच लाड माझे तीनही आतोबा व त्यांच्या पाठारे, नेरूरकर, म्हात्रे, परिवारांकडून मी करून घेतलेत. माझी आते, चुलत भावंडं, बाळूदादा, आशाताई, वीरेन, सुनील, दीपाली, परेश, यतीन, समीर, अमीता, पराग आम्ही आजही

एकत्र आहोत. आशाताई, समीर हे अकाली मृत्युमुळे दुरावले तरी त्यांची कुटुंबं जोडलेलीच आहेत.

आईचा गाव गोवा तसा दूर, पण माझी मामे बहिण नलूताई आमच्याकडे राहून शिकत होती. माझी मावशी वराडकर. मालवण जवळ चे तिचे गाव. मावस भावंडं, मामे भावंडं शिक्षण, नोकरी, लग्न हया निमित्त आमच्या कडे येत, जात, राहात असत व आम्ही मे महिन्यात वराड, गोवा इथे जात असू. खूप संस्कारांनी समृद्ध व प्रेमाच्या वातावरणात वाढले मी!

त्यात पुन्हा खूप खूप मानलेल्या काका, मामा, मावशा होत्या. रोहिणी मावशी, पपा, सुधामावशी, दोन्ही सुनंदामावशी, चंदूमामा, दत्तू काका, बंडा काका, कमल काकी, मालू आत्या अशी किती नावं घेऊ? सर्वांनी प्रेम दिलं. वेगवेगळया छान गोष्टी मी शिकले त्यांच्याकडून! सुधामावशी कडून छान ब्राम्हणी स्वंयपाक शिकले, तर मालू आत्याकडून भरतकाम!

बेळगावचे मेणसेमामा (आप्पा) व विमल मामी (ताई)हयांचं घर म्हणजे आईचं दुसरं माहेर होतं व आमचं आजोळ गोव्याच्या वाटेवर बेळगाव लागे, व आमचा पडाव तिथे पडे! लहानपणी विमल मामीने माझे खूप लाड केलेत, तिच्या म्हातारपणी मला जमले तेवढे मी तिचे केलेत! लताताई, बाळू (आनंद), नीतू ही जशी काही माझी सख्खी मामेभावंडं! असाच रक्ताचा नसलेला पण सख्खा मामेभाऊ प्रसन्नदादा उटगी. आजही मी खुशाल माहेरपणाला मडगावला जाऊ शकते, ते प्रसन्नदादा जयश्री वहिनी कडे! आणि तिचंही माहेरपण मी करते कधी कधी! प्रसन्नदादाचे सागर-समीर सुद्धा सख्खे भाचेच आहेत आमचे. सागर तर आम्हा दोघांचा मानसपुत्रच!

‘‘बालपणीचा काळ सुखाचा’’ आठवत मी जरा पुढे आले, परत मागे जाते.

माझ्यावरील संस्कारांमध्ये बाल मोहन शाळेनंतरची मोठी संस्था म्हणजे रूईया कॉलेज. आमचा बाळू दादा मला पकडून तिथे घेऊन गेला. ‘‘रूपारेल नाही रूईया च’’ असं म्हणून. रूईया कॉलेज चे छान प्राध्यापक, लॅबोरेटरी, लायब्ररी आणि पायऱ्या कट्टे, ‘‘मणीज’’ चा डोसा यात मस्ती मजा करत ग्रॅज्युएशन झालं. जीवा भावाच्या मैत्रिणी शाळा कॉलेज मध्ये भेटल्या, आजही आम्ही तेवढयाच जीवश्च कंठश्च मैत्रिणी आहोत! रूपा, वंदना, वासंती, संध्या, प्रतिभा, स्वाती, भारती, माधुरी...सगळयाच साठीच्या झालो. तरी भेटतो, जीवाभावाच्या गप्पा मारतो, फ्रेश होतो.

रूईया कॉलेजमध्ये जाऊन ऑल इंडिया स्टुडन्टस् फेडरेशन मध्ये काम करू लागले. माझा कॉम्रेड जयंत तिथेच भेटला, पुढे माझा नवरा झाला. दोघे एकमेकांना घडवत, बिघडवत गेलो.

खूप खूप भांडलो, अजूनही भांडतो, पण घट्ट हात हातात धरून १९७७ पासून आजवर एकत्र वाटचाल करतोय. एकत्र आम्ही अनेक लहान मोठी संकटं पार करत आलोय.

पुढे ‘बँक ऑफ इंडिया’ आमची स्टार बँक! सारं काही बँकिंग तिथेच शिकले. बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन, एम.एस.बी.ई.एफ., ए.आय.बी.ई.ए. या मध्ये काम केले, भरपूर बँकींग व ट्रेड युनियनिझम शिकले.खूप सहकारी, स्नेही जोडले. ऑपेरा हाऊस ब्रॅंच, मुंबई मुख्य शाखा ते कर्वे रोड पुणे शाखा,पुणे झोनल ऑफीस अशा बऱ्याच शाखा मी फिरले. बँकींग चे वेगवेगळे पैलू मार्केटींग सह शिकले.‘‘बँका गरीबात गरीब बाईपर्यंत पोहचत नाही.’’ ही खंत घेऊन बॅंक सोडली, पण दु: खाने किंवा रागाने नाही तर ‘बँका जे करत नाहीत, ते

आपल्याला करता येतं का पाहूया.’ अशा जिद्दीने, काही तरी घडवण्याच्या ऊर्मीने बाहेर पडले आणि तेहतिसाव्या वर्षी पुण्यात जिन्याखालच्या खोलीत, दगडविटांच्या आसनावर ‘अन्नपूर्णा परिवार’ सुरू केला. जो आज स्वत:च्या सहा मजली इमारतीत, २.५० लाख सभासद, ४०० स्टाफ इथवर आला आहे.

१९९४ मध्ये विचार केला, सोशल वर्कचे शास्त्रशुध्द शिक्षण घ्यावे. मी कर्वे इन्स्टिटय़ूटमध्ये पुण्यात दाखल झाले. कर्वे इन्स्टिटय़ूटच्या हॉलमध्ये महर्षी कर्वेंचा मोठा फोटो पाहून अंगावर उठलेला शहारा आजही विसरू शकत नाही. मनात आलं, की ‘‘एका ज्ञान यज्ञात’’ शिकतो आहोत. किती मी भाग्यवान!

कर्वे इन्स्टिटय़ूटमध्ये डॅफ्नी मैत्रीण झाली. सिस्टर डॅफ्नी सध्या व्हॅटीकन सिटी इथे असोसिएट मदर आहे. अजूनही आम्ही घट्ट मैत्रिणी आहोत. कर्वे इन्स्टिटय़ूटमध्ये माझ्याच वयाच्या प्राध्यापिका होत्या, त्या आता माझ्या मैत्रिणी झाल्या आहेत. अंजू मायदेव, मणी, उज्वला मजदेकर. हल्ली हल्ली आम्ही रात्रभर रस्त्यावर बसून ‘‘शाहीनबाग’’ ला पाठींबा दिला व जे.एन.यू.च्या विदयार्थ्यांसाठी सुध्दा तासभर का असेना, रस्त्यात उतरलो.

सोशल वर्कच्या डिग्रीनंतर पी.एच.डी केली १० वर्षांनी! डॉ. शरदचंद्र गोखले माझे गाईड होते. त्यांनी पहिल्यांदाच सांगितलं, ‘‘तुझ्या मायक्रो फायनान्स मधलं मला काही कळत नाही, पण मी तुला अनेक गुरू भेटवीन, तुझं तुला करायचंय.’’ मीही त्यांना स्पष्ट सांगितलं, ‘‘पुणे विदयापीठात चारच गाईड आहेत. सोशल वर्क डिसीप्लीन मध्ये, आणि मी तुमच्याच हाताखाली करणार हे ठरवलंय.’’

अशा ह्या माझ्या गुरूजींनी पुणे विदयापीठातल्या तांत्रिक अडचणीत मला अशी काही साथ दिली, की माझी नैया पार झाली. त्यामुळे कर्वे इन्स्टिटयूट व पुणे विदयापीठ यांचा माझ्या आयुष्यावर, कामावर मोठा ठसा उमटलेला आहे.

१९९६ साली ''इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज,'' ससेक्स युनिव्हर्सिटी, इंग्लंड येथे जाऊन ''महिला व सक्षमीकरण'' हयाचा २ महिन्यांचा कोर्स करण्याची सुवर्णसंधी चालून आली. ती ए.एफ.जी चे अरविंद गोडबोले हयांच्यामुळे. इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज मध्ये नैला कबीर ही तेव्हा हया कोर्सची डायरेक्टर होती. नैला कबीर ही आज जगातील पहिल्या १०० व्यक्तींमध्ये येते, ज्यांनी ''महिला सक्षमीकरणाच्या'' जागतिक धोरणांवर स्वतःचा ठसा उमटवला आहे. तिच्या सोबत, तिच्या कडून, आणि उत्कृष्ट ब्रिटीश प्राध्यापकांकडून मिळालेली शिकवण मी अन्नपूर्णाच्या कामात जागोजागी वापरते आहे. इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज मध्ये मिळालेली स्वीडीश मैत्रिण मोनिका आजही तितकीच जवळची आहे.

कर्वे इन्स्टिटयूट मध्येच F.X.Hay भेटला २००० साली. तो एक फ्रेंच ॲक्च्युरी होता. भारतात काही वर्षे राहून मायक्रो फायनान्समध्ये काम करायला आला होता, त्याच्यासोबत त्याची बायको ॲनक्लेअर सुध्दा होती. ती मॅनेजमेंट तज्ञ होती. त्या दोघांनी अन्नपूर्णासोबत ८ वर्षे मायक्रोफायनान्स व मायक्रोइन्शुरन्स क्षेत्रात काम केलं. मी त्यांच्याकडून खूप शिकले. बारकाईने सिस्टीम्स कशा बनवायच्या हे चांगलंच शिकायला मिळालं. त्यांची तीन मुलं भारतात जन्मली. ते इथे असताना कैकदा आमच्या घरी, त्यांच्या घरी आमची कुटुंबं एकत्र जमलोय. गेल्या १२ वर्षांपासून ते फ्रान्समध्ये परतले आहेत. आणि आता माझं

एक घर पॅरिसमध्येही आहे असं मी खुशाल म्हणू शकते, मी खूपदा पॅरीसला जाऊन त्यांचा पाहुणचार घेतलाय!

माझ्या सगळया प्रवासात मला खूप प्रेम, स्नेह मिळाला. ''खरा तो एकही धर्म, जगाला प्रेम अर्पावे.'' हे साने गुरूजींचे शब्द मी जगलेय, जगतेय.

अन्नपूर्णा परिवाराची स्थापना केल्यापासून अनेक छोटया छोटया कार्यकर्त्यांपासून सगळया सिनिअर सहकाऱ्यांपर्यंत सगळयांची खूप खूप साथ लाभली.

त्याच्यामध्ये शेवंताबाई, जहिदाबी यांना विसरणं शक्यच नाही. लीलाबाई, साळेकरबाई, पाटीलबाई, कासाबाई आणि आशा, आशाबी सारख्या अनेक हजारो बायकांची नावे घेता येतील. ती सगळी नावे घेणे शक्य नाही, प्रातिनिधीक नाव घेते आहे. हया सगळयांनी साथ दिली नसती, तर आज आपण हया टप्प्यावर अन्नपूर्णा परिवार आणूच शकलो नसतो. त्या साऱ्याजणी माझ्या परिवाराच्या घटक बनल्या आहेत.

माझ्या लोन ॲण्ड सेव्हिंग ऑफिसर, दिडशे तरूण महिला आहेत, आणि त्या वस्ती पातळीवर जावून, तळागाळात जावून कर्जवाटप, कर्जवसूली करतात. त्यांच्याच श्रमावर अन्नपूर्णा परिवार उभा आहे.

आमच्या सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह २२ तरूण महिला आहेत. अन्नपूर्णाची आरोग्य सेवा, आधारपूर्णा, विदयापूर्णा हे सभासदांपर्यंत हयाच पोहचवतात.आमच्या २२ ब्रँच मॅनेजर म्हणजे सोन्याचे तुकडे आहेत. हया माझ्या ब्रँच मॅनेजर म्हणजे वस्ती वस्ती मधल्या दुवे आहेत. अन्नपूर्णाचे सभासद आणि अन्नपूर्णा परिवार हयांच्यामधील!

त्यांच्या वरची फळी आहे पी.एम, एस.एम., डि.एम. पर्यंत. हेड ऑफीसला काम करणाऱ्या मध्ये उज्वला ताई

आघाडीवर आहेत. तिच्या मागोमाग आरती आहे. मधुरा, कल्पना, सविता, आश्विनी, मंजिरी, सुजाता, लता, संजना आहेत. आणि खूप सारी बँक ऑफीसची टीम आहे. त्यांच्या मध्ये लहानगी आमची ऋचा ही सामील झाली आहे. हया सगळया मंडळींच्या बरोबर अन्नपूर्णा परिवार असा वाढत गेला आहे. आमच्या डेप्युटी मॅनेजर्स मध्येही छान तयार झालेली टीम आहे. हया सर्वजणी अन्नपूर्णा परिवारात स्टाफ म्हणून आल्या, आणि कार्यकर्त्या झाल्या.

वात्सल्यपूर्णा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था आणि आमची पाळणाघरे हा माझा लाडका उपक्रम. आमच्या प्रेमळ तायांनी पाळणाघरे ही वस्तीतील छोटया मुलांना स्वतःचे घरच वाटेल अशी सांभाळली आहेत. मी त्या तायांना 'देवकी' च म्हणते.

विशेष सांगावस वाटतं की, अन्नपूर्णा परिवारात कुरियर बॉय म्हणून काम करणारी तरुण मुलं, आमचे ड्रायव्हर, सिक्युरिटी, मावशा हे सुद्धा जबाबदार, प्रेमळ, कामसू आहेत.

बोर्ड मेंबरर्स मध्ये बँकेतले सगळे तज्ञ आहेत आणि वेगवेगळया विषयांचे तज्ञ आहेत. त्यांनी इतकी मनापासून साथ दिली आहे. त्यामुळेच अन्नपूर्णा परिवार हया टप्प्यावर आलेला आहे. हस्तेपरहस्ते अनेक लोकांनी मदत केली आहे. त्यात ॲडवायझरर्स, कन्सल्टंट्स आहेत. इलंगोवन, रंजनी, घाटपांडे, भावे, गौरी, भोसले साहेब, पिंगळे, चौधरी, पराग, सोनिया, नेहा, कै.तुषार कर्णीक, ॲंथनी, बलवीर, मोरे, ब्रिजमोहन शर्मा ही नावं घेतली नाही तर अन्नपूर्णा परिवाराची यादी अपुरी राहील.

जयंतची नासान मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स ह्या कंपनीचा स्टाफ, कन्सल्टंट्स हा पण एक परिवारच आहे आमचा!

या कृतज्ञता यादीत शेवटी माझे सामंत कुटुंबाचा उल्लेख करते. माझे सासरे स्वातंत्र्य सैनिक होते. भास्करराव सामंत. अत्यंत करारी, निस्पृह, स्पष्टवक्ते, सचोटीचे होते. सासूबाई प्रभावती (तिरोडकर) सामंत. खूप स्वच्छता आवडायची त्यांना. त्याबाबतीत आम्हा दोघींचं १०० टक्के पटायचं. दोघेही फार शिकलेले नव्हते, पण सुसंस्कृत होते. सासरे ''कबीराचे दोहे'' पासून तर ''दास कॅपिटल''पर्यंत वाचायचे. प्रेस टेक्निशियन होते. सासूबाई मराठी पेपर पूर्ण वाचायच्या. काँग्रेस, राजकारण, क्रिकेट हे त्यांचे आवडते विषय. अगदी ९६ व्या वर्षी मृत्यु होईपर्यंत. माझ्या सासू- सासऱ्यांनी मला प्रेम दिलं, मीही त्यांची सेवा करू शकले हयाबद्दल मला खूप आनंद वाटतो.

माझ्या तीन नणंदा, एक दीर, त्यांची मुलं आणि आता नातवंडं असा आमचा छानपैकी सामंत-तिरोडकर-परूळेकर-सबनीस-वाघ परिवार आहे. भेटलो की 'खा खा' खातो, ''बोल बोल'' बोलतो.

माझ्या नवऱ्याबद्दल काय बोलू? आम्ही एकमेकात इतके मिसळून गेलो आहोत, की कोण कुठे सुरू होतं, कुठे संपतं सांगताच येणार नाही.

माझा मुलगा नचिकेत! प्रतिभावंत, प्रज्ञावंत असा कलाकार मुलगा आहे माझा! मी काही सांगायला लागले की, नचिकेत मला ज्ञानाचे डोस पाजतो, की मी म्हणते ''चाईल्ड इज फादर ऑफ मॅन.'' माझ्या अतिशय गोड दोन नाती आहेत, नव्या आणि मायरा. माझी सून डॉक्टर चैत्रा बालरोगतज्ञ आहे. आम्ही एकत्रच राहतो, कारण चैत्राला तसंच पाहिजे होतं. (आहे की नाही आश्चर्य?)

चैत्राचे आई वडील प्रमोद व अनुराधा नारळकर (शेरी म्हणतो घरी तिला) हे तर काही विचारूच नका, इतके

छान आहेत. आमचे आठ जणांचे एक कुटुंब असल्यासारखे आहोत आम्ही! कुणाला लाभतं का एवढं भाग्य?

शेवटी थांबण्यापूर्वी एक सांगते, सगळं छान असलं, तरी जीवनात काटे टोचलेच नाहीत, असं नाही. अगदी जवळच्यांचे वार टोचले, रक्तही आले, पण डोळे, रक्त पुसून पुढेच जात राहिले. सदैव सकारात्मक रहायचं असं ठरवून जगले वागले.

आम्ही दोघांनी एकच मूल होऊ दयायचं ठरवलं होतं. मुलगा-मुलगी जे होईल ते. नचिकेत झाल्यावर जशी आमची परिस्थिती सुधारत गेली, तसे आम्ही काही मुलांचं शिक्षण, सांभाळ केला. त्यात परशुराम, मारूती हे दोघे मातृपितृ छत्र हरपलेले भाऊ व रूपा, शिल्पा हया दोन पितृछत्र हरपलेल्या बहिणी. त्या आमच्या प्रयोगात ७५ टक्के यश आलं, २५ टक्के अपयश! पण सारं काही सकारात्मक घेतलं.

सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याचं वैयक्तिक आयुष्य दुःखी असतं असा एक सार्वत्रिक समज गैरसमज आहे. माझ्या आयुष्यापासून काही शिकू पाहणाऱ्या व सामाजिक क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या तरूण पिढीला किमान मी असा संदेश देऊ शकले की, समाजासाठी कार्य करताना ही आपण सुखी कौटुंबिक, वैयक्तिक जीवन जगू शकतो. ‘‘It is possible’’तर मी म्हणेन याचसाठी केला होता ‘‘अट्टाहास.’’

मी माझ्या जीवनात अतिशय आनंदी आणि समृध्द आहे. माझ्या साठावी नंतर ही मी माझा प्रवास असाच करणार आहे. सगळयांच्या साथीने आणि ज्या टप्प्यापर्यंत महिला सक्षमीकरण चळवळ नेता येईल, तळागाळातल्या घटकांचा विकास करता येईल तिथपर्यंत! शेवटच्या मिनिटापर्यंत माझी

शारीरिक, मानसिक, बौध्दीक ताकद राहो एवढीच इच्छा व्यक्त करते.

मन कृतज्ञतेने ओथंबलेले आहे!!

**डॉ. मेधा पुरव सामंत**



Medha Tai with Parents











Bank of India +
All India Bank Employees Association










**Board Meetings of Annapurna Pariwar**










**Lighter Moments with Board Members & Consultants of Annapurna Pariwar**







**Lighter Moments with Board Members & Consultants of Annapurna Pariwar**













**Lighter Moments with Board Members, Consultants & chief Guests of Annapurna Pariwar**


अन्नपूर्णा महिला मंडळ
पुणे
मुंबई विभाग
अन्नपूर्णा परिवार विकास संस्था
मुंबई विभाग
अन्नपूर्णा महिला मंडळ
मुंबई
पुणे



Staff Members of Annapurna Pariwar



Staff Members of Annapurna Pariwar









**Staff Members of Annapurna Pariwar**









**Staff Members of Annapurna Pariwar**










Staff Members of Annapurna Pariwar








**Annapurna Pariwar - Community Representatives**







Annapurna Pariwar Community Representatives











**Nearest and Dearest Ones**



Purao Family



Samant Family









Friends from age Zero to Graduation









**Friends from Banking to Micro-banking**




**Where Friendship and Profession go hand-in-hand**









Friends who became Family











Hobbies of Medha Tai





श्रीमती मेधा सामंत यांनी सर्वांशी केलेला सुखसंवाद म्हणजे हा 'सखी' काव्यसंग्रह. परंतु हा नुसताच सुखसंवाद नाही. त्या शिळोप्याच्या गप्पाही नाहीत तर त्यात दोन पिढ्यांतील बदलांचा आलेखही आहे, काही आरंभीची निरीक्षणे आहेत, चर्चा, वादसंवाद आणि कुतूहलमिश्रित गमतीदार तपशीलही चित्रित केले गेलेले आहेत. भोवतालचे वास्तव इतके सरळ सोपे नाही. ते संमिश्र ताणतणावांनी गुंफलेले, चकित करणाऱ्या भावभावनांनी, अनुभवांनी एकमेकांशी जोडलेले असते. ते तोडू म्हटल्या तुटत नाही व जोडू म्हटले तर ते सहज जोडलेही जात नाही. इतकी कमालीची गुंतागुंत रोजच्या जीवनात वाढत चाललेली आहे. नवी संवेदनाक्षम तरुण स्त्री कार्यकर्ती म्हणा; किंवा नव्यानेच काव्याद्वारा हे सगळे ताणतणाव व्यक्त करू मागणारे संवेदनाक्षम मन म्हणा, एका विलक्षण भोवऱ्यात सापडूनही ते काही सांगू मागते, बोलू मागते, अगदी लिहूही मागते तेव्हा अभिव्यक्तीचा नवा प्रवास इथूनच सुरू होतो. हे अंर्तद्वंद्व, असले तीव्र आंतरिक सादपडसाद शब्दांना ढकलीत राहातात आणि कवितेचा जन्म होतो.

१९८० नंतरच्या मराठीतील स्त्री कवयित्रींच्या कविता या अधिक धीट, स्त्रीमनाचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व नवा ताजा बदलता दृष्टिकोण व्यक्तवणाऱ्या आहेत. घराची ओढ, हुरहूर व पुरुषी सत्तेच्या धाकाखाली वावरणारी, ओढग्रस्त जीवन जगणारी कालची स्त्री अधिक मोकळी झाली ती या नव्या संदर्भांना आत्मसात करूनच.

— नारायण सुर्वे

प्रस्तावनेतून

मूल्य : ४० रुपये

ISBN 81-86995-85-4







**Publication of Sakhi**




Members of Annapurna Pariwar







